गुरुवार
२६
मार्च २०२६

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : ३७८
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग
# अजिंक्य भारत

आज
श्रीराम नवमी

## थोडक्यात

### देशात पेट्रोल आणि डिझेलचा साठा




**नवी दिल्ली:** मध्यपूर्वेतील सध्याच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, पेट्रोल आणि डिझेलच्या तुटवड्याबाबत पसरलेल्या अफवांमुळे भारतातील अनेक राज्यांमध्ये घबराट निर्माण झाली आहे. सोशल मीडियावर चुकीची माहिती वेगाने पसरल्यामुळे, मध्य प्रदेश आणि गुजरातसारख्या राज्यांमधील पेट्रोल पंपांवर लोकांची प्रचंड गर्दी जमली आहे. या 'घाबरून खरेदी करण्याच्या' प्रकाराच्या पार्श्वभूमीवर, देशातील प्रमुख तेल कंपन्यांनी परिस्थिती स्पष्ट करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. इंडियन ऑइल आणि भारत पेट्रोलियमसारख्या कंपन्यांनी अधिकृत निवेदने जारी करून हे स्पष्ट केले आहे की, देशात इंधनाचा कोणताही तुटवडा नाही आणि इंधन पुरवठा साखळी पूर्णपणे सुरळीतपणे कार्यरत आहे.

### झुबीन गर्ग यांचा मृत्यू अपघाताने बुडून झाला



**सिंगापूर:** १९ सप्टेंबर, २०२५ रोजी, सिंगापूरमध्ये गायक झुबीन गर्ग यांच्या मृत्यूची बातमी पसरताच संपूर्ण देश हादरून गेला. बॉलीवूड गायक आणि आसामी आयकॉन असलेल्या झुबीन यांचा मृत्यू कसा झाला, याबद्दल विविध दावे केले जात आहेत. भारतात या प्रकरणाचा तपास 'खून' म्हणून केला जात आहे, पण आता सहा महिन्यांनंतर सिंगापूरच्या न्यायालयाने आपला निकाल दिला आहे. राज्य न्यायवैद्यक न्यायालयाने बुधवार, २५ मार्च रोजी आपला निकाल देताना म्हटले आहे की, झुबीन गर्ग यांचा मृत्यू अपघाताने बुडून झाला होता. पोलिसांना यात कोणताही घातपाताचा पुरावा आढळला नाही.

### मुंबईचे सह-दुय्यम निबंधक निलंबित

**मुंबई :** शासनाचे ३ कोटी ८२ लाख रुपयांचे मुद्रांक शुल्क (स्टॅम्प ड्युटी) बुडवून नियमबाह्य नोंदणी केल्याप्रकरणी मुंबई ३१ चे सह-दुय्यम निबंधक ईश्वर डी. देवशी यांना निलंबित करण्यात येत असल्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत केली. या प्रकरणाची विभागीय चौकशी येत्या तीन महिन्यांत पूर्ण करून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. आमदार रत्नाकर गुट्टे यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे या गंभीर घोटाळ्याकडे सभागृहाचे लक्ष वेधले होते.

# जगन्नाथ मंदिरातील रत्नांची मोजणी ४८ वर्षांनंतर सुरू!

## जेमोलॉजिस्ट, बँक अधिकारी उपस्थित; प्रत्येक दागिन्याचे डिजिटल छायाचित्रण

**पुरी : दि. २५ वृत्तसंस्था**

येथील श्री जगन्नाथ मंदिराच्या रत्न भांडाराची (खजिन्याची) मोजणी आणि यादी तयार करण्याची प्रक्रिया ४८ वर्षांनंतर बुधवारपासून सुरू झाली. 'रत्न भांडार' हे भगवान जगन्नाथ, बलभद्र आणि देवी सुभद्रा यांच्या मौल्यवान दागिन्यांचा खजिना आहे. श्री जगन्नाथ मंदिर प्रशासनानुसार, हे काम निश्चित शुभ वेळेत (दुपारी १२:०९ ते १:४५ दरम्यान) सुरू करण्यात आले. यात केवळ अधिकृत लोकांनाच प्रवेश देण्यात आला.

या प्रक्रियेमुळे मंदिराच्या दैनंदिन पूजा-अर्चेवर कोणताही परिणाम होणार नाही.



भाविकांना बाहेरील बॅरिकेड्समधून (बाहेरच्या बाजूने) दर्शनाची परवानगी आहे, तर आतील भागात (आतल्या बाजूने) या काळात प्रवेश बंद ठेवण्यात आला आहे. श्री जगन्नाथ मंदिर व्यवस्थापन समितीने तयार केलेल्या नियमांनुसार, प्रथम दररोज वापरल्या जाणाऱ्या दागिन्यांची मोजणी होईल, त्यानंतर रत्न भांडाराचा बाहेरील कक्ष आणि शेवटी आतील कक्ष उघडला जाईल. दागिन्यांच्या मोजणीसाठी राज्य सरकारने एसओपी जारी केली आहे. तीन सदस्यीय समिती प्रक्रियेवर लक्ष ठेवेल. सोने, चांदी आणि इतर मौल्यवान दागिन्यांसाठी वेगवेगळे बॉक्स असतील. १० लोक दागिने बॉक्समध्ये ठेवतील. दंडाधिकारी दररोज खजिन्यातून रत्न भांडाराची चावी घेऊन येतील. प्रक्रिया पूर्ण झाल्यावर त्याच दिवशी परत जमा करतील. ओडिशा उच्च न्यायालयाने २०१८ मध्ये राज्य सरकारला रत्न भांडार उघडण्याचे निर्देश दिले होते. मात्र, ४ एप्रिल २०१८ रोजी न्यायालयाच्या आदेशानुसार (पान २ वर)

### १९७८ मध्ये झाली होती मोजणी

यापूर्वी १३ मे ते २३ जुलै १९७८ दरम्यान झालेल्या मोजणीत ४५४ सोन्याच्या मिश्र वस्तू (१२८.३८ किलो), २९३ चांदीच्या वस्तू (२२१.५३ किलो) आणि अनेक मौल्यवान रत्ने नोंदवली गेली होती. अधिकाऱ्यांनी सांगितले की, यावेळी आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने हे काम लवकर पूर्ण केले जाईल. दोन रत्न विशेषज्ञ (जेमोलॉजिस्ट) ओळखण्यात मदत करत आहेत आणि प्रत्येक वस्तूचे डिजिटल फोटो घेतले जात आहेत. सोन्याचे दागिने पिवळ्या कपड्यात, चांदी पांढऱ्या कपड्यात आणि इतर वस्तू लाल कपड्यात गुंडाळून सहा खास पेट्यांमध्ये ठेवल्या जात आहेत.

# सार्वजनिक कार्यक्रमांत वंदेमातरम अनिवार्य नाही: सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली: दि. २५ वृत्तसंस्था**

सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी राष्ट्रीय गीत वंदे मातरम गाण्याबाबत गृह मंत्रालयाच्या परिपत्रकाविरुद्ध दाखल केलेली याचिका फेटाळली. न्यायालयाने म्हटले की, सार्वजनिक ठिकाणी आणि सार्वजनिक कार्यक्रमांसाठी जारी केलेले हे निर्दे श बंधनकारक नाहीत. परिपत्रकाला आव्हान देणारी याचिका वेळेपूर्वीच दाखल करण्यात आली आहे.



हे प्रकरण मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम पंचोली यांच्या खंडपीठासमोर होते. खंडपीठाने म्हटले की, गृह मंत्रालयाच्या सल्ल्यामध्ये वंदेमातरम न गायल्यास कोणत्याही प्रकारच्या शिक्षेची तरतूद नाही. खंडपीठाने म्हटले, हे दिशानिर्देश केवळ एक प्रोटोकॉल आहेत आणि त्यांचे पालन करणे बंधनकारक नाही. जेव्हा याचिकाकर्त्याविरुद्ध दंडात्मक कारवाई केली जाईल किंवा त्याला गाणे बंधनकारक केले जाईल, तेव्हा आम्ही या सर्व गोष्टींवर लक्ष देऊ. न्यायालय मोहम्मद सईद नूरी यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करत होते. मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत म्हणाले, आम्हाला (पान २ वर)

■ गृह मंत्रालयाने २८ जानेवारी रोजी एक आदेश जारी केला होता. ज्यात म्हटले होते की, आता सरकारी कार्यक्रम, शाळा किंवा इतर औपचारिक आयोजनांमध्ये 'वंदे मातरम' वाजवले जाईल. यावेळी प्रत्येक व्यक्तीने उभे राहणे अनिवार्य असेल. हा आदेश २८ जानेवारी रोजी जारी झाला, परंतु माध्यमांमध्ये याची माहिती ११ फेब्रुवारी रोजी आली. आदेशात स्पष्ट लिहिले आहे की, जर 'वंदे मातरम' आणि 'जन गण मन' एकत्र गायले किंवा वाजवले गेले, तर आधी वंदे मातरम गायले जाईल.

# .... तर खरातला आम्ही डोनाल्ड ट्रम्प यांचा सल्लागार म्हणून नेमले असते!

## मुख्यमंत्र्यांची खरात प्रकरणावरून जोरदार टोलेबाजी



**मुंबई: दि. २५ वृत्तसंस्था**

नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात याच्या काळ्या कर्तृत्वाचे एकामागून एक 'कांड' बाहेर येत असतानाच, आता राज्य सरकारने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. 'श्रद्धा आणि अंधश्रद्धेतील रेषा पुसट झाल्यावर विवेक कसा हरवतो, हे या प्रकरणातून दिसून येते, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत संताप व्यक्त केला. खरातवर आतापर्यंत सात गुन्हे दाखल झाले असून, या प्रकरणाची पाळेमुळे खोदून काढली जातील, असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.

अंतिम आठवडा प्रस्तावावर उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी खरात प्रकरणावरून जोरदार टोलेबाजी केली. ते म्हणाले, जर जादूटोणा करून समस्या सुटल्या असत्या, तर खरातला आम्ही डोनाल्ड ट्रम्प यांचा सल्लागार म्हणून नेमले असते. (पान २ वर)

### फडणवीसांना पदावरुन काढून टाकण्यासाठी अघोरी पूजा?- आव्हाड



अशोक खरातने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात देखील अघोरी पूजा केल्याचा खळबळजनक दावा शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सभागृहामध्ये या भोंदूबाबाने एका पत्रकाराला जीवे मारले असल्याचे देखील सांगितले.

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, या खरातला वाचवण्यासाठी २००७ साली पहिला बळी पत्रकार बाळू तुपे याचा देण्यात आला. त्यावेळी या प्रकरणाची नाशिकमध्ये प्रचंड चर्चा होती. वृत्तपत्रातही याबाबत लेख छापून आले (पान २ वर)

# ममता बॅनर्जी यांचा २३ सरकारी पदांचा राजीनामा !

**कोलकाता: दि. २५ वृत्तसंस्था**



पश्चिम बंगालमध्ये निवडणुकीचा तडाखा जोरदार बसत आहे. बंगाल निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी विविध विभाग आणि संलग्न संस्थांमधील २३ पदांचा राजीनामा दिला.

**निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निर्णय**

बॅनर्जी यांनी राज्य आरोग्य मिशनच्या प्रमुख, राज्य वन्यजीव मंडळाच्या अध्यक्ष, पर्यावरण-पर्यटन सल्लागार मंडळाच्या अध्यक्ष, नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या १२५ व्या जयंती समितीच्या अध्यक्ष आणि पश्चिम बंगाल उर्दू अकादमीच्या नियामक मंडळासह अनेक पदांवरून राजीनामा दिला. राज्य गृह विभागाने एका पत्राद्वारे राज्य सरकारमधील संबंधित विभागांना, मुख्यमंत्र्यांनी नमूद केलेल्या पदांवरील तसेच त्यांच्या पत्रात स्पष्टपणे उल्लेख नसलेल्या इतर सर्व पदांवरील त्यांचे राजीनामे स्वीकारण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. ममता बॅनर्जी यांनी बांगला संगीत मेळा आयोजन समितीच्या प्रमुख आणि राज्य अनुसूचित जाती व जमाती सल्लागार परिषदेच्या प्रमुख पदांवरूनही राजीनामा दिला. त्यांनी राज्य औद्योगिक गुंतवणूक प्रोत्साहन मंडळ आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणातूनही राजीनामा दिला. राज्य गृह विभागाच्या एका पत्रानुसार, मला पत्राची एक प्रत पुढे पाठवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यावरून हे स्पष्ट होते, की ममता बॅनर्जी यांनी सोबत जोडलेल्या यादीत नमूद केलेल्या पदांवरून तात्काळ राजीनामा दिला आहे. या सर्व पदांवरील राजीनामे स्वीकारण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही तात्काळ सुरू करण्याचे निर्देशही विभागांना देण्यात आले आहेत. (पान २ वर)

# पटेल आणि तटकरेंनी पक्षाचा ताबा घेण्याचा प्रयत्न केला - रोहित पवार

**मुंबई: दि. २५ वृत्तसंस्था**



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांनी भारतीय निवडणूक आयोगाला पत्र लिहिले. या पत्रात त्यांनी पक्षाच्या घटनेत बदल झाल्याचा खोटा दावा केला होता. पक्षाचे कार्याध्यक्ष असलेल्या प्रफुल्ल पटेल यांच्या हाती अमर्याद अधिकार सोपवण्याच्या एका पूर्वनियोजित कटानुसार त्यांनी हे पाऊल उचलले होते, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे.

रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, अजित पवारांच्या निधनानंतर अवघ्या १८ दिवसांतच १६ फेब्रुवारी रोजी प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आणि ब्रिजमोहन श्रीवास्तव यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहिले. या पत्रात त्यांनी पक्षाच्या घटनेत सुधारणा करण्यात आल्याचा खोटा दावा केला आणि सर्व अधिकार कार्याध्यक्षांकडे सोपवण्यात यावेत, अशी मागणी केली. या संदर्भात ना सुनेत्रा पवार यांना, ना पार्थ पवार यांना विश्वासात घेण्यात आले होते. त्यानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी भारतीय निवडणूक आयोगाला पत्र लिहून विनंती केली की, अजित पवार यांच्या निधनानंतरच्या संक्रमण काळात (म्हणजेच सुनेत्रा पवार यांनी राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारण्याच्या कालावधीत) अशा कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाऊ नये. सुनेत्रा पवार यांची २६ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादीच्या नवीन राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली. रोहीत पवारांनी १० मार्च आणि २६ फेब्रुवारी या तारखांची काही कागदपत्रे सादर केली. ही कागदपत्रे पटेल आणि तटकरे यांच्या स्वाक्षऱ्यांसह निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात आल्याचे मानले जाते. या कागदपत्रांमध्ये नमूद करण्यात आले होते की, राष्ट्रीय अध्यक्ष अनुपस्थित असताना सर्व अधिकार राष्ट्रीय कार्याध्यक्षांकडे असतील आणि सर्व (पान २ वर)

# पंतप्रधान नरेंद्र मोदी ठरले जगातील सर्वात लोकप्रिय नेते!

**नवी दिल्ली: दि. २५ वृत्तसंस्था**

जागतिक राजकारणात भारताचा दबदबा पुन्हा एकदा सिद्ध झाला असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जगातील सर्वात लोकप्रिय नेते ठरले आहेत. अमेरिकेतील प्रसिद्ध डेटा इंटेलिजन्स फर्म 'मॉर्निंग कन्सल्ट'ने प्रसिद्ध केलेल्या ताज्या सर्वेक्षणात ६८ टक्के रेटिंगसह मोदींनी अव्वल स्थान पटकावले आहे. विशेष म्हणजे, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासह अनेक पाश्चिमात्य नेत्यांना मोदींनी मोठ्या फरकाने मागे टाकले आहे.

### डोनाल्ड ट्रम्प यांनाही मोदींनी टाकले मागे

६८ टक्के लोकांनी मोदींच्या नेतृत्वावर विश्वास दर्शवला आहे, तर २६ टक्के लोकांनी नाराजी व्यक्त केली आहे. ६ टक्के लोकांनी कोणतेही मत दिलेले नाही. मोदींनंतर स्वित्झर्लंडचे गाय पारमेलिन ६२ टक्के रेटिंगसह दुसऱ्या क्रमांकावर आहेत. दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष ली जे-म्युंग हे देखील ६२ टक्के (पान २ वर)




**दक्षतेचे पाऊल** | **राज्य सरकारचा मोठा निर्णय**

# शाळांमध्ये आता 'डिजिटल सेफ्टी'चे धडे?

**मुंबई: दि. २५ वृत्तसंस्था**

अल्पवयीन मुलांच्या सोशल मीडिया वापरावर नियंत्रण आणण्यासाठी शासन आता सतर्क झालं आहे. सोशल मीडियामुळे वेळोवेळी समोर येणाऱ्या घटनांवर ताबा मिळावा यासाठी सरकार आता पावलं उचलताना दिसत आहे. सरकारने नेमलेल्या टास्क फोर्सच्या अहवालानंतरच ठोस धोरण किंवा कायदा तयार केला जाईल. १८ वर्षांखालील युवाशक्तीच्या सोशल मीडिया, मोबाईल वापरावर सरसकट बंदी घालणे योग्य ठरणार नाही. शिक्षण व्यवस्थेत इंटरनेटचा महत्त्वाचा उपयोग आहे, अशी माहिती माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी विधानसभेत दिली. सदस्य राजेश पवार यांनी सोशल मीडिया, ऑनलाइन गेम्स




आणि डिजिटल प्लॅटफॉर्मच्या वाढत्या वापरामुळे अल्पवयीन मुलांवर होणाऱ्या परिणामांबाबत लक्षवेधी उपस्थित केली होती.

सोशल मीडियावर सरसकट बंदी हा उपाय नसून, शिक्षण आणि तंत्रज्ञान यांचा समतोल राखणे अत्यावश्यक असल्याचे आशिष शेलार यांनी स्पष्ट केले. एका बाजूला डिजिटल प्लॅटफॉर्म्समुळे शिक्षण, संवाद आणि नवकल्पनांना चालना मिळत असताना, दुसऱ्या बाजूला त्याचा अतिरेकी वापर टाळणे, मुलांचे संरक्षण करणे आणि जबाबदार डिजिटल सवयी विकसित करणे तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळेच एज व्हेरिफिकेशन यंत्रणा, स्क्रीन टाईम नियंत्रण, सायबर सुरक्षा नियम, तसेच शाळा स्तरावर डिजिटल सेफ्टी शिक्षण आणि जनजागृती यांसारख्या उपाययोजनांवर गंभीरपणे विचार सुरू असल्याचे शेलार म्हणाले. संतुलित दृष्टिकोन ठेवणे आवश्यक आहे. टास्क फोर्सला तीन महिन्यांचा कालावधी देण्यात आला असून, त्याच्या अहवालानंतर राज्य शासन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियामक चौकटीचा अभ्यास, माहिती तंत्रज्ञान कायदे सुधारणा, एज व्हेरिफिकेशन, स्क्रीन टाइम लिमिट, तसेच शाळांमध्ये डिजिटल सेफ्टी शिक्षण यासारख्या उपाययोजनांवर निर्णय घेईल. तसेच विद्यार्थ्यांसह शिक्षक आणि पालकांसाठीही डिजिटल सुरक्षिततेबाबत प्रशिक्षण आणि जनजागृती कार्यक्रम राबवण्याबाबत विचार सुरू असल्याचे मंत्री शेलार यांनी सांगितले.

### टास्क फोर्स स्थापन

इतर राज्यांनी सोशल मीडिया वापर बदीसंबंधी केवळ घोषणा केल्या असून, ठोस कायदे अद्याप अस्तित्वात आणलेले नाहीत; मात्र महाराष्ट्राने या विषयाकडे गांभीर्याने पाहत २ फेब्रुवारी २०२६ रोजी टास्क फोर्स स्थापन केला आहे. या टास्क फोर्सकडून अल्पवयीन मुलांचा सोशल मीडिया वापर, त्याचे मानसिक, शारीरिक व शैक्षणिक परिणाम तसेच डिजिटल जाहिरातीचा प्रभाव यांचा अभ्यास करण्यात येत आहे. तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियमांचा अभ्यास करून योग्य कायदेशीर, तांत्रिक व प्रशासकीय उपाय सुचवले जाणार आहेत. १८ वर्षांखालील युवाशक्तीच्या सोशल मीडिया किंवा मोबाईल वापरावर सरसकट बंदी घालणे योग्य ठरणार नाही, कारण शिक्षण व्यवस्थेत इंटरनेटचा महत्त्वाचा उपयोग आहे.



# राज्य विधिमंडळ अर्थसंकल्पीय अधिवेशन विशेष



## पान 1 वरून...

### जगन्नाथ मंदिरातील रत्नांची...

जेव्हा १६ लोकांचे पथक रत्न भांडाराच्या चेंबरपर्यंत पोहोचले, तेव्हा त्यांना रिकाम्या हाताने परत फिरावे लागले, कारण रत्न भांडाराची चावी हरवल्याचा दावा करण्यात आला होता. चावी न मिळाल्याने गोंधळ झाला, त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री नवीन पटनायक यांनी ४ जून २०१८ रोजी न्यायिक चौकशीचे आदेश दिले. चौकशी समितीने २९ नोव्हेंबर २०१८ रोजी चावीशी संबंधित आपला अहवाल सरकारला सादर केला, परंतु सरकारने तो सार्वजनिक केला नाही आणि चावीचा काहीही पत्ता लागला नाही. २०१८ मध्ये तत्कालीन कायदा मंत्री प्रताप जेना यांनी विधानसभेत सांगितले होते की, रत्न भांडारात १२,८३१ भरी (एक भरी ११.६६ ग्रॅमच्या बरोबर) पेक्षा जास्त सोन्याचे दागिने आहेत. यांमध्ये मौल्यवान खडे जडवलेले आहेत. तसेच २२,१५३ भरी चांदीची भांडी आणि इतर वस्तू आहेत. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये जगन्नाथ मंदिर व्यवस्थापन समितीने राज्य सरकारला शिफारस केली होती की, रत्न भांडार २०२४ च्या वार्षिक रथयात्रेदरम्यान उघडले जावे.

### सार्वजनिक कार्यक्रमांत वंदेमातरम...

ती नोटीस दाखवा ज्यात तुम्हाला राष्ट्रीय गीत वाजवण्यासाठी भाग पाडले गेले आहे. तुम्ही एक शाळा चालवता, ती मान्यताप्राप्त आहे की नाही हे देखील आम्हाला माहीत नाही. यावर त्यांच्या वकिलांनी सांगितले, जो व्यक्ती वंदेमातरम गाण्यास किंवा राष्ट्रगीताच्या वेळी उभे राहण्यास नकार देतो, त्याच्यावर नेहमीच खूप मोठा भार असतो. सल्ला देण्याच्या बहाण्याने लोकांना सोबत गाण्यास भाग पाडले जाऊ शकते. यावर न्यायमूर्ती बागची म्हणाले की, हा केवळ एक दृष्टिकोन आहे आणि लोक याच्याशी असहमत असू शकतात. जर तुमच्या विरोधात कोणती कारवाई झाली, नोटीस आली, तर तुम्ही पुन्हा न्यायालयात येऊ शकता. सध्या ही याचिका भेदभावाच्या एका अस्पष्ट भीतीशिवाय दुसरे काहीही नाही.

### .... तर खरातला आम्ही डोनाल्ड...

इतकेच कशाला, निवडणुकांसाठी प्रचारसभा घेण्याचीही गरज उरली नसती; एका जागी बसूनच निवडणुका जिंकता आल्या असत्या, या उपरोधिक विधानातून त्यांनी अंधश्रद्धेच्या आहारी जाणाऱ्या मानसिकतेवर प्रहार केला. महाराष्ट्राला संतांची आणि थोर समाजसुधारकांची मोठी परंपरा आहे. संतांनी नेहमीच अंधश्रद्धेवर प्रहार केला आहे, याची आठवण करून देत फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र धर्म वाढलाच पाहिजे, पण भोंदूगिरीला येथे थारा मिळणार नाही. जादूटोणा विरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेले नियम आता अंतिम टप्प्यात असून लवकरच ते लागू केले जातील, अशी महत्त्वाची माहिती त्यांनी सभागृहात दिली. अशोक खरात प्रकरणाची व्याप्ती मोठी असून, अजूनही अनेक 'सूरस कथा' आणि धक्कादायक माहिती समोर येणे बाकी आहे. मुख्यमंत्र्यांनी जनतेला आणि लोकप्रतिनिधींना आवाहन केले की, ज्यांच्याकडे या संदर्भात काहीही माहिती असेल, त्यांनी ती तातडीने शासनाकडे द्यावी. या व्यक्तीला अशी शिक्षा करायची आहे की, ज्यामुळे इतरांनाही जरब बसली पाहिजे.

**फडणवीसांना पदावरुन काढून टाकण्यासाठी अघोरी पूजा?- आव्हाड**

होते. त्यामुळे अशोक खरात कोण हे पोलिसांना माहिती नव्हते, अशातला भाग नव्हता. या सगळ्या आरोपींना वाचवण्यासाठी पोलिसांनी किती पैसे घेतले ते फक्त देवेंद्र फडणवीसांना माहिती आहे. अनेक बडे अधिकारी खरातच्या समोर लोटांगण घ्यायचे, असा दावा त्यांनी केला.अशोक खरातच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीला सुरुंग लावण्यासाठी काहीजण प्रयत्न करत होते. हे सर्वजण अशोक खरातकडे पूजा घालायला गेले होते. वेळ आल्यावर मी त्यांचे नाव उघड करेन. ही सगळी माहिती सहा महिन्यांपूर्वी मुख्यमंत्र्यांना मिळाली होती. या नेत्यांच्या खरातसोबत बैठका झाल्या होत्या. तेव्हा अशोक खरात म्हणाला होता, मला थोडे दिवस द्या, मुख्यमंत्री घरी गेलेले असतील,'असा मोठा दावा जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.

### पटेल आणि तटकरेंनी पक्षाचा...

निर्णय त्यांच्याद्वारेच घेतले जातील. त्या पत्राने सर्व अधिकार प्रभावीपणे कार्याध्यक्षामध्ये एकवटले होते, असा दावा त्यांनी केला. तसेच, केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांची विधाने संशयास्पद असल्याचे रोहित पवार यांनी आरोप केला की, राष्ट्रवादी काँग्रेसचे नियंत्रण आपल्या हाती घेण्यासाठी काही नेत्यांमध्ये एक पूर्वनियोजित कट शिजला होता. गोयल यांनी सुरुवातीला प्रफुल्ल पटेल हे पक्षाचे अध्यक्ष झाल्याचे प्रतिपादन केले होते, मात्र नंतर आपली ती माहिती चुकीच्या माहितीवर आधारित असल्याचे स्पष्ट केले होते.

### ममता बॅनर्जी यांचा २३...

ममता भवानीपूरमधून उमेदवार

ममता बॅनर्जी दक्षिण कोलकातामधील भवानीपूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. त्यांच्या विरोधात राज्याचे विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी निवडणूक लढवत आहेत. बंगालमध्ये मतदान दोन टप्प्यांत (२३ एप्रिल आणि २९ एप्रिल, २०२६) होणार असून, निवडणुकीचा निकाल ४ मे रोजी जाहीर केला जाईल.

### पंतप्रधान नरेंद्र मोदी ठरले जगातील...

रेटिंगसह तिसऱ्या क्रमांकावर आहेत, मात्र त्यांची 'डिस्प्रुव्हल' रेटिंग अधिक आहे. कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी ५५ टक्के रेटिंगसह सातव्या स्थानावर आहेत. दुसरीकडे, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन हे केवळ १७ टक्के रेटिंगसह या यादीत तळाला आहेत. सध्या अमेरिका आणि इराणमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची रेटिंग ३९ टक्क्यांपर्यंत खाली आली आहे. ५५ टक्के अमेरिकन नागरिकांनी त्यांच्या कामावर नाराजी व्यक्त केली आहे.

**डिजिटल विश्वातही विक्रम :** पंतप्रधान मोदींच्या लोकप्रियतेचा प्रत्यय सोशल मीडियावरही येत आहे. नुकतेच इन्स्टाग्रामवर १०० दशलक्ष (१० कोटी) फॉलोअर्सचा टप्पा पार करणारे ते जगातील पहिले जागतिक नेते ठरले आहेत. २०१४ मध्ये इन्स्टाग्रामवर पदार्पण केल्यानंतर गेल्या दशकात त्यांचे खाते जगातील सर्वात सक्रिय डिजिटल स्पेस बनले आहे.

## अखंड हरिनाम सप्ताह आणि भागवत कथा हे वारकरी संप्रदायातील जीवनाचे केंद्र- ह.भ.प. हरीष महाराज वाघ

**अकोला :** अखंड हरिनाम सप्ताह आणि भागवत कथा हे वारकरी संप्रदायातील आध्यात्मिक जीवनाचे केंद्र असून, ते मानवाला आत्मिक शांती, मोक्ष आणि भक्तीचा मार्ग दाखवतात. सात दिवस चालणाऱ्या या उत्सवात संत विचारांचे, भागवत पुराणाचे श्रवण आणि अखंड नामस्मरणामुळे मन शुद्ध होऊन आध्यात्मिक प्रगती होते, ज्यामुळे दु:ख नष्ट होऊन जीवन सत्कर्मी लागते असे आध्यत्मिक विचार भागवताचार्य ह.भ. प.श्री हरीष महाराज वाघ पाटील यांनी स्थानिक लहान उमरी येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई ज्योतिराव फुले सभागृह येथे अखंड हरिनाम सप्ताह आणि भागवत कथा दरम्यान असे आध्यात्मिक विचार व्यक्त केले. काल्याचे कीर्तन हे मानवी जीवनातील सर्वोच्च भक्ती, ऐक्य आणि आनंदाचा सोहळा आहे.काला म्हणजे सर्वांनी आणलेल्या अन्नाचे मिश्रण करून एकत्र जेवणे. हे अहंकाराचा नाश करून सर्वांना समान मानण्याची भावना शिकवते. असे मौलिक विचार व्यासपीठ नेतृत्व श्री ह.भ.,प.ज्ञानेश्वर महाराज नावकार यांनी आपल्या काल्याच्या कीर्तनातुन व्यक्त केले. कार्यक्रमाचा आरंभ चैत्रशुद्ध प्रतिपाद गुरुवार दिनांक १९ मार्च २०२६ रोजी सकाळी नऊ वाजता श्री जयंतराव मसने,महानगर अध्यक्ष भाजपा अकोला व अर्चना मसने माजी. महापौर, म.न.पा. अकोला ,यांच्या हस्ते कलश पूजनाने झाला. या आनंदमय सोहड्याला मृदंगाचार्य ह.भ.प. ज्ञानेश्वर यादगिरे ह.भ.प.विजय पखाले, ह.भ.प. बाळूभाऊ सुरपटाने, टाळकळी मध्ये विष्णु महारसज ढगे, शिवा महाराज जंगले, सोपान महाराज माजरी,निळकंठ जऊळकार,अनिल मोहळे,दिनकर मोहळे, चंद्रकांत पारधी, रमेश खिरोडकर, प्रभाकर घाटोळे, रमेश मानकर यांची साथसंगत लाभली.

## नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी स्वतंत्र नदी प्राधिकरण

### मंत्री पंकजा मुंडे यांची विधानसभेत माहिती

मुंबई, दि. २५ वृत्तसंस्था



राज्यातील नद्यांमधील वाढते प्रदूषण रोखण्यासाठी आणि त्यांच्या संवर्धनासाठी राज्य सरकार आता एक मोठे पाऊल उचलत आहे. केवळ नद्यांचे प्रदूषण नियंत्रण आणि पुनरुज्जीवनावर लक्ष केंद्रित करण्यासाठी स्वतंत्र नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण स्थापन करण्याचा निर्णय अंतिम टप्प्यात असल्याची माहिती पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी आज विधानसभेत दिली. आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी उपस्थित केलेल्या अर्धा तास चर्चेला त्या उत्तर देत होत्या.

**नद्यांची अवस्था चिंताजनक: ९६ टक्के सांडपाणी थेट पात्रात**

राज्यातील नद्यांच्या सद्यस्थितीवर बोलताना मंत्री पंकजा मुंडे यांनी धक्कादायक वास्तव मांडले. त्या म्हणाल्या की, ''सध्या राज्यातील सुमारे ९६ टक्के सांडपाणी कोणत्याही प्रक्रियेविना थेट नद्यांमध्ये सोडले जात आहे. औद्योगिक सांडपाणी, शहरातील सांडपाणी आणि शेतीतील रासायनिक खतांचा वापर यामुळे विदर्भ आणि मराठवाड्यासारख्या भागातील नद्यांचे प्रदूषण ही एक गंभीर समस्या बनली आहे.'' मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर आणि सोलापूर यांसारख्या मोठ्या शहरांमधील नद्यांमध्ये प्रदूषणाचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे त्यांनी नमूद केले.

**चंद्रपूरच्या इरई आणि झरपट नद्यांचे होणार पुनरुज्जीवन**

चंद्रपूरमधील इरई आणि झरपट या दोन्ही नद्यांच्या प्रदूषणाचा मुद्दा लक्षात घेऊन, नवीन प्राधिकरण स्थापन झाल्यानंतर पहिल्याच टप्प्यात या नद्यांचा समावेश केला जाईल. या नद्यांच्या स्वच्छतेसाठी प्राधान्याने काम करून त्यांचा कायापालट केला जाईल, असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.

**नाग नदी प्रकल्पाला गती; १९२६ कोटींचा आराखडा**

नागपूरमधील प्रसिद्ध नाग नदी पुनरुज्जीवनासाठी सरकारने १९२६.९९ कोटी रुपयांच्या भव्य प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. या प्रकल्पाचे सर्वेक्षण आणि निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे. सध्या १३ सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कार्यरत असून आणखी ३ नवीन प्रकल्प उभारण्याचे प्रस्तावित असल्याचे मंत्री मुंडे यांनी सांगितले.

**२०७० पर्यंत कार्बनमुक्त महाराष्ट्रचे उद्दिष्ट**

वातावरणीय बदलांच्या गंभीर परिणामांवर भाष्य करताना मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले की, राज्य सरकार वृक्षारोपण, प्रदूषण नियंत्रण आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्यावर भर देत आहे. २०७० पर्यंत देशाला कार्बनमुक्त करण्याच्या पंतप्रधानांच्या उद्दिष्टाला गती देण्यासाठी महाराष्ट्र शासन कटिबद्ध असून, नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण हे या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल ठरेल.

## अंमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी 'ऍप'चा वापर

**पुणे :** शहरात होणारी अमली पदार्थांची तस्करी आणि विक्री रोखण्यासाठी पुणे पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. अमली पदार्थांची तस्करी अणि विक्री रोखण्यासाठी पोलिसांकडून आता ऍपचा (उपयोजन) वापर करण्यात येणार असून, या ऍपवर माहिती देणाऱ्या नागरिकांचे नाव गोपनीय ठेवण्यात येणार आहे. कारवाई करणाऱ्या पोलीस पथकातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना तक्रारदाराचे नाव समजणार नाही, याची काळजी घेण्यात आली आहे, अशी माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिली. शहरातील अमली पदार्थांची तस्करी आणि विक्रीवरील कारवाई आणखी तीव्र करण्यात येणार आहे. या कारवाईत नागरिकांकडून देण्यात येणाऱ्या माहितीचा वापर करण्यात येणार आहे. त्यासाठी खास ऍप तयार करण्यात येणार आहे.

## महिलांची डिजिटल बदनामी ठरणार गुन्हा

### भारतीय न्याय संहिता महाराष्ट्र सुधारणा विधेयक कायदा एकमताने विधान परिषदेत मंजूर

मुंबई, दि. २५ वृत्तसंस्था




सोशल मीडिया किंवा इतर कोणत्याही डिजिटल माध्यमाद्वारे महिलांची बदनामी करणे, अश्लील व्हिडिओ किंवा फोटो प्रसारित करणे आता महागात पडणार आहे. राज्य सरकारने अशा विकृत कृत्यांना थेट लैंगिक गुन्ह्यांच्या श्रेणीत समाविष्ट केले असून, यासाठी तीन वर्षांपर्यंतच्या कारावासाची तरतूद असणारे भारतीय न्याय संहिता महाराष्ट्र सुधारणा विधेयक २०२६ बुधवारी विधान परिषदेत एकमताने मंजूर करण्यात आले.

आजच्या डिजिटल युगात व्हॉट्सअॅप, फेसबुक, ई-मेल किंवा इतर सोशल प्लॅटफॉर्मवर महिलांना लक्ष्य करण्याचे प्रमाण वाढले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विधेयकावर बोलताना स्पष्ट केले की, ''महिलांबाबत आक्षेपार्ह मजकूर पसरवणे किंवा त्यांना डिजिटल माध्यमांतून धमकी देणे हा आता गंभीर गुन्हा मानला जाईल. केंद्र सरकारच्या बीएनएस कायद्यात ज्या त्रुटी होत्या, त्या दूर करण्यासाठी राज्याने या महत्त्वाच्या दुरुस्त्या सुचवल्या आहेत.''

या विधेयकातील दुसरा सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे ॲसिड हल्ल्यातील पीडित महिलांची ओळख आता गुप्त ठेवली जाणार आहे. यामुळे पीडितेच्या सामाजिक प्रतिष्ठेचे रक्षण होण्यास मदत होईल. या दुरुस्त्या आता अंतिम मंजुरीसाठी केंद्राकडे पाठवण्यात येणार आहेत.

**मुले आणि पुरुषांवरील अत्याचारावरही भाष्य**

या चर्चेदरम्यान आमदार हेमंत पाटील यांनी लहान मुले आणि पुरुषांवर होणाऱ्या अत्याचाराचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, महिलांप्रमाणेच लहान मुले आणि पुरुषांवरील अत्याचाराच्या घटनांवर पोक्सो आणि इतर कायद्यांतर्गत तात्काळ कारवाई करण्याची तरतूद आधीच अस्तित्वात आहे.

शिवसेना (ठाकरे गट) आमदार सचिन अहिर यांनी या गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी विशेष तपास यंत्रणा नेमण्याची सूचना केली, जेणेकरून अशा प्रकरणांचा निकाल जलद गतीने लागेल. या चर्चेत अनिल परब, प्रविण दरेकर, मनिषा कायंदे यांसह अनेक सदस्यांनी सहभाग नोंदवत या बदलांचे स्वागत केले.

## गृहनिर्माण घोटाळ्याची महिनाभरात चौकशी

**मुंबई :** नाशिक महापालिका क्षेत्रात गृहनिर्माण नियमांचे उल्लंघन करून गरीबांच्या घरांसाठी राखीव असलेल्या जागेवर डल्ला मारणाऱ्या विकासक आणि अधिकाऱ्यांविरुद्ध राज्य सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी करून एका महिन्यात अहवाल सादर केला जाईल आणि दोषींवर कडक कारवाई केली जाईल. आमदार देवयानी फरांदे यांनी यासंदर्भात लक्षवेधी मांडली होती. नियमानुसार ४००० चौरस मीटरपेक्षा मोठ्या प्रकल्पांमध्ये २० टक्के घरे आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न गटासाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे. मात्र, नाशिकमध्ये काही विकासकांनी शासकीय अधिकाऱ्यांशी संगनमत करून भूखंडांचे छोटे-छोटे तुकडे दाखवले आणि बनावट नकाशे सादर करून या नियमाला बगल दिली. या घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि पोलीस आयुक्त यांची समिती नेमण्यात आली आहे.

## महाराष्ट्रात पेट्रोल, डिझेलचा पुरेसा साठा

मुंबई, दि. २५ वृत्तसंस्था

महाराष्ट्रात पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. राज्यात पेट्रोल-डिझेलचा पुरवठा नियमित आहे. नागरिकांनी अफवांकडे दुर्लक्ष करावे; असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील जनतेला केले आहे. राज्यात काही ठिकाणी पेट्रोल-डिझेल संपल्याच्या अफवा पसरल्या. यानंतर पेट्रोल, डिझेल भरून घेण्यासाठी पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. अनेक पेट्रोल पंपांवर गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी एक्स पोस्ट अर्थात ट्वीट करून जनतेला विश्वासात घेतले आहे. पश्चिम आशियात अमेरिका आणि इस्रायल विरुद्ध इराण असे युद्ध २८ फेब्रुवारी २०२६ पासून सुरू आहे. अमेरिका आणि इस्रायलच्या हवाई हल्ल्यांना इराणकडून प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न सुरू आहे. युद्धाने २६ व्या दिवसांत प्रवेश केला आहे. होर्मुझ सामुद्रधुनी शत्रू देशांसाठी बंद ठेवणार, असा इशारा इराणने दिला आहे. जे युद्धात शत्रू अथवा शत्रूचे सहकारी म्हणून सहभागी झालेले नाहीत त्यांच्या जहाजांसाठी होर्मुझ सामुद्रधुनी खुली आहे. फक्त इराण सरकारशी समन्वय साधून आणि नियमांचे पालन करत संबंधित देशांच्या जहाजांना होर्मुझ सामुद्रधुनीतून प्रवास करता येईल असेही इराणने जाहीर केले. आहे. भौगोलिक स्थितीचा फायदा घेत इराणने युद्ध होर्मुझ सामुद्रधुनी परिसरावर नियंत्रण ठेवले आहे. जगाच्या एकूण तेल व्यापारापैकी २० टक्के व्यापार होर्मुझ सामुद्रधुनीच्या मार्गाने जाते. यामुळे होर्मुझद्वारे केलेल्या कोंडीचा परिणाम हळू हळू जगावर दिसू लागला आहे. या परिणामांच्या बातम्या येत असतानाच राज्यात पेट्रोल-डिझेल संपल्याच्या अफवा पसरण्यास सुरुवात झाली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. राज्यात पेट्रोल-डिझेलचा पुरवठा नियमित आहे. नागरिकांनी अफवांकडे दुर्लक्ष करावे; असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

## पोलीस अधिक्षक अर्चित चांडक अकोला वैभव पुरकाराने सन्मानित



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २५ :** माऊली फांउडेशन तर्फे वार्षिक पुस्काराची घोषणा गुढीपाडवाच्या मुहर्तावर करण्यात आली. पोलीस अधिक्षक अर्चित चांडक यांच्या कार्यकाळात कायदा -सुरक्षा तत्पर राहून आरोपीना त्वरीत पायबंद घातला गेला. पोलीस विभागावर विश्वासहर्ता उंचावली. यामुळे अकोलाजिल्हातील गुन्हेगारी प्रवृत्तीस पायबंद घातल्या घेतला.

या कर्तव्यदक्ष कार्याची दखल माऊली फांउडेशने घेवून पोलीस अधिक्षक अर्चित चांडक यांना अकोला -वैभव २०२६ पुरस्काराने त्यांच्या कार्यालयात वैभवपुर्ण स्वरुपात मेमोटो, सन्मानपत्र,पुरस्कार राशी १ ,१११/शाल पुष्पगुच्छ देवून गौरवपुर्ण, भरीव सत्काराने फांउडेशन तर्फे गुढीपाडव्याचे औचित्य साधून सन्मानित करण्यात आले.

पोलीस अधिक्षक यांनी फांउडेशनच्या सत्काराचा आदर पुर्ण स्विकार करून आभार मानले परंतु धनादेश स्वतः न स्विकारता पोलीस कल्याण निधी फंडास हस्तातंरीत केला. यावेळी सुद्धा पोलीस बांधवा प्रती समपर्ण भावना व्यक्त केली.

यावेळी फांउडेशनचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मांडेकर, उपाध्यक्ष, सैय्यद रब्बानी, सचिव अशोक पारधी, संचालक मंगेश लांडे, अजय बांडी, गोपालसिंह गौत्तम, संतोष देशमुख आदि मान्यवर उपस्थित होते.

## लोकस्वातंत्र्यकडून पत्रकारांच्या मागण्यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २५ :** आचार्य बाळशास्त्री जांभेकर सन्मान योजनेची सभा घेऊन पेन्शनची प्रकरणे तातडीने मंजूर करावी. कल्याण योजनांमधील अटींमध्ये शिथीलता देऊन सुचविलेल्या सुधारणा व्हाव्यात व ईतर मागण्यांच्या पूर्ततेसंबधी मा. मुख्यमंत्र्यांना तसेच महासंलकांनाही लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे राष्ट्रीय तथा संस्थापक अध्यक्ष संजय एम.देशमुख यांनी २० मार्च २०२६ रोजी पत्राद्वारे कळविले आहे. पत्रकारांच्या गंभीर प्रश्नांवर चर्चा होऊन लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघ या समाजाभिमुख राष्ट्रीय संघटनेच्या झालेल्या सर्वसाधारण सभेत खालील मागण्यांचे ठराव सर्वसंमतीने मंजूर करण्यात आलेले आहेत. यामध्ये १) सन्मान योजनेतील सर्व पेन्शन प्रकरणे सभा घेऊन मंजूर करावीत. २) पत्रकार संरक्षण कायद्याची अंमलबजावणी सुरू करावी. ३) पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेता कल्याण मंडळांची घोषणा ही दिशाभूल ठरू नये. ४) पत्रकार कल्याण योजनांसाठी संघटनेकडून मागीतलेल्या दुरूस्त्यांचा सन्मान ठेऊन सुधारणा व्हाव्यात तथा अटी शिथील कराव्यात.(५) लघू-मध्यम वृत्तपत्रांच्या जाहिरातींबाबतीत जिल्हा आणि शहर पातळीवर स्थानिक स्वराज्य संस्थांमधील रोस्टर पध्दतीच्या कडक अंमलबजावणीचे आदेश द्यावेत. ६) रेल्वे प्रवास योजना सवलत सुरू करण्याची शिफारस केन्द्र सरकारकडे करावी.७) राज्य परिवहन महामंडळाच्या शिवशाही शयनायन, शिवाई आणि येणाऱ्या नव्या सर्वच बसमधून प्रवास सवलत मंजूर करावी. ८) अधिस्वीकृती आणि कल्याण योजनांच्या समित्यांवर ईतर संघटनांना सुध्दा प्रतिनिधित्व देऊन समता आणि पारदर्शकता ठेवावी.

मागण्यांचा विचार करून पत्रकारितेची खडतर सेवासाधना करतांना मानसिक आणि आर्थिक दृष्ट्या हतबल झालेल्या पत्रकारांना सावरण्यासाठी आपण योग्य वेळी मदतीचा हात द्यावा. यासाठी सर्वच पत्रकार आपणासही कर्तव्याची साथ देण्यासाठी निश्चितच कटीबध्द राहतील अशा भावना संजय देशमुख यांनी मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रातून व्यक्त केलेल्या आहेत.

## मराठा महासंघाच्या वतीने अण्णासाहेब पाटील यांना अभिवादन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २५ :** अखिल भारतीय मराठा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष कै.आमदार अण्णासाहेब पाटील यांचे पुण्यतिथी निमित्त मराठा महासंघाचे अकोला जिल्हा कार्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रसिद्ध चर्मरोग तज्ञ डॉक्टर प्रफुल्ल वाघाडे यांचे हस्ते मराठा महासंघाचे संस्थापक कै. आमदार अण्णासाहेब पाटील यांचे प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर सर्व उपस्थित पदाधिकारी यांनी पुष्प वाहून अभिवादन केले.तसेच अमर रहे !अमर रहे! अण्णासाहेब पाटील अमर रहे! अशा घोषणा देण्यात आल्या. मराठा समाजासाठी केलेले कार्य प्रेरणादायी असून त्यांच्या कार्याची प्रेरणा सर्वांनी घ्यावी. असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष श्री राम मुळे यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉक्टर प्रफ ुल्ल वाघाडे, अमरावती विभागीय अध्यक्ष श्री सुरेश ठाकरे , अकोला जिल्हाध्यक्ष, निळोबा ढोरे, महिला जिल्हाध्यक्ष सुनीताताई ताथोड यांनी अण्णासाहेब पाटील यांच्या उल्लेखनीय कार्यावर प्रकाश टाकला. तसेच याप्रसंगी अण्णासाहेब पाटील यांच्या पुण्यतिथी निमित्त जिल्हा सामान्य रुग्णालयात आयोजित रक्तदान शिबिरात रक्तदान केलेल्या रक्तदात्यांचे डॉक्टर प्रफ ुल्ल वाघाडे यांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले व रक्तदान केल्याचे जिल्हा सामान्य रुग्णालयाचे प्रमाणपत्र त्यांना वाटप करण्यात आले. याप्रसंगी डॉक्टर प्रफुल्ल वाघाडे ,राम मुळे, सुरेश ठाकरे ,निळोबा ढोरे, महिला जिल्हाध्यक्ष सुनीता ताई ताथोड ,श्री दिलीप देशमुख, अभिजीत ढोरे ,शिवशंकर भेंडे, डॉक्टर प्रशांत घावडे, शुभम शेंडे ,लहू जाधव ,लखन चव्हाण, मयूर शिंदे ,विशाल राऊत , विठ्ठल येवले ,सचिन सदाफुले, निलेश पाथरकर, गणेश बाठे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन जिल्हाध्यक्ष श्री निळोबा ढोरे यांनी तर आभार प्रदर्शन श्री दिलीप देशमुख यांनी केले.

**घोषणा** | **ॲड. आशिष शेलार यांची माहिती**

## फोर्ट कंझर्वेशन प्राधिकरणाबाबत अभ्यास करण्यासाठी कमिटी

मुंबई, दि. २५ वृत्तसंस्था



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ज्या बारा किल्ल्यांना युनोस्कोचा दर्जा मिळाला त्यासह राज्य शासनाकडून संरक्षित आणि असंरक्षित जे गड किल्ले आहेत या किल्ल्यांच्या जतन व संवर्धनासाठी अधिक निधी उपलब्ध व्हावा तसेच त्यासाठी ''फोर्ट कंझर्वेशन प्राधिकरण'' अर्थात ''किल्ले संवर्धन प्राधिकरण'' असावे का ? याबाबत अभ्यास करण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येईल, अशी घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री अँड आशिष शेलार यांनी आज विधानसभेत केली.

विधानसभेत आज नियम २९३ अंतर्गत आमदार अतुल भातखळकर यांनी चर्चा उपस्थित केली होती. या चर्चेत आमदार विक्रम सातपुते, बाबाजी काळे, दीपक केसरकर आणि अन्या सदस्यांनी देखील सांस्कृतिक कार्य विभागासंदर्भात विविध प्रश्न, सूचना आणि विभागाच्या उपक्रमांबाबत प्रशंसा केली. या चर्चेला मंत्री आशिष शेलार यांनी उत्तर दिले.

या उत्तरात मंत्री आशिष शेलार यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बारा गड किल्ल्यांना मराठा मिलिटरी लँडस्केप ऑफ इंडिया, असा दर्जा युनोस्कोने दिला. त्या सगळ्यांसाठी एक स्थळ व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला असून त्या माध्यमातून या बारा गड किल्ल्यावर माहिती फलक, जन सुविधा केंद्र माहिती केंद्र आणि इतर पर्यटन सुविधा शासनाकडून देण्यात येणार आहेत. भविष्यामध्ये गणेशोत्सव हा युनोस्कोच्या अमूर्त वारसा नामांकनामध्ये जावा यासाठीची प्रक्रिया शासनाने सुरू केली आहे. यावर्षी तर पांडुरंगाची वारी हा प्रस्ताव शासन घेऊन जाणार आहे, अशी माहिती शेलार यांनी दिली. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने विशेष प्रयत्न केल्यामुळे आपली दिवाळी सुद्धा युनेस्कोच्या अमूर्त वारसा नामांकनामध्ये समाविष्ट झाली हे सुद्धा मंत्री शेलार यांनी सभागृहाच्या निर्दशनास आणून दिली.

चर्चेत आमदार अतुल भातखळकर यांनी असंरक्षित किल्ल्यांसाठी सुद्धा संवर्धनाचे धोरण असलं पाहिजे अशी सूचना केली होती. याबाबत मंत्री शेलार यांनी सांगितले की, आपल्याकडे केंद्र सरकारच्या अखत्यारित ५४ किल्ले असून राज्य सरकारकडून संरक्षित ६२ किल्ले आहेत ते सोडून जे संरक्षित असले तरी त्याला ऐतिहासिक आणि काही ठिकाणी वास्तुशास्त्राचे महत्त्व सुद्धा आहे. म्हणून अशा सर्व असंरक्षित गड किल्ल्यांची जिल्हा निहाय प्राथमिक अवस्थेतील नोंदणी करण्याचे काम तंत्रज्ञांच्या मदतीने पुरातत्व वस्तुसंग्रहालय संचालनालयामार्फत सुरू करण्यात आली आहे. त्यामध्ये वन विभागातील किल्ल्यांची नोंद पूर्ण झालेली आहे, असे त्यांनी सांगितले.

आमदार अतुल भातखळकर यांनी अतिशय महत्त्वाची सूचना मांडली, की फोर्ट कंजर्वेशन प्राधिकरण स्थापन करण्यात यावे, या सूचनेचे मंत्री शेलार यांनी स्वागत केले. ही अतिशय मौल्यवान सुचना असून आपल्याकडे आज जे १२ गड किल्ले आहेत ज्यांना युनोस्कोचे मानांकन मिळालेले त्यासाठी एएसआय प्रस्ताव तयार करीत असून राज्य संरक्षित किल्ल्यांच्या बाबतीमध्ये ६६ किल्ल्यांपैकी ३३ किल्ल्यांवर ६३ कोटी ७१ लाख १५ हजार ११८ एवढ्या निधीतून जतन संवर्धनाचे काम चालू आहे. तरी असंरक्षित आणि उरलेले संरक्षित या सगळ्यासाठी आपल्याला भरीव निधी लागेल. त्यामुळे यासाठी प्राधिकरण करण्याच्या बाबतीमध्ये सांस्कृतिक कार्य विभागाच्या सचिवाच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येईल असे मंत्री शेलार यांनी घोषित केले.

## महत्त्वाचे

### भारताला मोठा दिलासा!

**नवीदिल्ली** : सरकारने मंगळवारी जाहीर केले की, एलपीजी ने भरलेली दोन जहाजे पाइन गॅस आणि जग वसंत यांनी 'हॉर्मुझची सामुद्रधुनी' सुरक्षितपणे पार केली असून ती भारताच्या दिशेने प्रवास करत आहेत. बंदरे, नौवहन आणि जलमार्ग मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश कुमार सिन्हा यांनी सांगितले की, ४५,००० मेट्रिक टन एलपीजी वाहून नेणारे पाइन गॅस हे जहाज २७ मार्च रोजी 'न्यू मंगळूर बंदर' येथे पोहोचणार आहे. दरम्यान, ४७,६०० मेट्रिक टन एलपीजीने भरलेले जग वसंत हे जहाज २६ मार्च रोजी 'कांडला बंदर' येथे पोहोचण्याची अपेक्षा आहे. याव्यतिरिक्त, २० भारतीय जहाजे सध्या हॉर्मुझच्या सामुद्रधुनीच्या पश्चिमेस थांबलेली आहेत.

यापूर्वी, जहाजांच्या हालचालींचा मागोवा घेणाऱ्या (ट्रॅकिंग) माहितीवरून असे दिसून आले होते की, सुरक्षित प्रवासासाठी आवश्यक ती मंजुरी मिळाल्यानंतरच ही दोन्ही जहाजे या अत्यंत महत्त्वाच्या सागरी मार्गावरून प्रवास करत होती. प्राप्त माहितीनुसार, हॉर्मुझची सामुद्रधुनी पार करण्यासाठी साधारणपणे १४ तासांचा कालावधी लागतो.

### अनेक राज्यांत वातावरणात कमालीचा बदल

**नवी दिल्ली:** गेल्या काही दिवसांपासून वातावरणात कमालीचा बदल जाणवत आहे. त्यातच मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात देशभरातील हवामान झपाट्याने बदलणार असल्याचा अंदाज आहे. हवामान विभागाच्या ताज्या अंदाजानुसार, २६ आणि २८ मार्च रोजी सक्रिय होणाऱ्या दोन पश्चिमी वाऱ्यांच्या प्रणालींचा उत्तर भारत, ईशान्य आणि दक्षिण भारतावर व्यापक परिणाम होईल. काही भागांमध्ये मुसळधार पाऊस आणि हिमवृष्टीचाही अंदाज आहे.

देशातील इतर ठिकाणी मेघगर्जना, वीज आणि गारपिटीची शक्यता आहे. अनेक राज्यांमध्ये तापमान ३६ ते ४० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचेल, ज्यामुळे उष्णता वाढेल. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पहिली पश्चिमी वाऱ्यांची प्रणाली २६ मार्च रोजी सक्रिय होईल आणि दुसऱ्या प्रणालीचा प्रभाव २८ मार्चच्या रात्रीपासून सुरू होईल. या दोन प्रणालींमुळे उत्तर भारतातील हवामान झपाट्याने बदलेल. २६ मार्च रोजी जम्मू आणि काश्मीर, लडाख आणि हिमाचल प्रदेशातील उंच भागांमध्ये हलका पाऊस आणि हिमवृष्टी होण्याची शक्यता आहे, तर याचा परिणाम उत्तराखंडमध्ये पोहोचेल. २८ मार्च रोजी जम्मू आणि काश्मीर आणि आसपासच्या परिसरातील हवामान पुन्हा बिघडू शकते. २६ मार्च रोजी पंजाब, हरियाणा, चंदीगड आणि दिल्लीमध्ये मेघगर्जनेसह पाऊस आणि हलका पाऊस अंदाज आहे. दिल्लीत जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे. राजस्थानमध्येही अशीच हवामान परिस्थिती अपेक्षित असून, त्यामुळे दैनंदिन कामकाज आणि वाहतुकीत व्यत्यय येण्याची शक्यता आहे.

# देशात पेट्रोल आणि डिझेलचा साठा

## इंधन पुरवठ्याबाबत तेल कंपन्यांचे महत्त्वपूर्ण विधान

नवी दिल्ली : दि.२५ वृत्तसंस्था




मध्यपूर्वेतील सध्याच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, पेट्रोल आणि डिझेलच्या तुटवड्याबाबत पसरलेल्या अफवांमुळे भारतातील अनेक राज्यांमध्ये घबराट निर्माण झाली आहे. सोशल मीडियावर चुकीची माहिती वेगाने पसरल्यामुळे, मध्य प्रदेश आणि गुजरातसारख्या राज्यांमधील पेट्रोल पंपांवर लोकांची प्रचंड गर्दी जमली आहे. या 'घाबरून खरेदी करण्याच्या' प्रकाराच्या पार्श्वभूमीवर, देशातील प्रमुख तेल कंपन्यांनी परिस्थिती स्पष्ट करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. इंडियन ऑइल आणि भारत पेट्रोलियमसारख्या कंपन्यांनी अधिकृत निवेदने जारी करून हे स्पष्ट केले आहे की, देशात इंधनाचा कोणताही तुटवडा नाही आणि इंधन पुरवठा साखळी पूर्णपणे सुरळीतपणे कार्यरत आहे.

देशातील सर्वात मोठी तेल कंपनी असलेल्या 'इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड'ने सोशल मीडियाच्या माध्यमातून जनतेला आश्वस्त केले आहे की, पेट्रोल किंवा डिझेलच्या तुटवड्याबाबतचे अहवाल पूर्णपणे निराधार आहेत. कंपनीने म्हटले आहे की, ऑनलाइन पसरवल्या जाणाऱ्या अशा अफवांमुळे इंधन पुरवठ्याच्या सामान्य पद्धतींमध्ये व्यत्यय येऊ शकतो आणि अनावश्यक चिंता निर्माण होऊ शकते. दुजोरा दिला आहे की, त्यांच्या सर्व विक्री केंद्रांवर इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध आहे आणि ही केंद्रे पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. कंपनीने नागरिकांना आवाहन केले आहे की, त्यांनी घाबरून इंधनाची खरेदी करणे टाळावे आणि इंधन पुरवठा व्यवस्था सुरळीतपणे चालू राहावी यासाठी केवळ पडताळलेली व अचूक माहितीच ग्राह्य धरावी. 'भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड'ने देखील घाबरून इंधन खरेदी करण्याच्या प्रकाराला आळा घालण्यासाठी जनतेचे सहकार्य मागितले आहे. कंपनीने स्पष्ट केले आहे की इंधनाच्या तुटवड्याबाबतचे दावे पूर्णपणे खोटे आहेत आणि भारताकडे तेलाचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. स्पष्ट केले की त्यांच्या पुरवठा साखळीत कोणताही व्यत्यय आलेला नाही आणि देशभरात कोणत्याही अडथळ्या शिवाय इंधन पोहोचवण्याच्या आपल्या कटिबद्धतेचा त्यांनी पुनरुच्चार केला. कंपनीने लोकांना विनंती केली आहे की, त्यांनी अनावश्यकपणे इंधनाचा साठा करून ठेवणे टाळावे; कारण सर्व ठिकाणी इंधनाचा अखंडित पुरवठा सुनिश्चित केला जात आहे.

गुजरात आणि मध्य प्रदेशातील अनेक शहरांमधील पेट्रोल पंपांवर एक चिंताजनक दृश्य पाहायला मिळाले; जिथे लोकांनी आपल्या वाहनांच्या टाक्या भरण्यासाठी तासन् तास रांगा लावल्या होत्या. गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी स्वतः जनतेला शांतता राखण्याचे आणि अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. दरम्यान, मध्य प्रदेशातील इंदूर, आगर मालवा आणि मंदसौरसारख्या शहरांमध्ये, लोकांनी आपल्या वाहनांसोबतच ड्रम आणि कॅन्स घेऊन पेट्रोल पंपांकडे धाव घेतली. प्रशासनाने आणि तेल कंपन्यांनी वारंवार या गोष्टीवर भर दिला आहे की, घाबरून जाण्याची कोणतीही आवश्यकता नाही; कारण तेलाची डेपो (साठवणूक केंद्रे) पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत.

## ट्रम्प यांची बायडेनपेक्षाही वाईट स्थिती!

### ६१% अमेरिकन जनतेने फिरवली पाठ

नवी दिल्ली : दि.२५ वृत्तसंस्था



डोनाल्ड ट्रम्प यांनी 'अमेरिका फर्स्ट' आणि महागाई कमी करण्याच्या आश्वासनावर सत्ता मिळवली खरी, पण इराणसोबत सुरू झालेला लष्करी संघर्ष आता त्यांच्याच राजकीय कारकिर्दीसाठी धोक्याची घंटा ठरत आहे. नुकत्याच समोर आलेल्या एका खळबळजनक सर्वेक्षणानुसार, अमेरिकन जनतेमध्ये ट्रम्प यांची लोकप्रियता झपाट्याने घसरत असून ती आतापर्यंतच्या सर्वात कमी ३६ टक्क्यांवर आली आहे. इराणवरील हल्ल्याने केवळ मध्य-पूर्व हादरले नाही, तर व्हाईट हाऊसचा पायाही डळमळीत केला आहे. गेल्या अवघ्या सात दिवसांत त्यांच्या रेटिंगमध्ये ४ टक्क्यांची मोठी घसरण झाली आहे. सर्वेक्षणातील ६२ टक्के लोकांनी ट्रम्प यांच्या कार्यपद्धतीवर तीव्र असमाधान व्यक्त केले आहे. दुसऱ्या कार्यकाळाच्या सुरुवातीलाच मिळालेला हा झटका ट्रम्प यांच्यासाठी भविष्यात मोठी डोकेदुखी ठरू शकतो. ट्रम्प ज्या तेहरानवर हल्ल्याची भाषा करत आहेत, त्याच हल्ल्यांना ६१ टक्के अमेरिकन नागरिकांनी विरोध दर्शवला आहे. अमेरिकन जनतेला हे युद्ध नको आहे. युद्धामुळे ओढवलेली असुरक्षितता आणि पुन्हा एकदा परकीय भूमीवर अमेरिकन सैन्याचे रक्त सांडले जाण्याची भीती यामुळे सर्वसामान्य नागरिक अस्वस्थ आहेत. केवळ ३५ टक्के कट्टर समर्थक या लष्करी कारवाईच्या बाजूने उभे असल्याचे दिसून येत आहे.

## हिजबुल्लाहच्या अस्तित्वावरच गदा?

**नवीदिल्ली : दि.२५ वृत्तसंस्था**

मध्य-पूर्वेतील युद्धाने आता सर्वात भीषण वळण घेतले आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष आता केवळ दोन देशांपुरता मर्यादित न राहता लेबनॉनच्या उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. इस्रायलचे संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी नुकताच एक खळबळजनक खुलासा केला आहे, ज्याने संपूर्ण जगाची झोप उडवली आहे. इस्रायल आता दक्षिण लेबनॉनच्या १० टक्के भूभागावर कायमस्वरूपी ताबा मिळवण्याच्या तयारीत आहे.

इस्रायलच्या संरक्षण मंत्र्यांच्या दाव्यानुसार, इस्रायली सैन्य दक्षिण लेबनॉनमधील लिटानी नदीपर्यंतचा संपूर्ण भाग आपल्या नियंत्रणात घेणार आहे. ही नदी इस्रायली सीमेपासून सुमारे ३० किलोमीटर आत आहे. हा भाग लेबनॉनच्या एकूण क्षेत्राच्या अंदाजे १० टक्के आहे. इस्रायलचा उद्देश येथे एक अभेद्य 'संरक्षण बफर झोन' तयार करणे हा आहे. काट्झ यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, जोपर्यंत इस्रायलच्या उत्तर भागातील सुरक्षा सुनिश्चित होत नाही, तोपर्यंत सैन्य या भूभागातून मागे हटणार नाही. संरक्षण मंत्र्यांचे सर्वात धक्कादायक विधान म्हणजे, या बफर झोनमध्ये आता कोणतेही घर किंवा नागरी वस्ती उरणार नाही. दहशतवादाचा नायनाट करण्यासाठी हा भाग पूर्णपणे रिकामा केला जाणार आहे. यामुळे दक्षिण लेबनॉनमधील लाखो लोकांनी आधीच उत्तरेकडे पलायन केले आहे. इस्रायलने लिटानी नदीवरील अनेक महत्त्वाचे पूल आधीच उद्ध्वस्त केले आहेत, जेणेकरून हिजबुल्लाहचे लढवय्ये आणि शस्त्रास्त्रांची वाहतूक रोखता येईल. याला इस्रायलने ''अग्ररक्षक संरक्षण रेषा'' असे नाव दिले आहे.

# भारतीय राजदूतांना चीनला गेल्यावर का बदलावी लागतात नावे?

## नेहरूंच्या काळातील 'ती' प्रथा आजही कायम

**नवीदिल्ली : दि.२५ वृत्तसंस्था**





भारत आणि चीन यांच्यातील सीमावाद किंवा व्यापारिक संबंध नेहमीच हेडलाईन्समध्ये असतात. पण या दोन देशांच्या राजनैतिक संबंधांमध्ये एक अशी गोष्ट आहे, जी ऐकून कोणालाही आश्चर्य वाटेल. चीनमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी जाणारे आयएफएस अधिकारी बीजिंगमध्ये पोहोचताच आपली ओळख बदलतात. तिथे गेल्यावर त्यांचं मूळ नाव कागदोपत्री बदलून एक नवीन 'चिनी नाव' स्वीकारलं जातं. हे ऐकायला एखादं गुप्तहेर चित्रपटातील कथानकासारखं वाटत असलं, तरी यामागे अत्यंत सखोल सांस्कृतिक आणि व्यावहारिक कारणं आहेत. चीनची अधिकृत भाषा 'मँडरिन' ही जगातील सर्वात कठीण भाषांपैकी एक मानली जाते. या भाषेत अक्षरे नसून 'कॅरेक्टर्स' असतात. भारतीय नावे, जसे की 'विक्रम' किंवा 'दोराईस्वामी', चिनी लोकांना उच्चारणे अत्यंत कठीण जाते. चिनी संस्कृतीत नावाचा केवळ उच्चार महत्त्वाचा नसून, त्या नावाचा अर्थ काय निघतो, याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जर एखाद्या नावाचा उच्चार चिनी भाषेत चुकीचा झाला, तर त्याचा अर्थ अपमानास्पदही निघू शकतो. म्हणूनच, प्रत्येक राजदूताला असा शब्द निवडला जातो जो त्यांच्या मूळ नावाशी साधर्म्य राखेल आणि त्याचा अर्थही सकारात्मक असेल. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने आणि भारतीय दूतावासाने मिळून त्यांचे नवीन नाव 'वेई जियामेंग' असे निश्चित केले आहे. या नावाचा अर्थ अत्यंत मार्मिक आहे. 'वेई' हे चीनमधील एक ऐतिहासिक आणि प्रतिष्ठित आडनाव आहे. 'जिया' म्हणजे वृद्धी किंवा वाढ, आणि 'मेंग' म्हणजे युती किंवा करार. दोन्ही देशांमधील संबंध सुधारण्यासाठी आणि युती अधिक मजबूत करण्यासाठी आलेला दूत, असा सकारात्मक संदेश या नावातून दिला जातो. नावे बदलण्याची ही प्रथा काही आजची नाही. १९५० च्या दशकात जेव्हा भारताने कम्युनिस्ट चीनला मान्यता दिली आणि राजनैतिक संबंध प्रस्थापित केले, तेव्हापासून ही परंपरा सुरू आहे. भारताचे पहिले राजदूत जेव्हा चीनला गेले, तेव्हा त्यांना 'पॅन एनजी' हे चिनी नाव देण्यात आले होते. तेव्हापासून आजपर्यंत प्रत्येक भारतीय राजदूताने ही परंपरा जोपासली आहे. केवळ भारतीयच नाही, तर अमेरिकेचे किंवा युरोपीय देशांचे राजदूतही चीनमध्ये आपली नावे चिनी संस्कृतीनुसार बदलतात. यामुळे स्थानिक लोकांशी संवाद साधणे आणि राजनैतिक दस्तऐवजांवर स्वाक्षरी करणे सोपे जाते. राजदूत हे केवळ अधिकारी नसून ते दोन देशांमधील सांस्कृतिक पूल असतात. जेव्हा एखादा भारतीय राजदूत चिनी नाव धारण करतो, तेव्हा तो तिथल्या जनतेला असा संदेश देतो की, ''आम्ही तुमच्या संस्कृतीचा आदर करतो.'' चीनमध्ये नाव बदलणे हा राजनैतिक शिष्टाचाराचा एक भाग आहे. यामुळे चिनी नेत्यांना आणि तिथल्या जनतेला भारतीय राजदूतांशी जवळीक साधणे सोपे होते. अशा प्रकारे, एका नावाच्या माध्यमातून दोन्ही देशांमधील कडू संबंधांवर साखरेचा लेप लावण्याचा प्रयत्न केला जातो.

# एआय मध्ये भारत पुढे, पण टेस्ट रँकिंगमध्ये आम्हीच सरस!

## ऋषी सुनक यांनी सांगितला पंतप्रधान मोदींसोबतचा 'तो' मजेशीर किस्सा

**नवीदिल्ली : दि.२५ वृत्तसंस्था**

तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात भारताने मारलेली गरुडझेप आता जगाला थक्क करत आहे. ब्रिटनचे माजी पंतप्रधान ऋषी सुनक यांनी भारताच्या वाढत्या ताकदीची दखल घेत, भारत आता खऱ्या अर्थाने 'ग्लोबल एआय सुपरपावर' बनल्याची कबुली दिली आहे. एका अलीकडील कार्यक्रमात बोलताना सुनक यांनी स्पष्ट केले की, तंत्रज्ञान आणि सुरक्षेच्या बाबतीत भारत आणि ब्रिटनचे संबंध आता एका ऐतिहासिक उंचीवर पोहोचले आहेत.

ऋषी सुनक यांनी स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या प्रसिद्ध इंडेक्स' चा हवाला देत सांगितले की, या जागतिक क्रमवारीत भारताने ब्रिटनला मागे टाकले आहे. भारताची ही प्रगती केवळ संख्यात्मक नसून ती गुणात्मक असल्याचेही त्यांनी मान्य केले. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत झालेल्या संवादातील एक रंजक आठवण शेअर केली. सुनक हसत म्हणाले, ''मी पंतप्रधान मोदींना गमतीने म्हणालो होतो की, एआय क्षेत्रात जरी भारताने आम्हाला मागे टाकले असले, तरी आयसीसी टेस्ट क्रिकेट रँकिंगमध्ये इंग्लंड अजूनही भारताच्या पुढे आहे.'' त्यांच्या या विधानामुळे उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला.

आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या नियमनाबाबत भारत आणि ब्रिटनचा दृष्टिकोन पूर्णपणे मिळताजुळता असल्याचे सुनक यांनी नमूद केले. ते म्हणाले की, ''युरोपीय महासंघाचे अत्यंत कडक नियम किंवा अमेरिकेचा अस्थिर पवित्रा स्वीकारण्याऐवजी, भारत आणि ब्रिटन एका व्यावहारिक मार्गाने जाण्यास प्राधान्य देत आहेत.'' दोन्ही देश अशा तत्त्वांवर काम करत आहेत जे नवनवीन संशोधनांना चालना देतील आणि त्यावर अनावश्यक बंधने लादणार नाहीत. तंत्रज्ञानाचा विकास आणि सुरक्षा या दोन्ही गोष्टी हातात हात घालून चालणे समाजाच्या हिताचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

तंत्रज्ञान आणि सुरक्षेसाठी वाढते सहकार्य

दोन्ही देशांमधील तांत्रिक सुरक्षेच्या करारांवर भाष्य करताना सुनक यांनी ब्रिटनच्या ' सेफ्टी इन्स्टिट्यूट' आणि भारताने नुकत्याच स्थापन केलेल्या अशाच प्रकारच्या संस्थेमधील समन्वयावर भर दिला. त्यांनी एक अत्यंत महत्त्वाची तुलना केली, ''ज्याप्रमाणे गुप्तचर माहितीच्या देवाणघेवाणीमुळे दहशतवादासारख्या मोठ्या संकटांशी लढण्यास मदत झाली, त्याचप्रमाणे एआय संस्थांमधील सहकार्य आपल्याला भविष्यातील तांत्रिक जोखमींपासून वाचवेल.'' ही भागीदारी केवळ डेटा शेअरिंगपुरती मर्यादित नसून सुरक्षित डिजिटल भविष्याचा पाया असल्याचे त्यांनी सांगितले.

आपल्या भाषणाच्या शेवटी सुनक यांनी 'यूके-इंडिया टेक्नॉलॉजी सिक्युरिटी इनिशिएटिव्ह' चा उल्लेख केला. त्यांनी या उपक्रमाला २१ व्या शतकातील सर्वात शक्तिशाली सुरक्षा आणि तांत्रिक भागीदारी म्हटले आहे. उल्लेखनीय आहे की, ऋषी सुनक यांनी ब्रिटनचे पहिले भारतीय वंशाचे आणि पहिले हिंदू पंतप्रधान म्हणून इतिहास रचला आहे. ऑक्टोबर २०२२ ते जुलै २०२४ या आपल्या कार्यकाळात त्यांनी भारत आणि ब्रिटनमधील सामरिक आणि तांत्रिक संबंध अधिक दृढ करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण पावले उचलली होती.



# महासत्तेची नाचक्की! ट्रम्प यांच्या चर्चेचा डाव फेल?

## इराणी सैन्याने जगासमोर काढली अमेरिकेची लायकी

**वॉशिंग्टन/तेहरान : दि.२५ वृत्तसंस्था**



मध्यपूर्वेतील अमेरिका-इराण युद्ध एक नव्या वळणावर पोहोतले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबत सकारात्मक आणि फलदायी चर्चा सुरु असल्याचा दावा केला होता. मात्र इराणच्या लष्कराने हे सर्व दावे फेटाळले आहे. इराणच्या लष्कराने अमेरिकेची अक्षरशः लायकी काढली आहे.

ट्रम्प गेल्या दोन दिवसांपासून इराणसोबत सकारात्मक चर्चा सुरु असल्याचा दावा करत आहेत. इराणच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याशी चर्चा सुरु असून ते शांततेसाठी तयार असल्याचे ट्रम्प यांनी म्हटले. त्यांच्या या विधानामुळे जगभरात शांततेची आशा निर्माण झाली होती. परंतु इराणने ट्रम्प यांच्या दाव्यांना खोटे ठरवले आहे.

इराणच्या सरकारी अधिकाऱ्यांनी ट्रम्प यांचे दावे फेटाळल्यानंतर लष्कराने देखील त्यांना खोटे ठरवले आहे. इराणी लष्कराचे प्रवक्ते लेफ्टनंट कर्नल इब्राहिम जोल्फागरी यांनी एक व्हिडिओ जारी केला आहे. या व्हिडिओमध्ये त्यांनी अमेरिकेवर जोरदार टीका केली आहे. त्यांनी म्हटले आहे की, ज्या रणनीतीक शक्तीच्या जीवावर तुम्ही उड्या मारत आहात, ती अपयशी ठरली आहे. अमेरिका स्वत:ला महासत्ता म्हणवून घेते परंतु त्यांच्याकडे या वादातून बाहेर पडण्याची ताकद नाही. जोल्फागरी यांनी हेही स्पष्ट केले की, अमेरिका आपल्या अपयशाला कराराचे नाव देऊ नये. इराण कधीच झुकणार नाही असे त्यांनी ठणकावून सांगितले. मीडिया रिपोर्टनुसार, ट्रम्प प्रशासनाने पाकिस्तानच्या माध्यमातून इराणला १५ कलमी शांतता प्रस्तावही पाठवला होता. मात्र इराणने हा प्रस्ताव धुडकाला आहे. आम्ही अमेरिकेशी तडजोड करणार नाही असे इराणने स्पष्ट केले आहे.

एककीडे शांतता चर्चांवरुन वाद पेटला आहे, तर याच वेळी दुसरीकडे इस्रायलचे लेबनॉन सीमेजवळ हिजबुल्लाहवर हल्ला केला आहे. तर इराणकडून संभाव्य हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर इस्रायलमध्ये रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. यामुळे युद्धाचे ढग आणखी गडद झाले आहेत.

## ३ सरकारी योजना | महिला उद्योजकांसाठी सुवर्णसंधी

# १० लाखांपासून ५० लाखांपर्यंत मदत

**नवीदिल्ली : दि.२५ वृत्तसंस्था**



आजच्या काळात महिला केवळ कौटुंबिक जबाबदाऱ्यांपर्यंत मर्यादित राहिलेल्या नाहीत. कौटुंबिक जबाबादाऱ्यांसह त्या आता उद्योग आणि व्यवसायातही स्वत:ची ओळख निर्माण करत आहेत. केंद्र आणि राज्य सरकार महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी विविध योजना राबवत आहे. भारतात महिला उद्योजकता वाढवण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून विविध आर्थिक योजना राबवल्या जात आहेत. भांडवलाची कमतरता असलेल्या महिलांना आता भरघोस अनुदान आणि कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून दिले जात आहे. जर तुम्हाला स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा असेल, तर खालील तीन योजना अत्यंत प्रभावी आणि फायदेशीर ठरू शकतात:

१. मुद्रा योजना (महिलांसाठी विशेष सवलत) : 'प्रधानमंत्री मुद्रा योजना' अंतर्गत महिला उद्योजिकांना प्राधान्य दिले जाते. लघु उद्योग सुरू करण्यासाठी हे सर्वात सोपे कर्ज मानले जाते.

कर्जाचे प्रकार: यामध्ये 'शिशू' (५०,००० रुपयांपर्यंत), 'किशोर' (५ लाख रुपयांपर्यंत) आणि 'तरुण' (१० लाख रुपयांपर्यंत) असे तीन टप्पे आहेत.

वैशिष्ट्ये: या कर्जासाठी कोणत्याही तारणाची गरज नसते. महिलांना व्याजाच्या दरात सवलत मिळते आणि प्रक्रिया शुल्कही माफ केले जाते.

उपयोग: टेलरिंग, बुटीक, ब्युटी पार्लर किंवा घरगुती खाद्यपदार्थांचा व्यवसाय करण्यासाठी हे कर्ज उपयुक्त आहे.

कर्जाचे व्याजदर बँकेनुसार वेगवेगळे असतात. तथापि, ते आरबीआयच्या नियमांनुसार निश्चित केले जातात. ऑनलाइन अर्ज करू शकता. पीएमएमवायच्या माध्यमातून महिलांना जलद निधी मिळतो आणि त्या आपली कौशल्ये सुधारू शकतात, ज्यामुळे व्यवसायाची जलद वाढ होते.

२. पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम : देशातील ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी केंद्र सरकारची 'पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम' ही योजना अत्यंत प्रभावी ठरत आहे. नवीन लघु उद्योग किंवा व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या महिलांसाठी या योजनेद्वारे मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत आणि अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे.

उत्पादन (मॅन्युफॅक्चरिंग) क्षेत्र: नवीन प्रकल्प उभारण्यासाठी ५० लाख रुपयांपर्यंत आर्थिक मदत मिळू शकते.

सेवा किंवा व्यापार क्षेत्र: सेवा क्षेत्रातील व्यवसायांसाठी २० लाख रुपयांपर्यंत खर्चाची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

अनुदानाचे गणित: या योजनेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये मिळणारे भरघोस अनुदान. महिलांसाठी अनुदानाचे दर खालीलप्रमाणे आहेत:

ग्रामीण भाग: प्रकल्प खर्चाच्या २५% ते ३५% पर्यंत अनुदान दिले जाते.

शहरी भाग: प्रकल्प खर्चाच्या १५% ते २५% पर्यंत अनुदान उपलब्ध आहे.

पात्रता आणि अटी: १. अर्जदार महिलेचे वय १८ वर्षांपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. २. स्वयं-सहायता गट , नोंदणीकृत संस्था किंवा सहकारी संस्थांचे सदस्यही या योजनेसाठी पात्र आहेत. ३. या योजनेचा लाभ घेण्यासाठी च्या अधिकृत ई-पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करता येतो.

३. लखपती दीदी योजना : ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी केंद्र सरकारची 'लखपती दीदी' योजना अत्यंत कळीची ठरत आहे. स्वयं-सहायता गटांशी () जोडल्या गेलेल्या महिलांचे वार्षिक उत्पन्न किमान १ लाख रुपयांपर्यंत नेणे, हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. योजनेचे प्रमुख फायदे आणि तरतुदी: मोठ्या कर्जाची सुविधा: महिलांना स्वतःचा लघु उद्योग किंवा व्यवसाय सुरू करण्यासाठी ५ लाख रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले जाते. यामध्ये व्याजात विशेष सवलतही दिली जाते. विविध क्षेत्रांत कौशल्य प्रशिक्षण: केवळ आर्थिक मदतच नाही, तर कृषी, हस्तकला, बँकिंग आणि पर्यटन यांसारख्या आधुनिक क्षेत्रांमध्ये महिलांना विशेष प्रशिक्षण दिले जाते. यामुळे महिलांना नवीन कौशल्ये आत्मसात करून आपली कमाई वाढवता येते.

आत्मनिर्भरतेवर भर: महिलांनी स्वतःचा व्यवसाय सुरू करावा आणि कोणावरही विसंबून न राहता आत्मनिर्भर बनावे, हा या योजनेचा मूळ हेतू आहे.

## इराणला पाकिस्तानची मध्यस्थी नामंजूर!

**नवी दिल्ली: दि.२५ वृत्तसंस्था**



मध्य-पूर्वेतील तणावाच्या आगीत स्वतःची राजकीय पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या पाकिस्तानला इराणने जमिनीवर आणले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या इशाऱ्यावरून 'शांतीदूत' बनू पाहणाऱ्या शहबाज शरीफ सरकारला इराणने असा काही दणका दिला आहे की, संपूर्ण इस्लामाबादमध्ये शांतता पसरली आहे. इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने कराचीकडे जाणारे एक मोठे मालवाहू जहाज भर समुद्रात रोखून पाकिस्तानचा मोठा अपमान केला आहे.

'सेलान' नावाचे एक कंटेनर जहाज संयुक्त अरब अमिरातीच्या शारजाह बंदरातून ६,८५० टन माल घेऊन पाकिस्तानच्या कराची बंदराकडे निघाले होते. २००० साली बांधलेले हे जहाज ओमानमार्गे होर्मुझच्या सामुद्रधुनीत पोहोचले. मात्र, तेवढ्यात इराणी लष्कराच्या बोटींनी या जहाजाला घेरले. इराणी अधिकाऱ्यांनी जहाजाच्या कॅप्टनला स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, त्यांना या जलमार्गातून पुढे जाण्याची परवानगी नाही. कोणत्याही संघर्षापेक्षा जहाजाला परत वळवणेच योग्य असल्याचे सांगत, इराणने हे जहाज पुन्हा युएईकडे धाडले.

विशेष म्हणजे, ही घटना घडण्यापूर्वीच पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी '' (ट्विटर) वर एक मोठी घोषणा केली होती. त्यांनी म्हटले होते की, ''जर अमेरिका आणि इराण सहमत असतील, तर पाकिस्तान या संघर्षावर तोडगा काढण्यासाठी निर्णायक चर्चेचे आयोजन करण्यास तयार आहे.'' पाकिस्तानला वाटले होते की ते मध्यस्थी करून जागतिक राजकारणात आपले वजन वाढवतील. मात्र, इराणने त्यांचे जहाज अडवून हे स्पष्ट केले की, आम्हाला तुमच्या मध्यस्थीची गरज नाही.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.✻ **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (✻पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले साहित्य या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## शिक्षण ही एक सेवा; सामाजिक बांधिलकीही अंतर्भूत

महाराष्ट्र, तमिळनाडू, दिल्ली, उत्तर प्रदेश आणि पंजाब या राज्यांमध्ये शिक्षण हक्क कायद्याची परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. महाराष्ट्रात तर सरकारकडे हजारो कोटी रुपयांची थकबाकी असल्यामुळे खासगी शाळा 'आरटीई' अंतर्गत प्रवेश देण्यास टाळाटाळ करत आहेत. आकडेवारी पाहिली, तर अनेक शाळांनी वर्षानुवर्षे शिक्षण हक्क कायद्यानुसार भरावयाच्या जागा रिक्त ठेवल्या आहेत किंवा या योजनेतूनच माघार घेतली आहे. ही परिस्थिती केवळ प्रशासकीय अपयश दर्शवत नाही, तर सामाजिक न्यायाच्या संकल्पनेवरही प्रश्नचिन्ह उभे करते. 'आरटीई'चा उद्देश केवळ 'मोफत शिक्षण' देणे नव्हता, तर समाजात समान संधी उपलब्ध करून देणे हा होता; मात्र खासगी शाळांचे व्यवस्थापन याकडे तोट्याचा व्यवहार म्हणून पाहत आहे. त्यांचे म्हणणे आहे, की सरकार वेळेवर परतफेड करत नाही, त्यामुळे त्यांच्या कामकाजावर परिणाम होतो. हा युक्तिवाद काही अंशी योग्य असू शकतो; पण त्याच्या नावाखाली मुलांना प्रवेश नाकारणे कोणत्याही परिस्थितीत योग्य ठरू शकत नाही. प्रवेशाच्या लॉटरीत नाव लागूनही पालकांना शाळांचे उंबरठे झिजवावे लागत आहेत, ही बाब व्यवस्थेतील गंभीर त्रुटी अधोरेखित करते. दुसऱ्या बाजूला राज्य सरकारेही आपली जबाबदारी टाळताना दिसतात. केंद्र आणि राज्य यांच्यातील निधीवाटपातील विसंवाद, देयके देण्यात होणारा विलंब आणि प्रशासकीय प्रक्रियांतील गुंतागुंत यामुळे ही समस्या अधिकच तीव्र होत आहे. जेव्हा सरकार वेळेवर थकबाकी देत नाही, तेव्हा शाळांचा विरोध काही प्रमाणात स्वाभाविक ठरतो; मात्र त्याचा थेट परिणाम मुलांवर होणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. ही एक अशी साखळी निर्माण झाली आहे, की ज्यात सरकार आणि शाळा एकमेकांवर जबाबदारी ढकलत राहतात आणि शेवटी मुलांचाच बळी जातो. काही शाळा 'आरटीई'तील मुलांबाबत भेदभाव करतात, तेव्हा परिस्थिती अधिक गंभीर होते. स्वतंत्र वर्ग चालवणे, अतिरिक्त शुल्क आकारणे किंवा अप्रत्यक्षपणे त्यांना नाकारण्याचा प्रयत्न करणे यामुळे नवी अस्पृश्यता तयार होत आहे. या सर्व बाबी केवळ कायद्याविरुद्धच नाहीत, तर नैतिकतेलाही धरून नाहीत. शिक्षणाचा हक्क हा केवळ शाळेत प्रवेश मिळविण्यापुरता मर्यादित नाही, तर तो सन्मानाने आणि समानतेने शिक्षण घेण्याचाही अधिकार आहे. या संपूर्ण परिस्थितीत सर्वात चिंताजनक बाब म्हणजे देशभरात 'आरटीई' अंतर्गत जागा भरल्या जाण्याचे प्रमाण केवळ २० ते २५ टक्के इतकेच आहे. दरवर्षी लाखो जागा रिक्त राहतात आणि तेवढ्याच संख्येने मुले शिक्षणापासून वंचित राहतात. ही केवळ संसाधनांची नासाडी नाही, तर देशाच्या भविष्यासोबतचा गंभीर खेळ आहे. वेळेत यावर उपाययोजना केली नाही, तर याचे सामाजिक आणि आर्थिक परिणाम आणखी गंभीर होऊ शकतात. शिक्षण हक्क कायद्यानुसार, मुलांचा शाळा प्रवेश सुकर होण्यासाठी उपाययोजनांच्या दृष्टीने काही ठोस पावले उचलण्याची गरज आहे. सर्वप्रथम, सरकारने वेळेवर निधी वितरित करण्याची आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. यासाठी पारदर्शक आणि स्वयंचलित यंत्रणा विकसित करता येईल. त्यामुळे देयके देण्यात विलंब होणार नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार कठोर नियम बनवून त्यांची काटेकोर अंमलबजावणी करणेही आवश्यक आहे. तसेच, आंतरराष्ट्रीय स्तरावरील काही यशस्वी मॉडेल्सचा विचार करणे गरजेचे आहे. स्वीडन, नेदरलँड्स आणि चिली या देशांमध्ये व्हाउचर प्रणाली किंवा 'वेटेड फंडिंग मॉडेल'द्वारे या समस्येवर प्रभावी तोडगा काढण्यात आला आहे. या पद्धतींमध्ये निधी थेट विद्यार्थ्यांशी जोडला जातो. त्यामुळे शाळांना वेळेवर पैसे मिळतात आणि पारदर्शकता टिकून राहते. भारतातही अशा पर्यायांवर गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. 'आरटीई' अंतर्गत येणाऱ्या मुलांना ओझे न समजता संधी म्हणून पाहिले पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच आपल्याला पुन्हा स्मरण करून दिले आहे, की 'आरटीई' कायद्यांतर्गत खासगी शाळांमधील २५ टक्के जागा दुर्बल घटकांसाठी राखीव आहेत. शिक्षणातील 'परिणाम' म्हणजे केवळ शाळेत प्रवेश मिळवणे नव्हे. मूल खरोखर शिकते आहे का? ते शाळेत टिकून राहते आहे का? आणि त्याची क्षमता भविष्यातील स्पर्धात्मक जगासाठी तयार होत आहे का? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे शोधल्याशिवाय 'आरटीई'ची अंमलबजावणी यशस्वी झाली, असे म्हणता येणार नाही. पुस्तके, गणवेश, वह्या, प्रकल्प साहित्य, वाहतूक या सगळ्यांचा एकत्रित खर्च मोठा असतो. आर्थिक आणि प्रक्रियात्मक अडचणींपलीकडे एक अदृश्य; पण अत्यंत प्रभावी अडथळा आहे, तो म्हणजे मानसिक भिंत. शाळा ही केवळ शिक्षणाची जागा नसते, तर ती एक सामाजिक विश्व असते. तिथे मुलांमध्ये केवळ अभ्यासातच नव्हे, तर कपडे, बूट, मोबाईल, भाषा आणि जीवनशैली यांतही तुलना होते. वाढदिवसाच्या मेजवान्या, सहली, प्रोजेक्ट्स या सर्व गोष्टी आर्थिक सहभागावर अवलंबून असतात. अशा वातावरणात गरीब कुटुंबातील मूल हळूहळू एकाकी पडू लागते. त्याचा आत्मविश्वास कमी होतो, आणि त्याचा थेट परिणाम शिकण्याच्या प्रक्रियेवर होतो. वर्गात उपस्थित राहूनही ते शिक्षणापासून दूर जात राहते. शाळेत शिकवले जाणारे ज्ञान आणि घरी उपलब्ध असलेले वातावरण यामधील तफावत त्याला मागे ढकलते. या सगळ्या पार्श्वभूमीवर शिक्षण ही एक 'उत्पादन प्रक्रिया' म्हणून पाहणे अधिक योग्य ठरेल. जसे एखाद्या कारखान्यात केवळ यंत्रे पुरेशी नसतात, तसेच शिक्षणात केवळ शाळेची जागा पुरेशी नसते. पोषण, सुरक्षित घर, अभ्यासाचे वातावरण आणि अतिरिक्त शैक्षणिक मदत हे सर्व घटक आवश्यक असतात. जर हे घटक अपुरे असतील, तर शिक्षणाचा परिणामही अपुरा राहतो. परिणामी, हे धोरण 'कमी परतावा देणारी गुंतवणूक' ठरते, म्हणूनच उपाय शोधताना व्यापक दृष्टिकोन आवश्यक आहे. सरकारने केवळ शुल्काची परतफेड करण्यापेक्षा, या मुलांसाठी संपूर्ण आधारव्यवस्था उभारली पाहिजे. गणवेश, वाहतूक, अतिरिक्त शिकवणी या सर्व गोष्टींसाठी निधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. शिक्षणाचा हक्क म्हणजे केवळ प्रवेश नव्हे, तर टिकणे आणि प्रगतीही आहे. त्यासाठी शाळांनीही आपली भूमिका बदलली पाहिजे.



## लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

### तेल



मिळणार नाही तेल
अशी अफवा उडाली
राजकीय आहे भेल
जनता आहे भडकली

असा कसा विश्वगुरू
आमचा नेता झाला
घरा घरात कुरुबूरू
गुरु फेल का झाला?

अरे आधी पेट्रोल गॅस
सिलेंडर द्या आम्हाला
उगाच आणू नका सोस
वाचवतो मीच तुम्हांला

## ।। अभंगवाणी ।।

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

उपकार किती
नका हो दाखवू ।
कुणाला दाखवू
किती केले ।।

मदतीस पात्र
ज्यांनी तुला केले ।
आभारावे त्याचे
उपकार ।।

मदत करणे
स्वभाव असतो ।
अभाव असतो
ती सांगणे ।।

मदत करणे
नसे साधा गुण ।
अलौकिक मन
त्यासी लागे ।।

# बळीराजा की राजाचा बळी... एक चिंता



विचारायण
साधना काळबांडे
मो. 9767993827



भारत कृषीप्रधान देश आहे. प्राचीन प्राचीन काळापासून ते आजच्या आधुनिक काळात शेतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शेती हा आपल्या देशाचा, समाजाचा आणि कुटुंबाचा कणा आहे. आपली अर्थव्यवस्था जास्तीत जास्त शेतीवर अवलंबून आहे. विवीध तंत्रज्ञानाचा शोध लागण्याआधी भारतीय शेती ही पारंपरिक पद्धतीने केली जात असे. भारतीय शेती ही पावसावर जास्तीत जास्त प्रकारे अवलंबून आहे. पूर्वी शेती करतांना पारंपरिक पद्धतीचा अवलंब होत होता. ज्यांच्या जवळ शेती आहे तो शेतकरी आणि ज्यांच्या जवळ शेती नाही ते शेतात काम करून आपला उदरनिर्वाह करित असत. त्यांना शेतमजूर म्हटल्या जात असे.

पारंपारिक शेती : शेतकरी पारंपारिक शेती करतांना जास्तीत जास्त लाकडी अवजारांचा वापर करायचे. मनुष्य बळाचा जास्तीत जास्त वापर व्हायचा. लाकडी नांगर, वखर, लाकडाची बैलगाडी, सर्वांचा वापर शेतीत होत होता. सर्व कामे माणसेच करायची.

शेती पद्धती : शेती करतांना विविध जुन्या पद्धतीचा वापर व्हायचा. पिकाला पाणी देण्याच्या पद्धती मध्ये रहाट गाडगे, मोटीचा वापर करून पिकाला पाणी दिल्या जात असे. रहाटट त्याला बांधलेले गाडगे बैलाच्या साहाय्याने विहिरीत सोडून पाणी काढले जावून पिकाला देत असत. मोट ही चामड्याची मोठी पिशवी असायची. दोरखंडाला बांधून मोटी व्दारे पाणी ओढले जाऊन पिकाला पाणी देण्याची पारंपारीक पद्धत होती. शेतीला शेणखताचा वापर केला जायचा. शेती बरोबर पशुपालन होत असल्याने शेणखत भरपूर प्रमाणात असायचे. जोडधंदा म्हणून पशुधनाकडे पाहिले जायचे. आपल्या पशुधनाचा प्रत्येक शेतकऱ्याचा अभिमान असायचा. त्यामुळे भरघोस पीक यायचे. अस्सल गावराणी पिके यायची. बागायती शेती, जिरायती शेती केल्या जायच्या. पिकांवर फवारणी साठी नैसर्गिक रित्या औषधं तयार करून फवारणी करण्यावर भर होता. कडुनिंबाचा अर्क काढून फवारणी साठी त्याचा वापर केला जायचा. घरीच तयार केलेल्या बियाण्यांचा वापर केला जात होता. घरी पीक आल्यानंतर त्यातील चांगल्या स्तरांचे बी वेगळे काढले जात असे व त्याचा वापर दुबार पीक पेरण्यासाठी केला जात असे. यंत्राचा शोध लागला नसल्याने मनुष्य आणि प्राण्यांचा वापर करून परंपरागत शेती व्हायची. शेतातील पिके हातानेच तयार केली जात होते. विविध धान्य हातानेच कांडणी, मळणी, उफणणी केली जायची आणि पीक तयार होत असे.

काळ बदलत गेला आणि शेती ही काळानुरुप बदलली. शेतीतही आधुनिक परिवर्तन झाले. आधुनिक शेती करतांना जुनी शेती करण्याची पद्धती मागे पडल्या. नवनवीन शेती अवजारांचा शोध लागला. नवनवीन तंत्रज्ञान शेती साठी उपयोगात आणले जावू लागले. लाकडी, लोखंडी नांगर जाऊन बैलांचा वापर कमी होऊ लागला. रहाट गाडगे, मोट जावून विहिरीतून मोटारीच्या साहाय्याने पिकाला पाणी दिले जावू लागले. विहिरी ऐवजी बोअरवेल चे आधुनिक तंत्रज्ञान आले. वाफ्यातून पाणी देण्याची पद्धती जाऊन ठिबक सिंचन, स्प्रिंकलर च्या साहाय्याने पिकाला पाणी देण्याची पद्धती आली. शेणखत, सेंद्रिय खत जावून जास्तीत जास्त पीक येण्यासाठी रासायनिक खतांचा वापर वाढला. घरी तयार केलेले बियाणे जाऊन कंपनीने तयार केलेली आधुनिक बियाण्यांचा वापर वाढला. नैसर्गिक फवारणी जाऊन रासायनिक पदार्थांची फवारणी केली जावू लागली. बैलगाडी जाऊन ट्रॅक्टर रोटाव्हेटर सारखे यंत्र शेतीसाठी उपयोगात आणले जावू लागले. बदलत्या काळात शेती आधुनिक झाली. यंत्राचा वापर शेतीत वाढल्याने शेतमजुरांचा वापर कमी झाला. नवनवीन बियाण्यांमुळे कमी दिवसात येणारे आधुनिक पिके घेतल्या जावू लागले. आज भारतातील शेती झपाट्याने आधुनिक होत आहे. परंपरागत पद्धती जावून आधुनिक पद्धतीचा वापर शेतकरी करू लागले. सगळे आधुनिक झाले असले तरी आजही आमची शेती वरच्या पावसावर अवलंबून आहे. पावसाशिवाय आमची शेती आजही आपण करू शकत नाही. पाऊस नाही तर शेती नाही ही अवस्था आजही जैसे थे आहे. कधी दुष्काळ तर कधी पुरात वाहून जाणारे पीक डोळ्यात पाणी आणते. देशाने या जगाने कितीही शोध लावले तरी पोट भरण्यासाठी शेतीची गरज आहे. शेती शिवाय कोणत्याच देशाला पर्याय नाही. देश कितीही पुढारला तरी शेती ही करावीच लागणार. देशाने शेती आणि शेतकऱ्याला महत्त्व देण्याची गरज आहे. शेतकऱ्यांच्या पिकाला योग्य भाव मिळालाच पाहिजे. शेतकरी सुखी तर देश सुखी हेही तेवढेच खरे. आजही शेती श्रेष्ठ आहे आणि कायम ती राहणारच.बळीराजाला मान सन्मान मिळालाच पाहिजे. आज शेतकऱ्याला राजा म्हटले तरी बळी मात्र त्याचाच जातो. कारणं निसर्गाची नसणारी साथ त्याला राजचा रँक बनवते. कितीही शेतात रात्र अन दिवस कष्ट घेतले तरी मात्र एका क्षणात निसर्ग शेतीच्या पिकाचे होत्याचे नव्हते करते. जे काहीच हाती उरत नाही. पण या बळीराजाच्या हिंमतीची दाद द्यावी लागेल. मोठया हिंमतीने तो पुन्हा उभा राहतो. पुन्हा काळया मातीला हिरवे करण्याची तयारी करतो.खचतो अन पुन्हा एखाद्या फिनिक्स पक्ष्या प्रमाणे उठतो.शेती ही मनुष्याची आवश्यक गरज आहे. अन्न, वस्त्र, निवारा ही आवश्यक गरज असल्याने शेतीच ह्या गरजा पूर्ण करु शकते. मग शेती या व्यवसायाकडे तरुणांनी वळणे ही काळाची गरज बनली आहे. या व्यवसायला नवीन तंत्रज्ञानाची जोड लावून नवनवीन साधनांचा वापर होऊन एक स्थिरता मिळवून देण्याची गरज आहे. कारणं सर्वांच्या पोटाची भूक ही शेतीच पूर्ण करु शकते. हेही ध्यानात घेणे गरजेचे आहे.

# राग: जेवढा वाईट तेवढाच चांगलाही!

विचारमंथन
मोहन शेळके
मो. 9623117110



"रागाबाबत अनेक लोकांचे असे मत आहे की राग हा खूप वाईट असतो, रागातून जे काही घडते ते चुकीचे घडते. राग माणसाला चुकीच्या दिशेने आणि चुकीच्या वळणावर घेऊन जातो, रागामुळे अनेक प्रकारचे नुकसान होते. रागातून माणसाच्या जीवनाचा विनाश होऊ शकतो वगैरे वगैरे... काही प्रमाणात हे खरे आहे परंतु मी या मताशी पूर्णपणे सहमत नाही. माझ्या मते राग हा जेवढा वाईट तेवढाच तो फायद्याचा आणि चांगलाही ठरू शकतो. फक्त आपला राग, आपले मन आणि आपली सद्सद्विवेक बुद्धी यांची पद्धतशीर सांगड घालता आली पाहिजे. हे जर जमले तर रागातून वाईट काही घडण्याऐवजी उलट खूप काही चांगलेही घडू शकते." बहुतेक लोकांच्या मते राग हा वाईट असतो. परंतु राग वाईट असला तरी तो आपण टाळू शकत नाही. कारण कुठे ना कुठे, कधी ना कधी, कोणी ना कोणी तरी आपल्याला असा एखादा भेटतोच की त्याच्या वागण्या बोलण्याने आपल्याला राग येतोच किंवा एखादी घटना अशी घडते की त्या घटनेचा आपल्या मनात राग निर्माण होतोच. त्यामुळे राग वाईट असला तरी तो पूर्णपणे कोणी टाळू शकत नाही. त्याऐवजी रागाचे योग्य पद्धतीने व्यवस्थापन करून तो व्यवस्थित हाताळता आला तर रागातून होणारे नुकसान टाळता येते आणि कधी कधी रागातून फायदाही होतो. राग वाईट असला तरी माणसाला थोडाफार राग येणे आवश्यक आहे. जर कुणाला राग येतच नसेल तर अशा व्यक्तीला इतर लोक वाटेल तशी वागणूक देतात. कोणीही खिल्ली उडावितो. कोणी वाटेल ते बोलतो. रागच येत नसल्याने अशा व्यक्तीला कोणी फारसे महत्त्व देत नाही. अशा व्यक्तीला प्रत्येक ठिकाणी गृहीत धरले जाते. त्यामुळे मग अशा व्यक्तींवर अन्याय होऊन अशा व्यक्तींच्या हक्कांवर आणि अधिकारांवरही गदा आणली जाते. त्यामुळे राग वाईट असला तरी तो योग्य प्रमाणात, योग्य ठिकाणी आणि योग्य वेळी आला पाहिजे आणि दाखवता आला पाहिजे. अती प्रमाणात राग येणे मात्र चांगले नाही. अती प्रमाणात आणि नको त्या ठिकाणी, नको त्यावेळी राग येणे हे नुकसानकारक व धोकादायक असते. अती प्रमाणात राग आल्याने कौटुंबिक, सामाजिक नाते बिघडतात. अती रागातून खूप मोठे नुकसान होऊ शकते. म्हणूनच राग कुठे, कधी यावा तो किती व कसा दाखवावा आणि प्रमाणापेक्षा जास्त राग येऊ नये, चुकीच्या ठिकाणी, चुकीच्या वेळी, अगदी तडकाफडकी राग दाखवू नये, जेव्हा राग येतो त्यावेळी आणि त्यानंतरही डोके शांत ठेवून विचार करता आला पाहिजे. कितीही राग आला तरी डोके शांत ठेवणे आणि गप्प राहणे याशिवाय रागामध्ये दुसरा कोणताही निर्णय घेऊ नये. या सर्व गोष्टींचे योग्य व्यवस्थापन करता आले तर राग वाईट किंवा चुकीचा ठरण्याऐवजी चांगला ठरू शकतो.

अनेक विचारवंत, प्रबोधनकार, प्रवचनकार राग या विषयावर बोलतांना तो किती वाईट आहे हेच जास्तीत जास्त पटवून देण्याचे काम करतात. काही प्रमाणात ते खरेही आहे. परंतु माझ्या मते राग हा नैसर्गिक आहे. माणसाच्या मनात ज्याप्रमाणे आनंद, समाधान, मनशांती, तृप्ती, लोभ, जिद्द, चिकाटी, मोह, प्रेम, आवड, आपुलकी, समज, गैरसमज अशा भावना निर्माण होतात, त्याचप्रमाणे मनात राग निर्माण होतो. रागाव्यतिरिक्त इतर भावना जेव्हा मनात निर्माण होतात तेव्हा त्या नियंत्रणात असतात आणि त्या व्यक्त कशा करायच्या हे आपले आपण ठरवू शकतो. तसे रागातही करता आले पाहिजे. इतर भावना मनात निर्माण झाल्यानंतर त्या व्यक्त करायच्या किंवा नाही करायच्या, करायच्या असल्यास कोणत्या पद्धतीने, कुणाजवळ, कधी, कशा व्यक्त करायच्या याबाबत आपण शांत डोक्याने विचार करून निर्णय घेतो. तसे राग आल्यानंतर तो व्यक्त करायचा किंवा नाही करायचा, करायचा असल्यास कधी, कुठे, कुणाजवळ आणि कशा पद्धतीने व्यक्त करायचा, हे सुद्धा शांत डोक्याने ठरवता आले पाहिजे. अगदी जेव्हाच्या तेव्हा अत्यंत तातडीने आणि विशेष म्हणजे कोणताही विचार न करता आपल्या मनातील राग कधी व्यक्त करू नये. मनात राग असतांना काहीही बोलू नये किंवा कोणताही निर्णय घेऊ नये. डोक्यात राग असतांना वाहन तर अजिबात चालवू नये. कारण रागाच्या भरात मोठी चूक होण्याची शक्यता असते, जी चूक नुकसानकारक ठरू शकते. आपल्याला राग येईल अशी घटना घडल्यानंतर त्यावेळी शांत राहून नंतर सद्सद्विवेक बुद्धीने त्या घटनेचा विचार करावा. जर आपल्याला राग आणणाऱ्या घटनेमागे आपलीच काही चूक असेल तर ती मान्य करून पुढे आपल्या हातून अशी चूक होणार नाही यासाठी काय काळजी घ्यायची याचा विचार करून झालेली घटना फक्त लक्षात ठेवायची. जेणेकरून ती चूक आपल्या हातून पुन्हा होणार नाही. याउलट ज्या घटनेने आपल्याला राग आला त्या घटनेमध्ये आपली काहीही चूक नसेल तर मग ज्याची कुणाची चूक आहे त्याला थोडा वेळ निघून गेल्यानंतर शांततेने त्याची चूक लक्षात आणून देण्याचा प्रयत्न करावा. त्याने त्याची चूक मान्य केली तर ठीक, मान्य नाही केली तर जबरदस्ती करू नये. पण अशा व्यक्तीसोबत भविष्यात कशा पद्धतीचे संबंध ठेवायचे याबाबत वेळीच योग्य निर्णय घ्यावा. अन्यथा अशा व्यक्ती ज्यांना आपली स्वतःची चूक कधीच मान्य नसते, त्या व्यक्ती वारंवार चुका करत राहतात आणि त्यातून आपल्याला राग येण्यासारख्या घटना घडत राहतात. पुढे पुढे अशा व्यक्तींचा प्रचंड मानसिक त्रास व्हायला लागतो. त्यातून एखादेवेळी आपला राग नियंत्रणाबाहेर गेला तर आपल्या हातून चूक घडू शकते. त्यामुळे अशा व्यक्तींसोबत अगदी कामापुरते संबंध ठेवणे योग्य असते.

आपला अपमान करणाऱ्या, आपल्याला अत्यंत चिल्लर किंवा फालतू समजणाऱ्या, आपल्या सोबत तुच्छतेची वागणूक देणाऱ्या, आपल्यासोबत उर्मट किंवा उद्धटपणाने बोलणाऱ्या, दादागिरी करणाऱ्या किंवा पद, पैसा, प्रतिष्ठा, सत्ता या गोष्टीची मस्ती दाखवणाऱ्या व्यक्तींना त्यांची जागा दाखविण्यासाठी आणि आपली लायकी सिद्ध करण्यासाठी थोडा संयम ठेवावा आणि डोके शांत ठेवून आपल्या हातून कायद्याचे उल्लंघन होणार नाही किंवा आपल्या हातून चूक होणार नाही याची काळजी घेऊन अशा व्यक्तींच्या नाड्या शोधण्याचे काम करावे. प्रत्येकाची एखादी नाडी अशी असते की ती दाबल्यानंतर त्यांचा आवाज बंद होतो आणि अंगातली मस्ती आपोआप जिरते. फक्त ती नाडी शोधता आली पाहिजे आणि योग्य वेळी, योग्य ठिकाणी दाबता आली पाहिजे.

# या बांडगुळांनाही रांगेत उभे करा...

माझे मत
सुशीलकुमार वाठोरे
9850192186



युद्धजन्य परिस्थितीतील भयानकता भारतीय नागरिकांनाही आता तीव्र उन्हाळ्यात चटके देवू लागली आहे. निसर्गानेही चटके द्यावे, सरकारी धोरणेही चटके देण्यासाठीच राबविली जावी अशीच काहीशी वास्तविकता आज सामान माणसाला जीणं नकोसं करु पहात आहे. नोटबंदीच्या रांगांनी आर्थिक कंबरडे तर मोडलेच पण सामाजिक विषमतेलाही बर्यापैकी खतपाणी घातले. त्यानंतर कोरोना नावाचा आणला गेलेला व्हायरस सर्वच कुटुंबांना दुःख देणारा ठरला. जणू आपण लोकशाही मार्गाने सत्तेत बसविलेली मंडळी नवनवीन धोकादायक शासकीय धोरणे राबवून सर्वसामान्य जनतेला गुलाम बनविण्यासाठीच पाठविली आहेत की काय अशी शंका आता येवू लागली आहे. कोणतेही सकारात्मक व्हीजन डोळ्यासमोर न ठेवता स्वार्थी विचाराने बरबटलेली ही सत्तापिपासू जमात म्हणजेच सत्ताधारी मंडळी देशासह राज्यांना कोणत्या दिशेने नेवू पाहात आहेत हे एव्हाणा स्पष्ट होवू लागले आहे. नोटबंदी नंतर कोरोना आणि आता सध्या परिस्थितीत सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचे झालेले वस्त्रहरण आणि त्याचा सर्वसामान्य जनतेला बसलेला फटका हा फार दूरगामी परिणाम करणारा आहे. या साऱ्या गंभीर परिस्थितीत राजकीय आणि सत्ताधारी मंडळी मात्र गुण्यागोंविंदाने आनंदात बागडतांना दिसत आहेत. मेटाकुटीस आला आला आहे तो मतदान करणारा सर्वसामान्य माणूस, की जो आता लोकशाहीच्या दरबारात प्रत्येक गोष्ट मिळविण्यासाठी रांगा लावून उभा आहे, नव्हे सत्ताधाऱ्यांनी त्याला उभा केला आहे. ही लोकशाहीची कोणती 'छबी'या नेते मंडळींनी उभी केली आहे? स्वातंत्र्यासाठी



लढा उभारून जिवाची आहुती देणाऱ्या हुतात्म्यांना अपमानीत करण्याचा हा किळसवाणा प्रकार कुठपर्यंत सहन करायचा या बद्दल आता प्रत्येकानेच गांभीर्याने विचार करणे गरजेचे झाले आहे नसता आपली गरज या बांडगुळांची शिदोरी न बनो, तसेही हे सारे भिकारी प्रवृत्तीचेच आहेत हे आतापर्यंतच्या त्यांच्या एकूण वागण्या बोलण्यातून स्पष्ट झालेले आहे.

आता ही स्पष्टता लक्षात घेवून या बांडगुळांनाही सहज उपलब्ध होणाऱ्या गोष्टी रांगेत उभे करूनच मिळाव्यात यासाठी काहीतरी ठोस भूमिका घेणे गरजेचे झाले आहे. युद्ध तिकडे चटके मात्र इकडे याला कारणीभूत सरकारी धोरणे आहेत हे स्पष्टच आहे. मग ही धोरणे ठरविणारी जमात वठणीवर आणण्यासाठी आता पुन्हा स्वातंत्र्य लढ्यासाठी सज्ज झाले पाहिजे, कारण खऱ्या अर्थाने भारतीयांना स्वातंत्र्य मिळालेच नाही याची जाणीव गेल्या १२ ते १३ वर्षात प्रकर्षाने जाणवू लागली आहे. गोऱ्यांची गुलामी उलथावून लावणाऱ्या आपल्या पूर्वजांना खरी आदरांजली द्यायची असेल तर या आधुनिक काळ्यांची गुलामी झुगारून देण्यासाठी तरुणांनी पुढे येणे गरजेचे आहे, नव्हे सर्वांनीच खाद्यांला खांदा लावून लढायला हवे. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या उद्दात्त हेतूने भारतासाठी एक उत्तुंग अशी राज्य घटना लिहिली त्या राज्य घटनेची आब राखण्याची जबाबदारी ही सर्वांचीच आहे.

परंतु काही निर्लज्ज मंडळी 'हिंदुत्व' नावाच्या आड देशात अराजकता माजवू पहात आहेत. त्यांचे हे मनसुबे यशस्वी होणार तर नाहीच उलट सर्वात जास्त नुकसान या धर्मवेड्या बांडगुळांचे होणार आहे एव्हढे मात्र निश्चित. माणसाला जगण्यासाठी धर्म नव्हे दोन वेळचे जेवण आवश्यक आहे.

पोटातच काही नाही आणि धर्माला कवटाळून काय मिळणार आहे. आपल्या देशात आज एक नाही अनेक समस्या उभ्या आहेत. त्या सोडविण्याऐवजी जटील करण्यातच ही राजकारणी मंडळी धन्यता माणून आपली पोळी भाजण्यात मश्गूल झाली आहेत. आता सर्वसामान्य माणसाने जागरूक होणे काळाची गरज आहे. नाहीतर हाच काळ आपल्यासाठी कर्दनकाळ ठरणार आहे याची जाणीव सर्वांनीच ठेवायला हवी.

# श्रद्धेचा पदर आणि भोंदूगिरीचा विळखा

## (स्त्रियाच सावज का ठरतात? एक दाहक वास्तव!)

चर्चा
मुक्तिका वाटखेडकर
पुणे, मो. 8600470869



**आजचे युग हे विज्ञान, तंत्रज्ञान आणि माहितीचे युग मानले जाते. मात्र, याच आधुनिक काळातही समाजाच्या एका कोपऱ्यात भोंदू बाबांच्या 'दरबारात'लागणाऱ्या रांगा कमी झालेल्या नाहीत. धक्कादायक बाब म्हणजे, या भोंदूगिरीच्या जाळ्यात अडकणाऱ्यांमध्ये महिलांची संख्या लक्षणीय असते. जेव्हा जेव्हा एखाद्या भोंदू बाबाचे काळे कारस्थान उघडकीस येते, तेव्हा समाजासमोर एकच प्रश्न उभा राहतो सुशिक्षित समाजातही स्त्रिया या भोंदूंच्या प्रभावाखाली का येतात? या प्रश्नाचे उत्तर केवळ अज्ञानात नाही, तर ते आपल्या सामाजिक, मानसिक आणि कौटुंबिक रचनेत खोलवर दडलेले आहे.**

भारतीय कुटुंब व्यवस्थेत स्त्रियांवर अनेकदा मानसिक आणि भावनिक दबाव असतो. कौटुंबिक कलह, मुलांचे भविष्य, सासरचा त्रास किंवा आर्थिक अडचणी यांमुळे महिला मानसिकदृष्ट्या थकलेल्या असतात. अशा वेळी, 'तुझं सगळं काही ठीक होईल,' असे म्हणणारा किंवा 'तुझ्यावर कोणाची तरी करणी आहे,' 'किंवा हे कर म्हणजे कृपा होईल', असे सांगून भीती घालणारा भोंदू बाबा त्यांना हवाहवासा वाटतो. भोंदू बाबा नेमका याच 'भावनिक कमकुवतपणाचा' फायदा घेतात. जिथे आप्तस्वकीय ऐकून घेत नाहीत, तिथे हे बाबा आपलेपणाचे सोंग आणून स्त्रियांचा विश्वास संपादन करतात. आपल्या समाजात मुलींना लहानपणापासूनच 'जास्त प्रश्न विचारू नकोस' किंवा 'मोठ्यांचा शब्द प्रमाण मानावा' असे शिकवले जाते. धर्माच्या आणि परंपरेच्या नावाखाली चालणाऱ्या गोष्टींवर शंका घेणे म्हणजे पाप, अशी भीती त्यांच्या मनात घातली जाते. परिणामी, एखादा भोंदू बाबा जेव्हा चुकीच्या गोष्टी करतो, तेव्हा त्यावर प्रश्न विचारण्याची किंवा विरोध करण्याची हिंमत अनेक स्त्रियांमध्ये नसते. ही 'मूक संमती' भोंदूंचे फावते. 'सगळे जातात, मग आपणही जाऊया,' ही मानसिकता अनेकदा महिलांना अशा मठांकडे किंवा आश्रमांकडे खेचून नेते. गल्लीतील किंवा नात्यातील इतर महिला एखाद्या बाबाचे गुणगान गात असतील, तर वैयक्तिक मत बाजूला ठेवून त्या प्रवाहात सामील होणे सोपे वाटते. सामाजिक बहिष्कृततेची भीती किंवा 'आपण मागे पडू'ही भावना स्त्रियांना अशा जाळ्यात अडकवते. हे वास्तव मांडताना एक गोष्ट स्पष्ट करणे आवश्यक आहे की, केवळ स्त्रियाच भोंदूगिरीला बळी पडतात असे नाही; तर पुरुषही मोठ्या प्रमाणात या जाळ्यात अडकतात. मात्र, स्त्रियांचे सामाजिक स्थान अधिक असुरक्षित असल्याने त्यांचे शोषण करणे भोंदू बाबांना सोपे जाते.



त्यांच्या श्रद्धेचा वापर त्यांच्याच विरुद्ध 'शस्त्र' म्हणून केला जातो. भोंदू बाबा आधी कुटुंबाच्या समस्या ओळखून त्यांचा विश्वास जिंकतात. त्यानंतर हळूहळू त्यांना भावनिक जाळ्यात ओढले जाते. हे नियंत्रण इतके खोलवर जाते की, पीडित व्यक्तीला आपले होणारे शोषणही 'दैवी साक्षात्कार' किंवा 'सेवेचा एक भाग' वाटू लागतो. याच मानसिक गुलामगिरीतून मग शारीरिक आणि आर्थिक शोषणाचे गुन्हे घडतात.

उपाय काय? (दोन प्रश्न जे दिशा बदलू शकतात) भोंदूगिरीचा हा वणवा शमविण्यासाठी समाजात 'विवेकाचा दिवा' लावणे गरजेचे आहे. त्यासाठी खालील गोष्टी महत्त्वाच्या आहेत: 'का?' आणि 'कसे?' हे प्रश्न विचारा: कोणतीही चमत्कारिक गोष्ट किंवा दावा समोर आल्यावर तो विज्ञानाच्या कसोटीवर उतरतो का, हे तपासा. प्रश्न विचारणे म्हणजे अनादर नव्हे, तर ती जागृत नागरिकाची ओळख आहे. भावनिक आधार कुटुंबात शोधा: जेव्हा कुटुंबातील सदस्य एकमेकांचे ऐकून घेतील आणि आधार देतील, तेव्हा स्त्रियांना बाहेरच्या भोंदू व्यक्तीकडे जाण्याची गरज उरणार नाही. धर्माचा खरा अर्थ समजावून घ्या: देव आणि अध्यात्म हे मनाच्या शांतीसाठी असतात, दहशतीसाठी किंवा शोषणासाठी नव्हे. जो स्वतःला देव मानतो, तो कधीच गुरू असू शकत नाही. श्रद्धा ही मानवी जीवनाला बळ देणारी असते, पण जेव्हा ती 'अंधश्रद्धा' बनते, तेव्हा ती विनाशाचे कारण ठरते. विश्वास ठेवा, पण डोळे मिटून नव्हे. विवेकाची जोड असेल तरच भोंदूगिरीच्या या विळख्यातून समाजाची सुटका होऊ शकते. लक्षात ठेवा, तुमचा विवेक हाच तुमचा खरा रक्षणकर्ता आहे.

# श्रीरामांच्या आदर्शांचा अंगीकार करूया

**माधुरी धनोकार, अकोला**



**चैत्र नवमी उजाडता, आनंद दाटे धाम, दशरथाच्या घरी अवतरले श्रीराम। धर्म-सत्याचा दीप पेटला त्या क्षणाम, भक्तीभावे गाऊ या जय श्रीराम।**

रामनवमी हा हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र, मंगलमय आणि उत्साहवर्धक सण आहे. हा सण भगवान श्रीराम यांच्या जन्मदिनानिमित्त साजरा केला जातो. हिंदू पंचांगानुसार चैत्र महिन्यातील शुक्ल पक्षातील नवमी या दिवशी प्रभू श्रीरामांचा जन्म झाला, म्हणून या दिवसाला विशेष महत्त्व आहे. संपूर्ण भारतभर आणि परदेशातही हिंदू समाजात हा सण अत्यंत भक्तिभावाने आणि आनंदाने साजरा केला जातो. भगवान श्रीराम हे केवळ एक देवता नसून ते आदर्श पुरुष, आदर्श पुत्र, आदर्श भाऊ आणि आदर्श राजा म्हणून ओळखले जातात. त्यांच्या जीवनातील प्रत्येक प्रसंग आपल्याला जीवनातील मूल्ये शिकवतो. सत्य, संयम, कर्तव्यनिष्ठा, त्याग आणि धर्मनिष्ठा हे त्यांच्या जीवनाचे मुख्य आधार होते. या महान ग्रंथात त्यांच्या जीवनाची प्रेरणादायी कथा वर्णन केली आहे. या ग्रंथातून आपल्याला कुटुंबातील नातेसंबंध, समाजातील कर्तव्य आणि न्यायाचे महत्त्व समजते.

रामनवमीच्या दिवशी मंदिरांमध्ये विशेष सजावट केली जाते. प्रभू श्रीरामांच्या मूर्तीची विधिवत पूजा, अभिषेक आणि आरती केली जाते. अनेक ठिकाणी रामजन्माचा सोहळा दुपारी बारा वाजता मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. भजन-कीर्तन, प्रवचन, रामायणाचे पारायण आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांचे आयोजन केले जाते. काही ठिकाणी भव्य शोभायात्रा काढून श्रीरामांचे गुणगान केले जाते. या दिवशी अनेक भक्त उपवास करतात आणि दिवस भर प्रभू श्रीरामांचे नामस्मरण करतात. काहीजण गरजू लोकांना अन्नदान, वस्त्रदान करून समाजसेवा करतात. त्यामुळे या सणाला सामाजिक आणि आध्यात्मिक असे दुहेरी महत्त्व प्राप्त होते. रामनवमीचा मुख्य संदेश म्हणजे "सत्याचा नेहमी विजय होतो" आणि "धर्माच्या मार्गावर चालल्यास जीवनात यश मिळते". आजच्या धकाधकीच्या आणि स्पर्धात्मक जीवनातही श्रीरामांचे आदर्श आपल्याला योग्य दिशा दाखवतात. त्यांचे जीवन आपल्याला संयम, प्रामाणिकपणा आणि सहकार्य यांची शिकवण देते. निष्कर्षतः, रामनवमी हा सण आपल्या संस्कृतीची ओळख आणि आपल्या जीवनमूल्यांची जपणूक करणारा आहे. या पवित्र दिवशी आपण सर्वांनी श्रीरामांच्या आदर्शांचा अंगीकार करून सत्य, प्रेम आणि सद्भावना यांचा प्रसार करण्याचा संकल्प करूया. जय श्रीराम

# इतकेच मला जाताना सरणावर कळले होते, मरणाने केली सुटका जगण्याने छळले होते !-सुरेश भट



**प्रासंगिक**

**प्रवीण वानखडे**
9022149145

जीवन हा शब्द उच्चारला की आपल्या डोळ्यासमोर आशा, आनंद, स्वप्नं आणि संघर्ष यांचं सुंदर चित्र उभं राहतं. पण प्रत्येकाचं आयुष्य असंच रंगीबेरंगी असतं का? काहींच्या वाट्याला येतं ते केवळ वेदना, असहाय्यता आणि अंतहीन प्रतीक्षा अशा वेळी "जगणं" हीच सर्वात मोठी शिक्षा बनते.हरीश राणाची कथा ही केवळ एका व्यक्तीची गोष्ट नाही, तर ती त्या प्रत्येक जीवाची कहाणी आहे जो श्वास घेतोय, पण जगत नाही. १३ वर्षं कोमामध्ये अडकलेलं आयुष्य ना भावना, ना संवाद, ना स्वप्नं फक्त यंत्रांच्या आधारावर चाललेली श्वासांची साखळी. हे जगणं नव्हतंच, हा तर छळ होताशांत, निःशब्द, पण अतिशय वेदनादायी. कधी कधी आपण म्हणतो, "जगणं हेच सर्वात मोठं वरदान आहे." पण जेव्हा तेच जगणं ओझं बनतं, तेव्हा? जेव्हा प्रत्येक क्षण हा असह्य वेदनेचा साक्षीदार असतो, तेव्हा? अशा वेळी माणूस जगण्याची नव्हे, तर मुक्तीची प्रार्थना करतो. हरीशच्या वडिलांनी अंत्यसंस्कारावेळी सांगितलेले शब्द काळजाला भिडणारे होते"कोणी रडू नका" हे वाक्य फक्त धीर देण्यासाठी नव्हतं, तर एक खोल स्वीकार होतं. त्यांनी आपल्या मुलाच्या मृत्यूला दुःख म्हणून नाही, तर त्याच्या वेदनांपासून झालेली सुटका म्हणून पाहिलं.

किती कठीण असेल तो क्षण!

एकीकडे पोटच्या मुलाचा निरोप आणि



दुसरीकडे त्याच्या वेदनांचा अंत झाल्याचं समाधान. ही कथा आपल्याला एक मोठा प्रश्न विचारते जीवन म्हणजे नेमकं काय? केवळ श्वास चालू असणं, की त्या श्वासांना अर्थ असणं? हरीशचं आयुष्य आपल्याला सांगून जातं की, जिवंत राहणं आणि जगणं यात फार मोठा फरक आहे. शरीर जिवंत असलं तरी मन, भावना आणि जाणीव जर हरवल्या असतील, तर ते अस्तित्व केवळ सावलीसारखं उरतं.

"**मरणाने केली सुटका जगण्याने छळले होते**" ही ओळ केवळ भावनिक नाही, तर ती एक कटू सत्य आहे. कारण काही वेळा मरण हा शेवट नसतोतो वेदनांपासून मुक्तीचा आरंभ असतो. आपण नेहमी मृत्यूला घाबरतो, त्याला टाळण्याचा प्रयत्न करतो. पण हरीशसारख्या प्रकरणात मृत्यू हा शत्रू नव्हता, तर एक मित्र होताजो त्याला या अंतहीन वेदनेतून बाहेर काढायला आला. ही कथा समाजालाही आरसा दाखवते. आपण जीवनाचा सन्मान करतो, पण त्या

**जीवनाच्या गुणवत्तेचं काय?**

आपण जगण्याला महत्त्व देतो, पण त्या

**जगण्यामागील वेदनांकडे दुर्लक्ष करतो का?**

हरीश राणाचं आयुष्य संपलं, पण त्याने एक विचार जिवंत ठेवला "सन्मानाने जगणं जितकं महत्त्वाचं, तितकंच सन्मानाने मरणंही महत्त्वाचं आहे." शेवटी चितेची ज्वाळा उसळत असताना एक विचित्र शांतता पसरली होती. कोणी हंबरडा फोडला नाही कारण त्या आगीत केवळ एक देह जळत नव्हता तर १३ वर्षांचा वेदनांचा कैदखाना जळून खाक होत होता.गत्या धगधगत्या अग्नीत एक प्रश्नही विरघळून गेला

"जगणं म्हणजे नेमकं काय?" आणि त्याच ज्वाळांमधून एक उत्तर उमटलं

"जिथे श्वास असतात पण जीवन नसतं,
तिथे मरणच खऱ्या अर्थाने मुक्ती असतं."

आज हरीश गेला
पण तो हरला नाही.
तो त्या वेदनांवर विजय मिळवून गेला.
कारण शेवटी
मरणाने त्याला शांत केलं नाही
तर त्याला मुक्त केलं.

# राशी-भविष्य

**मेष:** आजची भांडवली गुंतवणूक फायदेशीर ठरेल. कामाच्या ठिकाणी तुम्हाला आदर मिळेल. व्यवसाय वाढीमुळे तुमच्या योजनांनुसार काम होईल. तुम्हाला श्वसनाच्या समस्या येऊ शकतात.

**वृषभ:** वेळेवर महत्वाची कागदपत्रे सांभाळा; सामाजिक कार्यात तुम्हाला आदर मिळेल. कायमस्वरूपी मालमत्ता खरेदी करण्यात घाई करू नका. कौटुंबिक समस्या सुटतील.

**मिथुन:** आजचा दिवस सर्जनशील असेल. नवीन करार आणि करारांमुळे तुमचा नफा वाढेल. दिवस दैवी कार्यात घालवला जाईल. सार्वजनिक कल्याणाच्या तुमच्या भावनेमुळे तुमची प्रतिष्ठा वाढेल.

**कर्क:** धर्मादाय कार्यात पैसा गुंतवला जाईल. सामाजिक कार्यामुळे तुम्हाला चांगली प्रसिद्धी मिळेल आणि तुमचा प्रभाव वाढेल. व्यवसाय चांगला होईल. कुटुंबाच्या पाठिंब्याने कामे सहज पूर्ण होतील.

**सिंह:** कामाच्या मोठ्या ताणात यश तुमचे मनोबल वाढवेल. अनोळखी लोकांवर विश्वास ठेवू नका; तुमची फसवणूक होऊ शकते. कामाच्या ठिकाणी वाढ होण्याची शक्यता आहे.

**कन्या:** आनंद आणि समृद्धी वाढेल. आर्थिक गुंतवणुकीबाबत विचारपूर्वक निर्णय घेतल्यास फायदा होईल. कमी बोला आणि चांगले बोला. स्व-अभ्यासात तुमची आवड वाढेल. कुटुंब आणि समाजात तुमचे महत्त्व वाढेल.

**तूळ:** व्यवसायात सुरू असलेल्या गुंतागुंतीमुळे तुम्ही त्रस्त असाल. तुम्ही कुटुंबातील सदस्यासह एखादे विशेष कार्य पूर्ण करण्यासाठी पवित्र स्थळांना भेट द्याल.

**वृश्चिक:** दिवसाच्या सुरुवातीला राग येईल. जर गोष्टी तुमच्या इच्छेनुसार झाल्या नाहीत तर तुम्ही कुटुंबातील सदस्यांवर नाराज व्हाल. तुम्हाला नवीन नोकरीची ऑफर मिळेल. धार्मिक आवड वाढेल.

**धनु:** गुंतवलेल्या निधीतून मिळणारा नफा उशिरा होईल. तुमच्या मुलांसाठी निर्णय घेण्यास तुम्ही संकोच कराल. बिघडणारी आर्थिक परिस्थिती बांधकाम कामाच्या गतीवर परिणाम करू शकते.

**मकर:** कमी वेळात मोठ्या नफ्याच्या मागे लागू नका. कठोर परिश्रम करा. तुमचे पराक्रम वाढतील. व्यवसायात नवीन योजना सुरू केल्या जातील. घाई हानिकारक ठरेल.

**कुंभ:** आज, विशेष प्रगतीशील योग तुमच्या मनात आनंद आणतील. तुम्ही तुमचे मन भक्तीत गुंतवण्याचा प्रयत्न कराल. कामाच्या ठिकाणी अनुकूल परिणामांसाठी सक्रियता आवश्यक आहे.

**मीन:** आळस सोडून काम करा. रखडलेले प्रकल्प यशस्वी होतील. भांडवली गुंतवणुकीमुळे अपेक्षेपेक्षा जास्त नफा मिळेल. तुमच्या योजना आणि निर्णयांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तुम्ही एखाद्याकडे आकर्षित व्हाल.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३



**अध्यात्म**

**नितीन श्रीवास्तव**
मो. ९४२१४९४०४०

# भक्तांच्या हाकेला धावून येणारी रेणुका देवी

**'माझी रेणुका माऊली'**
**'माझी रेणुका माउली, कल्पवृक्षाची साउली जैसी वत्सालागी गाय तैसी अनाथांची माय'**

नवरात्र म्हणजे शक्तीची उपासना. शक्ती म्हणजेच देवी. घरोघरी घटस्थापना केली जाते. अखंड दीपप्रज्वलित ठेवला जातो. नवरात्राचे नऊ दिवसांत युद्धात देवीने अनेक दैत्यांचा संहार केला. महिषासुराचाही वध केला. म्हणूनच महिषासूरमर्दिनी नाव रूढ झाले. या तिच्या शक्ती रूपाचीच पूजा नवरात्रीत केली जाते. शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कुष्मांडी, स्कंदमाता, कात्यायनी, कालरात्री, महागौरी, सिद्धिदात्री अशी देवीची नऊ रूपे आहेत. महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती या रूपांतही देवीची पूजा केली जाते. नवरात्राचे नऊ दिवस वेगवेगळ्या फुलांच्या माळा घालण्याची प्रथा अनेक ठिकाणी आहे. पहिली माळ शेवंती, सोनचाफा अशा पिवळ्या फुलांची, दुसरी माळ मोगरा, तगर, अनंत, चमेली अशा पांढऱ्या फुलांची, तिसरी माळ गोकर्ण, निळी फुले, कृष्णकमळ, चौथी माळ अबोली, तेरडा, केशरी फुले, पाचवी माळ बेल, सहावी माळ कर्दळीची फुले, सातवी माळ झेंडूची फुले, आठवी माळ कमळ, गुलाब, जास्वंदी आणि नवव्या मांडला कुंकुमार्चन करतात.



रेणुका देवी भक्तांच्या हाकेला धावून येणारी मनोकामना पूर्ण करणारी माता म्हणून ओळखली जाते.रेणुका म्हणजे एकविरा आणि एकविरा म्हणजे रेणुका असा उल्लेख पुराणात सापडतो. दैवत्व एक असले तरीही त्या दोन्ही देवीची नावे व स्थान वेगवेगळे आहे आणि आता दोन्हीही शक्तीस्थळ म्हणून प्रसिध्द आहेत. दोन्ही स्थळांची एक वेगळी ओळख आहे. वेगळी प्रचीती आहे. कार्ल्याची आई श्री एकविरा म्हणून तर माहूरची श्री रेणुका म्हणून प्रसिध्द आहे. सर्वत्र देवींची विविध नावे असली तरी शेवटी ही सर्व देवी पार्वतीचीच रूपं आहेत. असेच प्रसिध्द आणि नवसाला पावणाऱ्या रेणुका देवीचे मंदिर बुलडाणा मुख्यालयापासुन अवघ्या २५ किलोमीटर अंतरावर असलेल्या चिखली शहरात आहे. दर वर्षी चैत्र पौर्णिमेला रेणुका देवीची यात्रा भरते.

चिखली येथील अतिप्राचीन असलेले श्री रेणुकामातेचे मंदिर परिसरातील भाविक भक्तांचे सर्वश्रेष्ठ शक्तिपीठ आहे. उपासकांचे श्रध्दास्थान असलेले भक्तांच्या नवसाला पावणारे, भाविकांच्या मनोकामना पुर्ण करणारे जाज्वल्य आणि जागृत दैवत म्हणून भक्तगण येथे नियमित येतात. पूर्वी देवीच्या मंदिराभोवती घनदाट जंगल होते. मंदिराजवळ एक जिवंत पाण्याचा झरा नेहमी वाहत असल्यामुळे आपली तृष्णा भागवण्यासाठी येथे हिंस्त्र श्वापदाचा वापर होता. देवीसमोर दिपमाळीची तिन्ही बाजुंनी अर्ध चंद्राकृती उभी आराम वैभवात भर घालत होती. मंदिरापासून अर्ध्या मैलावरून वाहणारी जाबुंवती नदीच्या काठावर चिखली गाव वसलेले आहे. निजामशाहीच्या कालखंडात परधर्मीय सतत हल्ले करुन हिंदुंची मंदिरे उद्वस्त करीत असत. अशा कठीण काळात मंदिरातील मुर्तीचे संरक्षण करण्यासाठी गावातील वतनदार मंडळीनी हातात शस्त्र घेऊन देवीचे संरक्षण केले. दरम्यान देवीची पुजा अर्चा करण्यासाठी तपस्वी बचानंद महाराज यांची नेमणूक झाली. दरम्यान देवानंद, परमानंद, शिवानंद, नागानंद यांनी सद्गुरु बचानंद महाराज यांचे शिष्यत्व पत्करले, गुरुपदेश आज्ञेवरून त्यांनी ठिकठिकाणी जाऊन देवीची मंदिरे उभारून मठ बांधले.

परिसरातील शेलुद, गोदरी, तपोवन, मर्दडी, अमडापूर, शेंदला, जानेफळ, घाटपुरी, देऊळगाव काळे, लोणार, बुलडाणा येथे जाऊन देवीचा प्रसार केला. कालांतराने गुरुच्या गादीवर शिष्य बसण्याच्या परंपरेवरुन वाद निर्माण झाल्यामुळे येथील पंचांनी गुरुवारला देवीच्या पुजेसाठी नेमले तेव्हापासून मंदिराचा कारभार पंच पाहत होते. आता विश्वस्त मंडळ सर्व कारभार पाहत आहे. विश्वस्त मंडळ आल्यापासून भाविकांना विविध सुविधा देण्याकडे लक्ष पुरविण्यात आले. जीर्णोध्दाराचे कार्य हाती घेऊन मंदिरात अनेक सुविधा निर्माण केल्या आहेत. संस्थामध्ये दरवर्षी तीन उत्सव साजरे केल्या जातात. शारदीय नवरात्रोत्सव, बचानंद महाराज पुण्यतिथी आणि वासंतिक नवरात्रोत्सव, यातील श्री अश्विन शु. प्रतिपदा ते नवमीपर्यंत उत्सवाचे स्वरुप असते. घटस्थापनेपासून दररोज सामुहिक आरती भजन किर्तन, प्रवचन, देवी भागवत, ज्ञानेश्वरी पारायण, भारूड, गोंधळ, गरबा आदी कार्यक्रम होत आहेत.

दरवर्षीप्रमाणे श्री रेणुकादेवी संस्थान व बचानंद स्वामी संस्थानच्या वतीने देवीचा वासंतिक नवरात्र उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवाचा प्रारंभ बुधवार दि. २५ मार्च २०२६ रोजी होत असून यादिवशी सकाळी घटस्थापना होईल. गुरुवार दि. २६ ला श्रीराम जन्मोत्सवानिमित्ताने श्रीराम दरबार पटपूजा, गुलाल व पुष्प उधळण, आरती तसेच सकाळी १० वाजता ह.भ.प. राजेंद्र महाराज तळेकर यांचे प्रवचन होईल. दि. २७ मार्च रोजी स्वामी नारायण जयंती कार्यक्रम व रात्री ८ वाजता ऋणानुबंध बहु. सामाजिक संस्था अहिल्यानगर यांचा भक्तीसंगीताचा कार्यक्रम, दि. २८ मार्च ला दुपारी ४ वाजता भजनसंध्या, दि. २९ रोजी कामदा एकादशीनिमित्त भजन, गीतापाठ तसेच दि. ३० मार्च रोजी सोमप्रदेशनिमित्ताने शिवलीलामृत वाचन सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत होईल. दि. ३१ मार्च रोजी ह.भ.प. शिवानीताई शिंदे यांचे किर्तन सायंकाळी ७ ते १० या वेळेत होईल. सदर कार्यक्रम हा जिल्हा बँकेच्या बाजुला, खामगाव चौफुली, चिखली येथे होणार आहे. बुधवार दि. १ एप्रिल ला सायंकाळी ७ ते १० या वेळेत ह.भ.प. राणीताई दौंड (नाशिक) यांचे किर्तन होईल. गुरुवार दि. २ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजता ह.भ.प. राजेंद्र महाराज तळेकर यांचे श्री हनुमान जयंतीनिमित्त किर्तन सेवा व काल्याचे किर्तन होईल. सायंकाळी ७ वाजता ह.भ.प.सोनालीताई फडके (पुणे) यांचे किर्तन होईल. १ व २ एप्रिल रोजी दुपारी २ ते ४ या वेळेत जिल्हा बँकेजवळ खामगाव चौफुली येथे डिगांबर महाराज आसावे (वरदडा) यांचे नेतृत्वात श्री रेणुका देवी महात्म हा कार्यक्रम होईल. दि. १ एप्रिल रोजी सकाळी शहरातील विविध नागरीक, विविध पतसंस्था, मंडळे, संघटना यांची पातळ मिरवणुक निघेल. रात्री ७ वाजता जुनेगावातील श्री गणपती मंदिरापासून भंदे मिरवणूक तर बसस्थानकापासून मशाल मिरवणूक निघेल. दि. २ एप्रिल रोजी प्रातःकाळी देवीला महाअभिषेक, महाआरती होईल. नंतर वगदी मिरवणूक, एम.टी. कर्मचारी यांचे मानाचे पातळ मिरवणूक, सायंकाळी ७ वाजतापासून वहन मिरवणूक निघेल. वहन मिरवणुकीत पंजाब येथील दिलेर खालसा पथक यांचे चित्तथरारक खेळ, झांज पथक, बँड पथक, लेझिम व टिपरी पथक, संबळ वादन, वाघ्या मुरळी आदी पथकांचा समावेश राहणार आहे. तसेच राऊतवाडी मित्र मंडळ, हरिओम मित्रमंडळ, संत गजानन महाराज मित्र मंडळ, माळीपुरा मित्र मंडळ, शिवराज पाटील मित्र मंडळ यांच्या वतीने भव्य आतिषबाजी व महाप्रसाद वितरण होईल. दि. २ एप्रिल रोजी सकाळी ४ वाजता नवरात्री उत्थापन व पूजा अभिषेक, शेलूद वासियांचे मानाचे पातळ अर्पण करण्यात येईल. याशिवाय विविध संस्था, पतसंस्था, संघटना व भाविकांचे वतीने महाप्रसाद, पाणी, चहा वाटप करण्यात येणार आहे. वहन मार्ग- मंदिराला प्रदक्षिणा, लोकमान्य टिळक पुतळा, पंचायत समिती, वीर सावरकर नगर, खामगाव चौफुली, बसस्टँड, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, राजा टॉवर, चिंच परिसर, तलाठी कार्यालय, उदासिन महाराज मठ, पॉवर क्लब, महारुद्र हनुमान मंदिर, नदीजवळील चौफुली, गणपती मंदिर, मारुती मंदिर, चिंच परिसर, पोलिस चौकी, रोकडा हनुमान मंदिर, गुरुनानक मंदिरापासून मंदिरात परत येईल. शुक्रवार दि. ३ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता श्री रेणुकादेवी मंदिरात आरती मंडळाचे वतीने महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे. तरी सर्व कार्यक्रमांचा परिसरातील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री रेणुकादेवी संस्थान व बचानंद स्वामी संस्थानच्या विश्वस्त मंडळाने केले आहे.

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 346




संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे शब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्दः—**

**दोन अक्षरी**
- इष्ट
- घन
- घृणा
- चर्च
- चार
- चोर
- जन
- टीका
- डर
- तमा
- तर
- तव
- तीर
- थारा
- नशा
- नाथ
- पंक
- मत
- मीन
- मृत्यु
- यव
- यस
- राग
- लस
- लक्ष
- वश
- वाचा
- वादा
- विडा
- शाप
- शुल
- सण
- सल
- साय
- हज

**तीन अक्षरी**
- आधार
- आनन
- कपाळ
- कपोल
- कलत्र
- किमया
- कृपण
- खवला
- गहाण
- तरल
- तलम
- धारक
- नर्तक
- निकृष्ट
- मदारी
- रबर
- वलय
- वसुधा
- विभूती
- शेवई
- सकल
- समय
- संतति
- सजनी
- सर्वत्र
- सारथी
- संसार
- क्षणिक

**चार अक्षरी**
- अवनती
- आट्यापाट्या
- आरमार
- आशीर्वाद
- इत्यंभूत
- जलाशय
- तळघर
- तीळमात्र
- दंतकथा
- दलदल
- धनुर्वात
- पुण्यतिथी
- बलवान
- भासमान
- मृत्युदंड
- लपंडाव
- शहानिशा
- सुधारस
- हवामान
- क्षयमास

**पाच अक्षरी**
- अनशेपोटी
- आपलपोट्या
- मानसपुत्र
- मृगनयना
- रजनीचर
- लवलक्षण
- शरणागत

**सहा अक्षरी**
- बालब्रह्मचारी

**अन्य अक्षरी**
- जखमेवर मीठ चोळणे
- जय जवान जय किसान

(उत्तर पुढील अंकी)

**मागील महाशब्दकोडेचे उत्तर**



Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 727



**—: आडवे संकेत :—**

1) पूर्वीच्या काळी विधवा स्त्रीबद्दल पत्रात लिहावयाचा आदरार्थी मायना
5) संकुचित स्थळी वाढलेला, विहिरीतील बेडूक
8) मिठाई करून विकणारा
11) वर्तुळाकार
12) अंबाडीसारखे एक झाड किंवा त्याचा वाख
13) आरोप, लांछन 14) रिकामा
15) माय, जननी, माता
16) आशा, अपेक्षा, इच्छा
17) तुरुंगवास
19) पाणी, जल
20) पोळी भाजण्याचे पसरट पात्र
21) अतिशय शुद्ध व उत्तम बावन्नवेळा शुद्ध केलेले सोने
22) स्वर्गलोकीचा एक देवर्षी
24) सूर्यास्त होण्याच्या सुमाराचा मुहूर्त
26) पति, स्वामी
27)उष्णतेमुळे अंगातून निघणारे पाणी
28) एक लहान चर्मवाद्य
30) समुदाय, जमाव
31) हे नऊ नाथ नवनारायणाचे अवतार समजले जातात
33) सौभाग्यवतीचे संक्षिप्त उच्चारण
34) जनावरांचा जमाव
35) कडे, वर्तुळ
37) दगा, समान संख्यांचा गुणाकार
38) ओझे, वजन
39) लाजाळू
40) साप मुंगुसाचे खेळ दाखविणारा
41) देहावसान
43) गिरणीवर पीठ करायला नेलेले गहू, डाळ इत्यादी
44) अंगावरील कोमल केस
46) मनाशी केलेला कठोर निश्चय
49) व्यवस्था करणारा, प्रत्यक्ष कृती करणारा
50) धन्यवाद, कृतज्ञता
51) बंदुकीच्या गोळ्या किंवा तलवारीच्या वारापासून संरक्षण व्हावे म्हणून घातलेला लोखंडी अंगरखा
53) गर्विष्ठ, बाणेदार,
55) नदीचा तीर, काठ
56) समाजात प्रतिष्ठा असलेली व्यक्ती
57) बंधन सुटलेला, स्वैर, मोकळा
58) पांडवांद्वारा अभयदानप्राप्त एक दानव
59) नाटकाच्या आरंभी सूत्रधार आणि एखादे पात्र यांचे संभाषण
60) प्रेम, जिव्हाळा 61) विस्तव
62) हिमालयात आढळणारा एक केसाळ प्राणी
63) पौराणिक काळातील मदनाची प्रेयसी
64) रंगमंचावर सादर होणारे कथानक
65) कृतज्ञ, ऋणी असणे
66) धैर्य, हिंमत
67) सजावट, शोभिवंत रचना
68) इच्छित कार्य सिद्धीस गेल्यास देवाला काहीतरी अर्पण करण्याचा निश्चय
69) शहराच्या आरंभी असलेली चौकी
71) एक ऋतू 72) प्रत्येक
73) सुक्या मेव्यातील एक फळ
74) कावळ्यांचा आवाज
75) भारताचे नागरिकत्व स्वीकारलेला
76) शुभ कार्याचा आरंभ
77) फूल उमलण्याअगोदरची स्थिती

**—: उभे संकेत :—**

1) गंगेचे उगमस्थान
2) कपोल
3) आचार्य विनोबा भावेंनी लिहिलेली श्रीमद् भगवत्गीतेवरील टीका
4) ताठा, गुर्मी
5) वंश, घराणे, पक्षकार
6) रामायणात कैकयीचे कान भरणारी दासी
7) देवळाचा शिरोभाग, अतिरेक, पराकाष्ठा
8) हिमालयाच्या कुशीत असलेले एक प्रसिद्ध पवित्र तीर्थक्षेत्र
9) वेल, वल्ली
10) येशु ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचा दिवस, गुड फ्रायडेनंतरचा पहिला रविवार
13) बैठक, बसण्याची वस्तू
15) स्वर, नाद
16) पुनः पुनः म्हणणे, आवृत्ती करणे
17) मराठी रंगभूमी व चित्रपटात अभिनय करणारा एक जुना नावाजलेला अभिनेता
18) डावा
20) गोणपाट, पोत्याचा तुकडा
21) भुजा
22) लहान बालकाचे नाव ठेवणे
23) जुलूम, अन्यायाने एखादी चळवळ दाबून टाकणे
24)..... अन् पोटात पाय या म्हणीतील जीव कोणता ?
25) कर्जाची मूळ रक्कम
29) रडणे, शोक
32) शिजवून पातळ केलेली डाळ
35) घरातील मोठी व्यक्ती
36) मृत्यूदेवता
38) कपाळ, ललाट
42) राखण, राखड
45) जन्मापासून आजवर घालविलेली एकंदर वर्षे
46) शक्यता, संभव
47) पडणे, पान
48) मोठा जोराचा आवाज
49) श्रीगणेशाचे एक नाव
50) गायनातील एक राग
51) चिकित्सा करणारा, परीक्षा करणारा
52) शेतजमिनीत घातलेले पौष्टिक द्रव्य
54) व्यवस्थित राहणारा, यथायोग्य, शोभेसा
55) जादू
57) ज्वारीची कणसे बडविण्याचे लाकडी अवजार
59) एखाद्या व्यक्तिने दिलेला अनुकूल उद्‌गार
60) रस्त्याने जाणारा, पांथस्थ
61) सादृश्य, भ्रम, प्रतिबिंब
63) बारीक झणझण
64) मोर्च्यातील घोषणा
65) पसंत पडणे
66) अरबीमध्ये दहा हा आकडा
67) देवांस स्तुती स्तोत्र म्हणत दिव्यांनी ओवाळणे
69) कोमल, सुकुमार
70) वडिलांचा भाऊ
72) मूल्य, किंमत (उत्तर पुढील अंकी)

**मागील महाशब्दकोड्याचे उत्तर**



Uday Munde - 8446302691

## महत्त्वाचे

### कुख्यात वसीम चिऱ्या जाळ्यात

**नागपूर :** लूटमार, खंडणी, हाणामारी, शस्त्राच्या धाकावर वसुली सारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये पाच पोलीस ठाण्यांना हवा असलेला कुख्यात गुन्हेगार वसीम उर्फ चिऱ्या अपझल शेख (४७, रा.शांतीनगर स्मशान घाट) हा अखेर गुन्हे शाखा पथक तीनच्या सायबर युनिटच्या हाती लागला. गेल्या वर्षी शांतीनगरात याच वसिम चिऱ्यावर वर्चस्वाच्या लढाईतून सलीम लंगडा टोळीतल्या सदस्यांनी हल्ला केला होता. वसीम विरोधात अमरावती शहरातील नागपूरी गेट, शांतीनगर, कळमना, यशोधरा नगर, लकडगंज पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. शहरातील चार आणि अमरावतीतल्या एका वाहनांची नासधूस करणारे सापडले.

एमआयडीसी पोलीस हद्दीतील इंदिरा माता नगरात सोमवारी वर्चस्वाच्या लढाईत रात्री झालेल्या वाहनांच्या नासधूस प्रकरणात चौघांची ओळख पटली आहे. यातील सूत्रधार गिट्टीखदान पोलीसांच्या डायरीवरील सराईत बदमाष असल्याचे आढळले. यात आकाश उर्फ बाका सहारे आण सोमेश उर्फ दद्दू दवराडे, सोहेल आणि मारी हे चौघे सूत्रधार आहेत. हे सर्व सराईत गुन्हेगार असून या टोळीचा इंदिरा माता नगरातल्या गुंडांशी रविवारी वाद झाला होता.त्यातूनच सोमवारी रात्री इंदिरा माता नगरातील सहा वाहनांची प्रचंड नासधूस झाली.

### पहिली पत्नी असताना दुसरीशी विवाह, गुन्हा दाखल

**नागपूर** :एकीसोबत अग्नीच्या साक्षीने सात जन्मापर्यंत साथ देईल, अशा आणाभाका घेतलेल्या पतीने दुसरीसोबतच सूत जुळवत विवाहबाह्य संबंध ठेवले. २८ वर्षीय आरोपी अजित जैन याने दोन्ही महिलांना अंधारात ठेवत गुपचूप विवाह देखील उरकल्याची घटना नागपूरमध्ये घडली आहे. दुसऱ्या पत्नीला त्याच्या पहिल्या विवाहाची कुणकूण लागली आणि तिने थेट पोलीस ठाणे गाठत विश्वासघातकी पतीला कायद्याचा हिसका दाखवला.

### विचित्र अपघातात ११ जण जखमी

**नागपूर** :वाहन चालवताना चालकाकडून जेवणाचा डबा खाली पडून ब्रेकच्या लिव्हरखाली खाली अडकला. त्यामुळे वाहन थांबवण्यात अडथळा आल्याने झालेल्या विचित्र अपघातात ११ जण जखमी झाले. वर्धा मार्गावरील हॉटेल प्राईडजवळ हा अपघात झाला. यशोधरा नगरातील किरण नथुजी मेश्राम (४९) हे केटरिंगचा व्यवसाय करतात. ते टाकळघाट येथे महाप्रसादाचा कार्यक्रम आटोपून कामगारांसह बोलेरो पिकअपने नागपूरकडे परत निघाले. अर्जुन वाघोडे (२५) वाहन चालवत होता. चालकाने जेवणाचा डबा गिअरजवळ ठेवला. तो डबा खाली पडून ब्रेकच्या लिव्हरखाली अडकला. त्यामुळे वाहन दुभाजकावर आदळले. या अपघातात पाच पुरुष, पाच महिला आणि एका लहान मुलासह ११ जण जखमी झाले.

### महागडे बूट, जॅकेट पळवणारे चोर

**नागपूर** :मध्यवर्ती मार्गावरील उच्चभ्रूंची वस्ती वर्धमान नगरातील पुमाचे शोरूम फोडत बुटांसह महागड्या ब्रांडेड वस्तू पळवणाऱ्या दोन चोरांना लकडगंज पोलिसांनी जेरबंद केले. रौनक सिद्धार्थ चौधरी (२०, रा. समता नगर, जरिपटका) आणि सुमित गणपत मेश्राम (१८, रा. म्हाडा कॉलनी, कपीलनग) अशी या दोन सराईत चोरांची नावे आहे. चैनी जीवनशैलीचे व्यसन जडलेले हे दोघेही सराईत चोर आणि मित्र आहेत. संगनमत करत या दोघांनी रविवारी २२ मार्चला पहाटे चारच्या सुमारास वर्धमान नगरातल्या पुमा कंपनीच्या शोरूम फोडले. दोघांनी पुमा कंपनीचे सहा जोडी बूट, १४ महागडे जॅकेट, अन्य ब्रांडेड वस्तू, बनियान, स्लिपर चप्पल, बरमुडा, चामडी बॅग, गल्ल्यातील साडेसात हजारांची रोख अशा ८८ हजारांच्या महागड्या ब्रांडेड वस्तू चोरल्या होत्या.

# सवलत घेतलेल्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांनाही खुल्या प्रवर्गात संधी

## सर्वोच्च न्यायालयाचा महत्वाचा निर्णय

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर, दि. २५ :** पात्रता परीक्षेत सवलत घेतलेल्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांना अंतिम निवड प्रक्रियेत अधिक गुण मिळाल्यास त्यांना खुल्या (सर्वसाधारण) प्रवर्गातील पदांसाठी विचारात घेता येईल, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले. संबंधित भरती नियमांत स्पष्ट मनाई नसल्यास अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गात नाकारणे अन्यायकारक ठरेल, असे स्पष्ट करत न्या. पी. एस. नरसिंहा आणि न्या. आलोक आराधे यांच्या खंडपीठाने शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उमेदवारांना दिलासा दिला आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचा निर्णय रद्द केला.

उच्च न्यायालयाचा निर्णयाविरोधात अपील उच्च न्यायालयाने त्यांच्या याचिका फ टाळल्यानंतर संबंधित उमेदवारांनी सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. उच्च न्यायालयाने यापूर्वी सवलत घेतलेल्या उमेदवारांना खुल्या प्रवर्गात समाविष्ट करता येणार नाही, असे म्हटले होते.

सर्वोच्च न्यायालयाने निर्णयात नमूद केले की, राज्य सरकारने १३ फेब्रुवारी २०१३ रोजी



जारी केलेल्या शासकीय निर्णयातील भरती नियमांत पात्रता परीक्षेत सवलत घेतलेल्या उमेदवारांना खुल्या प्रवर्गात जाण्यास मनाई केलेली नाही. त्यामुळे अंतिम गुणवत्तेत आघाडीवर असलेल्या उमेदवारांना खुल्या प्रवर्गात संधी नाकारणे योग्य ठरणार नाही. ''पात्रता निकषातील सवलत ही केवळ पात्रतेपुरती मर्यादित असते. अंतिम गुणवत्ता ही स्वतंत्रपणे निश्चित केली जाते. नियमांत मनाई नसल्यास त्याला परवानगी आहे,'' असे न्यायालयाने स्पष्ट केले.

हे प्रकरण महाराष्ट्रातील शिक्षक भरतीशी संबंधित आहे. शिक्षणाचा हक्क कायद्याच्या चौकटीत ही भरती प्रक्रिया राबविण्यात आली होती. उमेदवारांना प्रथम टीईटी उत्तीर्ण होणे आवश्यक होते आणि त्यानंतर शिक्षक अभिक्षमता व बुद्धिमत्ता चाचणी (टीएआयटी ) या परीक्षेतील कामगिरीच्या आधारे अंतिम गुणवत्ता निश्चित केली जात होती.

सामान्य प्रवर्गातील उमेदवारांसाठी टीईटी मध्ये ६० टक्के गुणांची अट होती, तर राखीव प्रवर्गातील उमेदवारांना ५ टक्के सवलत देऊन ५५ टक्क्यांवर पात्र ठरविण्यात येत होते. वाद तेव्हा निर्माण झाला, जेव्हा अशा सवलत घेतलेल्या काही उमेदवारांनी टीएआयटी मध्ये उत्कृष्ट कामगिरी करत खुल्या प्रवर्गातील अंतिम यादीत निवड झालेल्या उमेदवारांपेक्षा जास्त गुण मिळवले. तरीदेखील त्यांना खुल्या प्रवर्गातील यादीत समाविष्ट करण्यात आले नाही

न्यायालयाने या प्रकरणातून काही महत्त्वाचे कायदेशीर तत्त्वे स्पष्ट केली. पात्रता परीक्षेतील सवलत ही केवळ उमेदवाराला स्पर्धेत सहभागी होण्याची संधी देते, ती अंतिम गुणवत्तेवर परिणाम करत नाही. अंतिम निवड ही केवळ गुणवत्तेच्या आधारेच केली पाहिजे. तसेच, भरती नियमांत स्पष्ट मनाई नसल्यास सवलत घेतलेल्या उमेदवारांनाही खुल्या प्रवर्गात स्थलांतर करता येते. या पार्श्वभूमीवर न्यायालयाने निर्देश दिले की, खुल्या प्रवर्गातील शेवटच्या निवड झालेल्या उमेदवारांपेक्षा ३० गुणांनी अधिक गुण मिळवलेल्या अपीलकर्त्यांना गुणवत्ता यादीत समाविष्ट करावे.

## जंगलात लाकडे आणण्यासाठी गेलेली महिला वाघाच्या हल्ल्यात ठार



अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**चंद्रपूर, दि. २५ :** गॅस सिलेंडरच्या टंचाईमुळे घरात स्वयंपाकासाठी जळावू लाकडे आणण्यास जंगलात गेलेल्या तळोधी येथील प्रमिला वाटघुरे (४५) हिचेवर सावरला गावाजवळील कक्ष क्रमांक ८९ मध्ये झुडपात दडून बसलेल्या वाघाने हल्ला केला असता तिचा घटनास्थळीच मृत्यु झाला. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान ग्रामीण भागात गॅस सिलेंडरची टंचाई बघता महिला व पुरूषांचे जथ्थे च्या जथ्थे जळावू लाकडे आणण्यासाठी जंगलाकडे धाव घेत आहे. त्यामुळे भविष्यात या घटना वाढण्याची शक्यता आहे.

नागभीड तालुक्यातील तळोधी-बाळापूर वनपरिक्षेत्रात आज बुधवारी सकाळच्या सुमारास ही घटना घडली. तळोधी येथील रहिवासी असलेली प्रमिला वाटघुरे या घरात चूल पेटविण्यासाठी जळावू लाकूड गोळा करण्यासाठी जंगलात गेल्या असताना वाघाने अचानक हल्ला केला. या हल्ल्यात प्रमिला हिचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

परिसरात स्वयंपाकासाठी गॅसची तीव्र टंचाई असल्याने ग्रामीण भागातील महिलांना जीव धोक्यात घालून जंगलात जाऊन लाकूड आणावे लागत आहे. त्याच पार्श्वभूमीवर काही महिला बुधवारी सकाळी जंगलात गेल्या होत्या. तेव्हाच ही घटना घडली. या घटनेनंतर सोबत असलेल्या महिलांनी आरडाओरडा करून गावकऱ्यांना व वन विभागाला माहिती दिली. त्यानंतर वनपरिक्षेत्र अधिकारी अरूप कन्नामवार यांच्या मार्गदर्शनाखाली क्षेत्र सहाय्यक अरविंद मने, वनरक्षक राजेंद्र भरने, वनरक्षक बांगर, पथक तसेच स्वाब संस्थेचे यश कायरकर व सदस्य घटनास्थळी दाखल झाले. वाघाने महिलेचा मृतदेह घटनास्थळापासून सुमारे १५० मीटर अंतरावर असलेल्या लहान तलावाजवळील गवताळ भागात ओढून नेल्याचे आढळून आले.

## तिघांवर हल्ला करणाऱ्या बिबट्याचा मृत्यू

**गडचिरोली :** वाघाशी झालेल्या झुंजीत जखमी झाल्यानंतर तीन जणांवर हल्ला करणाऱ्या बिबट्याचा अखेर मृत्यू झाला. पोर्ला वनपरिक्षेत्रांतर्गत चांभार्डा गावानजीक आज सकाळी ही घटना घडली.याबाबत अधिक माहिती अशी की, आज सकाळी ७ वाजताच्या सुमारास पोर्ला वनपरिक्षेत्रांतर्गत चांभार्डा-मरेगाव पांदण रस्त्यालगत हरिदास मुनघाटे यांच्या शेताजवळ एक बिबट जखमी अवस्थेत निपचित पडलेला आढळून आला. त्याच वेळी रस्त्याने जाणाऱ्या विलास दादाजी ठाकरे (वय ४८), रेखा खुशाल मडावी (वय ४५) आणि लुभाजी देवराव मुनघाटे (वय ४०) (सर्व रा.चांभार्डा) यांनी बिबट मृत असल्याचे समजून त्याच्या जवळ जाऊन पाहिले. मात्र, बिबट्याने त्यांच्यावरच हल्ला केला. यामुळे तिघेही जखमी झाले.

माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी आर.डी.पाचभाई आणि त्यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमी नागरिकांवर सुरुवातीला चांभार्डा येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात प्रथमोपचार केल्यानंतर त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात भरती करण्यात आले. बिबट्याची प्रकृती तपासण्यासाठी पशुवैद्यकीय विभागाच्या चमूला पाचारण करण्यात आले. मात्र, बिबट्याची कोणतीही हालचाल न दिसल्याने तो मृत झाल्याचे निष्पन्न झाले.

## आजारी असूनही पवार नागपुरात; दत्ता मेघेंना श्रद्धांजली, कुटुंबीयांची भेट

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर, दि. २५ :** व्हीलचेअरवर असतानाही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते शरद पवार यांनी नागपूरमध्ये येऊन त्यांचे जुने सहकारी व ज्येष्ठ नेते दत्ता मेघेंच्या कुटुंबीयांना भेटून शोकसंवेदना व्यक्त केली. ज्येष्ठ नेते दत्ता मेघे यांचे रविवारी निधन झाले. प्रकृती अस्वास्थ्यामुळे पवार मेघांच्या अंत्यसंस्काराला येऊ शकले नाही मात्र मेंघेंशी असलेले जुने स्नेहबंध जपत पवार आज नागपुरात आले. त्यांनी मेघे कुटुबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

एक महिन्यापासून आजारी शरद पवार आज पहिल्यांदाच घराबाहेर निघाले. ते म्हणाले, गेल्या दीड महिन्यांपासून मी आजाराने ग्रासलेलो होतो. आज पहिल्यांदाच



घराबाहेर आलो आहे. नागपुरमध्ये मला खूप आपलेपणा आणि प्रेम मिळाले, त्यामुळे येण्याची इच्छा होती. त्या दिवशी मी येऊ शकलो नव्हतो.

दत्ता मेघेंच्या कार्याची आठवण पवारांनी वर्धा जिल्हा आणि नागपुरच्या लोकांनी एकत्र येऊन केलेल्या योगदानाद्वारे केली. त्यांनी सांगितले की, दत्ता भाऊ यांची इच्छा होती की शिक्षण, सामाजिक समस्यांवर उपाय शोधणे आणि अन्यायाविरुद्ध काम करणे हे त्यांचे ध्येय होते. त्यांनी संस्थांद्वारे, कॉलेज व शाळांमधून शिक्षणाचा मोठा मार्ग उघडला, ज्यामुळे अनेकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडले.

पवारांनी दत्ता मेघेंच्या व्यक्तिमत्वाचे स्मरण करत म्हटले, ''लोकांच्या कल्याणाबद्दल विचार करणारे, कधीही कुणाला नकार न देणारे असे दत्ता भाऊ होते. आज ते आपल्या दरम्यान नसले तरी, त्यांच्या कार्याची आठवण कायम राहील.असे पवार म्हणाले. ज्ञशरद पवारांनी आपल्या कुटुंब आणि पक्षाच्या शवतीने दत्ता मेघेंना श्रद्धांजली अर्पित केली. त्यांच्या भेटीमुळे नागपुरमधील राजकीय आणि सामाजिक वातावरणात संवेदनशीलता आणि ऐक्याची भावना निर्माण झाली.

राजकारणातील दीर्घकालीन सहकार्याबद्दल पवारांनी दत्ता मेघेंला आपला विश्वासू आणि घनिष्ठ सहयोगी म्हणून गौरविले. त्यांच्या कार्याचा वारसा आणि योगदान अनेक वर्षे स्मरणात राहणार आहे असे, पवार म्हणाले. या भेटीच्या निमित्ताने नागपुरमधील स्थानिक नागरिकांनीही शोकसंवेदना व्यक्त केली आणि दत्ता मेघेंच्या कार्याची आठवण म्हणून शरद पवार यांच्या उपस्थितीत स्मृती कार्यक्रम आयोजित करण्याचा प्रस्ताव मांडला. यामुळे नागपुरमध्ये राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात दत्ताभाऊंच्या योगदानाची आठवण उजळून निघाली. शहरातील राजकीय व सामाजिक नेत्यांनीही या भेटीला महत्त्व दिले, तर पक्षीय नेत्यांनी दत्ताभाऊंच्या आठवणींना उजाळा दिला.

## 'घरी जायला पेट्रोल नाही, आता रात्रभर पंपावरच झोपतो':अमेरिका-इराणमुळे विदर्भात संघर्ष पेटला!

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**भंडारा, दि. २५ :**एकीकडे पेट्रोल आणि डिझेलचा मुबलक साठा उपलब्ध असून वाहनधारकांनी कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून केले जात आहे तर दुसरीकडे काही पेट्रोल पंप धारकांनी पेट्रोल उपलब्ध नसल्याचे सांगून पेट्रोल आणि डिझेलचे वितरण बंद केले आहे. विशेष म्हणजे आज सकाळपासूनही हा पेट्रोल पंप बंद आहे.

पवनी तालुक्यातील अशाच एका पेट्रोल पंपावर काल रात्री वाहनधारकांनी प्रचंड गर्दी केली. मात्र पेट्रोल पंप चालकाने पेट्रोल संपले असे सांगून पेट्रोल वितरण बंद केले. शिवाय लाईटही बंद करण्यात आले. बराच



वेळ अंधारात वाहन चालक पेट्रोल पंपावर तात्काळत वाट बघू लागले. तर काही संतप्त वाहनधारकांनी आरडाओरडा सुरू केला. एका वाहन चालकाने तर 'घरी जाण्यासाठी सुद्धा माझ्या गाडीत पेट्रोल नाही आता मी पेट्रोल पंपावरच रात्रभर झोपतो' असा संताप व्यक्त करत पेट्रोलपंप धारकाला धारेवर धरले.

पवनी तालुक्यातील कोंढा कोसरा येथील नायरा या पेट्रोल पंपावर हा संपूर्ण प्रकार घडला. याबाबत काही प्रत्यक्ष दर्शनी 'लोकसत्ता'ला सांगितले की, पेट्रोल पंपावर मुबलक पेट्रोल उपलब्ध असताना जाणीवपूर्वक पेट्रोलचे वितरण केले जात नसल्याचा आरोप काही दुचाकी चालकांनी केला. नऊ वाजून ४५ मिनिटांनी पेट्रोल आणि डिझेलसाठा उपलब्ध नाही असे सांगून अचानक पेट्रोल पंप बंद करण्यात आला. पेट्रोल वितरण सुरू असताना विद्युत पुरवठा बंद करण्यात आल्याचेही काही वाहन चालकांनी सांगितले. विशेष म्हणजे आज सकाळपासून हा पेट्रोल पंप बंद ठेवण्यात आला आहे. पेट्रोल साठा उपलब्ध नसल्याच्या नावाखाली सर्वसामान्य जनतेला अशाप्रकारे वेठीस धरले जात असल्याने नागरिकांमध्ये उद्रेक उसळला आहे.

## पाडळी शिंदेवाकद शेतरस्त्याचा विकास आराखड्यात समावेश रखडला; ग्रामस्थ आक्रमक

### निवडणुकांवर बहिष्काराचा इशारा, सामूहिक आत्मदहनास परवानगीची मागणी

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अंढेरा, दि. २५ :**पाडळी शिंदे ते वाकद या महत्त्वाच्या शेतरस्त्याचा रस्ते विकास आराखड्यात समावेश करण्यास प्रशासनाकडून होत असलेल्या टाळाटाळीविरोधात पाडळी शिंदे येथील ग्रामस्थ व शेतकरी आक्रमक झाले आहेत. यासंदर्भात २४ मार्च रोजी तहसीलदार, देऊळगाव राजा यांना लेखी निवेदन देत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.



निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, संबंधित शेतरस्त्याचा रस्ते विकास आराखडा व गाव-जोड रस्त्यात समावेश करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे सहा महिन्यांपूर्वीच जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, देऊळगाव राजा तसेच जिल्हा परिषद बांधकाम विभाग, बुलढाणा येथे सादर करण्यात आली होती. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे.

ग्रामपंचायत पाडळी शिंदे व गट ग्रामपंचायत केशव शिवणी यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली असून, तहसीलदार सिंदखेडराजा व देऊळगाव राजा यांनी जागा उपलब्ध असल्याचे व भूसंपादनाची आवश्यकता नसल्याचे प्रमाणपत्रही दिले आहे. तसेच शेतकऱ्यांनी दानपत्रक, सातबारा उतारे, आधार कार्ड व अन्य कागदपत्रांसह वनविभाग, बुलढाणा यांचे नाहरकत प्रमाणपत्र सुद्धा सादर केले आहे. तरीही प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

या पार्श्वभूमीवर, सदर शेतरस्त्याचा तात्काळ रस्ते विकास आराखड्यात समावेश करून रस्ता मजबुतीकरणाचे काम हाती न घेतल्यास येणाऱ्या सर्व सार्वत्रिक निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा इशारा देण्यात आला आहे. इतकेच नव्हे, तर आंदोलन तीव्र करत सामूहिक आत्मदहनास परवानगी देण्याची मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या निवेदनावर तब्बल २५६ महिला व पुरुष ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या असून, निवेदन देताना शेकडो शेतकरी बांधव उपस्थित होते. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## राज्यात उष्णतेच्या लाटेसह वादळी पावसाचे दुहेरी संकट

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर, दि. २५ :**राज्यातून अवकाळीचे संकट परतले असे वाटत असताना आणि सुर्यनारायणाने पुन्हा डोके वर काढले असताना आता पुन्हा एकदा हवामान खात्याने मंगळवारी वादळी वाऱ्यासह आणि विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाचा इशारा दिला आहे.



प्रामुख्याने मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात अवकाळी पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

महाराष्ट्रात ऐन उन्हाळ्याच्या सुरुवातीला हवामानात मोठे बदल जाणवत आहेत. तापमान वाढीला लवकर सुरुवात झाली असतानाच आता अवकाळीचे संकट येऊन ठेपले आहे. मंगळवारी २४ मार्चला राज्यावर दुहेरी संकट असेल. कोकणात उष्ण आणि कोरडे हवामान कायम राहण्याचा अंदाज आहे. तर मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात अवकाळी पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

कोकण विभागात उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. मुंबई, ठाणे सह रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि पालघरमध्ये उष्ण आणि दमट हवामान असणार आहे. यावेळी मुंबईत साधारणपणे कमाल तापमानाचा पारा ३२-३४ अंश सेल्सिअस इतका राहील. आर्द्रता अधिक असल्यामुळे तीव्र उकाडा जाणवणार आहे. सिंधुदुर्ग वगळता सर्व जिल्ह्यांना उष्णतेचा यलो अलर्ट असेल.

पश्चिम महाराष्ट्रातील हवामानात पुन्हा बदल पाहायला मिळत आहेत. प्रामुख्याने पुणे शहरात कोरडे आणि उष्ण हवामान राहील. पुण्यात कमाल तापमानाचा पार ३३-३६ अंश सेल्सिअस दरम्यान राहील. सातारा, सांगली आणि सोलापूरला मात्र अवकाळी पावसाचा 'येलो अलर्ट' देण्यात आला आहे. यावेळी ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहतील. तसेच विजांसह हलका ते मध्यम पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, धुळे, जळगाव आणि नंदुरबारमध्ये उन्हाचा तडाखा पाहायला मिळेल. नाशिकमध्ये साधारण ३३-३५ अंश सेल्सिअस कमाल तापमान राहील. त्यामुळे नागरिकांनी योग्य ती काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले. विदर्भात अवकाळी पावसानंतर परत आता कमाल तापमानात वाढ झालेली दिसून येत आहे. नागपूर, अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, बुलढाणामध्ये उष्ण हवामान कायम असेल. कमाल तापमान ३४-३८ अंश सेल्सिअस तर किमान तापमानात २१-२४ अंश सेल्सिअस तापमान राहील.

### मराठवाड्यातील हवामानाची स्थिती

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना आणि परभणीमध्ये उष्ण आणि कोरडे हवामान राहील. कमाल तापमान ३३-३ अंश सेल्सिअस कमाल तापमान राहील. धाराशिव, लातूर आणि नांदेडला अवकाळी पावसाचा 'येलो अलर्ट' देण्यात आला आहे. यावेळी ४०-५० किलोमीटर वेगाने वारे वाहतील व विजांच्या कडकडाटासह पाऊस होईल असा अंदाज हवामान खात्याने दिला आहे. दरम्यान, ३४ मार्च रोजी राज्यात उष्णतेची लाट आणि वादळी पाऊस असे संकट राहील. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या पिकांची काळजी घ्यावी.

## नागपुरात १ हजार कोंबड्या मारल्या, १४ हजार अंडी नष्ट केली

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर, दि. २५ :** उपराजधानीत पुन्हा एकदा 'बर्ड फ्लयू'' चा शिरकाव झाला आहे. त्यामुळे शहरातील ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर, प्राणिसंग्रहालाय, बचाव केंद्रात विशेष खबरदारी घेतली जात आहे. याठिकाणी पक्ष्यांचे कक्ष वेगळे करण्यात आले आहेत. तर सर्व पिंजरे आणि परिसराचे निर्जंतुकीकरण करण्यात येत आहे. महाराष्ट्रातील नागपूर येथील एका शासकीय अंडी उबवणी केंद्राला 'बर्ड फ्लू'चा फटका बसला आहे. त्यामुळे या केंद्रातील सुमारे एक हजार कोंबड्या मारण्यात आल्या आहेत. भविष्यात कोणताही संभाव्य धोका टाळण्यासाठी खबरदारीचे उपाय योजण्यात आले आहेत. या कोंबड्यांसोबत १४ हजार अंडीही नष्ट करण्यात आली आहेत.

हे केंद्रशासित अंडी उबवणी केंद्र शहरातील सेमिनरी हिल्स परिसरात आहे. या केंद्रात कोंबड्या अचानक मरण पावल्याच्या बातम्या आल्या होत्या. त्यानंतर, कोंबड्यांचे नमुने तपासणीसाठी भोपाळ येथील सीएसआयआर प्रयोगशाळेतून राष्ट्रीय उच्च सुरक्षा पशु रोग संस्थेत पाठवण्यात आले. प्रयोगशाळेत बर्ड फ्लू संसर्गाची पुष्टी झाल्यानंतर प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि प्रशासकीय कारवाई सुरू करण्यात आल्याचे जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटणकर यांनी सांगितले. शासकीय कुक्कुटपालन प्रजनन केंद्र सेमिनरी हिल्स परिसरात आहे. केंद्राच्या एक किलोमीटरच्या परिसरात कृषी प्रदर्शनांसहित प्राण्यांशी संबंधित कार्यक्रमांवर बंदी घालण्यात आली आहे.

महत्त्वाचे

### सौरव गांगुलीने अखेर ‘किंग’ कोण ते सांगूनच टाकले!

**मुंबई:**क्रिकेट विश्वात अनेक खेळाडू प्रसिद्ध आहे. भारतीय संघातील अनेक क्रिकेटपटू यांनी क्रिकेट जगतात अनेक मोठे रेकॉर्ड केले आहेत. दरम्यान भारताचा माजी कर्णधार सौरव गांगुली आणि सचिन तेंडुलकर आणि विराट कोहली यांच्यात सर्वोत्तम खेळाडू कोण आहे याबाबत भाष्य केले आहे. सचिन तेंडुलकर की विराट कोहली यांच्यात बेस्ट खेळाडू कोण आहे याबाबत भारताचा माजी कर्णधार सौरव गांगुली याने भाष्य केले आहे. सचिन तेंडुलकर जगातील सर्वोत्तम खेळाडू असल्याचे त्याने म्हटले असल्याचे समोर येत आहे. त्याने सार्वजनिकरित्या दोघांमध्ये चांगले कोण असे सांगितले नाही. मात्र त्याने सचिन तेंडुलकरसोबत १४ वर्षे क्रिकेट खेळले आहे. त्याला जवळून खेळताना पाहिले आहे. त्यामुळे दोन्ही खेळाडूंची तुलना होऊ शकत नाही. मात्र सचिन हा मोठा खेळाडू आहे, असे सौरव गांगुली म्हणाला असल्याचे समोर आले आहे.

### न्यूझीलंडच्या फलंदाजामुळे सूर्याला झाला फायदा

**मुंबई:** आयसीसीने पुन्हा एकदा नवीन क्रमवारी जाहीर केली आहे. मागच्या वेळेपासून फारसे टी-२० सामने झाले नसले तरी, त्यात फारसे बदल झालेले नाहीत, पण काही किरकोळ चढ-उतार आहेत. विशेष म्हणजे, भारतीय संघाचा कर्णधार अलीकडे एकही सामना खेळलेला नाही, तरीही त्याला याचा फायदा झाला आहे. तो पुन्हा वर येण्यात यशस्वी झाला आहे. यावर्षी जाहीर झालेल्या आयसीसी टी-२० क्रमवारीत टीम इंडियाचा सलामीवीर फलंदाज अभिषेक शर्मा अव्वल स्थानावर आहे. त्याचे रेटिंग ८७५ आहे. इशान किशन ८७१ रेटिंगसह दुसऱ्या स्थानावर आहे. पाकिस्तानचा साहिबजादा फरहान ८४८ रेटिंगसह तिसऱ्या क्रमांकावर आहे. इंग्लंडचा फिल सॉल्ट ७९२ रेटिंगसह चौथ्या क्रमांकावर आहे. श्रीलंकेचा पथुम निस्संका ७६६ रेटिंगसह पाचव्या क्रमांकावर आहे. भारताचा तिलक वर्मा ७४२ रेटिंगसह सहाव्या क्रमांकावर कायम आहे. आयसीसी टी क्रमवारीत पहिल्या सहामध्ये कोणताही बदल झालेला नाही.

# काळे आर्म बँड्स, ११ सीट्स रिक्त अन् ११ नंबरची जर्सी

## बीसीसीआयचे नवे नियम असतानाही आरसीबीचा मोठा निर्णय

**नवी दिल्ली : दि.२५ वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ चा गतविजेता संघ रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने बीसीसीआयने कठोर नियम जाहीर केलेले असतानाही मोठा निर्णय घेतला आहे. आरसीबी संघाने गतवर्षी १७ वर्षांच्या प्रतिक्षेनंतर स्पर्धेचं जेतेपद पटकावलं. यानंतर आता यंदाच्या हंगामातील पहिल्या सामन्यातील सरावाच्या वेळी संपूर्ण संघ ११ नंबरची जर्सी घालून उतरणार आहे.

आरसीबीचा संघ ट्रॉफीच्या जवळ येऊन अनेकदा जेतेपदावर नाव कोरण्यात संघ अपयशी ठरत होता, पण २०२५ मध्ये रजत पाटीदारच्या नेतृत्वात संघाने ही कामगिरी करून दाखवली. पण या विजयानंतर झालेल्या विजयी रॅलीमध्ये



झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला. या ११ लोकांच्या स्मरणार्थ संपूर्ण आरसीबी संघ ११ नंबरची जर्सी घालून सरावाला उतरणार आहे.

याशिवाय चिन्नास्वामी स्टेडियममध्ये ११ सीटदेखील रिकाम्या ठेवल्या जाणार आहेत. आरसीबीने गेल्या वर्षी पहिल्यांदा आयपीएल ट्रॉफी जिंकली. ४ जून रोजी एम. चिन्नास्वामी स्टेडियमच्या आवारात विजयाचा जल्लोष साजरा करण्यात आला. अपुऱ्या सुरक्षा व्यवस्थेमुळे झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर आरसीबीला मोठ्या टीकेला सामोरे जावे लागले होते. पण या मोठ्या घटनेनंतर आता आरसीबीने पुढील वर्षासाठी खूप मेहनत घेतली आहे. ‘‘सामन्याच्या दिवशी, खेळाडू सरावादरम्यान ११ क्रमांकाची जर्सी घालतील. सामन्यादरम्यान खेळाडू नेहमीची आपल्या क्रमांकाची जर्सी घातलेले दिसतील. सरावादरम्यान सर्व खेळाडूंच्या पाठीवर ११ क्रमांकाची जर्सी लिहिलेली असेल. संघ त्यादिवशी काळी पट्टी बांधून मैदानावर उतरणार आहे. आम्ही चिन्नास्वामी स्टेडियममध्ये ११ सीट कायमस्वरूपी तयार करण्याचाही विचार करत आहोत. ह्या जागा त्या ११ चाहत्यांसाठी आहेत. ते नेहमीच आमच्यासोबत असतील.’’ असे आरसीबीचे सीईओ राजेश मेनन यांनी मंगळवारी पत्रकारांना सांगितलं.

गतविजेता आरसीबी २८ मार्चला सनरायझर्स हैदराबादविरुद्ध आपला पहिला सामना खेळेल. या मैदानावर खेळल्या जाणाऱ्या त्यांच्या पाच घरच्या मैदानावर सामन्यांपैकी हा पहिला सामना असेल. आरसीबी या आयपीएलमधील आपले उर्वरित दोन घरचे सामने रायपूर येथील शहीद वीर नारायण सिंह आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळेल. संघाचे सीईओ राजेश मेनन यांनी अशीही घोषणा केली की, तिकीटधारकांना सामन्याच्या दिवशी मेट्रोचा वापर करता येईल. पार्किंगसाठी आगाऊ नोंदणी करता येईल आणि स्टेडियमचे सर्व दरवाजे सामन्याच्या चार तास आधी उघडले जातील. त्यांनी असंही जाहीर केलं की, फ्रँचायझीने यावर्षी ‘अनबॉक्सिंग’ कार्यक्रम न घेण्याचा निर्णय घेतला असून, सामन्याच्या दिवशी सामना सुरळीतपणे पार पाडण्यावरच संपूर्ण लक्ष केंद्रित केलं जाईल.

## लग्नानंतर कुलदीप यादव पोहोचला वृंदावनला!



**नवी दिल्ली : दि.२५ वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा स्टार चायनामन फिरकीपटू कुलदीप यादव सध्या त्याच्या आयुष्यातील नवीन इनिंगमुळे चर्चेत आहे. नुकताच विवाहबंधनात अडकला आहे. त्यानंतर कुलदीप आपल्या पत्नीसह मथुरेतील सुप्रसिद्ध ठाकूर बांके बिहारी मंदिरात दर्शनासाठी पोहोचला. लग्नानंतर कुलदीपची वृंदावनला भेट देण्याची ही पहिलीच वेळ होती.

कुलदीप यादव याचा विवाह या महिन्याच्या १४ तारखेला पार पडला. त्याने आपली बालपणीची मैत्रीण वंशिका चड्ढा हिच्याशी मसुरी येथे हिंदू रितीरिवाजानुसार विवाहसोहळा झाला. पारंपरिक ‘सात फेरे’ घेतले. कुलदीपच्या विवाह सोहळ्याला अनेक क्रिकेटपटूंनी उपस्थिती लावली होती. लग्नानंतर, १७ मार्च रोजी कुलदीप आणि वंशिका यांच्यासाठी एका स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते, ज्याला अनेक मान्यवर पाहुण्यांनी हजेरी लावली होती.

बांके बिहारींचे आशीर्वाद घेतले कुलदीप आणि वंशिका सायंकाळी ७:०० च्या सुमारास श्री बांके बिहारी मंदिरात पोहोचले. त्यांनी तिथे विधिवत पूजा-अर्चा केली आणि ठाकूर बांके बिहारीजींचे आशीर्वाद घेऊन आपल्या वैवाहिक जीवनाच्या प्रवासाला सुरुवात केली. या भेटीदरम्यान त्याने देवाला ‘छप्पन भोग’ अर्पण केला. यावेळी या जोडप्याने बांके बिहारींचे मनोभावे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. बांके बिहारी मंदिरातील एका ‘सेवकाने या नवविवाहित जोडप्याचे पुष्पहार, सन्मानवस्त्रे (दुपट्टे) आणि प्रसाद देऊन स्वागत केले.

कुलदीप आणि त्याच्या पत्नीचे मंदिरातील फोटो सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहेत. नेटकऱ्यांनी या नवीन जोडीवर शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. कुलदीपच्या या भेटीमुळे त्याच्या धार्मिक वृत्तीचे आणि साधेपणाचे कौतुक होत आहे.

कुलदीप यादव २०२६ च्या हंगामात ‘दिल्ली कॅपिटल्स’ संघाकडून खेळणार आहे.

## रिंकू सिंह बनला ‘रीजनल स्पोर्ट्स ऑफिसर’

**मुंबई : दि.२५ वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा धडाकेबाज फलंदाज आणि ‘फिनिशर’ म्हणून ओळखला जाणारा रिंकू सिंह याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. भारतीय क्रिकेट संघाचा स्टार फलंदाज रिंकू सिंग याची उत्तर प्रदेश सरकारने ‘प्रादेशिक क्रीडा अधिकारी’ म्हणून नियुक्ती केली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील त्याच्या उत्कृष्ट कामगिरीचा गौरव म्हणून रिंकूला हे पद बहाल करण्यात आले आहे. त्याच्या या नवीन इनिंगमुळे क्रीडा विश्वातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. नुकत्याच पार पडलेल्या २०२६ च्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत विजेतेपद पटकावणाऱ्या ‘टीम इंडिया’च्या संघात रिंकू हा एक महत्त्वाचा सदस्य होता. मात्र, अनेकांच्या मनात एक प्रश्न नक्कीच उपस्थित झाला आहे: आपल्या या नवीन सरकारी नोकरीमध्ये रिंकूला प्रत्यक्षात किती पगार मिळणार आहे?

माध्यमांच्या वृत्तानुसार, प्रादेशिक क्रीडा अधिकारी या पदासाठी रिंकू सिंगचा पगार ७०,००० ते ८०,००० रुपयांच्या दरम्यान असण्याची शक्यता आहे. तथापि, ही रक्कम अद्याप अधिकृतपणे निश्चित झालेली किंवा दुजोरा मिळालेली पगार-रक्कम नाही.



प्रादेशिक क्रीडा अधिकारी नक्की काय काम करतो, असा प्रश्न कोणाला पडला असेल, तर हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, या पदावर असलेल्या व्यक्तीवर विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या सोपवलेल्या असतात. या अधिकाऱ्यावर त्यांच्या कार्यक्षेत्रातील क्रीडांगणे आणि क्रीडा-संबंधित पायाभूत सुविधांवर देखरेख करण्याची जबाबदारी त्याच्याकडे असते. राज्य सरकारची क्रीडा-संबंधित योजनांची तळागाळापर्यंत अंमलबजावणी करणे, क्रीडा क्षेत्रातील गुणवान खेळाडूंचा शोध घेणे आणि त्यांना घडवणे त्यांना प्रोत्साहन देणे यांसारख्या विविध कामांचा समावेश प्रादेशिक क्रीडा अधिकाऱ्याच्या कर्तव्यांमध्ये होतो.

## नाशिकमध्ये राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचा थरार

**नवी दिल्ली : दि.२५ वृत्तसंस्था**



या वर्षाच्या सुरुवातीला, कोका कोलाच्या अधिकृत प्रायोजकत्वाखाली फुटबॉल विश्वचषकाने भारताचा प्रवास केला. मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात चषकाचे भारतात स्वागत झाले. तेव्हा एका क्षणासाठी भारत आणि फुटबॉल यांचे नाते दृढ असल्याचे जाणवले. मात्र, या प्रवासानंतर या स्पर्धेचे प्रक्षेपण हक्क विकत घेण्याची इच्छा असणाऱ्या प्रक्षेपण कंपन्या गायब झाल्या. आता स्पर्धेची उलटगणती सुरू झालेली असताना सामन्यांचे जगभरातील थेट प्रसारण निश्चित होऊनही भारताला अजून याबाबत प्रतीक्षाच आहे.

आशियातील थेट प्रसारणासाठी ‘फिफा’ने जपान, इंडोनेशिया, सिंगापूर आणि हाँगकाँगसह आशियातील इतर देशांशी करार पूर्ण केले आहेत. मात्र, प्रमुख फुटबॉल बाजारपेठ म्हणून भारताचा उल्लेख केल्यानंतरही अद्याप स्पर्धेच्या भारतातील थेट प्रसारणासाठी कुठलाही करार झालेला नाही. उत्तर अमेरिकेतील १६ शहरांमध्ये ही स्पर्धा सुरू व्हायला आता फक्त ९० दिवस उरले आहेत.

यापूर्वी भारताकडे विश्वचषकासाठी एक निश्चित ‘ब्रॉडकास्ट होम’ होते. सन २००२ मध्ये ‘टेन स्पोर्ट्स’ने, २०१० मध्ये ‘ईएसपीएन-स्टार’ने, तर २०१४ आणि २०१८ मध्ये ‘सोनी’ने याचे प्रक्षेपण केले होते. २०२२ मध्ये ‘वायकॉम १८’कडे हे हक्क होते (टीव्हीवर स्पोर्ट्स १८ आणि डिजिटलवर जिओ सिनेमा). मात्र, या वेळी अजून कुणीच पुढे आलेले नाही. फिफा’ने २०२६ आणि २०३० च्या विश्वचषकासाठी एकत्र आणि २०२७ च्या महिला विश्वचषकासाठी स्वतंत्र निविदा जुलै २०२५ मध्ये काढल्या होत्या. अर्ज करण्याची अंतिम मुदत २ सप्टेंबर २०२५ उलटून गेली आहे. मात्र, भारतासाठी हे हक्क अद्याप विकले गेलेले नाहीत.

भारतीय बाजारपेठ सभासद वर्गणीवर नाही, तर जाहिरातींवर चालणारी आहे. प्रसारण माध्यमातील एका माजी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने सांगितले की, फुटबॉलमध्ये क्रिकेटसारखे विराम नसतात. क्रिकेटमध्ये प्रत्येक षटकानंतर विराम मिळतो, फुटबॉलमध्ये जाहिराती दाखवण्याची संधीच नसते. त्यातच मध्यंतराच्या वेळी बहुतेक प्रेक्षक टीव्ही बंद करतात किंवा चॅनेल बदलतात. या वेळेस स्पर्धेतील सामन्यांची संख्या ६४ वरून १०४ झाली असली, तरीही जागतिक स्तरावर फुटबॉल विश्वचषकाचा जाहिरात बाजार २०१८ मधील १२.६ अब्ज डॉलर्सवरून २०२६ मध्ये १०.५ अब्ज डॉलर्सपर्यंत घसरण्याचा अंदाज आहे. मनोरंजन क्षेत्रातील एका अधिकाऱ्याने सांगितले की, गेल्या वेळी हक्कांची किंमत सुमारे १०० दशलक्ष डॉलर्स होती. भारत विश्वचषक खेळत नाही आणि प्रेक्षकसंख्या फक्त उपांत्य फेरी, तसेच अंतिम फेरी अशा तीन-चार सामन्यांपुरती मर्यादित असते.

भारतात क्रिकेटचा प्रभाव इतका प्रचंड आहे, की इतर खेळांना जागा मिळणे कठीण होते. यंदा आयपीएल मार्च ते मेदरम्यान असेल आणि त्यानंतर लगेच जूनमध्ये विश्वचषक फुटबॉल स्पर्धा सुरू होईल. बहुतेक जाहिरातदारांनी ‘आयपीएल’साठी आधीच खर्चाचे नियोजन केले असणार, यात शंका नाही. त्यामुळे लगेच मोठ्या प्रमाणावर जाहिरातीवर खर्च करण्यासाठी कुणी तयार होईल का, अशी वेगळी शंका उपस्थित केली जात आहे. या वेळी २०२६ मधील विश्वचषक स्पर्धा उत्तर अमेरिकेत होत असल्याने सामन्यांच्या वेळा भारतीय प्रेक्षकांसाठी गैरसोयीच्या आहेत.

### महा-घसरणीनंतर सराफा बाजारात उघडताच झाला उलटफेर

**मुंबई:**सोनं आणि चांदीच्या दरांमध्ये घसरणीचा कल सुरूच आहे. भारतातील सोन्याचे दर ताज्या व्यवहाराच्या सत्रातही खाली घसरत राहिले, ज्यामुळे गेल्या आठवड्यापासून दिसून आलेली घसरण कायम राहिली. अमेरिका-इस्रायल आणि इराणमधील युद्धाचा शेअर बाजारासोबतच सोन्या - चांदीच्या दरावर देखील होत आहे. मागील काही दिवसांपासून सराफा बाजारात घसरणीचा कल सुरूच असून आठवड्याच्या सलग तिसऱ्या दिवशीही सोने-चांदीच्या दरात बदल झाले आहेत. बुधवारी आंतरराष्ट्रीय बाजारात सोने आणि चांदीच्या दरात मोठी वाढ झाली. मागील काही सत्रांमध्ये घसरल्यानंतर अमेरिका आणि इराण यांच्यात संभाव्य राजनैतिक तोडगा निघण्याच्या वृत्तांमुळे या दोन्ही मौल्यवान धातूंच्या किमती मजबूत झाल्या. आशियात बाजारात कॉमेक्सवर सोन्याच्या दरात जवळपास ४% वाढ होऊन प्रति औंस ४,६०० डॉलरवर पोहोचला, तर चांदीच्या दरात त्याहूनही मोठी वाढ नोंदवली गेली आणि जवळपास ७% झेप घेत प्रति औंस ७४.४२ डॉलरवर पोहोचला. अशा परिस्थितीत, आंतरराष्ट्रीय घडामोडींचा मागोवा घेत बुधवारी, २५ मार्च रोजी, देशांतर्गत बाजारात सोन्या-चांदीच्या दरात वाढ नोंदवली गेली आहे. अशाप्रकारे गेल्या दहा दिवसांपासून सुरू असलेल्या घसरणीचा कल अखेर मोडीस निघाला आहे.

# संकटातही जपानमध्ये ‘ऑल इज वेल’

## संपूर्ण जगाचा तेल पुरवठा ठप्प झाला तरीही ८ महिने नाही संपणार ‘ब्लॅक गोल्ड’

**नवी दिल्ली: दि.२५ वृत्तसंस्था**

अमेरिका आणि इराणमधील संघर्षामुळे अलीकडच्या दिवसांत क्रूड ऑइलच्या दरांनी १०० डॉलर प्रति बॅरलवर झेप घेतलेली. गेल्या काही दिवसांपासून कच्च्या तेलाच्या दरांमध्ये चढ-उतार होत असून भारतातील तेल आणि गॅसचा पुरवठा खंडित झाल्यामुळे जनतेचे टेन्शन वाढले होते तर दुसरीकडे, जपानच्या ‘एनर्जी सिक्युरिटी’ची जगभर चर्चा होत आहे.

इराण आणि अमेरिका-इस्रायलमध्ये पश्चिम आशियात तेलाचा भडका उडाला




असून तेहरानने होर्मुझवर घातलेल्या नाकेबंदीमुळे जागतिक तेल आणि वायू पुरवठा विस्कळीत झाला आहे. परिणामी आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाची किंमत प्रति बॅरल १०० डॉलरच्या वर गेली आहे. या दरम्यान केवळ अरब देशांनीच नव्हे, तर रशियानेही आपल्या कच्च्या तेलाची किंमत वाढवली असून यामुळे भारतासारख्या तेल आयातीवर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्थेसाठी अडचणी निर्माण झाल्या आहेत.

जगभर भारतात भारतासारखे अनेक देश आहेत जे स्वतः तेलाचे उत्पादन करत नाहीत, पण त्यांच्याकडे तेलाचे कृत्रिम साठे असल्यामुळे त्यांना या संकटाची चिंता वाटत नाही. या लिस्टमध्ये अमेरिका आणि चीन या दोन्ही महासत्तांचा समावेश आहे, तर जपानकडे जगातील तिसरा सर्वात मोठा कृत्रिम तेलसाठा आहे. त्यांनी अंदाजे ४०० दशलक्ष बॅरल तेलाचा साठा




तयार केला असून यापैकी जपान सरकार १० वेगवेगळ्या ठिकाणी २६० दशलक्ष बॅरल तेल साठवत आहे. जपानने या तेलाचा साठा जमिनीखाली, जमिनीवर, पाण्याखाली आणि डोंगरांच्या गुहांमध्ये दडवून ठेवला आहे. याशिवाय, जपान सरकारने सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती (युएई) आणि कुवेत यांच्यासोबत करार केले आहेत, ज्याअंतर्गत जपानचे तेल तिथेही साठवले जाते. या देशांकडे १७८ दशलक्ष बॅरल तेल आहे. अशाप्रकारे, जपानकडे ४४० दशलक्ष बॅरल तेल आहे, जे २०४ दिवसांची गरज भागवण्यासाठी पुरेसं आहे. म्हणजे पुढील १००, १५० किंवा २०० दिवस युद्ध चाललं तरीही जपानवर त्याचा फारसा परिणाम होणार नाही, कारण जपानने याच संकटासाठी आपला सामरिक तेलसाठा तयार ठेवला आहे आणि तेलाच्या किमती वाढल्यास जपान स्वतःचे तेल वापरेल. कच्च्या तेलाचा पुरवठा कमी होत असल्याने जपान आपल्या सरकारी तेल साठ्यापैकी २०% साठा रिलीज करणार असल्याचेही वृत्त समोर आले आहे.

## घसरणीची मरगळ मोडून बाजाराची फिनिक्स भरारी

### सेन्सेक्स १७०० अंक बहरला; गुंतवणूकदारांचे लॉस भरून निघाले

**मुंबई: दि.२५ वृत्तसंस्था**

गेल्या काही दिवसांची घसरणीची मरगळ मोडून काढत भारतीय शेअर बाजार पुन्हा एकदा तेजीचं रुळावर परतला आहे. बुधवारी सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये २ टक्क्यांहून अधिक वाढ झाली असून बँक निफ्टी, फायनान्शियल सर्व्हिसेस, निफ्टी मिडकॅप, स्मॉलकॅप, ऑटो, एफएमसीजी, मीडिया, मेटल, फार्मा, पीएयू बँक, प्रायव्हेट बँक आणि रिअल्टी निर्देशांक २% ते २.९०% दरम्यान व्यवहार करत आहेत.

मागील काही दिवसांपासून इराण आणि अमेरिकेतील संघर्षामुळे



घसरणपंथीला आलेल्या भारतीय शेअर बाजाराची गाडी पुन्हा तेजीच्या रुळावर परतली आहे. देशांतर्गत बाजारातील तेजीची लाट उसळी असून निफ्टी दिवसातील सर्वोच्च पातळी गाठली आणि ५१६ अंक किंवा जवळपास २.२५% वाढून २३,४२९ वर व्यवहार करत आहे. त्याचवेळी, मुंबई शेअर बाजाराचा प्रमुख निर्देशांक सेन्सेक्सने देखील १७०० अंकांनी फिनिक्स झेप घेतली ज्यामुळे काही प्रमाणात गुंतवणूकदारांचे नुकसान भरून निघाले आहेत.

सकारात्मक जागतिक संकेत आणि मध्य पूर्वेतील तणाव कमी होण्याच्या आशेमुळे प्रेरित होऊन देशांतर्गत बाजारातील निर्देशांकांनी तेजीची उभारी घेतली गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास सकारात्मक राहिल्याने बाजारात खरेदीचा जोर कायम आहे. अनेक भक्कम घटकांमुळे शेअर बाजारातील जोरदार तेजी पाहायला मिळत आहे, ज्यामुळे गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढला. जागतिक संकेतांपासून ते कच्च्या तेलाच्या घसरत्या किमतींपर्यंत, प्रत्येक घटकाने बाजाराला पाठिंबा दिला आहे.

## १५० कोटींची एफडी पण, प्रत्यक्ष खात्यात ‘शून्य’ शिल्लक

### अधिकारी अन् कर्मचारीच ‘मास्टरमाइंड’; महानगरपालिकेला चुना

**मुंबई: दि.२५ वृत्तसंस्था**

आयडीएफसी फर्स्ट बँकेनंतर आता हरियाणातील एका खासगी बँकेकडून शासकीय निधीचा अपहार केल्याचे प्रकरण समोर आले आहे. कोटक महिंद्रा बँकेचे काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून पंचकुला महानगरपालिकेत १६० कोटींच्या मुदत ठेवींच्या (एफडी) अपहाराचे प्रकरण उघडकीस आले आहे.

पंचकुला महानगरपालिकेने विविध वेळी बँकेत एकूण १५० कोटींच्या एफडी केल्या होत्या, पण बँकेच्या अधिकाऱ्यांनी बनावट खाती उघडून, संपूर्ण रक्कम त्यात हस्तांतरित केली आणि महानगरपालिकेला केवळ कागदपत्रे व बनावट विवरणपत्रे दिली.

कॉर्पोरेशनने ५८ कोटींच्या एफडीची मुदतपूर्तीची रक्कम खात्यात जमा करण्याची विनंती केली,




तेव्हा प्रकरण उघडकीस आले. बँकेने सुरुवातीला हस्तांतरणाची पुष्टी करणारे एक निवेदन जारी केले, पण प्रत्यक्षात ही रक्कम कॉर्पोरेशनच्या खात्यात कधीच पोहोलीच नाही. त्यानंतर बँकेने जारी केलेल्या जवळपास सर्वच एफडी फसव्या होत्या आणि प्रत्यक्ष खात्यांमध्ये कोणतीही रक्कम जमा झाली नव्हती असेही तपासात आढळून आले. आरटीजीएस व्यवहारांमध्ये बनावट सह्या आणि शिक्के यांचाही वापर केला गेला होता. कोटक महिंद्रा बँकेच्या कर्मचाऱ्यांनी बराच काळ फसवणूक लपवून ठेवली आणि नोंदींमध्ये फेरफार करण्यासाठी बनावट कागदपत्रे तयार केली, असा आरोप करण्यात आला असून महानगरपालिकेच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला गेला आहे आणि हरियाणा सरकारने या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. अलीकडेच फर्स्ट बँकेत झालेल्या ५९० कोटींच्या घोटाळ्यानंतर आता नवीन प्रकरण समोर आलं आहे. दोन्ही प्रकरणांमध्ये सरकारी विभागांच्या ठेवी धोक्यात सापडल्याचा आरोप असून यामुळे खासगी बँकांमध्ये पैसे जमा केलेल्या सामान्य लोकांमध्ये चिंता वाढली आहे, लोक आता त्यांच्या एफडी आणि बचत खात्यांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. सरकारी विभागांनी देखील त्यांच्या ठेवींचे नियमितपणे ऑडिट करावे आणि केवळ विश्वसनीय बँकांमध्येच व्यवहार करावे असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

## थोडक्यात

### चिल्ड्रन पार्कमध्ये गुढीपाडवा साजरा

**नागपूर :** ट्रॉफिक गार्डन क्लब तर्फे गुढीपाडवा साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. भावना सोनकुसळे यांच्या हस्ते श्री प्रभू रामाच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. श्री इंगोले (निवृत्त डे.सुपरीटेंड पोलीस) यांनी भजन तर डॉ. मंडलेकर यांनी भक्तगीत आणि गजानन मेंढेकर (निवृत्त कार्यकारी अभियंता) यांनी गीत रामायण सादर केले. त्यानंतर घवघवे ( व्हॉइस चान्सलर) यांनी देहदानाचे महत्त्व समजावून सांगून कार्यक्रमाची सांगता प्रसाद वाटपाने करण्यात आली.

### कारची दुचाकीला धडक

**नागपूरः** भरधाव कारने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात ५५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला असून, त्यांची १२ वर्षीय पुतणी गंभीर जखमी झाली आहे. हा अपघात २३ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ७.३० च्या सुमारास कान्होलीबारा-खडकी मार्गावर घडला. फिर्यादी सुरज देवराव उईके यांचे वडील देवराव नारायण उईके (वय ५५) हे आपली पुतणी अक्षरा विजय सराटे (वय १२) हिच्यासह दुचाकीने घरी परतत होते. टाकळघाट येथील 'वास्तुलँड डेव्हलपस' समोरून जात असताना विरुद्ध दिशेने येणाऱ्या कारचालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणाने चालवून उईके यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. अपघातानंतर कार चालक घटनास्थळावरून पसार झाला. धडकेत गंभीर जखमी झालेल्या देवराव उईके यांना उपचारासाठी तातडीने एम्स हॉस्पिटल येथे नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. जखमी अक्षरा सराटे हिच्यावर सुरुवातीला प्राथमिक आरोग्य केंद्र कान्होलीबारा येथे उपचार करून तिला पुढील उपचारासाठी एम्स हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.

### शोधपथकाची धडक कारवाई

**नागपूर :** महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाव्यांवर, कचरा फेकणाव्यांवर, थुंकणाव्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाव्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. शोध पथकाने ५० प्रकरणांची नोंद करून २०,५०० रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४०० दंड) या अंतर्गत १५ प्रकरणांची नोंद करून ६,००० रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत वसुली करण्यात आली.

### कोराडी परिसरात घरफोडी

**नागपूरः** कोराडी ठाण्याच्या हद्दीतील आर्य नगर भागात एका बंद घराचे खिडकीचे ग्रिल तोडून अज्ञात चोरट्यांनी सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह रोख रकमेवर डल्ला मारला आहे. ही घटना २२ मार्च ते २३ मार्च २०२६ च्या दरम्यान घडली. फिर्यादी संतोष सुरेश सिंह (वय ३९ वर्षे), रा. प्लॉट नं. १००, आर्य नगर, पवनपुत्र सोसायटी, नारा रोड, कोराडी, हे कामठी रेल्वे पोलीस चौकी येथे रात्रपाळीच्या ड्युटीवर गेले होते. त्यांच्या मुलाचा मुंडन कार्यक्रम बंगाल येथे असल्याने त्यांची पत्नी आणि मुले आधीच गावी गेली होती. घर बंद असल्याचे पाहून अज्ञात चोरट्याने संधी साधली. खिडकीचे लोखंडी ग्रिल तोडून आत प्रवेश केला. बेडरूममधील लाकडी आलमारीचे कुलूप तोडून त्यातील साहित्य अस्ताव्यस्त केले आणि मुद्देमाल चोरून नेला.

# ३१ हजार ग्राहकांचा थकीत वीजबिलापोटी वीजपुरवठा खंडित

## 'मार्च एंडिंग'मध्ये महावितरणची धडक कारवाई, वरिष्ठ अधिकारी स्वतः उतरले 'फील्ड'वर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २५ : 'आला मार्च एंडिंग, ठेवू नका बिल पेंडिंग' असे आवाहन करत महावितरणने नागपूर परिमंडलात थकीत वीजबिलांच्या वसुलीसाठी आक्रमक पवित्रा घेतला आहे. वारंवार सूचना देऊनही प्रतिसाद न देणाव्या ३१ हजार २९५ थकबाकीदारांचा वीजपुरवठा १ ते २२ मार्च या कालावधीत खंडित करण्यात आला आहे.**



सद्यस्थितीत घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक अशा विविध वर्गवारीतील लघुदाब ग्राहकांकडे सुमारे ५४ कोटी रुपयांची थकबाकी असून, ही वसुली करण्यासाठी महावितरणने आपली कारवाई अधिक तीव्र केली आहे. वरिष्ठ अधिकाव्यांचे थेट 'फील्ड'वर लक्ष महावितरणचा संपूर्ण आर्थिक डोलारा हा दरमहा होणाव्या वीजबिल वसुलीवर अवलंबून असतो. वीज खरेदीसह इतर देणी वेळेवर देण्यासाठी ही वसुली अनिवार्य आहे. या मोहिमेचे गांभीर्य ओळखून मुख्य अभियंता दिलीप दोडके, अधीक्षक अभियंते अमित परांजपे, संजय वाकडे आणि स्मिता पारखी हे स्वतः परिमंडलातील विविध शाखा कार्यालयांना भेटी देऊन थकबाकी वसुलीचा आढावा घेत आहेत. चोरीची वीज वापरणाव्यांवर 'वॉच' केवळ वीज कापून महावितरण थांबलेले नाही, तर ज्यांच्या जोडण्या खंडित केल्या आहेत, अशा ठिकाणी अधिकारी आणि कर्मचाव्यांची स्वतंत्र पथके अचानक भेटी देऊन पडताळणी करत आहेत. जर एखादा थकबाकीदार शेजाव्याकडून किंवा अन्य मार्गाने बेकायदेशीरपणे वीज वापरताना आढळल्यास, वीज देणाव्या आणि घेणाव्या अशा दोघांविरुद्धही कठोर कायदेशीर कारवाई केली जात आहे. ग्राहकांच्या सोयीसाठी या महिन्यात सुटीच्या दिवशीही सर्व अधिकृत वीजबिल भरणा केंद्रे सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### मनस्ताप टाळण्यासाठी

**धनादेश बाऊन्स झाल्यास बसणार आर्थिक फटका: धनादेशाद्वारे बिल भरणाव्या ग्राहकांनी अधिक काळजी घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. चुकीची तारीख, खाडाखोड किंवा खात्यात अपुरी रक्कम असल्यास चेक बाऊन्स झाल्यास ७५० रुपये दंड आणि १८ टक्के जीएसटी, असा एकूण सुमारे ८८५ रुपयांचा भुर्दंड बसू शकतो. तसेच यामुळे 'सिबिल' स्कोअरवरही परिणाम होऊन चेकद्वारे बिल भरण्याची सुविधा काही काळासाठी बंद होऊ शकते. हा मनस्ताप टाळण्यासाठी ग्राहकांनी ऑनलाइन बिल भरण्याच्या पर्यायाला प्राधान्य द्यावे.**



# डब्लूसीएल मुख्यालयात क्षयरोग जनजागृती कार्यक्रम

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २५ :** जागतिक क्षयरोग दिनानिमित्त नागपूर महानगरपालिका आरोग्य विभागाच्या सहकार्याने आणि झंकार महिला मंडळाच्या समन्वयाने डब्लूसीएल मुख्यालयाच्या दवाखान्यात (क्षयरोग जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाला झंकार महिला मंडळाच्या अध्यक्षा रीना पांडे यांनी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थिती दर्शविली. मंडळाच्या उपाध्यक्षा श्रुती परांजपे उपस्थित होत्या. शिबिरात एकूण १२० लाभार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाद्वारे क्षयरोगाबाबत जनजागृती करण्यात आली तसेच वेळेवर निदान आणि नियमित उपचार यांचे महत्त्व उपस्थितांना समजावून सांगण्यात आले. आपला क्षयरोग उपचार यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या दोन रुग्णांना 'क्षयरोग चॅम्पियन पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच 'निक्षय योजना' अंतर्गत झंकार महिला मंडळाने ७ क्षयरोग रुग्णांना दत्तक घेऊन त्यांना उपचारादरम्यान आवश्यक सहाय्य देण्याचा संकल्प केला. नागपूर महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. शिल्पा जिचकार, झोनल वैद्यकीय अधिकारी डॉ. वर्षा देवस्थळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. रेणुका यावलकर, तसेच वरिष्ठ उपचार पर्यवेक्षक अरविंद चव्हाण,संगीता शिंगणे मॅडम सुवर्णा मॅडम आणि वैभव सर उपस्थित होते. सूत्रसंचालन डब्लूसीएल मुख्यालयाच्या प्रभारी डॉ. छाया केदारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अरविंद चव्हाण यांनी विशेष परिश्रम घेतले.

### एमपीएड मैदानी चाचणी सुरळीत

**नागपूर, दि. २५ :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने शासकीय सीईटी एमपीएड फिल्ड टेस्ट परीक्षा सुरळीत पार पडल्या. शारीरिक शिक्षण पदव्युत्तर विभागात प्रवेशासाठी शासनाच्या वतीने सीईटी मार्फत प्रवेश परीक्षा आयोजित केली जाते. या परीक्षेला एकूण २८८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. सीट अँड व्हीच टेस्ट, मेडिसिन बॉल, सीट अॅप्स, स्टँडिंग ब्रोड, जंप, शटल, रन इत्यादीच्या एमपीएड करिता परीक्षा भारतातील विविध प्रांतातील विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा. प्रमुख म्हणून डॉ. माधवी मार्डीकर यांनी काम केले तर डॉ. वृषाली देशमुख, शुभम सैनिक, निकिता वैष्णव, रजनी मुरकुटे, आकाश यादव, दिनेश सिकलवार यांनी परीक्षेसंबंधीत कार्यवाही पार पाडली.

# तीन समिति सभापतींनी स्वीकारली सूत्रे

## महिला व बालकल्याण विशेष समितीच्या सभापतीचे पदग्रहण

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**नागपूर, दि. २५ :** नागपूर महानगरपालिकेच्या तीन विशेष समितींच्या नवनिर्वाचित सभापतींनी आज बुधवारी पदाची सूत्रे स्वीकारली. मनपा मुख्यालयात आयोजित छोटेखानी समारंभात महापौर निता ठाकरे, उपमहापौर लिला हाथीबेड, सत्तापक्ष नेते नरेंद्र बोरकर, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, माजी महापौर दयाशंकर तिवारी, माजी महापौर नंदा जिचकार उपस्थित होते.

स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीच्या सभापती अश्विनी जिचकार, क्रीडा विशेष समितीच्या सभापती दर्शनी धवड, विधी विशेष समितीचे सदस्य उपसभापती अॅड. संजयकुमार कृष्णराव बालपांडे, धनश्री आशिष देशपांडे,शारदा सुरेश बारई, कल्पक सदाशिव भनारकर, निलेश मनोहर गायधने, अॅड. शैलेन्द्र श्रीराम डोरले, अॅड. स्नेहल बंडू उर्फ ज्ञानेश्वर ठाकरे, गलिच्छ वस्ती निर्मुलन व घर बांधणी विशेष समिती सदस्य उपसभापती संदीप रमेशराव गवई, नागेश महादेव मानकर, योगिता धनराज तेलंग, हेमंत शांताराम बरडे, रितेश बापूराव पांडे, विवेक रमेश निकोसे, सुजाता विठ्ठलराव कोंबाडे, नगरसेवक श्री मनोज साबळे, सचिन नाईक, योगेश पाचपोर, बंडू राऊत उपस्थित होते. समाज कल्याण विभागाच्या सहायक आयुक्त सुकेशनी तेलगोटे, सरकारी वकील नितीन तेलगोटे, मीनाक्षी तेलगोटे यांनी विधी विशेष समिती सभापती निधी मीनाक्षी नितीन तेलगोटे, विधी अधिकारी सुरज परोचे, गलिच्छ वस्ती निर्मूलन व घर बांधणी विशेष समिती सभापती रूतिका मसराम, महिला व बालकल्याण विशेष समिती सभापती सारिका नंदुरकर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

### CAPTION माता भगवती चित्ररथ



**नागपूर: श्री पोद्दारेश्वर मंदिराच्या वतीने गुरुवारी श्रीराम जन्मोत्सव सोहळा साजरा होत आहे. यानिमित्ताने रथयात्राचे आयोजन करण्यात आले. यात माता भगवतीचा मुख्य रथ राहणार आहे. विविध संस्था आणि संघटनांचे चित्ररथ यात सहभागी होतील. याशिवाय मंगलकलश,नृत्यप्रसंगही सादरीकरणही होणार आहे.**

# बीएलओ सक्तीला शिक्षकांचा विरोध

## 'शाळा बंद'आंदोलनाचा संघटनांनी दिला इशारा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २५ :** बीएलओ अर्थात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणून शिक्षकांवर कामे लादण्याच्या विरोधात जिल्ह्यातील शिक्षक संघटना आक्रमक झाल्या आहेतसेच, संबंधित शिक्षकांवर गुन्हे दाखल केल्यास सर्व जिल्हा परिषद शाळा बंद ठेवून आंदोलन छेडण्याचा इशारा सर्व शिक्षक संघटनांनी दिला आहे.

सध्या नागपूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांना बीएलओची जबाबदारी देण्यात आली आहे. प्रत्यक्षात अनेक शाळांमध्ये शिक्षकांची तीव्र कमतरता आहे. काही शाळा पूर्णपणे शून्यशिक्षकी असून, अनेक ठिकाणी केवळ एकच शिक्षक कार्यरत आहे. अशा परिस्थितीत शाळेचे सर्व शैक्षणिक व प्रशासकीय कामे एकट्यावर आहे. शिक्षकांना आधीच विविध अशैक्षणिक कामांचा मोठा भार सहन करावा लागत आहे. शाळेतील ऑनलाइन नोंदी, विविध शासकीय उपक्रमांची अंमलबजावणी, विद्यार्थ्यांसाठी चालवली जाणारी पोषण आहार योजना, अहवाल सादरीकरण आदींमुळे शिक्षकांना अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. त्यातच सध्या विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षा तोंडावर आल्या असून, अपूर्ण राहिलेला अभ्यासक्रम पूर्ण करणे गरजेचे आहे. अशा परिस्थितीत प्रशासनाकडून बीएलओसारखी जबाबदारी सक्तीने देण्यात येत असल्याचा आरोप शिक्षक संघटनांनी केला आहे. सदर कामे न स्वीकारणाऱ्या शिक्षकांवर पोलिसांत गुन्हे दाखल करण्याच्या सूचना देण्यात येत असल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दबाव तंत्राचा वापर करून शिक्षकांना काम करण्यास भाग पाडले जात असल्याने संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. यासंदर्भात शिक्षक भारती संघटना जिल्हाध्यक्ष प्रवीण फाळके यांनी सांगितले, की जिल्हा परिषदेतील शिक्षकांवर विविध अशैक्षणिक कामांचा आधीच भार आहे. त्यावर सरकार सक्तीचे धोरण राबवून गुन्हे दाखल करण्याची धमकी देत आहे. हे शिक्षकीपेशाच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासण्यासारखे आहे. सरकारने याचा विचार करणे गरजेचे आहे.

# नागरिकांना वाढीव बिलातून दिलासा देण्याचे निर्देश

## जलप्रदाय विशेष समितीच्या सभापती दिव्या धुरडे यांचे निर्देश

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २५ :** उन्हाळ्याच्या काळात नागरिकांना पाण्याची समस्या येऊ नये आणि वाढीव पाणी बिलांपासून दिलासा मिळावा, या उद्देशाने नागरिकांना मिळालेली पाच पट वाढीव देयके पूर्ववत करून नागरिकांना दिलासा देण्याचे निर्देश ओसीडब्ल्यूला जलप्रदाय विशेष समितीच्या सभापती दिव्या धुरडे यांनी दिले.




बैठकीला उपसभापती विजय झलके, नगरसेवक योगेश पाचपोर, रामदास शाहू, सचिन नाईक, शेषराव गोतमारे, नगरसेविका तसनीम परवीन नियामत खान ताजी, अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, कार्यकारी अभियंता श्रीकांत वायकर यांच्यासह मनपाचे उपअभियंता आणि ओसीडब्ल्यूचे अधिकारी उपस्थित होते. सभापती दिव्या धुरडे यांनी २०२२ ते २०२५ या कालावधीतील कामांचा आढावा घेत २४ बाय ७ पाणीपुरवठा योजनेच्या सद्यस्थितीची माहिती घेतली. सभापती श्रीमती धुरडे यांनी शहरात होणारी जलवाहिनीतून होणारी पाण्याची गळती शोधून ती तातडीने दुरुस्त करण्यात यावे, दूषित पाणीपुरवठ्याबाबत त्यांनी नाराजी व्यक्त करीत ही समस्या त्वरित सोडवण्याचे निर्देश त्यांनी दिले. उन्हाळा लक्षात घेता शहरातील बोरवेल दुरुस्त कराव्यात, सार्वजनिक विहिरींचा गाळ काढून त्या स्वच्छ कराव्यात आणि नागरिकांना वॉटर हार्वेस्टिंगसाठी प्रोत्साहित करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. नागरिकांना मिळालेली पाच पट वाढीव देयके पूर्ववत करून नागरिकांना दिलासा देण्याचे निर्देश त्यांनी ओसीडब्ल्यूला दिले. शहरातील सर्व पाण्याचे ५ वर्ष जुने व नादुरुस्त मिटर तात्काळ बदलविण्याचे निर्देश दिले. उन्हाळ्यात नागरीकांना योग्य तो पाणीपुरवठा व्हावा या दृष्टीने ओसीडब्ल्यूला निर्देश दिले.उपसभापती विजय झलके यांनी पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी जलवाहिनीवर फ्लोमीटर लावण्याच्या सूचना केल्या. तसेच लॉन, मंगल कार्यालये आणि वॉटर कॅन पुरवठादारांनी व इतरांनी घेतलेल्या अवैध नळ जोडण्या शोधून त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले. बैठकीत कार्यकारी अभियंता श्रीकांत वायकर यांनी जलप्रदाय विभागाचे सादरीकरण केले. शहरात एकूण १०९ पाण्याच्या टाक्या असून त्यांच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जातो. नागपूरला शहराला पेंच प्रकल्प, कन्हान नदी, नवेगाव खैरी आणि गोरेवाडा तलाव येथून पाणी पुरवले जाते असल्याची माहिती त्यांनी दिली.

**विभागीय हातमाग कापड स्पर्धा ... हातमाग परंपरेला चालना देण्यासाठी नियोजन करु : महापौर**

# मलबरी सिल्क करवती साडीला प्रथम क्रमांक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २५ : नागपूर महानगरात खापरी मोहल्ला व इतर परिसरात हातमाग विणणारे बांधव आपले हस्तकौशल्य जपून आहेत. पूर्वी एवढी ही संख्या नसली तरी येत्या काळात नवी पिढी ही अधिक सक्षमतेने या हस्त कौशल्याकडे, हातमागाकडे वळावी, याला तंत्रज्ञानाची जोड मिळावी यासाठी महानगरपालिका पातळीवर नाविन्यपूर्ण योजनेची जोड देता यावी यासाठी निश्चित प्रयत्न करु, असे प्रतिपादन महापौर निता ठाकरे यांनी केले.**




हातमाग विणकरांना प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या विभागीय हातमाग कापड स्पर्धेच्या निवडीनिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. विभागीय उपायुक्त विजया बनकर, जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार, विणकर सेवा केंद्राचे उपसंचालक संदीप ठुबरीकर, वस्त्रोद्योग विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त अंजू बालपांडे, सहायक आयुक्त निलेश निखाडे आदी उपस्थित होते. वस्त्रोद्योग विभागाच्या कार्यालयात आयोजित या विभागीय हातमाग कापड स्पर्धेत एकूण २९ व्यक्तींनी सहभाग घेतला. यात टसर सिल्क, मलबरी सिल्क, कॉटन प्रकारात करवतकाठी साड्या, कलात्मक चादरी, बेडसीट्स, कारपेट आदी हातमाग उत्पादने यांचा समावेश होता. कापडामधील मुलायमता, रंगसंगती, विणकाम व मूल्यवृद्धी, नाविन्यता याबाबी विचारात घेऊन परीक्षकांनी या विभागीय स्पर्धेतील विजेतांची निवड केली. यात रमा गजानन डेकाटे व भारती रोशन पराते यांना प्रथम तर हंसराज ग्यानीराम निमजे व मोहम्मद नासीर शेख तय्यब यांना द्वितीय आणि गीता चुडामन हुंगे व लिलाधर मारोती निरवार यांना तृतीय पारीतोषिक विभागून जाहीर करण्यात आले. प्रथम २५ हजार, द्वितीय २० हजार व तृतीय १५ हजार रुपये असे बक्षिसाचे स्वरुप आहे.

# गिट्टीखदान परिसरात सशस्त्र टोळीचा हल्ला

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २५ :** जुन्या वादातून किंवा अज्ञात कारणावरून ४४ वर्षीय व्यक्तीवर कु0हाड आणि तलवारीने जीवघेणा हल्ला करण्यात आला फिर्यादी गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर मेयो रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गिट्टीखदान पोलिसांनी चार आरोपींना अवघ्या काही तासांत अटक केली आहे. गौतम नगर, भिवसेनखोरी येथे ही घटना घडली.

माहितीनुसार, फिर्यादी सुरेश जोहरसिंग चव्हाण यांचा मुलगा आणि आरोपी यांची जुनी ओळख होती. आरोपींनी संगनमत करून ५ ते ६ साथीदारांसह हातात कु0हाड, तलवार आणि काठ्या घेऊन २३ मार्च २०२६ रोजी रात्री ८३० च्या सुमारास चव्हाण यांच्या घरात जबरदस्तीने प्रवेश केला. आरोपींनी फियार्दीच्या मुलाबद्दल विचारणा केली, मात्र तो घरी नसल्याने संतापलेल्या आरोपींनी सुरेश चव्हाण यांना जीवे मारण्याच्या उद्देशाने शस्त्रांने वार करून गंभीर जखमी केले. तसेच, घरातील सामानाची तोडफोड करून मुलाला जीवे मारण्याची धमकी देऊन आरोपी पसार झाले.गिट्टीखदान पोलिसांनी याप्रकरणी तातडीने पावले उचलत साहिल प्रवीण पाटील (वय १९), रा. दहेगाव, कळमेश्वर, सोहेल उर्फ चिकू सलीम खान (वय १८), रा. गिट्टीखदान,दीपक लक्ष्मीप्रसाद बिसेन (वय २३), रा. दाभा, पवन किशोर वधे (वय १९), रा. नर्मदा सोसायटी, गिट्टीखदान यांना अटक केली.

अजिंक्य भारत •

# आपलं अकोला

अकोला, गुरूवार, दि.२६ मार्च २०२६ www.ajinkyabharat.com


## सुटीच्या दिवशीही बँक अन् कोषागार राहणार सुरू!

**अकोला :** आर्थिक वर्षाचा शेवटचा दिवस (३१ मार्च) असल्याने, शासनाचे आर्थिक व्यवहार पूर्ण करण्यासाठी सार्वजनिक सुट्टी असूनही जिल्ह्यातील भारतीय स्टेट बँक, मुख्य कोषागार कार्यालय आणि सर्व उपकोषागार कार्यालये सुरू राहणार आहेत. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी यासंदर्भात विशेष आदेश निर्गमित केले आहेत. ३१ मार्च रोजी महावीर जयंतीनिमित्त सार्वजनिक सुट्टी आहे. मात्र, ३१ मार्च हा आर्थिक वर्षाचा शेवटचा दिवस असल्याने शासनाचा निधी अखर्चित राहू नये आणि जमा-खर्चाचे सर्व व्यवहार त्याच दिवशी पूर्ण होणे अत्यंत आवश्यक असते. या तांत्रिक बाबी लक्षात घेऊन प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. मार्चअखेरची घाई आणि कामाचा व्याप पाहता, ही सर्व कार्यालये आणि बँका ३१ मार्च रोजी रात्री उशिरापर्यंत सुरू राहतील. यामुळे शासकीय विभागांना आपला निधी वेळेत खर्च करता येईल आणि देयके सादर करण्यास अडचण येणार नाही.

### महत्त्वाचे

## १६१ जागांसाठी तात्पुरती निवड यादी जाहीर!



**अकोला :** अकोला जिल्हा पोलीस दलातील १६१ पोलीस शिपाई पदांसाठीची तात्पुरती निवड आणि प्रतीक्षा यादी अखेर जाहीर झाली आहे. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या प्रक्रियेत मैदानी आणि लेखी परीक्षेच्या गुणांच्या आधारे ही गुणवत्ता यादी तयार करण्यात आली आहे. एकूण २ हजार २८१ उमेदवारांनी लेखी परीक्षा दिली होती, ज्यापैकी १ हजार ८४५ उमेदवार उत्तीर्ण झाले. जाहीर केलेल्या यादीवर काही आक्षेप असल्यास उमेदवारांना २६ मार्च २०२६ सायंकाळी ६ वाजेपर्यंत ई-मेलद्वारे हरकती नोंदवण्याची अंतिम संधी देण्यात आली आहे. ही निवड तात्पुरती असून, अंतिम नियुक्ती कागदपत्र पडताळणीनंतरच निश्चित होईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. उमेदवारांनी पुढील अपडेट्ससाठी अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.

# ४.२७ कोटींचा पाणीटंचाई निवारण आराखडा मंजूर

## २६२ गावांतील ३१४ कामांचा समावेश

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २५ :** ग्रामीण भागातील नागरिकांना उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट करावी लागू नये, यासाठी जिल्हा प्रशासनाने मोठे पाऊल उचलले आहे. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी जिल्ह्याचा संभाव्य पाणीटंचाई कृती आराखडा मंजूर केला असून, यामध्ये ४ कोटी २७ लक्ष ४० हजार रुपयांच्या तरतुदीला मान्यता दिली आहे. विशेषतः एप्रिल ते जून या काळात सर्वाधिक टंचाईची शक्यता लक्षात घेता, या तीन महिन्यांत २५० गावांसाठी २९९ उपाययोजना राबवण्यात येणार आहेत.

जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी सर्व संबंधित यंत्रणांना ही कामे विहित मुदतीत पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. ''कोणत्याही परिस्थितीत ग्रामीण भागात पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवणार नाही, याची खबरदारी यंत्रणांनी घ्यावी,'' असे निर्देशही त्यांनी दिले. या आराखड्याचे दोन टप्पे करण्यात आले असून, जानेवारी ते मार्च या पहिल्या टप्प्यात १२ गावांसाठी १५ उपाययोजनांचा समावेश आहे, तर उर्वरित मुख्य कामे एप्रिल ते जून या काळात पूर्ण केली जाणार आहेत.

जिल्ह्यातील सातही तालुक्यांमध्ये एकूण ३१४ विविध कामे हाती घेतली जातील. यात विहीर अधिग्रहणापासून ते नळयोजना दुरुस्तीपर्यंतच्या कामांचा समावेश आहे. नळयोजनांच्या विशेष दुरुस्तीसाठी स्वतंत्रपणे १ कोटी ५६ लक्ष ८१ हजार ४३८ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, यामुळे अनेक गावांतील पाणीपुरवठा सुरळीत होण्यास मदत होणार आहे.



### टंचाई निवारण: (आकडेवारी)

| तपशील | संख्या / माहिती |
|---|---|
| एकूण मंजूर निधी | ४ कोटी २७ लक्ष ४० हजार रु. |
| एकूण बाधित गावे | २६२ |
| एकूण उपाययोजना | ३१४ कामे |
| विहीर अधिग्रहण | १२७ गावे |
| नवीन विंधन विहिरी | ४६ कामे |
| विंधन विहीर दुरुस्ती | ९२ कामे |
| नळयोजना दुरुस्ती | १० योजना (१.५६ कोटी) |
| इतर कामे | विहीर खोलीकरण, कूपनिका, रिचार्ज शाफ्ट |

### तालुकानिहाय बाधित गावे

बार्शीटाकळी (६७), पातूर (५६), मूर्तिजापूर (३९), अकोट (३३), तेल्हारा (२८), बाळापूर (२३) आणि अकोला (१६).

### या नळयोजनांची होणार विशेष दुरुस्ती

आराखड्यांतर्गत प्रामुख्याने यावलखेड, चाचोंडी, आगर, गांधीग्राम, रोहणा (अकोला), बाभुळगाव, भंडारज बु. (पातूर), अंत्री मलकापूर, वझेगाव (बाळापूर) आणि माना (मूर्तिजापूर) येथील नळयोजनांच्या विशेष दुरुस्तीच्या कामांना वेग दिला जाणार आहे.

# दिव्यांग प्रमाणपत्र घोटाळा: प्रशासनाची चौकशी म्हणजे केवळ मलमपट्टी

## बदली सवलतीपुरती चौकशी नको, मूळ नियुक्त्यांचीच तपासणी करा

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. २५ :** अकोला जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात गाजत असलेल्या बोगस दिव्यांग प्रमाणपत्र प्रकरणाने आता वेगळे वळण घेतले आहे. या प्रकरणात काही कर्मचाऱ्यांचे निलंबन करून प्रशासन आपली पाठ थोपटून घेत असले, तरी प्रत्यक्षात ही चौकशी म्हणजे केवळ वरवरची मलमपट्टी असल्याची टीका होत आहे. जोपर्यंत मूळ नियुक्तीच्या वेळी सादर केलेल्या प्रमाणपत्रांची सखोल तपासणी होत नाही, तोपर्यंत खऱ्या दिव्यांगांना न्याय मिळणार नाही, अशी भावना उमटत आहे.

जिल्हा परिषदेत अनेक शिक्षकांनी सोयीच्या बदल्या मिळवण्यासाठी आणि दुर्गम भागातून सुटका करून घेण्यासाठी दिव्यांगत्वाचा आधार घेतला. यामध्ये विशेषतः कर्णबधिर प्रवर्गातील प्रमाणपत्रांचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर झाल्याचे समोर आले आहे. आमदार हरीश पिंपळे यांनी हा मुद्दा अधिवेशनात उपस्थित केल्यानंतर प्रशासनाला जाग आली असली, तरी सध्या सुरू असलेली कारवाई केवळ बदली प्रक्रियेपुरती मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप होत आहे.

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात २००५ आणि २००८ मध्ये शिक्षक भरती करण्यात आली. त्यावेळी अनेक उमेदवारांनी यवतमाळ बोर्डातून दिव्यांग प्रमाणपत्रे आणून नोकऱ्या लाटल्याचे आरोप झाले होते. त्यातही जास्तीत जास्त प्रमाणपत्रे ही कर्णबधिर प्रवर्गातील होती.त्यावेळी अशा बोगस प्रमाणपत्रांच्या फेरतपासणीची मागणी झाली होती. मात्र, प्रशासनातील काही बड्या अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने आणि आर्थिक तडजोडींमुळे ही फाईल त्या वेळी बंद करण्यात आली. आता पुन्हा एकदा चौघांच्या निलंबनाचे गाजर दाखवून मुख्य सूत्रधारांना वाचवण्याचा प्रयत्न होत असल्याचे चित्र दिसत आहे.

### अशा आहेत प्रमुख मागण्या

- **मूळ कागदपत्रांची पडताळणी:** केवळ बदलीसाठी दिलेली प्रमाणपत्रे न तपासता, नोकरीला लागताना सादर केलेल्या प्रमाणपत्रांची आधुनिक मेडिकल बोर्डामार्फत तपासणी व्हावी.
- **फौजदारी गुन्हे:** बोगसगिरी सिद्ध झाल्यास केवळ निलंबन नको, तर त्यांच्यावर गुन्हे दाखल करून पगार वसुली करावी.
- **दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई:** ज्या अधिकाऱ्यांनी ही प्रमाणपत्रे पडताळणी न करता मंजूर केली, त्यांच्यावरही कठोर कारवाई व्हावी.

# महापालिकेत शिवसेना विरुद्ध शिवसेना संघर्ष; शिंदे गटाने निवडला नवा गटनेता

## अपात्रतेसाठी विभागीय आयुक्तांकडे धाव



अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २५ :** अकोला महानगरपालिकेत राजकीय घडामोडींना वेग आला असून, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यातील कायदेशीर लढाई आता टोकाला पोहोचली आहे. उद्धव ठाकरे गटातून निवडून आलेल्या ६ पैकी ४ नगरसेवकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केला होता. या नगरसेवकांनी आता महापालिकेतील जुन्या गटनेत्याला हटवून नवा गटनेता निवडल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

शिवसेना (उबाठा) पक्षातून निवडून आलेले मनोज पाटील, सोनाली सरोदे, सागर भारुका आणि सुरेखा काळे या चार नगरसेवकांनी जिल्हाप्रमुख मंगेश काळे यांच्यासह शिंदे गटात प्रवेश केला. यानंतर या चारही नगरसेवकांनी एक विशेष सभा घेऊन मूळ गटनेते विजय इंगळे यांना पदावरून हटवण्याचा ठराव मंजूर केला आणि सागर भारुका यांची महापालिकेतील पक्षाच्या गटनेतेपदी निवड केली. विशेष म्हणजे, या सभेसाठी त्यांनी उर्वरित दोन नगरसेवक अभय खुमकर आणि विजय इंगळे यांनाही नोटीस पाठवली होती.

दुसरीकडे, शिंदे गटात सामील झालेल्या या चारही नगरसेवकांविरुद्ध उबाठा गटाचे गटनेते विजय इंगळे यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. पक्षांतर करणाऱ्या या चारही नगरसेवकांना अपात्र ठरवण्यात यावे, अशी याचिका इंगळे यांनी विभागीय आयुक्तांकडे सादर केली आहे. ''महापालिका निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडून निवडून येऊनही त्यांनी पक्षांतर केल्याने त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई व्हावी,'' अशी मागणी या याचिकेत करण्यात आली आहे.

एकीकडे शिंदे गटाने बहुमताच्या जोरावर गटनेतेपद ताब्यात घेण्याची खेळी खेळली असताना, दुसरीकडे उबाठा गटाने कायद्याचा आधार घेत या बंडखोर नगरसेवकांचे पद रद्द करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. या दोन्ही गटांच्या संघर्षाने आता कायदेशीर वळण घेतले असून, विभागीय आयुक्त यावर काय निकाल देतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महापालिकेच्या स्व:हिश्श्यासाठी ६०१ कोटींच्या अनुदानाची मागणी

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २५ :** अकोला महानगरपालिका क्षेत्रातील विकासकामांना गती देण्यासाठी आणि केंद्र व राज्य पुरस्कृत विविध योजनांमधील महापालिकेचा ३० टक्के स्वहिस्सा शासनानेच भरावा, या मागणीसाठी अकोला पूर्वचे आमदार तथा भाजप विधीमंडळ मुख्य प्रतोद रणधीर सावरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे धाव घेतली आहे. महापालिकेची आर्थिक स्थिती नाजूक असल्याने सुमारे ६०१.८० कोटी रुपयांचे विशेष अनुदान तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली असून, यावर मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

अकोला शहरात सध्या केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान आणि स्वर्ण जयंती नगरोत्थान अभियान (राज्यस्तर) अंतर्गत मोठ्या प्रकल्पांचे नियोजन आहे. यामध्ये अमृत २.० अंतर्गत ६२९ कोटी रुपयांची मलनि:स्सारण योजना (टप्पा-१) आणि २२१ कोटी रुपयांची वाढीव पाणीपुरवठा योजना (टप्पा-१) मंजूर आहे. या दोन्ही कामांसाठी महापालिकेला अनुक्रमे १८८.७० कोटी आणि ६६.३० कोटी रुपयांचा स्वहिस्सा भरणे आवश्यक आहे.

तसेच, सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत ५५१ कोटींची वाढीव पाणीपुरवठा योजना (टप्पा-२) आणि मलनि:स्सारण योजनेमुळे नादुरुस्त झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी ६५५ कोटींचा प्रकल्प (टप्पा-२) मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. या प्रकल्पांसाठी महापालिकेचा हिस्सा अनुक्रमे १५६.५० कोटी आणि १९०.५० कोटी इतका होतो. अशाप्रकारे, एकूण चारही मोठ्या प्रकल्पांसाठी महापालिकेला आपल्या हिश्श्यापोटी ६०१.८० कोटी रुपये जमा करावे लागणार आहेत.

महापालिकेची सध्याची आर्थिक परिस्थिती पाहता ही प्रचंड रक्कम उभारणे पालिकेला शक्य नाही. नागरी सुविधांची ही कामे रखडू नयेत, यासाठी हा ३० टक्के स्वहिस्सा राज्य शासनाने विशेष अनुदान म्हणून द्यावा, अशी मागणी आमदार रणधीर सावरकर यांनी केली आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि रखडलेले प्रकल्प मार्गी लावण्यासाठी खा. अनुप धोत्रे आणि आ. रणधीर सावरकर यांनी केलेल्या या प्रयत्नांबद्दल महापौर शारदा खेडकर, स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल आणि उपमहापौर गोगे यांनी आभार मानले आहेत.

# ५ सराईत गुन्हेगार सहा महिन्यांसाठी हद्दपार!

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २५ :** शहरात येऊ घातलेल्या श्रीरामनवमीसह विविध सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अकोला पोलिसांनी कठोर पाऊल उचलले आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या पाच सराईत आरोपींना सहा महिन्यांसाठी जिल्ह्याबाहेर हद्दपार करण्यात आले आहे. या कारवाईमुळे शहरातील गुन्हेगारीवर लगाम बसण्यास मदत होणार असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. वारंवार गुन्हे करणाऱ्या आणि कायद्याचा धाक न बाळगणाऱ्या आरोपींवर महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ५६ अंतर्गत कारवाईचा प्रस्ताव तयार करून उपविभागीय दंडाधिकारी, अकोला यांच्याकडे सादर करण्यात आला होता. त्यानुसार आदेश देत पाचही आरोपींना अकोला व बाळापूर तालुक्यातून सहा महिन्यांसाठी तडीपार करण्यात आले आहे.हद्दपार करण्यात आलेल्या आरोपींमध्ये सैयद मोबीन सैयद हसन (नेहरू नगर), अमर महेंद्र उज्जेनवार (हनुमान चौक, अकोट फैल), महेश ओंकार त्रिपाठी (लाडीस फैल), नितेश महादेव वाकोडे (रमाबाई आंबेडकर नगर) आणि मनीष हरीषकुमार खानचंदानी (सिंधी कॅम्प) यांचा समावेश आहे. या सर्वांविरुद्ध गंभीर व पुनरावृत्ती होणाऱ्या गुन्ह्यांची नोंद असल्याने ही कारवाई करण्यात आली.

# १२८३ अपात्र घरकुल लाभार्थी ठरणार पात्र!

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २५ :** महानगरपालिका क्षेत्रातील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत विविध तांत्रिक कारणांमुळे अपात्र ठरलेल्या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य सरकारने ठोस पावले उचलली आहेत. योजनेतील उत्पन्नाची मर्यादा वाढवणे, चटई क्षेत्राचे निकष शिथिल करणे आणि मालकी हक्कातील त्रुटी दूर करून उर्वरित लाभार्थ्यांना पात्र करण्याची मागणी लावून धरण्यात आली असून, यावर शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे.

महापालिका क्षेत्रात २०१७ पासून प्रधानमंत्री आवास योजना राबविण्यात येत आहे. याअंतर्गत सुमारे ६४ हजार अर्ज प्राप्त झाले होते, त्यापैकी ७,६४० अर्ज मंजूर करण्यात आले होते. मात्र, या मंजूर अर्जांपैकी ४,६१९ प्रस्ताव तांत्रिक कारणांमुळे शासनाने नाकारल्याचे महापालिकेला कळविले होते. महाराष्ट्र शासनाच्या १५ ऑक्टोबर २०१५ च्या निर्णयानुसार, यातील ३,३३६ प्रस्ताव पात्र ठरतात. परंतु, ३१ डिसेंबर २०२३ नंतर कपात झालेले १,२८३ लाभार्थी अद्यापही प्रधानमंत्री आवास योजना २.० मध्ये अपात्र ठरत आहेत. या लाभार्थ्यांना हक्काचे घर मिळणे गरजेचे असल्याने तांत्रिक निकष शिथिल करण्याची मागणी आमदार सावरकर यांनी शासनाकडे केली आहे.

**या अडचणींवर होणार तोडगा:** अपात्र ठरलेल्या प्रकरणांमध्ये प्रामुख्याने जागेचा मालकी हक्क, उत्पन्नाची कमी मर्यादा आणि बांधकामाचे चटईक्षेत्र कमी असणे अशा स्वरूपाच्या अडचणी आहेत. यावर तोडगा म्हणून खालील प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत:

**उत्पन्न मर्यादा:** शासनाच्या १५ ऑक्टोबर २०१५ च्या निर्णयानुसार उत्पन्नाची मर्यादा ३ लाखांवरून ४.५ लाख रुपये करण्यात यावी.

**अतिक्रमण नियमानुकूल:** लाभार्थ्यांनी प्रस्तावित केलेल्या शासकीय जागेवरील अतिक्रमण नियमानुकूल करण्यात यावे.

**चटईक्षेत्र:** बांधकामाचे चटईक्षेत्र २१ चौरस मीटरपर्यंत शिथिल करण्यात यावे. पूर्वीच्या निकषानुसार २१ ते ३० चौ.मी. चटईक्षेत्राची मर्यादा होती, मात्र नवीन योजनेत ती ३० ते ४५ चौ.मी. करण्यात आल्याने अनेक लाभार्थी तांत्रिकदृष्ट्या बाद झाले होते. हे निकष शिथिल झाल्यास उर्वरित १२८३ कुटुंबांना स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण करता येईल.

# ३१ शेतकरी आत्महत्या प्रकरणे मदतीसाठी पात्र

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २५ :** जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष समितीची बैठक पार पडली. या बैठकीत एकूण ४५ प्रकरणांची सखोल छाननी करण्यात आली, ज्यापैकी ३१ प्रकरणे शासकीय मदतीसाठी पात्र ठरवण्यात आली आहेत. यामुळे संबंधित बाधित कुटुंबांना शासनाच्या मदतीचा मार्ग मोकळा झाला आहे. उर्वरित प्रकरणांपैकी १० प्रकरणे अपात्र ठरली असून, ४ प्रकरणांची फेरचौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. निसर्गाचा लहरीपणा, सततची नापिकी, वाढता कर्जबाजारीपणा आणि उत्पन्नात झालेली घट यामुळे शेतकरी टोकाचे पाऊल उचलत असल्याचे चित्र जिल्ह्यात दिसत आहे. अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान आणि शेतमालाला मिळणारा अत्यल्प भाव यामुळे बळीराजा संकटात सापडला आहे. या बैठकीला जिल्हाधिकारी आणि समितीचे सर्व संबंधित सदस्य उपस्थित होते.






**योजना** | ५.१७ कोटी मंजूर; धान्याऐवजी आता थेट बँक खात्यात रोख रक्कम

# ८४ हजार शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २५ :** शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने दिलासादायक निर्णय घेतला आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी शासनाने तब्बल ५ कोटी १६ लक्ष ९५ हजार १७८ रुपयांचा निधी वितरित करण्यास मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे अन्नधान्याऐवजी आता थेट रोख रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होणार असून, जिल्ह्यातील ८३ हजार ८०२ लाभार्थी शेतकऱ्यांना यामुळे मोठा आर्थिक आधार मिळणार आहे.



दुष्काळाच्या काळात जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने अन्नसुरक्षा योजनेत समाविष्ट केले होते. शेतकऱ्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलू नये, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. पूर्वी या योजनेत २ रुपये किलो गहू आणि ३ रुपये किलो तांदूळ या सवलतीच्या दरात प्रतिमहिना २५ किलो धान्य दिले जात होते. मात्र, सप्टेंबर २०२२ पासून हे धान्य वाटप बंद झाल्याने शेतकऱ्यांची अडचण झाली होती. ही बाब लक्षात घेऊन शासनाने धान्याऐवजी थेट डीबीटी द्वारे रोख रक्कम देण्याचा निर्णय घेतला. आता नवीन आर्थिक वर्षासाठी निधी मंजूर झाल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या गरजेनुसार हा पैसा खर्च करता येणार आहे. शेतीसाठी साहित्य खरेदी, कर्जफेड किंवा दैनंदिन गरजांसाठी हा निधी अत्यंत उपयोगी ठरणार आहे.

### अनुदानात अशी झाली वाढ

राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत समाविष्ट न झालेल्या केशरी कार्डधारक शेतकऱ्यांसाठी फेब्रुवारी २०२३ मध्ये ही योजना सुरू झाली. सुरुवातीला प्रत्येक लाभार्थ्यास दरमहा १५० रुपये दिले जात होते. मात्र, जून २०२४ मध्ये या रकमेत वाढ करून ती १७० रुपये प्रतिमहिना करण्यात आली आहे. यामुळे शेतकरी कुटुंबांच्या उत्पन्नात थोडीफार भर पडण्यास मदत होत आहे.

## महत्त्वाचे

### बाळापूर ग्रामीण शासकीय रुग्णालयाचा जनजागृती संदेश

**बाळापूर :** बाळापूर येथील ग्रामीण शासकीय रुग्णालयाच्या वतीने परिसरातील नागरिकांसाठी एक महत्त्वपूर्ण आरोग्य उपक्रम म्हणून मोफत एचपीव्ही लसीकरण मोहीम सुरू करण्यात आली आहे. ही लस आता दररोज रुग्णालयात उपलब्ध करून देण्यात आली आहे. हे लसीकरण विशेषत: १४ ते १५ वर्षे वयोगटातील मुलींसाठी अत्यंत आवश्यक व लाभदायक मानले जाते. एचपीव्ही लस गर्भाशय मुखाच्या (सर्व्हायकल) कर्करोगापासून संरक्षण करण्यासाठी प्रभावी ठरते. हा आजार महिलांमध्ये आढळणाऱ्या गंभीर आजारांपैकी एक आहे. रुग्णालय प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, ही लस पूर्णपणे सुरक्षित, प्रभावी असून शासनाने शिफारस केलेली आहे. योग्य वेळी लसीकरण केल्यास भविष्यात उद्भवणाऱ्या गंभीर आरोग्य धोक्यांपासून बचाव करता येतो.
ग्रामीण भागातील नागरिकांनी आपल्या मुलींना घेऊन जवळच्या शासकीय रुग्णालयात किंवा बाळापूर ग्रामीण रुग्णालयात येऊन या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. ''आजची छोटी काळजी उद्याची मोठी सुरक्षा ठरू शकते. मुलीचे आरोग्य म्हणजे तिचे सशक्त भविष्य ही संधी वाया जाऊ देऊ नका,'' असा संदेश रुग्णालय प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

### महिलांचा सत्कार कार्यक्रम उत्साहात



**अकोला :** आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त श्री राजराजेश्वर शिक्षण, क्रीडा बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने महिलांचा सत्कार करण्यासाठी छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नवनिर्वाचित नगरसेवक अमोल मोहोकार, अमोल गोगे, देवाशिष काकड तसेच करण साहू उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात पाहुण्यांच्या स्वागताने झाली. संस्थेच्या सचिव सौ. वंदना महेंद्र गोमासे यांनी प्रास्ताविक करून कार्यक्रमाचा उद्देश मांडला. महिलांच्या सन्मानासाठी नेहमी कार्यरत असलेल्या संस्थेच्या वतीने विविध महिलांना भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन संस्थेच्या अध्यक्षा कु. आकांक्षा वंदना महेंद्र गोमासे यांनी केले. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी शितल सटवाले यांच्या वतीने अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली. महिलांनी या कार्यक्रमाचा उत्साहाने आनंद घेतला आणि संस्थेच्या उपक्रमाचे कौतुक केले.

### अंदुरा येथे श्रामनेर शिबिराचा समारोप



**जानोरी मेळ :** अंदुरा येथे भारतीय बौद्ध महासभा तर्फे आयोजित श्रामनेर शिबिराचा समारोप २४ मार्च रोजी झाला. या शिबिराची सुरुवात १५ मार्च रोजी झाली होती. शिबिराचे प्रमुख मार्गदर्शक चैत्यभूमीचे उपाध्यक्ष भंते बी. संघपाल महाथेरो होते, तर ननीर गुरुजी यांनी केंद्रीय शिक्षक म्हणून कार्य केले. पंचक्रोशीतील अनेक गावांतील बौद्ध बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले. दररोज प्रभातफेरी व प्रवचनांचे आयोजन करण्यात आले. २३ युवकांनी श्रामनेर म्हणून सहभाग नोंदवला. समारोप प्रसंगी सरपंच संजय वानखडे यांनी दान दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभनील तायडे यांनी केले.

# अकोट शहरात गॅस सिलिंडरचा तीव्र तुटवडा

## पोलीस बंदोबस्तात गॅस वितरण; कार्यालयाला कुलूप

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**अकोट, दि. २५ :** अकोट शहरात सध्या गॅस सिलेंडरचा तीव्र तुटवडा निर्माण झाला असून नागरिकांना गॅस मिळवण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शहरात केवळ दोनच गॅस एजन्सी कार्यरत असल्याने शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांवर अतिरिक्त ताण पडत आहे.
दोन देशांमधील युद्धाच्या पार्श्वभूमीवर गॅस पुरवठ्यावर परिणाम झाल्याचे सांगितले जात असून, नागरिकांना दोन ते तीन दिवस आधी गॅस बुक करावा लागत आहे. तसेच सिलेंडर मिळवण्यासाठी ग्राहकांना मोठ्या रांगांमध्ये उभे राहावे लागत आहे.
गॅसचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून दर वाढविण्याचे संकेत असल्याची चर्चा शहरात सुरू आहे. त्यामुळे नागरिकांनी गॅस घेताना सावधगिरी बाळगण्याची गरज व्यक्त होत आहे. विशेषतः सिलेंडरची डिलिव्हरी घेताना वजन काट्यावर तोलून घेणे आवश्यक असल्याचे सुज्ञ नागरिकांकडून सांगितले जात आहे, जेणेकरून कोणत्याही प्रकारची फसवणूक टाळता येईल.
दरम्यान, गॅस वितरणावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये व वाद निर्माण होऊ नये यासाठी गॅस एजन्सीसमोर अकोट शहर पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पोलीस निगराणीखाली गॅसचे वितरण करण्यात आले, तसेच काही ठिकाणी गॅस एजन्सी कार्यालयाला कुलूप लावूनच वितरण प्रक्रिया पार पाडण्यात आली.

❑ गॅस सिलेंडर मिळवण्याकरिता तीन ते चार दिवस वाट पहावी लागत आहे. आज सिलेंडर आणण्यासाठी गेलो असता एजन्सी समोर भरपूर मोठ्या रांगा लागल्या होत्या. कार्यालयीन अडचण घेऊन व्यवस्थापकांना भेटण्यासाठी गेलो असता कार्यालयाला टाळे लागले होते. आणि कार्यालय बंद होते. या प्रकारामुळे शहरातील नागरिकांना प्रचंड मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

\- **दिनेश घोडेस्वार**, समाजसेवक, अकोट

❑ माझी तब्येत खराब असल्याने मी गॅस एजन्सी कार्यालयामध्ये आलो नाही. यासंदर्भात नागरिकांना कुठल्या समस्या असल्यास दुपारी कार्यालयामध्ये मी हजर असेल. गॅस स्टॉक गाडी तीन दिवसानंतर येत असल्यामुळे नागरिकांना तास त्रास सहन करावा लागत आहे.

\- **रामदास काळमेघ**, व्यवस्थापक गॅस एजन्सी अकोट

## पादुका संस्थान मुंडगावचा शासनाकडून सन्मान



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मुंडगाव, दि. २५ :** प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियानांतर्गत 'निक्षय मित्र' म्हणून श्री गजानन महाराज पादुका संस्थान, मुंडगाव यांचा शासनाच्या वतीने सन्मान करण्यात आला.श्री गजानन महाराज पादुका संस्थानतर्फे धार्मिक, कृषी, आरोग्य, शैक्षणिक, सांस्कृतिक व पर्यावरणविषयक विविध नाविन्यपूर्ण सामाजिक उपक्रम सातत्याने राबविण्यात येतात. याच अंतर्गत प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियानात संस्थानने क्षयरुग्णांना पोषण आहार किटचे वितरण केले होते. या कार्याची दखल घेत जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, अकोला तसेच राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम, अकोला यांच्या वतीने जागतिक क्षयरोग दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात संस्थानचा 'निक्षय मित्र' म्हणून गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी वर्षा मीना, जिल्हा परिषद अकोल्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेश्राम मॅडम, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. मनीष शर्मा तसेच इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.पादुका संस्थानच्या वतीने अध्यक्ष गणेश ढोले व व्यवस्थापक विजय ढोरे यांनी हा सन्मान स्वीकारला.

## आस्की किड्सचा पदवीदान समारंभ थाटात संपन्न

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोट, दि. २५ :** आस्की किड्स येथे केजी-२च्या विद्यार्थ्यांचा पदवीदान (ग्रॅज्युएशन) समारंभ मोठ्या उत्साहात व थाटामाटात पार पडला. लहान मुलांमध्ये मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून आत्मविश्वास निर्माण करणे, अभ्यासाबद्दल सकारात्मकता वाढवणे, बदल स्वीकारण्याची मानसिकता विकसित करणे, यशाची पहिली जाणीव करून देणे, सामाजिक कौशल्यांची रुजवणूक करणे तसेच कौटुंबिक आदरभाव निर्माण करणे या उद्दिष्टांसह या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.
या कार्यक्रमाला प्रसिद्ध त्वचारोगतज्ञ डॉ. आरती अंबाळकर व स्त्रीरोगतज्ञ डॉ. अर्चना पखान यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शाळेचे सचिव नितीनजी झाडे व प्राचार्या नेहा झाडे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.
कार्यक्रमाची सुरुवात आद्यशिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला वंदन करून करण्यात आली. यावेळी लहान मुलांच्या बोबड्या बोलातील भाषणांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. तसेच विद्यार्थ्यांनी सादर केलेले नृत्याविष्कारही उपस्थितांचे विशेष आकर्षण ठरले. शाळेच्या प्री-प्रायमरी प्राचार्या संगीता बाळापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या प्राथमिक विकास प्रक्रियेत समावेशक शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावते आणि केजी स्तरावर घेतलेला हा उपक्रम कौतुकास्पद असून तो मैलाचा दगड ठरेल, असे मत प्रमुख पाहुण्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. यामध्ये वर्गशिक्षिका नेहा पवार व सोनाली पांडे यांचे विशेष सहकार्य लाभले.

## कृषी प्रदर्शनात शेतकरी संवाद कार्यक्रम उत्साहात

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. २५ :** संत पुंडलिक महाराज यात्रा महोत्सवानिमित्त आयोजित कृषी प्रदर्शन व पाचव्या शेतकरी साहित्य संमेलनातील दुपारच्या सत्रात 'शेतकरी संवाद' हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या वेळी शेतकरी प्रश्नांचे अभ्यासक व शेतकरी जागर मंच अकोलाचे संस्थापक इंजि. प्रशांत गावंडे यांनी मार्गदर्शन केले.
यावेळी बोलताना गावंडे यांनी सांगितले की, अमेरिकन सरकार 'गॅट' कराराचे उल्लंघन करून आपल्या शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात अनुदान देते. त्यामुळे त्यांची शेती तोट्यात जात नाही. जरी तोटा झाला तरी सरकार तो अनुदानाच्या माध्यमातून भरून काढते आणि उत्पादित मालाची विक्री करण्यासाठी जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देते. विविध देशांशी करार करून अमेरिकन शेतमालाची निर्यात केली जाते. नुकत्याच झालेल्या भारत-अमेरिका कराराच्या पार्श्वभूमीवर अमेरिकन शेतमालाला भारतीय बाजारपेठ खुली होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. यावर आयात शुल्क लागू न झाल्यास देशाला होणारे आर्थिक नुकसान आणि स्थानिक शेतकऱ्यांवर होणारा परिणाम गंभीर ठरू शकतो. कमी दरात येणाऱ्या परदेशी मालामुळे देशातील शेतमालाला उत्पादन खर्चही निघणार नाही, अशी भीती त्यांनी व्यक्त केली.आपल्या देशात संपूर्ण शेती उत्पादन हमीभावाने खरेदी करण्याचा कायदा नसून, केवळ मर्यादित खरेदी केली जाते. अशा परिस्थितीत अमेरिकेसारख्या बलाढ्य शेती व्यवस्थेसमोर भारतीय शेतकऱ्यांचा टिकाव लागणार का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी शेतकऱ्यांनी लोकप्रतिनिधींना जाब विचारत संघटितपणे आवाज उठवण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.
कार्यक्रमाला परिसरातील अनेक प्रयोगशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी पाचव्या शेतकरी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष पंकज कांबे यांनी गावंडे यांचा स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आंतरभारती, पुणे (मूर्तिजापूर)चे तालुका सचिव प्रमोद राजंदेकर यांनी केले, तर आभार जनमंच, नागपूरचे मूर्तिजापूर तालुकाध्यक्ष प्रा. सुधाकर गौरखेडे यांनी मानले.

## जिल्ह्यातील शिक्षकांना मिळणार सेवा पुस्तिकेची दुय्यम प्रत व दरमहा वेतन प्रमाणपत्र

### मनीष गावंडे यांच्या मागणीवर शिक्षणाधिकारी यांचे आदेश

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २५ :** अकोला जिल्ह्यातील खाजगी शाळांवर काम करणाऱ्या शिक्षकांना सेवा पुस्तिकेची दुय्यम प्रत व दरमहा वेतन प्रमाणपत्र मिळत नसल्याची तक्रार भाजपा ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मनीष गावंडे यांच्याकडे काही शिक्षकांनी केली होती. यावर मनीष गावंडे यांनी अमरावती विभागाचे शिक्षण उपसंचालक यांना पत्र देऊन विभागातील सर्व शिक्षणाधिकाऱ्यांना सेवा पुस्तकाची दुय्यम प्रत व धर्मा वेतन प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यासंदर्भात निर्दे श देण्याबाबत विनंती केली होती.
यावर शिक्षण उपसंचालक श्रीमती निलिमा टाके यांनी तात्काळ कारवाई करून विभागातील पाचही शिक्षणाधिकाऱ्यांना श्री. मनीष गावंडे यांच्याकडून प्राप्त निवेदनावर तात्काळ शासन नियमानुसार कारवाई करण्याबाबत सूचना दिल्या होत्या.शिक्षण उपसंचालक यांच्याकडून प्राप्त सूचनेनंतर अकोला प्राथमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी श्री रतनसिंग पवार यांनी आदेश काढून शिक्षकांना सेवा पुस्तकाची दुय्यम प्रत व दरमहा वेतन प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यासंदर्भात वेतन पथक अधीक्षक व जिल्ह्यातील अंशतः व अनुदानित शाळेतील मुख्याध्यापकांना आदेशित केले आहे. शिक्षणाधिकाऱ्यांनी आपल्या आदेशामध्ये खाजगी शाळा संहिता १९८१ मधील नियम ३९ नुसार सेवा पुस्तिकेची दुय्यम प्रत, महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१ नुसार रजा लेखा अद्यावत करणे व महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ नुसार दरमहा वेतन प्रमाणपत्र देऊन प्रशासकीय जबाबदारीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले मुख्याध्यापक व वेतन पथक अधिक्षक यांना दिले.
शिक्षकांच्या प्रश्नावर तत्परता दाखविल्याबद्दल शिक्षण उपसंचालक श्रीमती निलिमा टाके व प्राथमिक शिक्षणाधिकारी श्री.रतनसिंग पवार यांच्यासह शिक्षण विभागातील श्री अजय गावंडे, उपसंचालक कार्यालयातील श्री.किशोर कामनकर यांनी सहकार्य केल्याबद्दल मनिष गावंडे यांनी आभार व्यक्त केले.

## अकोला येथे श्रीराम नवमी निमित्त भव्य सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोला, दि. २५ :** येथील महाराणा प्रताप बाग, सिटी कोतवाली चौक येथे श्रीराम नवमीच्या निमित्ताने आयोजित भव्य सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे आयोजन श्रीराम नवमी शोभायात्रा समिती यांच्या वतीने करण्यात आले होते.
कार्यक्रमात महाकाली ढोल पथक यांनी दमदार व आकर्षक प्रस्तुती सादर करून उपस्थितांचे विशेष मनोरंजन केले. यावेळी मोठ्या संख्येने रामभक्त व मातृशक्ती उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घेतला. या प्रसंगी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मातृशक्तींचा स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये राष्ट्रीय बॉक्सिंग कोच सौ. वंदना पिंपळखरे, मायक्रो बायोलॉजी विषयातील गोल्ड मेडलिस्ट डॉ. मयुरी महाजन, ८५ वर्षीय सामाजिक कार्यकर्त्या व प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व श्रीमती ताराताई हातवळणे, पीएचडी धारक डॉ. प्राचीप्रभा शर्मा तसेच शोभज आयुर्वेदाच्या संचालिका डॉ. शोभा पांडव यांचा समावेश होता.
तसेच कार्यक्रमात रांगोळी आर्टिस्ट अमृता सेनाड, अँकर जया भारती, मनीषा पालीवाल, कथक नृत्यांगना अमृता जटाळ यांचाही प्रति स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे, शारीरिक अडचणी असूनही जिद्दीच्या जोरावर तुळशीच्या माळा व दिव्यांच्या वाती तयार करून स्वावलंबनाचा आदर्श निर्माण करणाऱ्या श्रीमती यशोदा रामकृष्ण पद्मने यांच्या उपस्थितीने कार्यक्रम अधिक प्रेरणादायी ठरला.
कार्यक्रमासाठी स्थायी अध्यक्ष कृष्णा गोवर्धनजी शर्मा, अध्यक्ष अरुण बालमुकुंदजी शर्मा तसेच विहिप जिल्हाध्यक्ष राजुभाऊ मंजुळकर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अर्चना शर्मा, मंजुषाताई सावरकर, वैशालीताई शेळके, गीतांजली शेगोकार, सीमा मांगटे, चंदाताई शर्मा, निशा कढी, आरती शर्मा, पुष्पा वानखेडे, रेखा नालट, मनीषा भुसारी, मालती रणपिसे, मनीषा देशपांडे, प्रीती गुरुखुदे, सारिका देशमुख, वैशाली शेगोकार, अलका देशमुख, दिपाली वाकळे, संगीता जानोरकर, पुरी काकू आदींचे विशेष सहकार्य लाभले. समितीच्या वतीने अशा धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांद्वारे समाजात एकात्मता व संस्कारांचे जतन करण्याचा संदेश देण्यात आला.

**तक्रार** | बीडीओकडे तक्रार, फौजदारी कारवाईची ग्रामस्थांची मागणी

# १५ व्या वित्त आयोगाच्या कामांत अपहाराचा आरोप

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोट, दि. २५ :** तालुक्यातील मौजे चंडिकापूर येथे १५वा वित्त आयोगांतर्गत करण्यात आलेल्या नाली व जिल्हा परिषद शाळेतील पेव्हर ब्लॉक कामांमध्ये अपहार झाल्याचा आरोप करण्यात आला असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.
याबाबत गावातील विक्रम रमेश इंगळे यांनी पंचायत समिती अकोटचे गटविकास अधिकारी (बीडीओ) यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, गोपाल मोरे ते श्रीकृष्ण चौधरी तसेच रवींद्र वाशिमकार ते गोपाल वैद्य यांच्या घरापर्यंत नाल्यांचे बांधकाम करण्यात आले असून, या कामांची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.
तसेच, जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेत पेव्हर ब्लॉकचे काम प्रत्यक्षात न करता काम पूर्ण झाल्याचे दाखवून निधीचा अपहार करण्यात आल्याचा आरोप आहे. या कामासाठी १ लाख ३० हजार रुपये मंजूर करण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात काम झाले नसतानाही बिल काढण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.
याशिवाय, ग्रामपंचायत सदस्याने स्वतःच्या खाजगी जागेत ग्रामपंचायतीच्या निधीतून बोरवेल खोदल्याचा आरोपही करण्यात आला असून, त्या जागेवर वैयक्तिक मालकी हक्क गाजवला जात असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.
या सर्व प्रकरणात संबंधित ठेकेदार, ग्रामपंचायत सरपंच, ग्रामसेवक व संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी शासन निधीचा अपहार केल्याचा आरोप करत त्यांच्यावर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करावेत, तसेच अपहार झालेली रक्कम वसूल करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

❑ चंडिकापूर येथे नाल्या व शाळेतील पेव्हर ब्लॉक कामांमध्ये अपहार झाल्याचे निदर्शनास आल्याने मी सखोल चौकशी व दंडात्मक कारवाईची मागणी गटविकास अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रारीद्वारे केली आहे. तक्रारीची दखल न घेतल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल.

\- **विक्रम रमेश इंगळे**, तक्रारदार व ग्रामस्थ

❑ चंडिकापूर येथील कामांबाबत भ्रष्टाचाराची तक्रार प्राप्त झाली आहे. तक्रारीनुसार संबंधित कामांची चौकशी सुरू आहे. चौकशीत गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**मदनसिंग बहुरे**, विस्तार अधिकारी, पंचायत समिती अकोट

## पातुर तहसील कार्यालयात ग्राहक सभेचे आयोजन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पातुर, दि. २५ :** ग्राहक दिनाच्या औचित्याने पातुर तहसील कार्यालयाच्या नव्याने उभारलेल्या इमारतीतील सभागृहात दि. २५ मार्च २०२६ रोजी ग्राहक सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेच्या अध्यक्षस्थानी निवासी नायब तहसीलदार विश्वजीत खंदारे होते.यावेळी पुरवठा निरीक्षक शीतल दांदळे-मोरखडे, पातुर तालुका ग्राहक पंचायतचे अध्यक्ष देवानंद गहिले तसेच तालुका महिला अध्यक्षा प्रा. सौ. करुणा गवई यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाची सुरुवात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर पातुर व बाळापूर तहसील प्रशासनाच्या वतीने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.सभेमध्ये ग्राहकांचे हक्क, त्यांच्याशी संबंधित समस्या तसेच फसवणूक टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. देवानंद गहिले व प्रा. करुणा गवई यांनी ग्राहकांनी सतत जागरूक राहण्याचे महत्त्व अधोरेखित केले. विशेषतः ऑनलाइन वीज बिल भरताना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले.अध्यक्षीय भाषणात विश्वजीत खंदारे यांनी ग्राहकांनी सजग राहून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन केले. तसेच स्वस्त धान्य दुकानदार व इतर सेवा पुरवठादारांनी पारदर्शक व्यवहार ठेवावेत, जेणेकरून ग्राहकांना कोणताही त्रास होणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक शीतल दांदळे-मोरखडे यांनी केले. संचालन बाळापूर येथील कनिष्ठ लिपिक जगदीश ढगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सचिन परदेशी यांनी मानले.

## महत्त्वाचे

### रामनवमी व स्वामी रामदेवजी बाबा यांचा संन्यास दीक्षा दिन आज साजरा होणार

**वाशिम:** मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामचंद्र यांची जयंती अर्थात रामनवमी आणि योगऋषी स्वामी रामदेवजी महाराज यांचा संन्यास दीक्षा दिवस या दुग्धशर्करा योगाचे औचित्य साधून वाशिममध्ये भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पतंजली योग परिवार आणि भारत स्वाभिमान न्यास, जिल्हा वाशिम यांच्या वतीने गुरुवार, २६ मार्च २०२६ रोजी या विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम पुसद नाका येथील महावितरण कार्यालयामागे असलेल्या नित्य योगा ग्राउंडवर सकाळी ५:०० ते ७:०० या वेळेत पार पडणार आहे. या मंगल दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रामुख्याने इंटिग्रेटेड योग, वातावरणाच्या शुद्धीसाठी हवन यज्ञ आणि आध्यात्मिक प्रगतीसाठी सत्संग अशा त्रिवेणी संगमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याच्या माध्यमातून प्रभू श्रीरामांचे आदर्श आणि योग संस्कृतीचा प्रचार करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. पतंजली योग परिवाराचे सर्व सदस्य, योग शिक्षक आणि जिल्ह्यातील सर्व योग साधकांनी या आरोग्यदायी आणि आध्यात्मिक सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी होऊन लाभ घ्यावा, असे आवाहन पतंजली योग परिवार, जिल्हा वाशिमच्या वतीने करण्यात आले आहे.

### ग्रामीण भागात रेशन दुकानांतून केरोसीन वितरण होणार

**वाशिम:** आंतरराष्ट्रीय स्तरावरील इराण-अमेरिका संघर्षाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेली गॅस टंचाई लक्षात घेता, शासनाने आता केरोसीन (घासलेट) वितरणाचा पर्याय स्वीकारला आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी स्वस्त धान्य दुकानांमार्फत केरोसीन पुरवठा करण्याची तयारी प्रशासनाने पूर्ण केली असून, जिल्हा पुरवठा विभागाने यासंदर्भात तहसीलदारांना आवश्यक निर्देश दिले आहेत. इराण-अमेरिका युद्धाचे पडसाद जागतिक स्तरावर उमटत असून, देशांतर्गत गॅस सिलिंडरचा मोठा तुटवडा निर्माण झाला आहे. याचा थेट फटका सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघराला बसत असल्याने, राज्याच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने केरोसीन वितरणाचे धोरण आखले आहे. त्यानुसार जिल्ह्यातील ७७६ रेशन दुकानांपैकी ग्रामीण भागातील दुकाने आणि नोंदणीकृत हॉकर्समार्फत हा पुरवठा केला जाणार आहे. जिल्हा पुरवठा विभागाने सोमवारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेऊन सर्व तहसीलदारांना नियोजनाच्या सूचना दिल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने केरोसीन परवान्यांचे नूतनीकरण करणे आणि तालुकास्तरावरून टँकरद्वारे होणाऱ्या पुरवठ्याची साखळी निश्चित करणे, यावर भर देण्यात आला आहे.

### ट्रकची दुचाकीला धडक; बाप-लेक बचावले!

**मानोरा :** गादेगाव येथून मुलीच्या बी.एससी. परीक्षेसाठी दिग्रसकडे निघालेल्या वडील-मुलीच्या दुचाकीला ट्रकने जोरदार धडक दिल्याची घटना मंगळवार, २४ मार्च रोजी सकाळी मानोरा तालुक्यातील वाई गौळ परिसरात घडली. या अपघातात दुचाकीचा अक्षरशः चुराडा झाला; मात्र, दैव बलवत्तर ठरल्याने बाप-लेकीला कोणतीही दुखापत झाली नाही. प्राप्त माहितीनुसार, गादेगाव येथील भारत दत्ता चव्हाण हे त्यांची मुलगी गायत्री चव्हाण हिचा बी.एससी. चा पेपर असल्यामुळे एमएच ३७, जी ६३७५ क्रमांकाच्या दुचाकीने दिग्रसकडे जात होते. दरम्यान, वाई गौळ परिसरात सुरू ट्रकखाली आल्याने दुचाकीची मोडतोड झाली.

# पुनर्रचनेत प्रस्थापितांना शॉक, नव्या समीकरणांचा मास्टरप्लॅन!

## आरक्षणाच्या संभाव्य बदलामुळे राजकीय गणित कोलमडणार!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २५ : राजकारणात शाश्वत काहीच नसते, हे आता वाशिम जिल्ह्याच्या बाबतीत तंतोतंत खरे ठरणार आहे. २०२९ च्या मतदारसंघांच्या पुनर्रचनेचे जे वारे वाहत आहेत, ते जिल्ह्यातील दिग्गज नेत्यांच्या सत्तेची समीकरणे मुळासकट उपटून टाकणारे ठरणार आहेत. यात सर्वात कळीचा मुद्दा ठरणार आहे तो म्हणजे आरक्षणाचे संभाव्य स्थलांतर. नव्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार जिल्ह्याचा राजकीय भूगोल पूर्णपणे बदलण्याची चिन्हे आहेत.**




वाशिम विधानसभा मतदारसंघ सध्या अनुसूचित जातीसाठी राखीव आहे. या मतदारसंघावर गेल्या अनेक वर्षांपासून भाजपची मजबूत पकड राहिली आहे. माजी आमदार लखन मलिक यांनी सलग तीनवेळा या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. मात्र, नुकत्याच झालेल्या निवडणुकीत भाजपने त्यांना संधी न देता श्याम खोडे यांना रिंगणात उतरवले आणि त्यांनी विजय मिळवत भाजपचा बोलबाला कायम राखला.

जर पुनर्रचनेत वाशिम मतदारसंघ खुला झाला, तर गेल्या १५-२० वर्षांपासून केवळ आरक्षणाअभावी निवडणूक लढवू न शकलेले अनेक हेवीवेट नेते मैदानात उतरतील. अशा स्थितीत भाजपला आपला गड राखण्यासाठी नव्या रणनीतीचा अवलंब करावा लागेल, तर विरोधकांसाठी सत्तेची दारे उघडण्याची ही मोठी संधी असेल.

रिसोड-मालेगाव हा मतदारसंघ काँग्रेसचा अभेद्य गड मानला जातो. गेल्या २५ वर्षांपासून येथे झनक घराण्याचे वर्चस्व आहे. दिवंगत माजी मंत्री सुभाषराव झनक यांच्यानंतर आता आमदार अमित झनक यांनी ही सत्ता अबाधित राखली आहे. या मतदारसंघात देशमुख-पाटील हा राजकीय संघर्ष जुनाच आहे, जो अनेकदा निवडणुकीचे निकाल ठरवतो. दरम्यानच्या काळात केवळ एकदाच भाजपचे विजयराव जाधव यांनी येथे विजयाची नोंद केली होती. मात्र, जर हा मतदारसंघ राखीव झाला, तर झनक घराण्याचे या मतदारसंघावरील वर्चस्व धोक्यात येऊ शकते. पिढ्यानपिढ्या ज्यांनी या मातीवर आपली पकड निर्माण केली, त्यांच्यासाठी हा सर्वात मोठा राजकीय धक्का ठरेल. कारंजा-मानोरा हा मतदारसंघ सध्या खुला आहे. येथे डहाके घराण्याची पकड मजबूत राहिली आहे. दुसरीकडे, दिवंगत आमदार राजेंद्र पाटणी यांचे सुपुत्र ज्ञायक पाटणी यांनीही आपल्या कार्यातून येथे मोठी ताकद निर्माण केली आहे. या मतदारसंघात जर आरक्षणाची किंवा भौगोलिक फेररचना झाली, तर येथील सत्तासंघर्षाला वेगळेच वळण लागेल. प्रस्थापित नेत्यांना आपल्या अस्तित्वासाठी नव्या मतदारसंघाचा शोध घ्यावा लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. लोकसभा पुनर्रचनेतही एक अत्यंत चतुर खेळी खेळली जाण्याची शक्यता आहे. स्वतंत्र वाशिम लोकसभा मतदारसंघाची मागणी जुनीच आहे. बंजारा समाजाचे प्राबल्य असलेला मानोरा तालुका यवतमाळ लोकसभा क्षेत्रासाठी लाईफलाईन मानला जातो. यवतमाळच्या नेत्यांना हा तालुका आपल्याकडेच ठेवणे फायदेशीर आहे.

अकोला लोकसभेत असलेले रिसोड आणि मालेगाव हे तालुके जर वाशिम लोकसभेत परतले आणि मानोरा यवतमाळकडेच राहिला, तर वाशिम जिल्ह्याचे भौगोलिक संतुलन बिघडेल. यामुळे जिल्ह्याच्या अस्मितेचा आणि विकासाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर येईल. २०२९ ची निवडणूक ही केवळ सत्तेसाठी नाही, तर अस्तित्वासाठी असणार आहे. आरक्षणाची फिरती लाट ज्याच्या अंगावर येईल, त्याचे राजकीय भविष्य अस्थिर होईल, तर ज्याचा मतदारसंघ खुला होईल, त्याच्यासाठी प्रगतीची नवी दारे उघडतील. वाशिम जिल्ह्याच्या राजकारणातील ही आजवरची सर्वात मोठी उलटफेर ठरणार आहे.

# अफवांना बळी पडू नका; इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. २५ :** जिल्ह्यातील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अलीकडे काही भागांत पेट्रोल पंपांवर पेट्रोल व डिझेलच्या खरेदीसाठी अनावश्यक गर्दी होत असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल आणि घरगुती एलपीजी यांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. कोणत्याही प्रकारची तुटवडा परिस्थिती निर्माण झालेली नसून, नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. घाबरून जास्त प्रमाणात इंधन खरेदी करण्यासाठी गर्दी करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. आवश्यकतेनुसारच इंधन खरेदी करावी व प्रशासनास सहकार्य करावे.

जिल्हा प्रशासनाकडून इंधनाचा पुरवठा सुरळीत राहण्यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करण्यात आलेली असून, नागरिकांनी संयम व जबाबदारीने वागावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी दीपक बाजड यांनी दिली आहे.

# रामनवमी यात्रेसाठी देशभरातून पालख्या दाखल; जंगी स्वागत

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मानोरा, दि. २५ :** बंजारा समाजाची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र पोहरादेवी येथे २६ मार्च रोजी होणाऱ्या भव्य रामनवमी यात्रेचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. या यात्रेनिमित्त महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्रप्रदेश आणि मध्यप्रदेश या राज्यांतून हजारो भाविक पायदळ पालख्यांसह पोहरादेवीत दाखल होत असून, संपूर्ण मंदिर परिसर भक्तीमय झाला आहे.

देशाच्या विविध कानाकोपऱ्यांतून आलेल्या पालख्यांचे धर्मगुरू आ. बाबुसिंग महाराज व देवीभक्त शेखर महाराज यांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले. कर्नाटक राज्यातील रायचूर, बल्लारी येथून ७०० ते ८०० किलोमीटरचा पायी प्रवास करून आलेल्या पालख्यांसह मध्यप्रदेशातील बडवानी, खरगोन आणि राज्यातील बीड, जालना भागातील पालख्यांचेही मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

पाच ते सहा लाख भाविकांची उपस्थिती अपेक्षित

दरवर्षीप्रमाणे यंदाही जगदंबादेवी, जगद्गुरू संत सेवालाल महाराज व तपस्वी डॉ. रामराव महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी देशभरातून सुमारे ५ ते ६ लाख भाविक येण्याची शक्यता आहे. भाविकांच्या निवासासाठी बापू समाधीजवळ भव्य मंडप उभारण्यात आला असून, थंड पिण्याचे पाणी आणि दोन्ही वेळच्या भोजनाची चोख व्यवस्था करण्यात आली आहे. हे नियोजन यशस्वी करण्यासाठी विविध राज्यांतील स्वयंसेवक परिश्रम घेत आहेत.

यात्रा उत्सव निर्विघ्न पार पडण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. ठाणेदार नैना पोहेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, यात्रेसाठी १ पोलीस उपविभागीय अधिकारी, ८ पोलीस निरीक्षक, ३५ पोलीस अधिकारी, २८९ अंमलदार आणि ५१ महिला पोलीस कर्मचारी असा एकूण ३८४ जणांचा तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

### पोहरादेवी यात्रेसाठी ३८४ पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात!

**मानोरा:** श्रीक्षेत्र पोहरादेवी येथे रामजन्मोत्सवानिमित्त भरणाऱ्या भव्य यात्रेसाठी प्रशासनाने जय्यत तयारी केली असून, सुरक्षेच्या दृष्टीने अभूतपूर्व पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. देशभरातून येणाऱ्या लाखो भाविकांची गर्दी लक्षात घेता, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ३८४ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जगदंबा देवी, जगद्गुरू संत सेवालाल महाराज आणि तपस्वी संत डॉ. रामराव महाराज यांच्या समाधी दर्शनासाठी पोहरादेवी येथे भाविकांचा मोठा ओघ सुरू झाला आहे. ही यात्रा निर्विघ्न पार पडण्यासाठी मानोरा पोलीस ठाण्याच्या ठाणेदार नैना पोहेकर यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष नियोजन करण्यात आले आहे. या बंदोबस्तामध्ये १ उपविभागीय पोलीस अधिकारी, ८ पोलीस निरीक्षक आणि ३५ पोलीस उपनिरीक्षक व सहाय्यक उपनिरीक्षक. २८९ पोलीस कर्मचारी आणि ५१ महिला पोलीस कर्मचारी. हा विशेष बंदोबस्त २३ मार्चपासूनच कार्यान्वित झाला असून, तो २७ मार्चपर्यंत अविरत सुरू राहणार आहे.

# शिव-पार्वती विवाह सोहळा उत्साहात संपन्न

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मंगरूळपीर, दि. २५ :** तालुक्यातील ईचा येथील प्राचीन श्री महादेव संस्थान येथे शिवरात्रोत्सवाचे औचित्य साधून आज, २५ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता शिव-पार्वती विवाह सोहळा मोठ्या थाटात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. या सोहळ्याने ईचा-नागी परिसर शिवमय झाला असून, हजारो भाविकांनी या अलौकिक विवाह सोहळ्याचा आनंद घेतला.

प्राचीन महादेव मंदिर परिसरात सायंकाळपासूनच भाविकांची मोठी वर्दळ सुरू झाली होती. सायंकाळी ७ वाजता शास्त्रोक्त मंत्रोच्चारात आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात शिव-पार्वती विवाहाचे मंगलविधी पार पडले. प्रभू महादेव आणि माता पार्वतीच्या मूर्तींचे मनमोहक रूप पाहून भाविक मंत्रमुग्ध झाले होते. हर हर महादेवच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

या विवाह सोहळ्यासाठी ईचा आणि नागी परिसरातील ग्रामस्थांसह तालुक्यातील हजारो भाविकांनी हजेरी लावली होती. संस्थानच्या वतीने चोख नियोजन करण्यात आले होते. विवाह सोहळ्यानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. रात्री उशिरापर्यंत भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. ईचा येथील हे महादेव मंदिर प्राचीन आणि जागृत देवस्थान मानले जाते. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी संस्थानच्या वतीने अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने हा उत्सव साजरा करण्यात आला. परिसरातील सामाजिक आणि धार्मिक एकतेचे दर्शन या सोहळ्याच्या निमित्ताने पाहायला मिळाले.

# डॉ. मोनिका कालापाड यांची प्रसूतीशास्त्र व स्त्रीरोग तज्ञ पदव्युत्तर शिक्षणासाठी निवड

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. २५ :** तालुक्यातील पार्डी आसरा येथील रहिवासी असलेल्या डॉ. मोनिका रामकृष्ण कालापाड यांनी आपल्या मेहनत, जिद्द आणि शैक्षणिक गुणवत्तेच्या बळावर वैद्यकीय क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण यश संपादन केले आहे. त्यांची प्रसूतीशास्त्र व स्त्रीरोग तज्ञ (एम.एस.) या पदव्युत्तर शिक्षणासाठी निवड झाली असून, त्यांच्या या यशामुळे संपूर्ण परिसरात अभिमानाची भावना व्यक्त होत आहे.

डॉ. मोनिका यांनी एमबीबीएस ही पदवी यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर पुढील उच्च शिक्षणासाठी प्रयत्न सुरू ठेवले होते. वैद्यकीय क्षेत्रात अधिक सखोल ज्ञान मिळवून समाजातील गरजू रुग्णांची सेवा करण्याचा त्यांचा दृढ निश्चय यामागे होता. अखेर त्यांच्या सातत्यपूर्ण परिश्रमांचे चीज होत रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे त्यांची प्रसूतीशास्त्र व स्त्रीरोग तज्ञ या शाखेसाठी निवड निश्चित झाली आहे.

विशेष म्हणजे, त्यांच्या मोठ्या भगिनी सारिका या देखील वैद्यकीय क्षेत्रात जनरल सर्जन म्हणून कार्यरत आहेत. त्यामुळे कालापाड कुटुंबात वैद्यकीय सेवेची परंपरा रुजलेली असून, समाजसेवेची भावना अधिक दृढ होत असल्याचे दिसून येते.

दप्तर नव्हे, शिक्षण हवे

## विद्यार्थ्यांच्या पाठीवरचा भार कमी करा

# शाळांमध्ये लॉकर आणि डिजिटल शिक्षणाची मागणी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



> ❑ आपली मुले हे देशाचे भविष्य आहेत. त्यांच्या आरोग्याशी तडजोड न करता, त्यांना दप्तराच्या ओझ्यातून मुक्त करून आनंदी शिक्षण देणे ही सर्वांची जबाबदारी आहे.
>
> **- अमोल गाभणे**
> जिल्हा सचिव, मनसे

**वाशिम, दि. २५ :** शाळेत जाताना मुलांच्या चेहऱ्यावरील हसू टिकून राहावे आणि त्यांच्या कोवळ्या खांद्यांवरील दप्तराचा भार हलका व्हावा, या संवेदनशील हेतूने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने प्रशासनाकडे धाव घेतली आहे. दप्तर हे शिक्षणाचे साधन असावे, ओझे नव्हे ही भावना व्यक्त करत मनसेच्या वतीने जिल्हा परिषद शिक्षण विभागाला निवेदन देण्यात आले.

वाढत्या दप्तराच्या वजनामुळे शालेय विद्यार्थ्यांच्या पाठीवर आणि मानसिकतेवर विपरीत परिणाम होत असल्याचा मुद्दा निवेदनातून मांडण्यात आला आहे. पुस्तके आणि वह्यांच्या अनावश्यक भारामुळे विद्यार्थ्यांचे बालपण दबले जात असून, याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे मनसेने म्हटले आहे. विद्यार्थ्यांचे शालेय जीवन सुसह्य व्हावे, यासाठी मनसेने काही विधायक उपाययोजना सुचवल्या आहेत. इयत्तेनुसार दप्तराचे वजन निश्चित करण्यात यावे. शाळांमध्ये लॉकरची सोय उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून सर्व साहित्य घरी न्यावे लागणार नाही. आठवड्याच्या वेळापत्रकानुसारच पुस्तके आणण्याचे नियम लागू करावेत. ई-बुक्स आणि डिजिटल शिक्षणावर भर देऊन वह्या-पुस्तकांची संख्या कमी करावी.

नवीन शैक्षणिक सत्र सुरू होण्यापूर्वी या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती मनसेने केली आहे. योग्य कार्यवाही न झाल्यास विद्यार्थ्यांच्या हितासाठी राज्यभर सनदशीर मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी मनसेचे जिल्हा सचिव अमोल गाभणे यांच्या नेतृत्वात मनीष डांगे, रवि वानखेडे यांच्यासह मनसेचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. आता या संवेदनशील विषयावर शिक्षण विभाग काय पावले उचलणार, याकडे सर्व पालकवर्गाचे लक्ष लागले आहे.

# हरिष सारडांना जामीन : जिल्हा न्यायालयाचा तात्पुरता दिलासा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. २५ :** वाशिम शहर पोलीस स्टेशनमध्ये दाखल असलेल्या एका गुन्ह्यातील आरोपी हरिष सारडा यांना वाशिम जिल्हा न्यायालयाने अंतरिम जामीन मंजूर केला आहे. या निर्णयामुळे सारडा यांना तूर्तास मोठा दिलासा मिळाला असून, या प्रकरणाची पुढील सुनावणी आता ३० मार्च रोजी होणार आहे.

न्यायालयाने या अर्जावर प्राथमिक सुनावणी घेत सारडा यांना अंतरिम जामीन दिला असला, तरी या प्रकरणातील कायदेशीर प्रक्रिया अद्याप सुरू आहे. न्यायालयाने ३० मार्च ही तारीख निश्चित केली असून, त्या दिवशी संबंधित तपास अधिकाऱ्यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली आहे. तपास अधिकाऱ्यांचा अहवाल आणि दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर, या अटकेबाबत किंवा जामिनाबाबत न्यायालय अंतिम निर्णय घेणार आहे.या संवेदनशील प्रकरणात आता ३० मार्च रोजी होणाऱ्या सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अंतरिम जामीन म्हणजे एखाद्या आरोपीच्या नियमित जामीन अर्जावर अंतिम निर्णय येईपर्यंत न्यायालयाने दिलेला तात्पुरता दिलासा होय. जेव्हा नियमित जामिनावर सुनावणीसाठी वेळ लागतो किंवा दुसऱ्या बाजूचे (पोलिसांचे) म्हणणे ऐकून घेणे बाकी असते, तेव्हा आरोपीला अटक होऊ नये म्हणून ठराविक कालावधीसाठी हा जामीन दिला जातो.

महत्त्वाचे

## महेंद्र काकड यांचा नवोपक्रम जिल्ह्यात अव्वल



**अकोला :** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे मार्फत आयोजित राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा २०२६ मध्ये जि.प.शाळा पोपटखेडचे उपक्रमशील शिक्षक महेंद्र सुभाषराव काकड यांच्या वाचन बँकेच्या माध्यमातून निपुन होवूया या नवोपक्रमास जिल्हयात मानांकन मिळाले असुन आदिवासी बहुल भागातील भाषीक विद्यार्थी मुख्य प्रवाहात यावे हा या भाषिक नवोपक्रमाचा उद्देश आहे.जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या श्रीमती रत्नमाला खडके यांच्या अध्यक्षतेखाली जेष्ठ अधिव्याख्याता अंकोश ससाने व राजेंद्र अजगर यांच्या मूल्यांकनात राज्यस्तरापर्यंतच्या विविध फे-यात नवोपक्रम पोहचला आहे.महेंद्र काकड उपक्रमशील शिक्षक असुन विविध स्तंभलेखक तथा कवी आहेत. शालेयस्तरावर विवध प्रशासकीय जबाबदा-या पार पाडतांना जि.प.शाळा पोपटखेड येथे शालेय परसबाग त्यांनी फुलवली आहे. सदर नवोपक्रमा करीता गटशिक्षणाधिकारी मधुकरराव सुर्यवंशी तसेच विस्तार अधिकारी गजाननराव सावरकर यांचे मार्गदर्शन लाभले. महेंद्र काकड यांच्या यशाबद्दल जि. प. शाळा पोपटखेडच्या मुख्याध्यापिका दिपा अवताडे तथा शिक्षक नितीन तराळे, प्रशांत धाबे, कु.रूपाली सोनटक्के, कु.अर्चना खाडे,कु.कविता गिरी,कु.विद्यावती राजपुत यांनी अभिनंदन केले आहे.

## हुंड्याच्या कारणावरून छळ, चार जणाविरुद्ध गुन्हा

**मूर्तिजापूर :** हुंड्याच्या कारणावरून विवाहित महिलेला शारीरिक व मानसिक त्रास दिल्या प्रकरणी मुर्तीजापुर शहर पोलीस ठाण्यात चार जणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी गीता संजय चांडसकर (३५) यांनी तक्रार दाखल केली. त्यांचे लग्न पारंपारिक पद्धतीने झाले असून त्यांना एक लहान मुलगी आहे. मात्र लग्नानंतर सासरच्या मंडळीकडून ''लग्नात खर्च केला नाही '' या कारणावरून वारंवार वाद घालत पैशाची मागणी करण्यात येत होती. फिर्यादीच्या तक्रारीनुसार, आरोपीने वेळोवेळी शारीरिक तसाच मानसिक त्रास दिला. सदर २८ फेब्रुवारी २०१७ पासून ते २४ मार्च २०२६ पर्यंत सुरू होता. असेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी मुर्तीजापुर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीमध्ये पतीसह सासू व इतर नातेवाईकांचा समावेश आहे.

## जीएनए महाविद्यालयात डॉ दीपक चौरपगार यांचा सत्कार

**बार्शीटाकळी :** प्रतिभा शिक्षण प्रसारक मंडळ जनुना द्वारा संचालित गुलाम नबी आझाद कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बार्शीटाकळी येथे महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ बिस्मिल्ला खान यांच्या मार्गदर्शनात या पीएचडी रिसर्च स्टडी सेंटर द्वारा आयोजित सत्कार समारंभामध्ये प्रा डॉ दीपक चौरपगार यांच्या सह इतरही मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. नव्यानेच जाहीर झालेल्या पीएचडी आचार्य पदवीचे मार्गदर्शक यादी नुसार डॉ. संतोष हुशे, डॉ. मोहन बल्लाल, डॉ प्रवीणकुमार राठोड डॉ दीपक चौरपगार डॉ आर एल सरकटे डॉ दीपिका जैन, डॉ प्रियंका मसतकर, डॉ नीलिमा कंकाळे, डॉ संजय देशमुख, डॉ. मनोज जाधव, डॉ भीमराव जैवळ यांचेही आचार्य मार्गदर्शक म्हणून स्वागत करण्यात आले.

# १३ कोटींची सुजल योजना कागदावरच; पातूरकर तहानलेले

### कंत्राटदाराची कार्यपद्धती आणि नियोजनाअभावी योजनेला लागली खीळ

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पातूर, दि. २५ : शहरातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी शासनाने १३ वर्षांपूर्वी मंजूर केलेली १३ कोटींची निर्मल सुजल पाणीपुरवठा योजना आजही पांढरा हत्ती ठरली आहे. कोट्यवधींचा निधी खर्च होऊनही पातूरकरांना १०-१० दिवस पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. विशेष म्हणजे, कंत्राटदाराचा मनमानी कारभार आणि लोकप्रतिनिधींच्या कथित कमिशनखोरीमुळे योजनेचे तीनतेरा वाजल्याचा आरोप नागरिक करत आहेत.**



२०१३ मध्ये सुरू झालेल्या या योजनेचे काम १८ महिन्यांत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, १३ वर्षे उलटूनही स्थिती जैसे थे आहे. पाईपलाईन टाकण्यासाठी शहरात ४ कोटींचे सिमेंट रस्ते उखडून टाकण्यात आले, ज्यामुळे नागरिकांना धुळीचा आणि खडतर प्रवासाचा त्रास सहन करावा लागत आहे. ही रस्ते दुरुस्ती करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असतानाही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.

योजनेला विलंब झाल्यामुळे कंत्राटदाराला दररोज १० हजार रुपये दंड ठोठावण्यात आला होता. ही रक्कम ३ कोटींच्या घरात गेल्यावर कंत्राटदाराने न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने ''योजना पूर्ण होईपर्यंत देयके देऊ नये,'' असे स्पष्ट निर्देश दिले होते. तरीही, तत्कालीन प्रभारी मुख्याधिकाऱ्यांनी संगनमताने कंत्राटदाराचे लाखो रुपयांचे बिल काढून न्यायालयाच्या आदेशाचा अवमान केल्याचा गंभीर आरोप होत आहे. सद्यस्थितीत जुन्या, गळक्या पाईपलाईनमधून दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

❑ तांत्रिकदृष्ट्या पूर्ण झाली आहे की अपूर्ण, तसेच नवीन पाईपलाईनमधून पाणीपुरवठा करण्यात नेमक्या कोणत्या तांत्रिक अडचणी येत आहेत, याविषयीची सविस्तर माहिती नगरपरिषदेच्या संबंधित अभियंत्यांकडून मागवण्यात आली आहे. सर्व कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतरच या प्रकरणावर पुढील अधिकृत भाष्य करणे योग्य ठरेल.

**- ए. बी. गडलिंग,** मुख्याधिकारी, पातूर

❑ ही योजना नगरपालिकेकडे हस्तांतरित झाली आहे. नवीन टाक्या पूर्ण भरल्यास गळती लागते, ही समस्या आहे. सध्या शहरात काही भागात जुन्या तर काही भागात नवीन पाईपलाईनने पाणी दिले जाते. पंप नादुरुस्त असल्याने पाणीपुरवठ्यास विलंब झाला होता, मात्र आता दुरुस्ती झाली असून लवकरच नवीन पाईपलाईनवरून सर्व भागांत पुरवठा सुरू करण्याचे नियोजन आहे.

**- अमोल दातीर,** अभियंता, नगरपरिषद पातूर

## विश्वमित्र प्रकल्पामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**विवरा, दि. २५ :** पातुर तालुक्यातील मळसूर येथे विश्वमित्र नदीवर उभारण्यात आलेल्या धरणामुळे पंचक्रोशीतील शेतकऱ्यांच्या जीवनात मोठे आर्थिक परिवर्तन घडत आहे. एकेकाळी शेतात काम करण्यासाठी घरून पिण्याचे पाणी न्यावे लागणाऱ्या शेतकऱ्यांसाठी आज विश्वमित्र प्रकल्प वरदान ठरत आहे. १९९९ पूर्वी येथील शेती पूर्णपणे नैसर्गिक पावसावर अवलंबून होती. मात्र, प्रकल्प सुरू झाल्यानंतर परिस्थितीत आमूलाग्र बदल झाला असून आता शेतकरी खरीप, रब्बी आणि उन्हाळी अशी तिन्ही हंगामातील पिके घेत आहेत. कालव्यामुळे शेतीला शाश्वत सिंचन उपलब्ध झाले असून भूजल पातळीतही वाढ झाली आहे. यामुळे पिकांचे उत्पादन वाढले असून शेतकऱ्यांना वर्षभर विविध पिके घेणे शक्य झाले आहे.

या भागातील जमीन मुरमाड स्वरूपाची असल्याने कालव्याचे पाणी मिळाल्याने जमिनीत ओलावा टिकून राहतो आणि पाण्याची पातळी वाढते. त्यामुळे शेती अधिक उत्पादनक्षम झाली आहे. यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आर्थिक चालना मिळाली आहे.

❑ १९९९ पूर्वी आमची परिस्थिती अत्यंत बिकट होती. आम्ही फक्त एका पिकावर अवलंबून होतो. मात्र, विश्वमित्र प्रकल्प सुरू झाल्यानंतर आमच्या जीवनात मोठा बदल झाला आहे. पाण्याच्या उपलब्धतेमुळे आम्ही आधुनिक शेतीकडे वळलो असून शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

**- संदीप पायघन,** शेतकरी, मळसूर

❑ विश्वमित्र प्रकल्पाचा साठा दरवर्षी चांगल्या प्रमाणात उपलब्ध असतो. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार कालव्याद्वारे पाणी पुरवठा केला जातो. या पाण्यामुळे शेतकऱ्यांना चांगले उत्पादन मिळत असून त्यांचे समाधान आम्हाला प्रेरणादायी आहे.

**- प्रविण रौदळे,** शासकीय कर्मचारी

पूर्वी या भागातील मजुरांना रोजगारासाठी बाहेरगावी जावे लागत होते. मात्र, सिंचनाची सुविधा उपलब्ध झाल्यानंतर स्थानिक पातळीवरच रोजगारनिर्मिती झाली असून मजुरांनाही गावातच काम मिळू लागले आहे.

## वणी वारुळा येथे नारी शक्ती एकता संघर्ष फाऊंडेशनतर्फे महिलांचा सत्कार



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मुंडगाव, दि. २५ :** अकोट तालुक्यातील संत नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वणी वारुळा येथे नारी शक्ती एकता संघर्ष फाऊंडेशनतर्फे विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिला, पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, अधिकारी, पोलिस अधिकारी व पत्रकारांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.

पत्रकार तथा रेडिओ श्रोता, नारी शक्ती एकता संघर्ष फाऊंडेशनचे संस्थापक आणि सौजन्य बहुउद्देशीय संस्था, वारुळा यांचे अध्यक्ष राजकुमार वानखडे यांच्या वडिलांच्या, स्वर्गीय वामनराव वानखडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.सदर कार्यक्रम मुंबई विविध भारतीचे सहाय्यक संचालक डॉ. संतोष जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत, तसेच श्रीकांत आर. जी. फड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी उद्घोषक विकास पल्हाडे, उद्घोषिका शिलाताई घरडे, उद्घोषक संदीप घरडे, संजीव डाबेराव, महादेव पवार, अरुण वानखडे, आर्मी जवान पंकज वानखडे, ग्राम महसूल अधिकारी आशेर परमार्थ, माजी पोलीस उपनिरीक्षक मनोहर वानखडे, बलवंत कुमार वर्मा आदी मान्यवर उपस्थित होते.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला व कार्यकर्त्यांचा प्रमाणपत्र, शाल, शिल्ड व पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. माजी पोलीस उपनिरीक्षक मनोहर वानखडे, समाजसेवक गजानन हरणे, राजेश तेलगोटे, पत्रकार स्वप्निल सरकटे, योगेश लबडे, गितेश कुंजाम, मिलिंद सरकटे आदींना 'नारी शक्ती एकता संघर्ष पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमादरम्यान मंगला दिंडोकार व रजनी माथने यांनी नारी शक्ती एकता संघर्ष फाऊंडेशनमध्ये प्रवेश केला. त्यांच्या प्रवेशाचेही मान्यवरांच्या हस्ते स्वागत व सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकास पल्हाडे यांनी केले, प्रास्ताविक अजय प्रभे यांनी मांडले, तर आभार प्रदर्शन राजकुमार वानखडे यांनी केले.

## मूर्तिजापूरातील शिवभोजन थाळी चुलीवर; आखाती युद्धाचा फटका

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मूर्तिजापूर, दि. २५ :** महाराष्ट्र शासनाने गरीब व गरजू नागरिकांसाठी सुरू केलेली 'शिवभोजन थाळी' योजना ही एक महत्त्वपूर्ण योजना असून, या योजनेअंतर्गत अवघ्या १० रुपयांत पोषक व ताजे जेवण दिले जाते. या योजनेची सुरुवात २६ जानेवारी २०२० रोजी करण्यात आली होती. मात्र, सध्या या योजनेला अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

आधीच अनुदान थकल्यामुळे अडचणीत आलेल्या शिवभोजन केंद्रांना आता युद्धाच्या पार्श्वभूमीवर गॅस सिलेंडरच्या टंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे मूर्तिजापूरातील काही शिवभोजन केंद्र चालकांनी डिझेल व पेट्रोलवर चालणाऱ्या भट्ट्यांचा, तर काहींनी थेट चुलीचा आधार घेत स्वयंपाक सुरू ठेवला आहे.

आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाचा परिणाम सर्वत्र जाणवत असून, व्यावसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. याचा थेट फटका शिवभोजन योजनेलाही बसत आहे. व्यावसायिक सिलेंडर उपलब्ध होत नसल्याने काही केंद्र चालकांवर केंद्र बंद करण्याची वेळ आली आहे. मूर्तिजापूर तालुक्यात शिवभोजन योजनेअंतर्गत एकूण चार केंद्रे कार्यरत असून, या केंद्रांमधून दररोज सुमारे ५२५ थाळ्यांचे वितरण केले जाते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून गॅस टंचाई निर्माण झाल्यामुळे केंद्र चालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शासनाने व्यावसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठा अत्यावश्यक सेवांसाठी राखीव ठेवल्यामुळे शिवभोजन केंद्रांना नियमित गॅस मिळणे कठीण झाले आहे. या पार्श्वभूमीवर काही केंद्र चालक पेट्रोल व डिझेलवर चालणाऱ्या भट्ट्यांचा वापर करत आहेत, तर काहींनी लाकूड व गवऱ्यांच्या चुलींवर अन्न शिजविण्यास सुरुवात केली आहे. ही समस्या लवकर सुटली नाही, तर गरिबांना याचा फटका बसण्याची शक्यता आहे. याबाबत शिवभोजन केंद्र चालकांकडून शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असून, तातडीने गॅस सिलेंडरचा पुरवठा करण्याची मागणी करण्यात येत आहे.

❑ शिवभोजन केंद्र चालकांचे अनुदान जानेवारी २०२५ पासून थकीत आहे. त्यामुळे केंद्र चालक आधीच आर्थिक अडचणीत आहेत. त्यातच गॅस सिलेंडरच्या टंचाईमुळे चुलीवर तसेच कोळश्याच्या भट्ट्यांवर स्वयंपाक करण्याची वेळ आली आहे. शासनाने तात्काळ अनुदान व व्यावसायिक गॅस सिलेंडर उपलब्ध करून द्यावेत.

**- किशोर सोनोने,** शिवभोजन केंद्र चालक, मूर्तिजापूर

## शेतकऱ्यांच्या मुलांच्या लग्नाचा प्रश्न थेट विधानसभेत

### आमदार नितीन देशमुख यांचा संताप

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**सुकळी, दि. २५ :** बाळापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार नितीन देशमुख यांनी सुरू असलेल्या अधिवेशनादरम्यान विविध विषय मांडताना सरकारवर तीव्र संताप व्यक्त करत ताशेरे ओढले. विरोधी पक्षातील आमदार असल्यामुळे त्यांच्या मतदारसंघाला निधी देताना सरकार भेदभाव करत असल्याचा खळबळजनक आरोप त्यांनी केला. ''मतदारसंघातील नागरिक कर भरतात, मग त्यांना विकासासाठी निधीपासून का वंचित ठेवले जाते?'' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. संबंधित मंत्र्यांनी आमदाराचा विचार न करता त्या मतदारसंघातील नागरिकांचा विचार करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

तसेच 'लाडक्या बहिणींना' १५०० रुपये दिले जात असताना त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांचे काय, असा प्रश्न उपस्थित करत शेतकऱ्यांच्या मुलांचे लग्न होत नसल्याचा मुद्दाही त्यांनी विधानसभेत मांडला.याचबरोबर, स्वतःला हृदयविकाराचा झटका आल्याची अफवा पसरवण्यात आल्याचे सांगत त्या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली.माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात बाळापूर मतदारसंघासाठी कोटींचा निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र सरकार कोसळल्यानंतर त्या कामांना स्थगिती देण्यात आल्याचा आरोप करत, ही स्थगिती त्वरित उठवून मंजूर कामे मार्गी लावावीत, अशी मागणीही त्यांनी विधानसभेत केली.

## हिदायतुल्ला पटेल यांच्या फरार मारेकऱ्यांना तात्काळ अटक करा

### ठाणेदारांना निवेदन; ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. २५ :** तालुक्यातील माना येथे ६ जानेवारी २०२५ रोजी हिदायतुल्ला पटेल यांच्यावर झालेल्या क्रूर हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणातील मुख्य आरोपीला पोलिसांनी अटक केली असली तरी, मृताने मृत्यूपूर्व जबानीत नाव घेतलेले इतर ५ आरोपी अद्यापही फरार आहेत. या फरार आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी, या मागणीसाठी माना येथील सर्वपक्षीय नागरिक आणि सर्व समाजाच्या वतीने ठाणेदारांना निवेदन देण्यात आले.

६ जानेवारी रोजी झालेल्या मच्छी बाजारातील वादातून हिदायतुल्ला पटेल यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला होता, ज्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. पोलिसांनी या प्रकरणातील मुख्य आरोपी उबेद पटेल उर्फ कल्लू याला अटक केली आहे. मात्र, हिदायतुल्ला पटेल यांनी मृत्यूपूर्व दिलेल्या जबानीत इतर ५ जणांची नावे स्पष्टपणे घेतली होती.

मृत्यूपूर्व जबानीनुसार, संजय रामदास बोडके, मोहम्मद बदारो जम्मा मोहम्मद आदिल, फारुख आसिफ खान, फाजील आसिफ खान आणि राजू विठ्ठल बोचे हे पाच आरोपी अद्यापही पोलिसांच्या हाताला लागलेले नाहीत. हे आरोपी फरार असल्याने पीडित कुटुंबाला न्याय मिळण्यास विलंब होत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

पोलिसांनी जर उर्वरित फरार आरोपींना तात्काळ अटक केली नाही, तर माना येथील सर्व धर्मीय आणि सर्वपक्षीय नागरिकांच्या वतीने तीव्र उग्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

निवेदन देतेवेळी राजा देशमुख, अजीमुद्दीन जैनुद्दीन, अब्दुल वाजिद अब्दुल मजीद, सामाजिक कार्यकर्ते मोहम्मद तनवीर मोहम्मद जाकीर, मोहम्मद सोहेल ताकिउद्दीन, अब्दुल रज्जाक अब्दुल हमीद, बाळासाहेब मोखाटकार, संभा पाटील, अरुण डी. राव, तपजुल हुसेन, सय्यद हबीब, नियमतुल्ला करामतुल्ला, मोहम्मद नावेद, अब्दुल अजीज, वाजिद खान मजीद खा, तहसीन खान मज्जिद खान, शमस बादृजहूर, मुक्तार , अथर खान, मुन्ना यांच्यासह माना येथील असंख्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तहान भागेना | जलजीवन मिशनचे काम रखडले

# ४० अंशांच्या वर चटक्यात पाण्यासाठी वणवण!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**बाळापूर, दि. २५ :** अकोला आणि बुलढाणा जिल्ह्यांच्या सीमेवर वसलेले १० ते ११ हजार लोकसंख्येचे लोहारा गाव सध्या भीषण पाणीटंचाईच्या गर्तेत सापडले आहे. मार्च महिना सुरू होताच तापमानाचा पारा ४० अंश सेल्सिअसवर पोहोचला असून, गावातील नळांना पाणी नसल्याने महिलांना भर उन्हात शिवारातील विहिरींवरून पाणी शेंदून आणावे लागत आहे. प्रशासकीय उदासीनतेमुळे ग्रामस्थांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत असल्याचे दाहक वास्तव समोर आले आहे.



गावात जलजीवन मिशन अंतर्गत नळ योजनेचे काम गेल्या दोन वर्षांपासून संथ गतीने सुरू आहे. ही योजना अद्याप पूर्ण न झाल्याने पाईपलाईनमध्ये पाणी कधी येणार, याची प्रतीक्षा लोहारा येथील नागरिक करत आहेत. विशेष म्हणजे, गावाजवळच कवठा येथे धरण असूनही लोहारावासीयांच्या नशिबी कोरडच आहे. दूषित पाणी आणि उन्हाचा तडाखा यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. जिल्हा परिषद प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तात्काळ पाणीपुरवठा सुरळीत करावा, अन्यथा येणाऱ्या काळात तीव्र जनक्षोभ उसळण्याची शक्यता आहे. शासनाने याकडे युद्धपातळीवर लक्ष देऊन कायमस्वरूपी पाणी प्रश्न सोडवावा, अशी मागणी लोहारावासीयांकडून केली जात आहे.

❑ गेल्या अनेक दिवसांपासून नळाला पाणी नाही. घरची कामे सोडून पिण्याच्या पाण्यासाठी आम्हाला शिवारात वणवण फिरावे लागत आहे. भर उन्हात महिलांचे प्रचंड हाल होत असून, शासनाने आमची पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तातडीने करावी.

**- लता मोरे,** महिला ग्रामस्थ, लोहारा

❑ कवठा येथे अनेक वर्षांपासून धरण बांधले आहे, पण अजूनही आमच्या गावात पाणी पोहोचले नाही. लहान मुलांपासून थोरांपर्यंत सर्वांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागतोय. जलजीवनचे काम पूर्ण करून आम्हाला स्वच्छ आणि पुरेसे पाणी त्वरित द्यावे.

**- सुनीता सिरसाठ,** ग्रामस्थ महिला

अजिंक्य भारत

# आपलं बुलडाणा

बुलडाणा, गुरूवार, दि. २६ मार्च २०२६ www.ajinkyabharat.com



## महत्त्वाचे

### दुचाकी चोरी; गुन्हा दाखल

**शेगाव :** शहर पोलीस ठाण्यात दुचाकी चोरीप्रकरणी अज्ञात चोरटयाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संजय भगवान चंदनशीव (५०) व्यवसाय खाजगी चालक, रा. शाळा क्र. ०५, रायली फैल, शेगाव यांनी फिर्याद दिली आहे. २१ मार्च २०२६ रोजी रात्री ९.३० ते २२ मार्च रोजी सकाळी ८ वाजेदरम्यान त्यांच्या घरासमोरून हिरो कंपनीची पेंशन प्लस (क्रमांक एमएच २८ बीवाय २६५१) ही मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेली. सदर मोटारसायकलची अंदाजे किंमत ६० हजार रुपये आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अंतर्गत कामयी अप क्रमांक १७१/२०२६ नोंदविण्यात आला आहे.

### अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलाचा लागला शोध

**शेगाव :** हरविलेल्या अल्पवयीन मुलाचा शोध घेऊन त्याला सुरक्षितपणे कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात शेगाव पोलिसांना यश आले आहे. २ जानेवारी २०२६ रोजी रोकडिया नगरातील गणेश रामदास गोडचवर वय १५ वर्ष हा जुन्या पँटला शिलाई मारून असे म्हणून घरून निघून गेला होता याप्रकरणी शेगाव पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत अथक परिश्रम घेतले. मोबाईल लोकेशन नुसार त्या मुलाचा वृंदावन उत्तर प्रदेश येथे असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले तपासादरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी शोधमोहीम अधिक वेगाने राबवत मुलाचा ठावठिकाणा निश्चित केला. त्याला २३ मार्च रोजी वृंदावन उत्तर प्रदेश येथून सुरक्षितपणे ताब्यात घेण्यात यश आले. सदर कारवाई ठाणेदार निमिष मेहत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अंमलदार पोलिस हेडकॉन्स्टेबल निलेश गाडगे, पोलिस कॉन्स्टेबल राणा ओइंबे यांनी पार पडली. मुलाला सुखरूप आईवडिलांच्या स्वाधीन करण्यात आले गेल्या काही वर्षात १६ अपहरित मुलामुलींना शेगाव पोलिसांनी आई वडिलांच्या स्वाधीन केले.

### चारित्र्यावर संशय घेऊन विवाहितेचा छळ

**मलकापूर :** चारित्र्यावर संशय घेवून माहेरवरून ३ लाख रूपये आणण्यासाठी तगादा लावीत मानसिक व शारिरीक छळ करीत असल्याच्या तक्रारीवरून मलकापूर शहर पोलीस स्टेशनला ६ जणांविरूध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सिफा जमजम अरबाज खान (वय २३ वर्ष) रा. ह.मू.गुलाब बाबा दर्गा जवळ, मदार टेकडी, पारपेठ मलकापूर यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, माझे पती अरबाज खान असलम खान हे माझ्या चारित्र्यावर संशय घेवून मारहाण करीत असत. तसेच मेडीकल टाकण्याकरीता मला माहेरवरुन ३ लाख रुपये आणण्याचा नेहमीच तगादा लावत असत. जर पैसे नाही आणले तर तुला वागविणार नाही अशी नेहमीच धमकी देत. तर आरोपी असलम बात अव्यासखान, अफरोज बवी असलम खान, उजमा नईम खान, नईम खान सलीम खान रा.मदार टेकडी पारपेठ, नगमा राजीक शेख हे कालेवाडी पुणे हे माझे पतीला मारण्यास भडकावुन देत होते तसेच शिवीगाळ करीत होते. मला १५ मे २०२३ ते फेब्रुवारी २०२५ दरम्यान वेळोवेळी आरोपींनी शारीरिक व मानसिक त्रास दिला. अशा फिर्यादीवरून आरोपींविरूध्द मलकापूर शहर पो.स्टे. ला अप नं. १९९/२०२६ कलम ८५, ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) बीएनएस अन्वये गुन्हा दाखल केला.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव**

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | २०५० - २१५० |
| गहू | १७०० - २२७५ |
| तुर | ४६२५ - ८०२५ |
| हरभरा | ४२०० - ५२०० |
| सोयाबीन | ४५०० - ५४६० |
| उडीद | ३५०० - ६००० |
| मुग | ४८०० - ४८०० |
| मका | ११०० - १६०० |

# मेरा खुर्द येथे अफूची अवैध लागवड उघड; ९ लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**अंढेरा दि. २५ :** पोलीस स्टेशन अंढेरा हद्दीतील मेरा खुर्द येथे अवैधरित्या करण्यात आलेली अफूची लागवड उघडकीस आली असून, पोलिसांनी कारवाई करत सुमारे ९ लाख १८ हजार ३२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कायमी अप क्रमांक ९२/२०२६ अंतर्गत एन.डी.पी.एस. कायद्याच्या कलम ८ (क) व १८ (क) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

फिर्यादी पोलीस उपनिरीक्षक अविनाश जायभाये (स्थानिक गुन्हे शाखा, बुलढाणा) यांनी दिलेल्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली. दि. २४ मार्च २०२६ रोजी रात्री ११.३९ ते २५ मार्च रोजी पहाटे ४.४५



मेरा खुर्द येथील शेतकरी कृष्णा रामहरी वाघमारे यांनी अफु बियाणे कुठुन आणले तसेच लागवड केलेला अफु ते कोणाला विकणार हे पोलिस तपासात लवकरच निष्पन्न होणार असुन अजुन किती जणे यामध्ये सहभागी आहेत? तसेच यामागे कोणते राकेट तर नाही ना?हे लवकरच तपासात निष्पन्न हाईलच.तसेच यामध्ये सहभागी असलेले सर्वाना कुठेही गय केली जाणार नसुन कठोर कारवाई करण्यात येईल.

**रुपेश शक्करगे ठाणेदार, पोलीस स्टेशन अंढेरा**

या वेळेत पोलिस पथक देऊळराजा विभागात गस्त घालत असताना गोपनीय माहिती मिळाली की, मेरा खुर्द येथील शेत शिवार गट क्रमांक २०३ मध्ये आरोपी कृष्णा रामहरी वाघमारे (वय २६) हा अफूची अवैध लागवड करत आहे. वरिष्ठांच्या परवानगीनंतर पोलिसांनी घटनास्थळी सापळा रचून छापा टाकला. छाप्यात शेतात वांग्याच्या झाडांमध्ये अफूची झाडे लावलेली आढळून आली. हिरवट रंगाची पाने, बोंडे व मुळासह पूर्ण वाढ झालेली अूची झाडे पोलिसांनी पंचासमक्ष उपटून जप्त केली. एकूण ३ नमुन्यांचे वजन ११.४७९ किलो असून त्याची बाजारभावानुसार किंमत ९,१८,३२० रुपये इतकी असल्याचे सांगण्यात आले. सदर कारवाईदरम्यान एसडीपीओ मनीषा कदम तसेच पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी रुपेश शंकर शक्करगे यांनी घटनास्थळी भेट दिली. हा गुन्हा हेड कॉन्स्टेबल ज्योत्स्ना सोमवंशी यांनी नोंदवला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक रुपेश शंकर शक्करगे करत आहेत. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, अवैध अमली पदार्थांच्या विरोधात पोलिसांची कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

# दुसरबीड येथे ६ एप्रिलपासून आमरण उपोषण; पाणी, गटार व रस्त्यांच्या प्रश्नावर गाव एकवटले

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**सिंदखेडराजा दि. २५ :** तालुक्यातील दुसरबीड येथील नागरिकांनी पिण्याचे पाणी, गटार व मूलभूत सोई तथा जुने अतिक्रमण धारक यांना शासन नियमाप्रमाणे गाव नमुना ८ देऊन नियमकुल करणेबाबद,रस्त्यांच्या गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या गंभीर प्रश्नांवर अखेर आक्रमक भूमिका घेत दि. ६ एप्रिल २०२६ पासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

या आंदोलनाला आता राजकीय पाठिंबा मिळू लागल्याने प्रशासनाचे लक्ष वेधले जात आहे. निवेदनानुसार, गावातील पाणीपुरवठा योजना गेल्या तब्बल १० वर्षांपासून विस्कळीत असून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी गैरसोय सहन करावी लागत आहे. गटार व्यवस्था अपुरी असून रस्त्यांचीही दुरवस्था झाल्यामुळे ग्रामस्थांचे दैनंदिन जीवन त्रस्थ झाले आहे. या संदर्भात ग्रामस्थांनी अनेक वेळा तहसीलदार, उपविभागीय अधिकारी व संबंधित विभागांकडे निवेदने दिली; मात्र अद्यापपर्यंत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही, असा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, या आंदोलनाला भाजप तालुका उपाध्यक्ष सुरेश बुलकडे, भाजप जिल्हा महामंत्री (अनुसूचित जाती) नानासाहेब तौर, तसेच भारतीय जनता पार्टी जिल्हा अल्पसंख्याक महामंत्री यांनी जाहीर पाठिंबा दिला असून ते स्वतःही उपोषणात सहभागी होणार असल्याचे स्पष्ट केले आहे. हे आमरणउपोषण शेख फय्यूम शेख मजीद व गजानन पुंजाजी सोनुने हे करत असून, ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांच्या कामकाजाची चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी,आणि दोषींवर कडक कारवाई करावी गावातील मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने या गंभीर प्रश्नाची तात्काळ दखल घेतली नाही तर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल आणि या आमरण उपोषणाची जबाबदारी संबंधित प्रशासन, ठेकेदार, आणि समनधीतांची असेल असे निवेदनात नमूद केले आहे.

## डॉ. श्रुती सावळे यांना दंतशास्त्र पदवी प्रदान

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि. २५ :** स्वर्गीय दादासाहेब काळमेघ विद्यालय नागपूर येथे आयोजित पदवी वितरण समारंभात बुलढाणा येथील डॉ. श्रुती सोमनाथ सावळे यांना दंतशास्त्र विषयात पदवी प्रदान करण्यात आली आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांकडून डॉ. श्रुती सावळे यांना मानचिन्ह, पदक, सन्मानपत्र तसेच पारंपरिक शाल देऊन गौरविण्यात आले.

डॉ. श्रुती सावळे या दिवंगत जेष्ठ पत्रकार सोमनाथ सावळे आणि सौ.सुरेखा सावळे यांच्या कन्या आहेत. डॉ.श्रुती यांच्या वडिलांनी त्यांना डॉक्टर होण्याचे स्वप्न बघितले होते. त्यांचे वडील आज हयात नाहीत पण डॉ.श्रुती यांनी आपल्या वडीलांचे स्वप्न सत्यात उतरवले आहे. वडिलांनी बघितलेलं स्वप्न प्रत्यक्षात साकार होणे हे अत्यंत अभिमानास्पद आहे. डॉ.श्रुती यांना दंतशास्रात पदवी प्रदान झाल्याबद्दल समाजातील विविध स्तरांतून कौतुक होत आहे. डॉ.श्रुती सावळे आपल्या यशाचे श्रेय आई वडील, मोठ्या भगिनी व गुरुजनांना देतात. दंतशास्रात पदवी प्राप्त झाल्यानंतर डॉ.श्रुती यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, माझ्या वडीलांनी जे स्वप्न बघितले होते ते आज साकार झाले आहे.

## श्री संत गोमाजी महाराज यात्रा उत्साहात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेगाव दि.२५ :** संत नगरी शेगाव पासून जवळच असलेले श्री संत गोमाजी महाराज संस्थान च्या वतीने दोन दिवस श्री यात्रा उत्सव आयोजित करण्यात आले होते या उत्सवात आज सकाळी किर्तन, गोपालकाला दहीहंडी होऊन या उत्सवाचे सांगता झाली आहे.

श्री गोमाजी महाराज दोन दिवस यात्रा उत्सव आयोजित करण्यात आले होते यात रविवार रोजी सकाळी सकाळी ८ ते १० गाथेवरील भजन, सायंकाळी हरिपाठ सायंकाळी नवचंडी यागाची पूर्णाहुती झाली रात्री ८ ते १० हभप रामेश्वर महाराज कंकाळे गव्हाण यांचे कीर्तन झाले तर सोमवार रोजी हभप श्रीकांत महाराज राऊत आता यांचे सकाळी ७ ते ८ काल्याचे किर्तन झाले कीर्तन झाल्यानंतर गोपालकाला दहीहंडी भजनी भारुड कार्यक्रम होऊन श्री ची पालखी रथ,मेना यातून दिडीसह गावांत नगर प्रदक्षिणा मिरवणूक निघाली या उत्सवात आलेल्या हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. गेल्या दोन दिवसांपासून श्री क्षेत्र नागझरी येथे श्री गोमाजी महाराज यांचे दर्शन घेऊन धन्य झाले आहे यात्रा उत्सवानिमित्त हार, फुले, प्रसाद तसेच लहान मुलांचे विविध खेळण्याचे दुकाने तसेच रेवडा, फुटाणे यांचे दुकान लागले असल्याने या व्यवसायिकांचाही चांगला व्यवसाय झाला आहे. तसेच श्री संत गोमाजी महाराज संस्थानचे व्यवस्थापक धनंजय दादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली यात्रा उत्सवानिमित्त चौख नियोजन करण्यात आले होते.



## रिक्त ग्रा.पं. सदस्य पदांसाठी पोटनिवडणूक जाहीर

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२५ :** राज्य निवडणूक आयोगाकडून घोषीत केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार शेगाव तालुक्यांतील पाच ग्रामपंचायतींच्या रिक्त थेट सरपंच व सदस्यांच्या पोट निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये येऊलखेड, चिंचखेड, सगोडा, टाकळी व धारवला मुरा असे पाच रिक्त ग्रामपंचायत सदस्य पदाच्या जागासाठी निवडणूक होणार आहे. या ग्रामपंचायतींमध्ये आचारसंहिता लागू असून निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन शेगाव तहसिलदार तथा ग्रामपंचायत निवडणूक अधिकारी यांनी केले आहे.

**निवडणूक कार्यक्रम याप्रमाणे :** निवडणूकीची अधिसूचना सोमवार दि. ३० मार्च २०२६ रोजी संबधित तहसिल कार्यालय व ग्रामपंचायत कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल. या कार्यक्रमानुसार निवडणुकीकरीता नामनिर्देशनपत्र दि. ७ ते १३ एप्रिल २०२६ पर्यंत सकाळी ११ वाजेपासून ते दुपारी ३ वाजेदरम्यान स्वीकारले जाणार आहे. नामनिर्देशन पत्र छाननी बुधवार दि. १५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजूपासून छाननी संपेपर्यंत. दि. १७ एप्रिल २०२६ रोजी नामनिर्देशन अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ठेवण्यात आली आहे. या निवडणूकीचे मतदान मंगळवार दि. २८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायं ५.३० वाजेपर्यंत होणार असून मतमोजणी बुधवार दि. २९ एप्रिल २०२६ रोजी करण्यात येणार आहे.

## सावत्र आईकडून मारहाण होत असलेल्या बालिकेची सुटका

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२५ :** मलकापूर येथील वरखेड गावात सावत्र आईकडून मारहाण होत असलेल्या १४ वर्षीय बालिकेची चाईल्ड हेल्प लाईन १०९८, जिल्हा बाल संरक्षण कक्ष व मलकापूर ग्रामीण पोलिसांनी संयुक्त कारवाई करत सुटका केली.

दि. २२ मार्च २०२६ रोजी या घटनेची माहिती चाईल्ड हेल्प लाईनला प्राप्त होताच प्रकल्प समन्वयक शेख सोहेप यांनी तातडीने दखल घेतली. त्यांनी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अमोल डिघुळे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी दिवेश मराठे तसेच बाल कल्याण समिती यांना माहिती देऊन त्यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कार्यवाही सुरू केली. यानंतर चाईल्ड हेल्प लाईनच्या पथकाने वरखेड येथे भेट देऊन चौकशी केली असता संबंधित बालिकेला सावत्र आईकडून मारहाण होत असल्याचे निष्पन्न झाले. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन तात्काळ मलकापूर ग्रामीण पोलीस स्टेशनला कळविण्यात आले.चाईल्ड हेल्प लाईनच्या पथकाने बालिकेसह तिच्या मोठ्या भावाला ताब्यात घेऊन पोलिस स्टेशनमध्ये आणले. पोलिसांनी चौकशी करून संबंधित सावत्र आईविरुद्ध गुन्हा दाखल केला. तसेच बालिकेची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. बालिकेला बाल कल्याण समितीसमोर हजर करण्यात आले असता, समितीच्या आदेशानुसार तिला संरक्षण व काळजीच्या दृष्टीने सखी वन स्टॉप सेंटर, बुलडाणा येथे दाखल करण्यात आले. यानंतर चाईल्ड हेल्प लाईनच्या समुपदेशकांनी बालिकेचे समुपदेशन केले. सदर प्रकरणाची पुढील कार्यवाही बाल कल्याण समिती, बुलडाणा यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## रामनवमीच्या निमित्ताने हिरडव येथे भव्य आरोग्य शिबिर उत्साहात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**लोणार दि.२५ :** तालुक्यातील हिरडव येथे रामनवमीच्या औचित्य साधून श्री संत भगवान बाबा युवा प्रतिष्ठानच्या वतीने भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. गोरगरीब रुग्णांची सेवा हीच खरी ईश्वर सेवा मानत या शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन शिवछत्र मित्र मंडळाचे अध्यक्ष नंदकिशोर मापारी यांच्या हस्ते पार पडले. यावेळी प्रमुख उपस्थितीत भाजपचे माजी तालुकाध्यक्ष ॲड. शिवाजी सानप, खरेदी विक्री संस्थेचे संचालक विजय डोईफोडे, ग्रामसेवा सोसायटीचे अध्यक्ष अशोकराव सांगळे कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक विठ्ठल घायाळ, विठ्ठल मुंडे, समाधान मोरे, हिम्मत कांबळे, उत्तम ईप्पर तसेच मुख्याध्यापक मदन चव्हाण उपस्थित होते.



या आरोग्य शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी केली. यात डॉ. चांगाडे (मधुमेह व हृदय रोग तज्ञ), डॉ. डव्हळे (अस्थिरोग तज्ञ), डॉ. वैभव मुंडे सर (मूळव्याध व भगंदर तज्ञ), डॉ. कल्पना थोरवे मॅडम (नाडी परीक्षा व स्त्रीरोग तज्ञ), डॉ. धनंजय नागरे (जनरल फिजिशियन) आणि डॉ. वैभव जायभाये (जनरल फिजिशियन) यांनी सेवा दिली. समता फाउंडेशन च्या वतीने मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले या शिबिरामध्ये सुमारे २०० रुग्णांनी लाभ घेतला. मोफत तपासणी व औषधोपचारामुळे गरजू नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. शिबिरामध्ये अनेक प्रकारच्या रक्त तपासणी मोफत करण्यात आल्या. श्री संत भगवान बाबा युवा प्रतिष्ठान हा समूह सातत्याने सामाजिक उपक्रम राबवत असून, अशा उपक्रमांमुळे समाजातील गरजू घटकांना मोठी मदत होत असल्याचे मत शिवाजी सानप सह उपस्थितांनी व्यक्त केले.

**विकास** आ.डॉ.संजय कुटे यांची अधिवेशनात मागणी

# शिक्षण, उद्योग व ग्रामीण आरोग्यासाठी सरकारने पुढाकार घ्यावा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**संग्रामपूर दि. २५ :** जि.प. शाळांमधील शिक्षकांच्या रिक्त पदांमुळे शिक्षण संदर्भात विद्यार्थ्यांवर गंभीर परिणाम होत असून शिक्षकांची रिक्त पदे त्वरीत भरावीत. तसेच पश्चिम विदर्भातील औद्योगिक उद्योग व्यवसाय व ग्रामीण आरोग्यासाठी सुद्धा शासनाने पुढाकार घ्यावा. अशी मागणी जळगाव (जा.) विधानसभा मतदार संघाचे आ.डॉ. संजय कुटे यांनी विधानसमेत प्रश्न उपस्थित करतांना केली.



शिक्षण संदर्भात प्रश्न मांडतांना म्हणाले संग्रामपूर व जळगाव (जामोद) तालुक्यात सुमारे ४० टक्के शिक्षक पदे रिक्त असल्याचे त्यांनी वेळोवेळी अधिकाऱ्यांना कळवूनही रिक्त पदांबाबत ठोस निर्णय घेतला जात नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. तसेच बदलीचे प्रमाण बाढले असून योग्य ठिकाणी नियुक्ती न झाल्याने अनेक शिक्षक रुजू होत नसल्याचेही त्यांनी सांगितले. जिल्ह्यातील अनेक जि.प. शाळांमध्ये शिक्षकांच्या अभावामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे नमूद करत आमदार कुटे म्हणाले की, एका शिक्षकावर अनेक वर्गाची जबाबदारी सोपवली जात असून गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे कठीण झाले आहे. ग्रामस्थ व पालकांकडून ''आमच्या गावाला शिक्षक नाहीत'' अशा तक्रारी सातत्याने येत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. काही ठिकाणी १०० टक्के शिक्षक तर काही तालुक्यात ४० ते ६० टक्के शिक्षकंची पदे रिक्त आहेत. नियम सर्वांसाठी समान असतांना ९० ते अशी असमानता का निर्माण झाली? लोकप्रतिनिधी असा प्रश्नही फक्त मतदारसंघापुरता विचार न करता संपूर्ण जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. कंत्राटी पद्धतीऐवजी कायम स्वरूपी शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी. तसेच बुलढाणा जिल्ह्यातील सर्व रिक्त पदांचा तातडीने आढावा घेऊन विशेष शिक्षक भरती मोहीम राबवावी. अशी मागणी त्यांनी शासनाकडे अन्यथा केली असून शिक्षण विभागाने लवकर निर्णय घेऊन रिक्त पदे भरण्याबाचत ठोस पावले उचलावीत, विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर गंभीर परिणाम होईल, असा इशाराही आ. डॉ. संजय कुटे यांनी अधिवेशनात दिला. तसेच ग्रामीण भागाचा उद्योग औद्योगिक विकास खुंटला असून पश्चिम विदर्भात उद्योग निर्मिती फारच अत्यल्प असल्याने असल्याने विकास व्हावा यासाठी व सुधारण शासनाने राबविणे आवश्यक असल्याची मागणी संजय कुटेयांनी विधानसभेत केली असून त्याचबरोबर आरोग्य व्यवस्थेची रचना केंद्र उपकेंद्र ग्रामीण रुणालय आणि उपजिल्हा व जिल्हा रुग्णालय स्तरावर अनेक त्रुटीमुळे तळागाळातील व ग्रामीण भागातील रुग्णांना पाहिजे त्या प्रमाणात सेवा मिळत नाही आरोग्यसेवा मिळण्यास अनेक अडचणी आहेत. या बाबीकडे ही शासनाने गांभीयनि दखल घ्यावी.

# शिक्षक मतदारांमध्ये माध्यमिक शाळेतील सर्व शिक्षकांना संधी द्यावी

### अमरावती शिक्षक मतदार यादीतील संभ्रम दूर करा- डी.एस.लहाने

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२५ :** अमरावती शिक्षक मतदार यादी तयार करण्याचे काम सुरू आहे.मात्र यादीत मध्ये मोठ्या प्रमाणात संभ्रम आहे. तो दूर करण्यात यावा व माध्यमिक शाळेतील सर्व शिक्षकांना मतदानाची संधी द्यावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सह संपर्कप्रमुख प्रा. डी एस लहाने यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे. याबाबत आज जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

निवेदनात म्हटले की, अमरावती विभाग शिक्षक मतदार संघामध्ये मतदार नोंदणी करून यादी तयार करण्याचे काम सुरू आहे. भारत निर्वाचन आयोगाच्या पत्रामधील १.३.२ मधील तरतुदीमध्ये माध्यमिक शाळेचा उल्लेख आहे. मात्र माध्यमिक शिक्षकांचा नाही. त्यामुळे माध्यमिक शाळेतील सर्व शिक्षक पात्र असावे.आजपर्यंत झालेल्या शिक्षक मतदार संघात माध्यमिक शाळेतील सर्व शिक्षक मतदार म्हणून पात्र धरले होते.माध्यमिक शाळेतील सर्व शिक्षकांनी आजपर्यंत सदर मतदार संघात मतदान केलेले आहे. आज रोजी अमरावती मतदार संघाच्या नोंदणीमध्ये सुध्दा अनेक ठिकाणी सर्व शिक्षकांची नोंदणी झालेली आहे.परंतु काही जिल्ह्यांमध्ये विशेषतः बुलडाणा जिल्ह्यात नव्याने माध्यमिक शाळेतील ९,



१० व ११ वी, १२ वी ला शिकविणाऱ्या शिक्षकांचीच नोंदणी करण्याचे निर्देश दिल्या गेले आहे. तसेच शासनमान्य सेल्फ फायनान्स च्या शाळा व इतर टेक्नीकल संस्था, विनाअनुदानित महाविद्यालये, विनाअनुदानित अपंग/मुकबधीर/ शाळा, मतिमंद शाळा येथील कार्यरत शिक्षकांना शिक्षणाधिकारी यांचे नसते. संस्था स्तरावर ते कार्यरत असतात. त्यांची सुध्दा मतदार म्हणून नोंदणी होणे आवश्यक आहे. अनेक तालुक्यात त्याची नोंदणी करण्यासाठी प्रशासनाने नकार दर्शविला आहे. तरी अमरावती विभाग शिक्षक मतदार संघातील मतदार नोंदणी मधील हे संभ्रम तात्काळ दूर करावे,जेणेकरून कोणतेही शिक्षक मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहणार नाही. अशी मागणी करण्यात आली. यावेळी प्रा लहाने यांच्यासह प्रमोद पवार,संजय शिंदे,गौरव देशमुख, अतिश्वर भोरकर, प्रमोद माहेश्वर, सुनिल दाभाडकर स्वानिम काकडे आदी उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### अस्मिता खेलो इंडिया स्पर्धेत जान्हवी मोतीवाडला रौप्यपदक

**शेगाव :** येथील माऊली अभियांत्रिकी महाविद्यालयातील बी.ई. प्रथम वर्षाची विद्यार्थिनी जान्हवी मोतीबाड हिने ''अस्मिता खेलो इंडिया स्पर्धा'' अंतर्गत झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले. नाशिक येथे दि. २१ ते २२ मार्च दरम्यान पार पडलेल्या अस्मिता पेनचेक सिलेट स्टेट लीग (महाराष्ट्र) २०२५-२६ स्पर्धेत तिने टेंडिंग बॉक्सिंग प्रकारात रौप्यपदक पटकावत विजेतेपद मिळवले. या यशामुळे जान्हवीची राष्ट्रीय स्तराचरील स्पर्धेसाठी निवड झाली असून महाविद्यालयासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. एम. जाधव क्रीडा मार्गदर्शक प्रा. संजय देशमुख, संचालक (क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग) यांनीही तिचे अभिनंदन केले.

### शेगावात मारहाणीचा गुन्हा दाखल; तिघांना अटक

**शेगाव :** शहर पोलीस ठाण्यात मारहाणीच्या प्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली. नंतर त्यांची जामिनावर सुटका करण्यात आली आहे. पोलीस सूत्रांनुसार, आरोपीमध्ये मोहन केशवराव मोरे (५२), नागेश्वर उर्फ नागेश सुरेश गावंडे (वय २५) आणि गोलू उर्फ प्रणव मोहन भोरे (१९) सर्व रा. संगमनगर, भुतबंगला परिसर यांचा समावेश आहे. या तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ११८ (१) ११५ (२), ३५१(२), ३५२ आणि ३(५) मुसार गुन्हा क्रमांक १५६/२०२६ करण्यात आला आहे. दाखल ही घटना ५ मार्च २०२६ रोजी रात्री १० वाजता घडली असून, ६ मार्च रोजी दुपारी गुन्ह्याची नोंद करण्यात आली. तपासादरम्यान २३ मार्च रोजी सायंकाळी आरोपींना अटक करण्यात आली. अटकेची माहिती संबंधित नातेवाईकांना देण्यात आली आहे. पोलीस हवालदार श्याम आधाब यांनी ही कारवाई केली. दरम्यान, सदर गुन्ह्यातील आरोपींना ७ वर्षपिक्षा कमी शिक्षेची तरतूद असल्याने त्यांची वैयक्तिक मुचलक्यावर सुटका करण्यात आली आहे.

### विद्यार्थ्यांचा ग्रॅज्युएशन समारंभ उत्साहात

**खामगाव :** येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये सीनियर केजी विद्यार्थ्यांचा ग्रॅज्युएशन समारंभउत्साहपूर्ण व आनंददायी वातावरणात पार पडला. या प्रसंगी विद्यार्थ्यांना प्रमोशन सर्टिफिकेट प्रदान करण्यात आले. छोट्या यशाचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर झळकत होता, तर ग्रॅज्युएशन गाऊनमध्ये सजलेले विद्यार्थी आकर्षक दिसत होते. हा क्षण विद्यार्थ्यांसह पालकांसाठीही अविस्मरणीय ठरला. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या रंगतदार नृत्याने उपस्थितांची मने जिंकली, त्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाला पालकांकडून भरभरून दाद मिळाली. त्यामुळे वातावरण अधिक उत्साही व आनंदमय झाले. पालकांनी शाळेच्या विविध उपक्रमांचे तसेच ''टीम पोदार प्रेप च्या सातत्यपूर्ण प्रयतांचे कौतुक केले. कार्यक्रमाला शाळेचे प्राचार्य अनिल छाडी, मुख्याध्यापिका भाग्यश्री देशमुख, प्रशासकीय अधिकारी पचन स्वर्गिये यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### मलकापूर बसस्थानकात तरुणाचा गुप्ती घेऊन धुळगूस

**मलकापूर :** येथील बस स्थानक परिसरात हातात धारदार शस्त्र (गुप्ती) घेऊन आरडाओरड करत धांदली करणाऱ्या १९ वर्षीय तरुणाला शहर पोलिसांनी ताब्यात घेतले. या घटनेमुळे दुपारी परिसरात काही काळ खळबळ उडाली होती. प्राप्त माहितीनुसार, बस स्थानकाजवळील हनुमान मंदिर परिसरात दुपारी सुमारे ४ वाजताच्या सुमारास एक तरूण हातात गुमी घेऊन लोकांना घाबरवत आरडाओरड करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत संबंधित तरुणाला ताब्यात घेतले.

# वाढीव लोडशेडिंग विरोधात ठिय्या आंदोलन; दोन दिवसांत ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे आश्वासन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मलकापूर दि. २५ :** घिर्णी येथील वाढीव लोडशेडिंगच्या समस्येविरोधात शिवसेना (उबाठा) पदाधिकाऱ्यांसह ग्रामस्थांनी म.रा.वि.वि. कंपनीच्या कार्यकारी अभियंता कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन छेडले. कार्यकारी अभियंता राजेश मिश्रा यांनी दोन दिवसांत सबस्टेशनवर ट्रान्सफॉर्मर बसवून समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले.

घिर्णी गावात गेल्या आठवडाभरापासून वाढीव लोडशेडिंगमुळे सकाळी ८ ते रात्री १० या वेळेत तब्बल १४ तास वीजपुरवठा खंडित होत असल्याने ग्रामस्थ त्रस्थ झाले होते. याबाबत शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांना माहिती देण्यात आली होती. त्यानंतर २० मार्च रोजी कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देऊन तीन दिवसांत समस्या सोडवावी, अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. मात्र प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याने संतप्त ग्रामस्थांनी २४ मार्च रोजी सकाळी ११ वाजता कार्यकारी अभियंता कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले. ''घिर्णी येथील वाढीव लोडशेडिंग बंद झालेच पाहिजे'' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनादरम्यान कार्यकारी अभियंता राजेश मिश्रा व आर. जी. तायडे यांनी दूरध्वनीवरून गजानन ठोसर यांच्याशी संपर्क साधला. खामगाव येथून ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून दोन दिवसांत सबस्टेशनवर बसविण्यात येईल आणि घिर्णी येथील लोडशेडिंगचा प्रश्न कायम स्वरूपी मार्गी लावण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले. या आंदोलनात शिवसेना शहरप्रमुख हरीदास गणबास, उपशहरप्रमुख बाळू पोलाखरे, शकील जमादार, शेतकरी संघटनेचे नेते दामोधर शर्मा, रणजीत डोसे, किसान सेना तालुकाप्रमुख महादेव पवार, उपतालुका प्रमुख गजानन मेहेंगे, वाहतूक सेना शहरप्रमुख इमरान लकी यांच्यासह घिर्णी ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भरोसा येथे लांडग्याने केलेल्या हल्ल्यात बकऱ्यांसह ४० कोंबड्या ठार

## गावात पशु पालकांत भीतीचे वातावरण

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**चिखली दि.२५ :** तालुक्यातील भरोसा परिसरात वन्यप्राण्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून याचा मोठा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसत आहे. दि.२२ मार्चच्या मध्यरात्री लांडग्यांनी शेतातील गोठ्यावर हल्ला चढवत तीन बकऱ्या व ४० कोंबड्यांचा फडशा पाडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

भरोसा येथील शेतकरी सुखदेव त्र्यंबक थुट्टे यांनी शेतीला जोडधंदा म्हणून शेळीपालन व कुक्कुटपालन व्यवसाय सुरू केला होता. त्यांच्या शेतालगत असलेल्या गोठ्यात बकऱ्या बांधलेल्या होत्या, तर बाहेरील खुराड्यात कोंबड्या ठेवण्यात आल्या होत्या. दि. २२ मार्चच्या रात्री अचानक लांडग्यांच्या कळपाने हल्ला करत गोठ्यातील तीन बकऱ्या ठार केल्या, तसेच खुराड्यातील ४० कोंबड्यांचाही फडशा पाडला. यापूर्वीही परिसरात लांडग्यांनी एका वासरावर हल्ला करून त्याला ठार केल्याची घटना घडली होती, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निमाण झाले आहे. या घटनेत संबंधित शेतकऱ्याचे सुमारे एक लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. विश्वास वानखेडे, वनरक्षक गजानन पोटे, वनपाल प्रदीप मुंढे तसेच तलाठी मगर यांनी घटनास्थळी धाव घेतली. वनरक्षक गजानन पोटे यांनी पंचनामा करून घटनेची नोंद केली आहे. दरम्यान, वाढत्या वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे शेतकरी हवालदिल झाले असून नुकसानग्रस्त शेतकऱ्याला तातडीने आर्थिक मदत व नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## मलकापूरातून विद्यार्थिनी बेपत्ता; पोलिसांत तक्रार दाखल

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मलकापूर दि.२५ :** अनुराबाद येथील १९ वर्षीय विद्यार्थिनी मलकापूर येथे कॉलेजला जाऊन घरी परत न आल्याने मलकापूर शहर पोलीस स्टेशनमध्ये हरवल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. याबाबत रोहित नथ्थू चौधरी (वय २१, रा. अनुराबाद ता. मलकापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे की, त्यांची बहीण कु. धनश्री नथ्थू चौधरी (वय १९) ही २३ मार्च रोजी सकाळी ९ वाजता मलकापूर येथील कोलते कॉलेजला गेली होती. ती नेहमीप्रमाणे सायंकाळी ६ वाजेपर्यंत घरी परतते, मात्र त्या दिवशी ती घरी न आल्याने कुटुंबीयांनी शहरात, कॉलेजमध्ये तसेच नातेवाईकांकडे शोध घेतला, परंतु ती कुठेही आढळून आली नाही. हरवलेल्या मुलीचे वर्णन असे आहे.

## शासकीय सुट्ट्यांमध्येही दुय्यम निबंधक कार्यालये सुरू राहणार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२५ :** आर्थिक वर्ष संपत आले असून, नवीन वर्षाच्या निमित्ताने मालमत्ता खरेदी-विक्रीच्या व्यवहारांमध्ये होणारी वाढ लक्षात घेता मार्च महिन्यातील सार्वजनिक सुट्यांच्या दिवशीही राज्यातील दुय्यम निबंधक आणि सह जिल्हा निबंधक कार्यालये सुरू ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मालमत्ता खरेदीदारांनी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी दस्त नोंदणी करण्याचे आवाहन, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

मार्च महिन्यातील २६, २८, २९ आणि ३१ मार्च २०२६ या चार सार्वजनिक सुट्यांच्या दिवशी सर्व दुय्यम निबंधक कार्यालये नियमितपणे सुरू राहतील. यामध्ये शनिवार आणि रविवारच्या सुट्यांचाही समावेश आहे. ज्या कार्यालयांची साप्ताहिक सुटी शनिवार-रविवार सोडून इतर दिवशी असते, अशा कार्यालयांनी त्यांच्या दोन सुट्यांपैकी एक दिवस कार्यालय सुरू ठेवून कामकाज पूर्ण करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. मार्च महिना हा आर्थिक वर्षाचा शेवटचा महिना असल्याने शासकीय महसूल उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी तसेच नवीन वर्षानिमित्त अनेक नागरिक नवीन घराची किंवा जमिनीची खरेदी करतात. या काळात दस्तनोंदणीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढते. मुद्रांक शुल्काची प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे आणि नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी निबंधक कार्यालय सुरू राहील.

## हळदीच्या बेण्यावर चोरट्यांचा डल्ला

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**डोणगाव दि.२५ :** शेतात ठेवलेले हळदीचे दहा पोतेबेणे चोरटयांनी चोरून नेल्याची घटना डोणगाव पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या हिवरा साबळे शिवारात सोमवार दि.२३मार्च रोजी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

डोणगाव पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या हिवरा साबळे येथील गजानन नारायण साबळे यांनी गट क्रमांक १५मध्ये सेलम जातीची अर्धा एकर हळदीची लागवड केली होती. २२मार्च २०२६रोजी त्यांनी हळदीचे पीक काढले. त्याचे बेणे तयार करण्यात आले. संध्याकाळी १३ बोते हळद बेणे एका शेतकऱ्याला देण्यासाठी शेतातच हे बेणे ठेवले होते. मात्र २३ मार्च सकाळी हळद घेऊन जाण्यासाठी शेतकरी शेतात गेला असता तीनच पोते बेणे होते दहा पोते बेणे चोरीस गेल्याचे आढळून आले .घटनास्थळी केवळ तीनच पोते बेणे दिसून आले. पोत्यापासून रतापूर रस्त्याकडे जाणाऱ्या चोरट्यांच्या पाऊलखुणा दिसून आल्या. त्यावरून चोरट्यांना १३ पैकी १० पोते हळद चोरून नेल्याचे दिसून आले. गजानन साबळे यांच्या शेतातील हळद कित्येक शेतकऱ्यांनी लागवडी करता मागतले होती. या हळदीवर अज्ञाताने नगर ठेवून चोरून नेली. याप्रकरणी गजानन सावळे डोणगाव पोलीस स्टेशन ला तक्रार दिली पण वृत्त लिहीपर्यंत डोणगाव पोलीस स्टेशनला विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

## अवैध व्यवसाय बंद करण्याची मा.आ.रायमुलकर यांची मागणी

**बुलडाणा दि.२५ :** मेहकर शहर आणि परिसरात अवैध व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरू असल्यामुळे कायदा आणि सुव्यवस्था प्रभावित झाली आहे. त्यामुळे अवैध व्यवसायांना प्रतिबंध करून कठोर कारवाई करण्याची मागणी माजी आमदार संजय रायमुलकर यांनी केली आहे .

उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खाडे आणि मेहकर, डोणगाव ,जानेफळ पोलीस निरीक्षक यांना पत्र पाठवून संजय रायमुलकर यांनी मागणी केली आहे की, विशेषतः मेहकर शहरात आणि आणि संपूर्ण तालुक्यामध्ये जुगार, अवैध दारू विक्री, वरली मटका आणि तत्सम अनेक बेकायदेशीर व्यवहार मोठ्या प्रमाणात सुरू आहेत त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. यामुळे तरुण पिढी बरबाद होण्याची भीती निर्माण झाली आहे.गरीब कुटुंबांचे आर्थिक नुकसान होत असून सामाजिक स्वास्थ्य बिघडत आहे .बेकायदेशीर अवैध व्यवसायांमुळे वारंवार भांडणे, गुन्हेगारी प्रकारांमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झालेली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे या संदर्भात तात्काळ कारवाई करून हे अवध्य व्यवसाय पूर्णपणे बंद करण्यासाठी त्यांना आळा घालणे आवश्यक आहे. म्हणून या संदर्भात कडक कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी संजय रायमुलकर यांनी केली आहे. सदर पत्राच्या प्रति त्यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, सुनेत्रा पवार, यांच्यासह आदींना पाठविल्या आहेत.

## ॲड. प्रा.व्ही.के. क्षीरसागर यांच्या जीवन कार्यावर आधारित स्मृति ग्रंथ प्रकाशन समारंभाचे आयोजन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**नांदुरा दि.२५ :** बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचे पाईक तथा समाज परिवर्तनाच्या चळवळीत ५१ वर्ष निष्ठेने सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व सांस्कृतिक कार्य करणारे म.रा. कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे तत्कालीन केंद्रीय अध्यक्ष, कृतीशील विचारवंत व अष्टपैलू व्यक्तीमत्व प्रा.ॲड. व्ही. के. क्षीरसागर गुरुजींच्या १६ व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारा आंबेडकरी अस्मितेचं तारांगण प्रा.



ॲड. व्ही. के. क्षीरसागर गुरुजी

ह्या स्मृतिग्रंथाचा प्रकाशन सोहळा व अभिवादन कार्यक्रम दिनांक २९ मार्चला आयोजित केला आहे.ह्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ॲड.जे. एस. काकडे हे भूषविणार आहेत.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ. संतोष बन्सोड (सिनेट सदस्य, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ),प्रा.डॉ. अरुण रौराळे (संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ), रमेश घेवंदे (निवृत्त अति जिल्हाधिकारी)ॲड विजयकुमार कस्तुरे, प्रा.डॉ. के. बी. इंगळे , डी.एस. वानखडे (माजी गट शिक्षणाधिकारी, स्खाम गांव) इत्यादी उपस्थित राहणार आहेत. जिजामाता महाविद्यालय बुलढाणा च्या सभागृहात सकाळी १०.३० वाजता होऊ घातलेल्या या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याच्या आयोजन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## आ.श्वेता महाले पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त धाड येथे आरोग्य शिबिर

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**चिखली दि.२५:** चिखली विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ. श्वेता महाले पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त धाड येथील विश्राम भवन येथे भव्य महाआरोग्य शिबिर उत्साहात पार पडले. आमदार सौ. श्वेता महाले पाटील यांच्या सामाजिक बांधिलकीतून आणि जनसेवेच्या भावनेतून आयोजित या उपक्रमाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.



या महाआरोग्य शिबिराचा लाभ परिसरातील शेकडो नागरिकांनी घेतला असून, एकूण ५५० रुग्णांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी करण्यात आली. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिरात विविध आजारांवर उपचार, तपासण्या व आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन अंकुशराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाजपा शहराध्यक्ष अनिल कुटे यांनी केले. या शिबिरात एक्स-रे, ईसीजी, लसीकरण, गर्भवती महिलांची तपासणी, सिकल सेल तपासणी, विविध लॅब तपासण्या तसेच मोतीबिंदू ऑपरेशनसाठी रुग्णांची निवड अशा विविध प्रकारच्या वैद्यकीय सेवा देण्यात आल्या. आमदार सौ.श्वेता महाले पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या समाजोपयोगी उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, भविष्यातही अशाच उपक्रमांद्वारे जनसेवा अधिक प्रभावीपणे सुरू ठेवण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. याप्रसंगी देविदास पाटील जाधव (जिल्हा उपाध्यक्ष), श्रीरंगअण्णा येंडोले (जिल्हा उपाध्यक्ष), सुनील देशमुख (भाजपा नेते, मासरूळ), विष्णू पाटील वाघ (सरचिटणीस), विष्णू पाटील उगले (उपजिल्हाध्यक्ष, किसान आघाडी), विशाल विसपुते (उपजिल्हाध्यक्ष, युवा मोर्चा), संदीप पाटील उगले (भाजपा नेते, रुईखेड), अनिल फेपाळे (सरपंच, रुईखेड), सौ. सावित्रीबाई बोर्डे (सरपंच, धाड), योगेश राजपूत (जिल्हाध्यक्ष, व्हीजेएनटी), अनिल जाधव (धाड मंडळ अध्यक्ष), किरण सरोदे (तालुका कोषाध्यक्ष) यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

**आयोजन** | विदर्भासह देशभरातील महिलांचा सहभाग अपेक्षित

## शेगावात 'मातृसंस्कार समागम' २८-२९ मार्चला

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेगाव दि.२५ :** विश्वमांगल्य सभा विदर्भ प्रांताच्या वतीने ''मातृसंस्कार समागम'' हा दोन दिवसीय भव्य कार्यक्रम येत्या २८ व २९ मार्च रोजी शेगाव येथील श्री संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ऑडिटोरियम हॉलमध्ये आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती विदर्भ प्रांत जनसंपर्क संयोजिका डॉ. अपर्णाताई कुटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



मातृसंस्कार संघटनेची सुरुवात विदर्भातून झाली असून आज ही संघटना देशातील तब्बल २२ राज्यांमध्ये कार्यरत आहे. सुमारे ८ लाख महिलांचे भक्कम जाळे असलेल्या या संघटनेचे मुख्य उद्दिष्ट भारतीय संस्कृती जपणे, संस्कार रुजवणे तसेच समाजात सदाचार, सामर्थ्य आणि मूल्यांची जोपासना करणे हे आहे. गेल्या ११ वर्षांपासून सातत्याने कार्यरत असलेली ही संघटना विदर्भातील ५ जिल्ह्यांमध्ये सक्रिय असून सुमारे १५०० सदस्य प्रत्यक्ष कार्यात सहभागी आहेत. या समागमाचे हे ९ वे एकत्रीकरण असून ११ व्या उद्घाटन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थानावरील श्रद्धा व विश्वासामुळे या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. या प्रसंगी जितेंद्रनाथ महाराज यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. समागमादरम्यान महिलांचा सन्मान, विविध सांस्कृतिक कार्यक्रम, प्रभातफेरी तसेच आकर्षक झाकी यांसारख्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. देव, देश आणि धर्म या तत्वांवर आधारित हा उपक्रम शेगावसारख्या अध्यात्मिक भूमीत होत असल्याने त्याला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. संघटना अधिक बळकट व्हावी आणि समाजात चांगले संस्कार रुजावेत या उद्देशाने बालसभा, बालसंस्कार उपक्रम, आरोग्य जनजागृती तसेच जनप्रतिनिधींचा सहभाग अशा विविध उपक्रमांद्वारे कार्य केले जात आहे. विशेष म्हणजे अनाथ (स्वनाथ) मुलांना मातृत्वाची जाणीव करून देणे आणि ''सप्तमातृत्व'' या संकल्पनेद्वारे कुटुंबव्यवस्था व ममत्व वृद्धिंगत करण्याचे कार्यही संघटनेतून केले जात आहे.

या भव्य समागमासाठी शेगाव नगरी सज्ज झाली असून विदर्भासह विविध राज्यांतील महिलांचा मोठ्या संख्येने सहभाग अपेक्षित आहे. पत्रकार परिषदेस विदर्भ प्रांत अध्यक्ष मधुरा लेंधे, उपाध्यक्ष रश्मी जाजोदिया, सचिव निशा टावरी, सहसंयोजिका वर्षा उफाळे, अकोला शहर संयोजिका अश्विनी जकाते, कार्यालय प्रमुख सुषमा ठोकळ, शेगाव शहर अध्यक्ष अंजली जोशी, संयोजिका आरतीताई वैद्य, सविता पाटील आदी उपस्थित होत्या.

## बुलडाणा येथे उन्हाळी क्रीडा व व्यक्तिमत्व विकास शिबीराचे आयोजन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२५ :** जिल्ह्यातील खेळाडू घडावेत, त्यांच्या कौशल्यांना वाव मिळावा आणि विद्यार्थ्यांमध्ये खेळाविषयी आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलडाणा यांच्या वतीने उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण व व्यक्तिमत्व विकास शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.



शिबीर दि. १ एप्रिल ते २५ एप्रिल २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येणार असून सकाळी ६ ते ८ आणि सायंकाळी ५.३० ते ७.३० या दोन सत्रांमध्ये प्रशिक्षण दिले जाईल. जिल्हा क्रीडा संकुल, जिजामाता क्रीडा व व्यापारी संकुल, तालुका क्रीडा संकुल (धाड नाका शेरीवेल) तसेच एडेड हायस्कूलचे मैदान या ठिकाणी शिबीर होणार आहे. शिबीराचा शुभारंभ दि. १ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता जिजामाता क्रीडा व व्यापारी संकुल, बुलडाणा येथे होणार आहे. या शिबिरात मैदानी खेळांसह आर्चरी, हँडबॉल, कबड्डी, खो-खो, फुटबॉल, बॉक्सिंग, जिम्नॅस्टिक्स आदी विविध खेळांचे आधुनिक आणि तंत्रशुद्ध प्रशिक्षण दिले जाणार आहे. राज्य क्रीडा मार्गदर्शक, तसेच जिल्ह्यातील आजी-माजी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. ८ ते १७ वयोगटातील विद्यार्थी (मुले व मुली) या शिबिरात सहभागी होऊ शकतात. मात्र ८ ते १४ वयोगटाला प्राधान्य दिले जाणार आहे. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमतेत वाढ होऊन त्यांचे आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होईल. यासोबतच व्यक्तिमत्व विकासासाठी चित्रकला, योगा, एरोबिक्स, लाठी-काठी, क्रीडा दुखापत व प्रथमोपचार, तसेच आहार विषयक मार्गदर्शन तज्ज्ञांकडून दिले जाणार आहे. हे शिबीर पूर्णपणे विनामूल्य असून नियमित उपस्थित राहणाऱ्या खेळाडूंना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. इच्छुकांनी ऑनलाईन नोंदणी करावी तसेच अधिक माहितीसाठी उज्वला लांडगे (मो. ९७६४७३२७६८) व जीवन मोहड (मो. ९४०५७३४४०३) यांच्याशी संपर्क साधावा.

अजिंक्य भारत •
आपलं जालना
जालना, गुरुवार, दि. २६ मार्च २०२६ www.ajinkyabharat.com


## महत्त्वाचे

### प्रल्हादपूर येथे हिंदू संमेलनाचे आयोजन

**परतूर :** प्रल्हादपूर परतूर येथे सकल हिंदू समाजाच्यावतीने भव्य हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. समाजातील ऐक्य, संघटन आणि विविध प्रश्नांवर एकत्रितपणे मार्ग काढण्याच्या उद्देशाने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले असल्याचे आयोजकांनी सांगितले. हे संमेलन शनिवार, दिनांक २८ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता नारायण दादा चौक, प्रल्हादपूर (ता. परतूर, जि.जालना) येथे पार पडणार आहे. या कार्यक्रमासाठी विविध मान्यवरांची उपस्थिती लाभणार असून प्रमुख वक्ते म्हणून इंद्रजित प्रतापसिंह बैस हे मार्गदर्शन करणार आहेत.तसेच मार्गदर्शक म्हणून महंत बालगिरीजी महाराज यांचेही विशेष मार्गदर्शन लाभणार आहे. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन हिंदू समाजाच्या बळकटीसाठी प्रयत्न करण्याचे आवाहन या निमित्ताने करण्यात आले आहे. कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ५ वाजता शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या संमेलनास मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करण्याचे आवाहन प्रल्हादपूर हिंदू संमेलन समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

### ग्राहक पंचायतची महत्वाची बैठक

**जालना :** ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा जालना पदाधिकारी व सदस्य मंडळाची जिल्हा बैठक दि.२७ मार्च २०२६ शुक्रवार रोजी दुपारी २ वाजता रेल्वे स्टेशन रोडवरील हॉटेल सनराईज मध्ये आयोजित करण्यात आली आहे. ग्राहक पंचायत महाराष्ट्र जालना जिल्हाध्यक्ष मोहन इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ.दिलीप लाड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत आगामी कामाचे नियोजन व तालुका समिती गठीत करणे या बाबत सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे.सर्व पदाधिकाऱ्यांनी बैठकीस वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा संघटक संजय देशपांडे व सचिव शिवाजी वाघ यांनी केले आहे.

### जिल्हा निर्देशांकात जालना जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

**जालना :** सांख्यिकी विभागाकडे असलेल्या तपशिलाच्या आधारे पुणे येथील विख्यात गोखले अर्थशास्त्र संस्थेकडून विविध जिल्ह्याच्या कामगिरीचे विश्लेषण केले गेले. त्यानूसार जालना जिल्ह्याने विविध विकास निर्देशांकाबाबत प्रथम क्रमांक नोंदविला आहे. त्यानूसार जालना जिल्ह्याने उत्कृष्ट कामगिरी करत 'गट-१' मध्ये राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या कार्यक्रमाचे आयोजन दि.२० मार्च २०२६ रोजी हॉटेल ताज विवांता मुंबई येथे करण्यात आले होते. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विविध निकषांवर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यांचा सत्कार केला. विशेषतः प्रशासकीय गतिमानता आणि लोककल्याणकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्यात जिल्हा प्रशासनाला मोठे यश आले आहे. या लक्षणीय यशाबद्दल जिल्ह्याचा विशेष सन्मान करण्यात आला असून जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी हा मानाचा पुरस्कार व सन्मानचिन्ह स्वीकारले आहे. या यशाबद्दल बोलताना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, हा बहुमान जिल्हा प्रशासनातील सर्व अधिकारी, कर्मचारी आणि जिल्ह्यातील जनतेच्या सांघिक प्रयत्नांचे फळ आहे. भविष्यातही जालना जिल्ह्याला विकासाच्या बाबतीत अग्रस्थानी ठेवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. जालना जिल्ह्याला मिळालेल्या या गौरवामुळे सर्व स्तरातून प्रशासनाचे कौतुक होत असून मराठवाड्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# बस सवलतीचे 'मास्टरकार्ड' आता ३०० रुपयांत; नागरिक नाराज!





**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. २५ : महाराष्ट्र शासनाने एसटी बस प्रवासात वयोवृद्ध महिला व पुरुष तसेच इतर संवर्गातील प्रवाशांना सवलत जाहीर केल्यानंतर आता या सवलतीचा फायदा घेण्यासाठी नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) सक्तीचे केले आहे. या कार्डसाठी जालना बसस्थानकात या प्रवाशांना १९९ रुपयात ते उपलब्ध करून दिले जात आहे. सकाळी १० वाजता सुरू होणाऱ्या या प्रक्रियेसाठी गेल्या काही दिवसांपासून सकाळी ७ वाजेपासूनच महिला व पुरुषांची गर्दी वाढू लागली आहे.**

**लोकांची गरज आणि वेळेची बचत याची सांगड घालत एका खाजगी एजन्सी मार्फत दिल्या जाणाऱ्या या एनसीएमसी कार्डची किंमत मागच्या आठवड्यात २५० रुपयांपर्यंत गेली होती. आतापर्यंत ६ हजार सवलतीचा फायदा घेणाऱ्या प्रवाशांना या कार्डचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरीत लोकांनाही लवकरच कार्ड मिळेल असे एसटी बस प्रशासनाकडून सांगण्यात आले. दरम्यान, आज बुधवार रोजी मात्र संबंधित एजन्सीकडून गरजवंत महिला व पुरुषांकडून तब्बल ३०० रुपये वसुल केल्या जात असल्याचा प्रकार सकाळी ११ वाजेच्या दरम्यान समोर आल्याने तेथील महिला व पुरुषांनी तक्रारी करण्यास सुरुवात केल्याचे चित्र पहावयास मिळाले. आता या संदर्भात एसटी महामंडळ संबंधित एजन्सीला ताकीद देते की अभय हे येणाऱ्या काही दिवसात दिसून येईल.**

# रेल्वे स्थानकांच्या पाहणीसह पायाभूत सुविधांच्या विकास कामांचा आढावा

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. २५ :** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाचे अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक कल्याण राजू यांनी दिनांक २४ मार्च २०२६ रोजी विविध स्थानके व सुरू असलेल्या पायाभूत सुविधा विकास कामांची पाहणी करून कार्यक्षमता, सुरक्षा मानके आणि प्रवासी सुविधा यांचा आढावा घेतला.

या दौऱ्यादरम्यान कल्याण राजू यांनी नागरसोल ते छत्रपती संभाजीनगर या विभागात रियर विंडो निरीक्षण करून सुरू असलेल्या दुहेरीकरण कामांच्या प्रगतीचा आढावा घेतला. या कामांमुळे मार्गाची क्षमता वाढून गाड्यांची वेळपालनता सुधारण्यास तसेच प्रवासी व मालगाड्यांची वाहतूक अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

दौऱ्याचा एक भाग म्हणून नागरसोल, रोटेगाव, परतूर, सेलू आणि मानवत रोड या अमृत भारत स्टेशन योजना अंतर्गत विकसित होत असलेल्या स्थानकांची पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान प्रवासी सुविधा, स्वच्छता, सुरक्षा व्यवस्था तसेच स्थानक विकास कामांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. कल्याण राजू यांनी दौऱ्यादरम्यान रेल्वे अधिकाऱ्यांशी संवाद साधून सुरक्षा, कार्यक्षम संचालन आणि प्रवाशांसाठी उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्याच्या सूचना दिल्या. तसेच या विभागातील सुरू असलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या प्रगतीचा देखील आढावा घेतला.

या पाहणीदरम्यान अभियांत्रिकी, संचालन, विद्युत, सुरक्षा तसेच सिग्नल व दूरसंचार विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

ही पाहणी नांदेड विभागाच्या पायाभूत सुविधा बळकटीकरण, प्रवासी सुविधा सुधारणा आणि सुरक्षित व कार्यक्षम रेल्वे संचालन सुनिश्चित करण्याच्या बांधिलकीचे प्रतीक आहे.

# जिल्ह्यात एलपीजी गॅस व इंधन मुबलक प्रमाणात उपलब्ध

## नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये : जिल्हाधिकारी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. २५ :** आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे जालना जिल्ह्यात एलपीजी गॅस व इंधन टंचाई निर्माण झाल्याची अफवा पसरली असून, यामुळे जिल्ह्यातील पेट्रोल पंपांवर नागरिकांची मोठ्या प्रमाणत गर्दी करत आहेत. मात्र, जिल्ह्यात एलपीजी गॅस, पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून पुरवठा सुरळीत सुरू आहे. अलीकडे काही ठिकाणी गॅस व इंधन टंचाईबाबत चूकीच्या अफवा पसरत असल्याने, नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण होत आहे. मात्र, जिल्हा प्रशासनाने या अफवांचे खंडन करत, परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात असल्याचे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले आहे.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले की, जिल्ह्यातील काही पेट्रोल पंप चालकांनी गॅस व तेल कंपन्यांना देयके उशिरा अदा केल्याने त्यांना इंधन साठा मिळण्यास थोडा विलंब झाला होता. याचा चुकीचा अर्थ काढून शहरात आणि जिल्ह्यात एलपीजी गॅस व इंधन संपल्याच्या चूकीच्या अफवा पसरल्यामुळे अनेक नागरिक वाहनांमध्ये अतिरिक्त साठा करण्यासाठी पेट्रोल पंपांवर गर्दी करत असल्याचे चित्र दिसत आहे. जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, सर्व तेल कंपन्यांचे विक्री अधिकारी आणि प्रतिनिधींना इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यात इंधनाचा तुटवडा भासणार नाही, याची जिल्हा प्रशासनाकडून पूर्ण काळजी घेतली जात आहे. सोशल मिडिया किंवा इतर माध्यमांतून एलपीजी गॅस व इंधन टंचाईबाबत चुकीची माहिती किंवा अफवा पसरवणाऱ्यांविरुद्ध प्रशासनामार्फत कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासन आणि तेल कंपन्या इंधनाचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी कटिबद्ध आहेत. जिल्ह्यात घरगुती गॅस आणि पेट्रोल-डिझेलचा पुरेसा पुरवठा सुरू असल्याने नागरिकांनी घाबरून न जाता शांतता आणि संयम राखावी. जिल्ह्यातील सर्व गॅस एजन्सींकडे घरगुती एलपीजी गॅसचा पर्याप्त साठा उपलब्ध आहे. तसेच पेट्रोल पंपांवरही पेट्रोल आणि डिझेलचा नियमित पुरवठा सुरू असून, कोणतीही कमतरता भासणार नाही यासाठी जिल्हा प्रशासनाकडून योग्य ते नियोजन करण्यात आले आहे. पुरवठा साखळी सुरळीतपणे कार्यरत असल्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊन साठेबाजी करू नये. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. अफवा पसरवणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले आहे.

**जिल्ह्यासह शहरातही एलपीजी गॅसच काय इंधनही मुबलक प्रमाणात नसल्याचेच चित्र दिसत आहे. हे वास्तव रोज समोत येत असताना जिल्हा प्रशासन मात्र सर्वसामान्यांची दिशाभूल कशासाठी करत आहे हे कळण्यापलीकडचे आहे. विशेष म्हणजे अफवा हा विषयच जालन्यात नाही. तरीही प्रशासन अफवेच्या नावाखाली काय लपवू पहात आहे हे आता सामान्य माणसाला कळू लागले आहे. आजरोजी मुबलक हा शब्द प्रशासन वापरत असताना साठेबाजांवर कोणती कारवाई केली जात आहे हे मात्र प्रशासनाकडून सांगितले जात नाही.**

# आ.खोतकर यांनी मराठवाड्यातील शेतकऱ्यांचा प्रश्न सभागृहात मांडला

## तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाईची मागणी



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. २५ :** मुबई येथे सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या नुकसानीचा गंभीर प्रश्न आमदार अर्जुनराव खोतकर यांनी प्रभावीपणे सभागृहात मांडला. काही दिवसांपूर्वी झालेल्या अवकाळी पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्यामुळे मराठवाड्यातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सांगितले की, अनेक ठिकाणी उभ्या पिकांचे पूर्णतः नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी किमान एक लाख रुपये नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली.

यावर उत्तर देताना राज्याचे कृषिमंत्री यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. त्यांनी सांगितले की, कृषी विभागाने विविध भागांमध्ये तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत आणि नियमांनुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई दिली जाईल. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

# रस्ता अडवल्याप्रकरणी सरपंच व ग्रामसेवक यांच्यावर कारवाई करण्याची मागणी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**जालना, दि. २५ :** जाफ्राबाद तालुक्यातील गाढे गव्हाण येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासमोरील पुर्व नियोजित जागेवर या पुर्वी सरपंच व ग्रामसेवक यांच्या सहाय्याने अतिक्रमण करण्यात आले होते. वंचित बहुजन आघाडीच्या पाठपुराव्यामुळे पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांनी अतिक्रमण थांबवले आहे. याचा राग मनात धरून पुन्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पारंपरिक जयंती मिरवणुकीचा सरकारी रस्ता सरपंच व ग्रामसेवक यांनी कैलास गिरी यांच्या सहाय्याने अडवला आहे. तो तात्काळ पुर्ववत करण्यात यावा व याप्रकरणी कैलास गिरी यांच्यासह सरपंच व ग्रामसेवक यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी, या मागणीचे निवेदन जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी संदीप पवार यांची भेट घेऊन सादर करण्यात आले आहे. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके, जिल्हा संघटक राजेंद्र खरात, शत्रुघ्न कोळी, विजय सावंत, बबन सावंत, योगेश हिवाळे, रोहन हिवाळे, राजु दाभाडे, कडुबा हिवाळे, संजय हिवाळे, भगवान घोरपडे, विलास सावंत यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जिज्ञासा** शांती निकेतन विद्यामंदिरात विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन

# कोणतीही गरज ही शोधाची जननी-कल्याण सोळुंके

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. २५ :** मानवाला दैनंदिन जीवनात ज्या अडचणी निर्माण होतात त्या सोडवण्यासाठी वेगवेगळ्या कल्पना पुढे येतात त्यातूनच नवनवीन गोष्टी निर्माण होत असतात. त्यामुळे खऱ्या अर्थाने कोणतीही गरज ही त्या शोधाची जननी असल्याचे प्रतिपादन विज्ञान विषयाचे तज्ञ मार्गदर्शक व अंबड तालुक्यातील घुंगर्डे हदगाव येथील मत्स्योदरी विद्यालयाचे मुख्याध्यापक कल्याण सोळंके यांनी केले.

जालना शहरातील संभाजीनगर प्रभागात असलेल्या शांतिनिकेतन विद्यामंदिर शाळेत विशेष विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केले होते. यावेळी शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मार्गदर्शक कल्याण सोळंके म्हणाले की, आपल्या वर्ग व अभ्यासक्रमातील प्रत्येक प्रयोग विद्यार्थ्यांनी स्वतः करून पाहिला पाहिजे त्यामुळे त्याच्या त्या प्रयोगातील सर्व संकल्पना स्पष्ट होतात व विज्ञान विषयात आवड निर्माण होते.



आपण तयार केलेल्या या छोट्या छोट्या प्रयोगातील विविध कल्पना या नवनिर्मितीला जन्म देत असतात त्यामुळे प्रत्येक कल्पना ही अत्यंत महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांची विज्ञान विषयातील गोडी वाढावी त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा याकरिता वेगवेगळ्या प्रयोगांचे प्रत्यक्ष सादरीकरण केले.

यावेळी वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्यासाठी विद्यार्थ्यांनी घ्यावयाची काळजी याबद्दल मार्गदर्शन करत असताना सोळंके यांनी ध्वनीचे प्रसारण, चुंबकीय क्षेत्रात विद्युत निर्मिती, अशा प्रयोगांचे सादरीकरण व सी.व्हि.रमण यांच्या रमण प्रभाव या संशोधनावर प्रकाश टाकला.

यावेळी शाळेतील दोन सत्रातील अनेक विद्यार्थ्यांनी १६२ प्रयोग सादर केले. यामध्ये

पार्थ खांडेकर यांने बनवलेला स्मार्ट हाऊस, शाम साबळे व स्वप्नील मतकर यांचा चारा कुट्टी मशीन, सोहम वाखारकर याने वायरलेस ट्रान्समिशन, श्रद्धा इंगळे हिने अन्नपचन संस्था व स्तवन मिसाळच्या सेफ डिस्टन्स फ्रॉम टीव्ही या प्रयोगानी सर्वांचे लक्ष वेधले.

या अपूर्व विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन नियोजन शाळेच्या विज्ञान विभागाच्या प्रमुख तथा माध्यमिकच्या मुख्याध्यापिका प्रेमला पंडित यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी यावेळी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर गाढवे, सूर्यकांत बेले, अशोक माधवले, मोहन भदाडे, पांडुरंग वाजे, शिवहरी मांटे, सुनीता खरात, अमोल पवार, गजानन दळवी, अर्चना भालेराव, शिवराम गिराम, पल्लवी खरात, सुनील जाधव, पुरुषोत्तम चौरे, कीर्ती खैरे, अनिता जाधव, अंबादास घायाळ, सीमा इंगळे, रामकिसन मोहिते, स्वाती काकडे, विद्या चौधरी, अरुणा मांटे, कांचन वाघ, संदीप वाखारकर, उद्धव वाघ, गायत्री सूर्यवंशी, किशोर शेळके, कल्याणी काळे, नितीन पंडित, संजय खरात, वसंत गाडेकर, तुकाराम चव्हाण आदींनी प्रयत्न केले.

# परतूर येथे आज श्रीराम नवमी निमित्त भव्य शोभायात्रेचे आयोजन

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**परतूर, दि. २५ :** श्रीराम नवमीच्या पावन निमित्ताने प्रल्हादपुर येथे आज गुरुवारी हिंदू एकता दिवस २०२६ उत्साहात साजरा करण्यात येणार असून यानिमित्ताने गुरुवार, दि. २६ मार्च २०२६ रोजी भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही शोभायात्रा यंदा १३ व्या वर्षात पदार्पण करत असून परिसरात मोठ्या उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण म्हणजे अयोध्या येथील श्रीरामलल्ला यांची ८ फूट उंच भव्य बाल स्वरूपातील श्रीमूर्ती असणार आहे. याशिवाय प्राचीन कालीन संबळ पथक, बाहुबली नरसिंह अवतार, भव्य ध्वज पथक, आकर्षक धून, पुष्पवर्षा व दिव्य आतिषबाजी यांसारख्या विविध आकर्षणांची मेजवानी उपस्थितांना अनुभवायला मिळणार आहे.



ही शोभायात्रा दुपारी ३.३० वाजता धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज उड्डाणपूल येथून सुरू होऊन श्री खंडोबा मंदिर (गाव भाग) येथे समारोप होणार आहे. सायंकाळी ५.३० वाजता श्री महादेव मंदिर चौक येथे भव्य महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन समस्त धर्माभिमानी हिंदू बांधव-भगिनी, प्रल्हादपुर (परतूर) यांच्या वतीने करण्यात आले असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

अमरावती, गुरूवार, २६ मार्च २०२६

## थोडक्यात

### क्षुल्लक कारणावरून इसमाला मारहाण

चांदूर रेल्वे : तू ठेकेदाराला माझ्याविरुद्ध भडकावले म्हणून त्याने मला कामावरून काढले, हा राग मनात ठेवत एका युवकाने दुसऱ्याला मारहाण करीत जखमी केले. ही घटना शिवाजी नगर, चांदूर रेल्वे येथे घडली. जखमी आकाश बंडू यादव (२८) याच्या तक्रारीवरून पंकज महादेव यादव (३५) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### दोन अल्पवयीन मुलींना पळविले

अमरावती : जिल्ह्यात एका १४ वर्षीय मुलीसह १७ वर्षीय मुलीला अज्ञाताने फूस लावून पळवून नेले. या घटना मोर्शी व चांदूर रेल्वे पोलीस ठाण्यांतर्गत घडल्यात. मुलींच्या नातेवाईकांच्या तक्रारीवरून संबंधित पोलीस ठाण्यात अज्ञातांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला.

### क्षुल्लक कारणावरून हाणामारी

चांदूर बाजार : कुलर दुरुस्तीसाठी टाकण्याकरिता रिक्षा हवा होता. त्यासाठी फिर्यादी गजानन बोंद्राजी गणेशकर (४०) हे शिरजगाव बंड येथे गेले. तेथे विलास गोविंदराव नांदणे (४०) व गोपाल गोविंदराव नांदणे (४५) यांनी रिक्षा नेवू नको या कारणावरून फिर्यादीला मारहाण करीत जखमी केले. ही घटना जमापूर शिरजगाव येथे घडली. फिर्यादीच्या तक्रारीवरून चांदूर बाजार पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### भांडण सोडवण्यास जाणे पडले महागात

तिवसा : तालुक्यातील तळेगाव ठाकूर येथे दोघांचे भांडण सुरू होते त्यात मध्यस्थी करण्यासाठी फिर्यादी संदीप बाबाराव थोरात (४४) गेले. मात्र त्यांना ते महागात पडले. अमोल रघुनाथ चौधरी (२२) याने राफ्टरने त्यांच्या डोक्यात मारले. त्यात त्यांना गंभीर दुखापत झाली. त्यांच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तिवसा पोलिसांनी युवकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### जबरदस्ती गर्भपात करणाऱ्यावर गुन्हा दाखल

अंजनगाव सुर्जी : सासरचे सतत हुंड्यासाठी विवाहितेमागे तगादा लावत होते. त्यातच ती गर्भवती राहिली. बाळ नको असलेल्या सासरच्यांनी तिची कोणतीही परवानगी न घेता गर्भपात केला. शिवाय तिचा शारीरिक व मानसिक छळही सुरू केला. त्यामुळे तिच्या आरोग्यासह जीविताला धोका निर्माण झाला. विवाहितेच्या तक्रारीवरून अंजनगाव पोलिसांनी शेख वहिद शेख हमीद (३२) व अन्य दोघे जण यांच्यावर गुन्हा नोंदवला.

### गोठ्यातून बकऱ्यांसह बोकडांची चोरी

वरुड : उदापूर येथे गोठ्यात बकऱ्यांसह बोकडही बांधलेले होते. अ-ताने त्यातील काही बकऱ्या व बोकड चोरून नेले. त्यांची अंदाजे किंमत १ लाख ४० हजार रुपये आहे. पशुपालक चंद्रभान हरीभाऊ उबाळे (६५) यांच्या तक्रारीवरून वरुड पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### घरगुती कारणावरून पत्नीला मारहाण

चांदूर बाजार : दारू पिऊन आलेला पती तू माझ्या बहिणीसोबत का बोलत नाही? तुझ्यामुळे ती घरी येत नाही असे म्हणून पत्नीला शिवीगाळ केली. सोबतच कुऱ्हाडीच्या दांड्याने मारहाण करीत जखमी केले. ही घटना विश्रोळी येथे घडली. पत्नीच्या तक्रारीवरून ब्राह्मणवाडा थडी पोलिसांनी पती, एकनाथ दशरथ लोखंडे (३३) याच्याविरुद्ध दुखापतीचा गुन्हा नोंदवला.

# कोट्यवधींच्या पाण्याचा खेळ! कागदावरच मुरला 'जलजीवनचा' भ्रष्ट मेळ!

## मेळघाटात पाण्यासाठी पाण्यासारखा पैसा खर्च, तरी टँकरचाच आधार

अजिंक्य भारत | भारत वरठे

**धारणी, दि.२५ :** मेळघाटातील चिखलदरा तालुक्यात जलजीवन मिशन अंतर्गत राबविण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजना भ्रष्टाचाराचे नमुनेदार उदाहरण ठरत आहेत. पिण्याच्या पाण्यासाठी शासनाने पाण्यासारखा पैसा खर्च केला, मात्र प्रत्यक्षात ग्रामस्थांना थेंबभर पाणीही मिळाले नाही. अधिकारी आणि कंत्राटदारांनी संगनमत करून हा सर्व खेळ चालविल्याचे समोर येत असून, या महाघोटाळ्यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

राज्यात सर्वाधिक टँकर याच तालुक्यात लागतात, ही वस्तुस्थिती असताना दुसरीकडे कोट्यवधी रुपये खर्चुन उभारलेल्या योजना केवळ कागदावरच कार्यान्वित दिसतात. अजिंक्य भारतने या भ्रष्टाचाराचे वृत्त प्रकाशित करताच दोषी अधिकारी आणि कंत्राटदारांचे धाबे दणाणले. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ६६ राहुल येवले यांनी केली. हतरू भागातील २० ते २५ गावांपैकी ८० टक्के गावांमधील पाणीपुरवठा योजना आजघडीला पूर्णपणे बंद आहेत. त्यामुळे





पाण्यासाठी आदिवासी बांधवांना उन्हाळ्यात मोठी कसरत करावी लागत असल्याचे चित्र पहायला मिळते.

कोट्यवधी रुपये खर्च करूनही अनेक टाकीत पाण्याचा थेंबही पोहोचलेला नाही. निधी खर्च होऊनही मेळघाटातील जनतेची तहान भागलेली नाही. याउलट भ्रष्टाचाराचे पाणीच या योजनांमध्ये अधिक मुरल्याचे भीषण वास्तव समोर आले आहे. आता यावर वरिष्ठ प्रशासन काय कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

चिलाटी येथे चक्क जुन्याच टाकीला केवळ रंगरंगोटी करून नवीन असल्याचे भासवले गेले. ही टाकी आता अत्यंत जीर्ण झाली

> पिण्याच्या पाण्यासाठी कोट्यवधी रुपयाचा खर्च झाला. मेळघाटात मनमर्जी कामे करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणाच्या चौकशी करुन योग्य ती कारवाईची मागणी केली आहे.
> **– राहुल येवले, जिल्हाध्यक्ष, युवक काँग्रेस,**

असून, ती हलत असल्याने कधीही कोसळण्याची भीती निर्माण झाली आहे. सरवारखेडा – येथील पहिल्या ३ टाकीत आजपर्यंत एक दिवसही पाणी चढले नाही.

तरीही तिथे दूसरी टाकी बांधण्यात आली. आता दोन्ही टाक्या कोरड्या असून, गावाला थेंबभर पाणी मिळालेले नाही. रुईपठार – येथे सन २००० मध्ये बांधलेल्या जुन्या टाकीतून मेळघाट मित्रच्या माध्यमातून पाण्याची सोय केली होती. असे असतानाही शासनाने नवीन टाकी बांधून डोमीवरून पाइप लाइन टाकली. मात्र, नवीन योजनेतून एक थेंबही पाणी आले नाही. कुही व सिमोरी – कुही येथे दोन टाक्या असूनही पाणीपुरवठा पूर्णपणे ठप्प आहे, तर सिमोरी येथे नवीन टाकी बांधून तयार आहे; पण आजपर्यंत या टाक्यांमध्ये पाण्याचा टिपूसही आलेला नाही.

# शहरवासीयांचे बिबट्यापासून संरक्षण करण्यासाठी उपाययोजना करा

## आ. सुलभा खोडके यांची विधानसभेत मागणी

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.२५ :** अमरावती शहरी भागात बिबट्याने संचार केल्याच्या घटना वारंवार समोर येत आहे. शहरालगत असलेल्या वडाळी वनपरिक्षेत्रातही बिबट्या शहरात भटकंती करत असल्याने वडाळी, विद्यापीठ, तपोवन परिसर, मंगलधाम परिसर, एसआरपीएफ कॅम्प, जुना बायपास भागातील नागरिकांमध्ये दहशत पसरली आहे. बिबट्यापासून मानवी जीवितास धोका पोहोचू नये म्हणून शासनाची काय उपाययोजना आहे? व यासंदर्भात वनविभागाला निर्देशित करण्यात आले आहे का ? असा प्रश्न अमरावती विधानसभा मतदार संघाच्या आमदार आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी राज्यविधिमंडळातून उपस्थित केला. यावेळी आमदार सौ.सुलभाताई खोडके यांनी सभागृहासमक्ष सांगितले कि, अमरावती शहराच्या लगतच वडाळी वनपरिक्षेत्र व पोहरा जंगल असून या भागात बिबट्याच्या मोठा अधिवास आहे. या वनपरिक्षेत्रात बिबट सह इतरही वन्यजीव हे अन्न –पाणीच्या शोधात शहराकडे भटकंती करत असून त्यांनी रहिवाशी भागातील पाळीव जनावरे फस्त केल्याच्याही घटना समोर आल्या आहेत. शहरालगतच्या वडाळी, विद्यापीठ, तपोवन परिसर, मंगलधाम परिसर, एसआरपीएफ कॅम्प, जुना बायपास भागात बिबट्याने शिरकाव केल्याचे सुद्धा सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाले आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये दहशत निर्माण झाली आहे. मंगलधाम परिसरात तर बिबट्याच्या दहशतीमुळे कुणीही सायंकाळी ६ नंतर घराबाहेर पडत नसून ऑटो –रिक्षा देखील मिळत नाही. अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अमरावती शहरालगतच्या परिक्षेत्रातील बिबट्यांना वेळीच मज्जाव न घातल्यास ते शहराच्या मध्यवस्तीपर्यंत पोहोचतील, असे



अनेकदा समोर आले आहे. दोन वर्षांपूर्वी बिबट्याने चक्क व्हीएमव्ही परिसर व पुंडलिकबाबा नगर, पाठपुस्तक मंडळ पर्यंत शिरकाव करून धुमाकूळ घातला होता. याबाबतसुद्धा आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी सभागृहाला अवगत करून वनमंत्री ना. गणेश नाईक यांचे लक्ष वेधले. बिबट्या शहरालगतच्या जंगल भागातून भटकंती करत अन्नाच्या शोधात शहरात येत असल्याने त्याच्या मूळ वास्तव्याच्या ठिकाणी म्हणजेच शहरालगतच्या जंगल भागाला चैनलिंग फेन्सिंग करणे आवश्यक आहे. अशी सुचना सुद्धा आमदार महोदयांनी सभागृहासमक्ष केली. याकडे सुद्धा गंभीरतेने लक्ष देण्याची गरज असल्याचे आमदार महोदयांनी सभागृहात सांगितले. पोहरा –वडाळी वनपरिक्षेत्रातील बिबट्या व अन्य वन्यजीव शहराकडे येणार नाही व वन्यजीवांपासून मानवी जीवितास धोका पोहोचवू नये, यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना करण्यात आल्या ? तसेच वनविभागाला तसे दिशा निर्देश देण्यात आले का ? असा प्रश्न आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी विधानसभेतून उपस्थित केला.

# पेट्रोल व गॅससाठी नागरिकांची झुंबड

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, दि.२५ :** धामणगाव शहरात सध्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर पेट्रोल व गॅस सिलेंडरचा तुटवडा निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात असल्याने नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे पेट्रोल पंप तसेच गॅस एजन्सीसमोर नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. मंगळवारी रात्री उशिरापर्यंत शहरातील विविध पेट्रोल पंपांवर पेट्रोल भरण्यासाठी नागरिकांनी तुफान गर्दी केली होती. अनेक वाहनधारकांनी आपल्या गाड्यांमध्ये पेट्रोल भरून घेतले, तर काही नागरिकांनी अतिरिक्त साठा करण्यासाठी डबे, कॅन आदी भांडी घेऊन पेट्रोल घेण्यासाठी रांगा लावल्या होत्या. त्यामुळे काही ठिकाणी पेट्रोल पंपांवर लांबच लांब रांगा लागल्याचे दृश्य दिसून आले. दरम्यान, बुधवारी सकाळी





शहरातील गॅस एजन्सीसमोरही सिलेंडर घेण्यासाठी नागरिकांची मोठी रांग लागल्याचे दिसून आले. संभाव्य तुटवड्याच्या भीतीने अनेकांनी आधीच गॅस सिलेंडर घेण्यासाठी एजन्सीकडे धाव घेतली. या पार्श्वभूमीवर शहरात पेट्रोल व गॅस सिलेंडरचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून प्रशासनाने नागरिकांनी घाबरून जाऊ नये व अनावश्यक साठा करू नये, असे आवाहन करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# फुगा फुटला! लक्ष्मी गॅस एजन्सीला कुलूप

## संतप्त ग्राहकांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.२५ :** शहरात गॅसचा कोणताही तुटवडा नसल्याचा दावा जिल्हा पुरवठा विभागाने केला खरा, मात्र अवघ्या २४ तासांत या दाव्याची अक्षरशः पोलखोल झाली आहे. रुक्मिणी नगर येथील लक्ष्मी गॅस एजन्सीच्या संचालकाने मंगळवारपासून कार्यालयाला कुलूप लावून पोबारा केल्याने संतप्त ग्राहकांनी बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर धाव घेतली. या प्रकारामुळे प्रशासकीय यंत्रणेच्या नियोजनावर आता मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लक्ष्मी गॅस एजन्सीच्या ग्राहकांना गॅस वितरणाचे मेसेज आले होते. त्यानुसार बुधवारी सकाळी १० वाजेपासून शेकडो ग्राहक एजन्सीवर पोहोचले. मात्र, मंगळवार



दुपारपासूनच एजन्सीचे शटर बंद करून मॅनेजर फरार झाल्याचे दिसून आले. हक्काचा गॅस मिळत नसल्याने आणि अधिकारी दाद देत नसल्याने ग्राहकांचा पारा चढला. संतप्त नागरिकांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालय गाठून प्रशासनाकडे जाब विचारला.प्रकरणाचे गांभीर्य ओळखून अन्नधान्य वितरण अधिकारी प्रवीण राऊत आपल्या ताफ्यासह तातडीने घटनास्थळी दाखल झाले. यावेळी ग्राहकांनी अधिकाऱ्यांसमोरच जोरदार घोषणाबाजी करत आपला रोष व्यक्त केला.

अखेर वाढता तणाव पाहता, पोलीस बंदोबस्तात एजन्सीच्या बंद शटरचे कुलूप उघडण्यात आले.विशेष म्हणजे, शहरात गॅस पुरवठा सुरळीत असल्याचे स्पष्टीकरण जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी कालच दिले होते. मात्र, एका एजन्सीने हजारो ग्राहकांना वेठीस धरल्याने प्रशासनाचा हा दावा फोल ठरला आहे. गॅस एजन्सीच्या या मुजोरीमुळे सामान्यांचे हाल होत असून, संबंधितांवर कडक कारवाई करण्याची मागणी आता जोर धरत आहे.

**घोटाळा** खा.बळवंत वानखडे यांनी घेतली दखल

# ईपीएफमध्ये फ्रॉड; दोन कोटींच्या दंडाची फाइल गायब?

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.२५ :** महापालिकेत कंत्राटी अभियंते, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांची मासिक वेतनावर बाह्यस्त्रोताद्वारे सन २०२२ पासून सेवा घेण्यात येत आहे. मात्र कंत्राटदार एजन्सीने कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी (ईपीएफ) त्यांच्या खात्यात जमा केले नसल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली. त्यामुळे आयुक्तांनी दोन कोटींचा दंड कंत्राटदारांवर आकारला होता. कारणे दाखवा नोटीस बजावली होती. त्यांचे खुलाशे प्राप्त झालेत. पण याप्रकरणी पुढे कोणते चक्र फिरले, हे कोणालाही कळू शकले नाही. ना कंत्राटदारांचे देयके गाठवले, ना बँक वारंटी जप्त करण्यात आली. कर्मचाऱ्यांचे ईपीएफ फ्रॉड कायम असून, दंडाची फाइल गेली कुठे याचा थांगपत्ता नाही, हे विशेष. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी दि.२६ फेब्रुवारी २०२६ रोजी बजावलेल्या आदेशानुसार मे. ईटकॉन्स सोलुशन्स प्रा. लि. यांना लेखापरीक्षणाचा आधार घेत कर्मचारी वेतनातून जीएसटी, आयकर आणि कार्यालयीन खर्चाची रक्कम




कपात आल्याचा ठपका ठेवण्यात आला.

खुलासा समाधानकारक नसून कर्मचाऱ्यांची आर्थिक पिळवणूक होत असल्याप्रकरणी लेखापरीक्षणात परिगणनानुसार अपहार आणि फरकाची १,५६,७९,८८२ एवढ्या रकमेचा भरणा तीन दिवसांत महापालिकेत जमा करावा, अन्यथा देयके गोठविली जातिल व बँक वारंटी जप्त करण्यात येईल, संस्थेला काळ्या यादीत टाकले जाईल असा निर्वाणीचा इशारा देण्यात आला होता.मे. महात्मा फुले मल्टी सर्व्हिसेस प्रा. लि. परभणी शाखा अमरावती यांना सुद्धा ३९,९५,५६० रुपयांचा भरणा तीन दिवसांत करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र दंड आकारणीची फाइल कुठे गेली, याचा शोध घेणार कोण? हा प्रश्न निरुत्तरित आहे.महापालिकेत कंत्राटी कर्मचाऱ्याच्या ईपीएफमध्ये फ्रॉड झाल्याबाबतची तक्रार युवक काँग्रेसचे समीर जवंजाळ यांनी केली होती. या तक्रारीची दखल खासदार बळवंत वानखडे यांनी घेत या प्रकरणाची चौकशी करून अहवाल पाठविण्याचे प्रशासनाला कळविले होते. मात्र महापालिकेत याबाबत केवळ टाईमपास सुरु आहे. आयुक्तांनी याप्रकरणी कोणतीही कारवाई करू नये, यासाठी राजकीय दबाव आल्याची माहिती आहे. त्यामुळे ही राजकीय व्यक्ती कोण? हा संशोधनाचा विषय आहे. खासदार बळवंत वानखडे यांनी दि. २१ नोव्हेंबर २०२४ रोजी महापालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या नावे पत्र देत अमरावती महापालिका अंतर्गत स्वच्छता व इतर कामगार संस्था कार्यरत आहेत. सदर संस्था त्यांच्याकडे काम करणाऱ्या स्वच्छता व इतर कामगारांचा भविष्य निर्वाह निधी तथा कामगार विमा भरत नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच

> कंत्राटी कर्मचाऱ्यांचे एजन्सीने ईपीएफ न भरल्याप्रकरणी स्थिती जैसे थे आहे. एजन्सीला कारणे दाखवा नोटीस बजावली होती. मध्यंतरी आयुक्तांनी दंड आकारला होता, पण ही फाइल पुन्हा आयुक्तांकडेच आहे.
> **– ॲड. श्रीकांतसिंह चव्हाण, सामान्य प्रशासन, महापालिका**

अमरावती महानगरपालिकांतर्गत कार्यरत स्वच्छता व इतर कामगारांना वेतन कायद्यानुसार वेतन देण्यात येत नसून पूर्ण कामाचे अर्धवेतन देण्यात येत आहे. याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल देण्यात यावा, असे कळविले होते. दि. १ एप्रिल २०२५ रोजीच्या पत्रान्वये याप्रकरणी चौकशी करणेबाबत आदेशीत केले होते.

त्याअनुषंगाने दि. १८ जुलै २०२५ रोजी महापालिकेत चौकशी करण्यात आली. परंतु चौकशीची कोणतीही माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली नाही, अशी नाराजी खासदार बळवंत वानखडे यांनी प्रशासनावर व्यक्त केली आहे.

# तीन हाफ मर्डरमध्ये चार तरुण जखमी

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.२५ :** वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत प्राणघातक हल्ल्याच्या घटना घडल्याने खळबळ उडाली आहे. या हाफ मर्डरमध्ये चार तरुण गंभीर जखमी झाले असून या घटना गुन्हेगारी प्रवृत्तीचा वाढता प्रभाव अधोरेखीत करीत आहेत. गाडगे नगर, नांदगाव पेठ आणि फ्रेजरपुरा या भागात घडलेल्या घटनांमध्ये जुनी वैमनस्य आणि प्रेमप्रकरणातून टोळीयुद्धाचा थरार दिसून आला या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हल्लेखोर फरार असून त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिस पथके रवाना झाली आहेत. विविध पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करून तपास सुरू असून टोळीयुद्ध आणि वैयक्तिक वादातून वाढलेल्या हल्ल्यामुळे नागरिकांची चिंता वाढली आहे. या घटनांमुळे अमरावतीत पुन्हा एकदा शहरातील सुरक्षा व्यवस्था प्रश्नाखाली आली असून, या घटनांनी प्रशासनाचे गतीशीलतेवर गंभीर सवाल उपस्थित केला आहे. संतोषी नगर परिसरात जुन्या वादातून मयूर किशोर सोळंके (२१) याच्यावर




२-३ जणांनी चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात सुनील राठोड आणि अनूप नावाचे संशयित सहभागी असल्याचे पोलिसांनी सांगितले. मयूर हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्याला शहरातून तडीपार करण्यात आले होते; त्याच्यावर हा जीवघेणा हल्ला झाल्याने प्रशासनाच्या गंभीरतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले.गुणवंतवाडी परिसरात विशाल राजकुमार शिरमये (१७) व प्रथमेश दिलीपराव ठाकरे (१८) यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी धारदार शस्त्रांनी हल्ला केला. प्राथमिक तपासानुसार हा हल्ला प्रेमप्रकरणातून झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. दोघांना तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले, नंतर त्यांना खासगी रुग्णालयात हलवण्यात आले.यशोदा नगर परिसरात राहुल धर्माळे आणि त्याचे मित्र अंशू व यश यांनी किसन दिवाकर (२७) यावर चाकूने हल्ला केला. हा हल्ला आरोपींच्या भावाशी झालेल्या वादातून झाला.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, गुरूवार,२६ मार्च २०२६



## थोडक्यात

### महिलेच्या गळ्यातून सोनसाखळी लंपास

अंजनगाव सुर्जी : एका धार्मिक कार्यक्रमात जेवण करण्यासाठी गेलेल्या महिलेच्या गळ्यातील २० ग्रॅमची सोनसाखळी अज्ञाताने चोरून नेली. तिची अंदाजे किंमत १ लाख ८ हजार रुपये आहे. ही घटना विठ्ठल मंदिर, पानअटाई येथे घडली. महिलेच्या तक्रारीवरून अंजनगाव पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### हिरुळपुर्णा येथे वाळू चोरट्यांवर कारवाई

चांदूर बाजार : हिरूळपुर्णा येथील पुर्णा नदीच्या पात्रात जेसीबीने वाळूचे उत्खनन करणाऱ्यांवर चांदूर बाजार पोलिसांनी कारवाई केली. त्यांच्या ताब्यातून एक ब्रास वाळू, जेसीबी (एमएच २७-डीएल ०८४४) व विना क्रमांकाचा ट्रॅक्टर ट्रॉली असे एकूण २४ लाख ५ हजारांचे साहित्य जप्त केले, तर जेसीबी चालक मोहम्मद हुसेन मोहम्मद सकीम (२२), जेसीबी मालक अमोल विश्वासराव कुकडे (३९) यांच्यासह आशिष रमेश शिवारे (३०), मारोती साहेबु मुडे (४५) व आशिष वासुदेवराव तायडे (२५) यांच्यावर गुन्हे नोंदवले.

### सायखेडा येथे हजारोंची घरफोडी

चांदूर बाजार : सायखेडा येथे अज्ञाताने घराचा कुलूप कोंडा तोडून रोख १० हजारांचा एकूण ५० हजारांचा ऐवज चोरून नेला. या संदर्भात सुरज रघुनाथ मनोहरे (३०) यांच्या तक्रारीवरून शिरजगाव कसबा पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. या घटनेचा पुढील तपास चांदूर बाजार पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली चांदूर बाजार पोलीस करीत आहे.

### अपघातात एकाचा मृत्यू

मोर्शी : डोंगर यावली येथे दुचाकी झाडावर धडकल्याने एकाचा मृत्यू झाला. मनीष वरठी (२५, रा. पंढरी, ता. वरुड) असे मृतकाचे नाव आहे. अमरावती येथे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. मोर्शी पोलिसांनी मृतकावर गुन्हा दाखल केला.

### दारू पिण्यास पैसे न दिल्याने मारहाण

अचलपूर : परिचिताने वृद्धाला दारू पिण्यासाठी पैसे मागीतले. मात्र त्याने पैसे नसल्याचे सांगीतले. त्याचा राग आल्याने पैसे मागणाऱ्याने काठीने त्याला मारहाण करीत जखमी केले. शिवीगाळ करीत मारण्याची धमकी दिली. त्यात मारोती झांगरू कास्देकर (६०) जखमी झाले. ही घटना तळेगाव मोहना येथे घडली. वृद्धाच्या तक्रारीवरून सरमसपुरा पोलिसांनी सुरेश अजु बेठेकर (४५) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### परतवाड्यात दुकानासमोरून दुचाकीची चोरी

अचलपूर : आठवडी बाजारातील नरसिंह मंदिर परिसरातील दुकानासमोर भरत सुभाष बहोरीया (२९, रा. अचलपूर) यांनी दुचाकी उभी केली होती.

काम आटोपून ते परत आले असता, दुचाकी दिसून आली नाही. अज्ञाताने ती चोरून नेली. त्यांच्या तक्रारीवरून परतवाडा पोलिसांनी अज्ञात दुचाकी चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### चारचाकीच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

अमरावती : उपचारार्थ दवाखान्यात जाणाऱ्या एकाला मागून भरधाव आलेल्या चारचाकीने धडक दिली. त्यात दुचाकीस्वार जखमी झाला असून त्याच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही घटना बडनेरा मार्गावरील मंत्री मोटर्ससमोर घडली. राजापेठ पोलिसांनी चारचाकीच्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# मेळघाटला 'ताडोबा'च्या धर्तीवर चालना द्या!

## आमदार रवी राणा यांची विधानसभेत मागणी

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.२५ :** राज्याच्या सर्वांगीण आर्थिक विकासात पर्यटन हा महत्त्वाचा आधारस्तंभ ठरू शकतो. कोकण व पश्चिम महाराष्ट्रा प्रमाणेच विदर्भालाही पर्यटनाच्या नकाशावर अग्रक्रम मिळाला पाहिजे, अशी ठाम भूमिका आमदार रवी राणा यांनी सोमवारी विधानसभेत मांडली. विशेषत: मेळघाट व्याघ्र प्रकल्प या निसर्गरम्य व वनसंपन्न पट्ट्यात जंगल सफारी, पायाभूत सुविधा आणि आधुनिक पर्यटन प्रकल्प विकसित केल्यास स्थानिक आदिवासी बांधवांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सभागृहात बोलताना राणा यांनी सांगितले की, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प येथे राज्य सरकारने पर्यटनाच्या माध्यमातून केलेल्या नियोजनबद्ध विकासामुळे देश-विदेशातून पर्यटक मोठ्या प्रमाणात आकर्षित होत आहेत. परिणामी स्थानिकांच्या आर्थिक स्थितीत लक्षणीय सुधारणा झाली असून



रोजगारनिर्मितीला चालना मिळाली आहे. याच धर्तीवर मेलघाट परिसरातील चिखलदरा, सेमाडोह, कोल्कास या भागांत जंगल सफारी, पर्यटन निवासव्यवस्था, सुरक्षित रस्ते आणि मूलभूत सुविधा उभारण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ताडोबा परिसरातील पर्यटन विकासासाठी घेतलेल्या पुढाकाराचे कौतुक करत विदर्भातील इतर जिल्ह्यांतही 'वनतारा'सारखे आधुनिक पर्यटन प्रकल्प उभारण्याची मागणी राणा यांनी केली. अशा उपक्रमांमुळे विदर्भाची जागतिक पर्यटन नकाशावर स्वतंत्र ओळख निर्माण होईल, असा दावा त्यांनी केला. याचबरोबर धार्मिक पर्यटनाच्या मोठ्या क्षमतेकडेही त्यांनी लक्ष वेधले. संत गाडगेबाबा समाधी मंदिर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाधी स्थळ, रिद्धपूरसारखी तीर्थक्षेत्रे, बुद्धभूमी येथे उभारली जात असलेली भव्य गौतम बुद्ध मूर्ती तसेच ब्रह्मकुमारी आश्रम यांचा एकात्मिक विकास केल्यास पर्यटनाला नवे आयाम मिळू शकतात. या ठिकाणी पायाभूत सुविधा, माहिती केंद्रे आणि निवासव्यवस्था उभारल्यास भाविक व पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढेल, असे त्यांनी नमूद केले. अमरावतीतील ऐतिहासिक खापर्डे वाडा येथे संत गजानन महाराजांशी संबंधित वस्तूंचे संग्रहालय उभारल्यास शहराला धार्मिक-ऐतिहासिक पर्यटन केंद्र म्हणून नवी ओळख मिळू शकते, असेही त्यांनी सुचविले.

दरम्यान, पर्यटनवाढीसोबत सुरक्षिततेच्या उपाययोजनांवर भर देणे आवश्यक असल्याचे सांगताना मेलघाट घाटमार्गावरील अपघातांचा उल्लेख करत रस्ते सुधारणा, आपत्कालीन सेवा आणि पर्यटकांसाठी मार्गदर्शक व्यवस्था निर्माण करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. याशिवाय राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सुरू असलेल्या कारवाईचे स्वागत करत आमदार राणा यांनी अमरावती पोलिसांनी एमडी ड्रग्ससारख्या अंमली पदार्थांविरोधात केलेल्या मोठ्या कारवाईचे सभागृहात कौतुक केले. विशेषत: मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच शहर पोलीस आयुक्त राकेश ओला आणि गुन्हे शाखेच्या पथकाचे त्यांनी अभिनंदन केले. युवकांना व्यसनमुक्त ठेवण्यासाठी अशा मोहिमा सातत्याने राबवण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## धम्ममय वातावरणात बहरले परिवर्तनवादी कवी संमेलन



अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.२५ :** बी. आर.ए.नवयुवक मंडळ, रमाई महिला मंडळ,बोधिवृक्ष महिला मंडळ, समता सैनिक दल यांच्या संयुक्त विद्यमाने, २१ , २२ मार्च रोजी दोन दिवसीय धम्म परिषदेचे आयोजन खरडगाव ( खळना ) येथे करण्यात आले होते.शनिवार २१ मार्च रोजी ,दुसऱ्या सत्रात प्रमुख अतिथी शब्दास्त्र प्रमुख प्रवीण कांबळे,विद्रोही अविनाश गोंडाने,प्रा.देवानंद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच कवी संमेलनाचे अध्यक्ष कवी पद्माकर मांडवधरे यांच्या अध्यक्षतेखाली परिवर्तनवादी कवी संमेलन पार पडले.या पार पडलेल्या परिवर्तनवादी कवी संमेलनात सहभागी विदर्भातील प्रख्यात वऱ्हाडी कवी रमेश राऊत यांनी गतकाळातल्या परिस्थितीचा वेध घेणारी, तेच्यावर झाकून तुया बापाचं फाटक धोतर हाय रे अशी आशयपूर्ण कविता सादर केली.कवी रिजवान शेख यांनी,बाबासाहाब महान ही कविता सादर करताच टाळ्यांचा गजर झाला.कवयित्री कांताबाई सोनोने यांनी पेनाची तलवार ही सुंदर कविता गाऊन सादर केली.जेष्ठ कवी ठवरे गुरुजी यांच्या, धम्मधर व्हा या कवितेने मानवी मनाला उजळण्याचा प्रयत्न केला.कवी का. स.राठोड, ज्ञानेश्वर राठोड यांनी आशयपूर्ण कविता सादर केल्या.यावेळी प्रमुख अतिथी विद्रोही अविनाश गोंडाने यांनी धम्म परिषदेचे महत्व विषद करून, दाटून खूप आले ढग आकाशात आता ही मार्मिक गझल सादर केली.

## शहीद भगतसिंग सुखदेव आणि राजगुरू यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण




**चांदुर रेल्वे, दि.२५ :** चांदुर रेल्वे येथे भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने शहीद भगतसिंग सुखदेव व राजगुरू यांना विनम्र अभिवादन करून त्यांच्या जीवनचरित्र प्रकाश टाकून युवकांपुढे आदर्श ठेवला १९३१ मध्ये देशाची ब्रिटिश सत्तेविरुद्ध व परिस्थितीनुसार क्रांती घडली. त्या क्रांतीला प्रतिउत्तर म्हणून क्रांतिकारक शहीद भगतसिंग राजगुरू सुखदेव यांनी २३ मार्च १९३१ ला लाहोर तुरुंगात हसत हसत फाशी स्वीकारली आमचे जीवन देशाला समर्पित केले. व आजच्या तरुणापुढे एक आदर्श घडवण्याचं काम शहीद भगतसिंग राजगुरू सुखदेव यांनी केले.

## समाजाने मराठा विवाह मंडळाच्या कार्याचा लाभ घ्यावा

### उपवर युवक-युवती व पालक परिचय मेळाव्यात रणजीत बंड यांचे आवाहन

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.२५ :** आजच्या काळात विवाह जुळविणे कठीण होऊन बसले असून नोकरीसाठी दूरवर गेलेल्या मुलामुलींचे विवाह जुळविण्यासाठी आणि पर्यायाने त्यांना आपल्या शहराशी जुळलेले राहण्यासाठी विवाह मंडळांची आवश्यकता आहे, ही बाब ओळखून मराठा विवाह मंडळ हे गेल्या ३५ वर्षापासून निस्वार्थपणे काम करत असून समाजाने या मंडळाचा लाभ घ्यावा आणि या विवाह मंडळाला सर्व ते सहकार्य करावे, असे आवाहन अस्पा बंड सन्सचे मुख्य कार्यपालन अधिकारी रणजीत बंड यांनी केले. स्थानिक मराठा विवाह मंडळ व वाचनालय




यांच्या वतीने सुयोग मंगल कार्यालय, रूक्मिणी नगर येथे आयोजित उपवर युवक-युवती व पालक परिचय मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. मंडळाचे अध्यक्ष माजी कुलगुरू डॉ.गणेश पाटील यांच्या अध्यक्षतेत आयोजित या मेळाव्याला प्रा.डॉ.विनायक भटकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.मंडळाचे उपाध्यक्ष डॉ.बी.आर.देशमुख, एकनाथराव भडांगे, प्रा.दिनकर राऊत, गोवर्धन दिवाण, सौ.नयनाताई गावंडे यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.बदललेल्या परिस्थितीनुसार आपल्याला बदल करणे आवश्यक असून मराठा विवाह मंडळ जे कार्य करीत आहे ते अधिक जोमाने चालले पाहिजे आणि त्यासाठी सर्वांनी सहकार्य केले पाहिजे,असे आवाहन प्रमुख अतिथी प्रा.डॉ.विनायक भटकर यांनी केले.मंडळाचे अध्यक्ष माजी कुलगुरू डॉ.गणेश पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून सर्व समाजाकडून सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली.मंडळाचे ज्येष्ठ उपाध्यक्ष डॉ.बी.आर.देशमुख यांनी आपल्या प्रास्ताविकातून मंडळाच्या कार्याची माहिती दिली.

## मनपा उच्च प्राथमिक व माध्यमिक जेवड शाळेचे भूमिपूजन

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती,दि.२५ :** बडनेरा मतदार संघातील प्रभाग क्र. २०, सुतगिरणी परिसरात ८५ लक्ष रुपयांच्या निधीतून उभारण्यात आलेल्या मनपा उच्च प्राथमिक व माध्यमिक जेवण शाळेचे उद्घाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या शाळेचे भुमीपुजन आमदार रवि राणा यांच्या हस्ते करण्यात आले.या नव्याने उभारलेल्या शाळेमुळे परिसरातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच स्वच्छ व सुरक्षित वातावरणात जेवणाची सुविधा उपलब्ध होणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस चालना मिळणार असून पालकांमध्येही समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.या उद्घाटन प्रसंगी राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे, महापौर श्रीचंद तेजवानी, उपमहापौर सचिन भेंडे,



नगरसेविका सुमती ढोके, शारदा मंगेश खोंडे, डॉ. राजेंद्र तायडे तसेच मंगेश खोंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी अशा सुविधा अत्यंत आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.माझ्या बडनेरा मतदार संघातील प्रत्येक विद्यार्थ्याला उत्तम शिक्षण व आवश्यक सुविधा मिळाव्यात, हा माझा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. सुतगिरणी परिसरात उभारण्यात आलेली ही मनपा उच्च प्राथमिक व माध्यमिक जेवड शाळा विद्यार्थ्यांसाठी एक मोठी सुविधा ठरणार आहे. तसेच ८५ लक्ष रुपयांच्या निधीतून साकारलेला हा प्रकल्प विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरेल. शिक्षणासोबतच पोषणही तितकेच महत्त्वाचे आहे, याची जाणीव ठेवून ही सुविधा निर्माण करण्यात आली आहे.यापुढेही बडनेरा मतदार संघात शिक्षण, आरोग्य व पायाभूत सुविधा या क्षेत्रात अधिकाधिक विकासकामे करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडवणे हेच माझे ध्येय असल्याचे राणा म्हणाले.

## शिवशक्ती क्रीडा मंडळातर्फे रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**बेनोडा,दि.२५ :** डॉ. चौधरी स्त्रीरुग्णालय व वैष्णवी बालरुग्णालय, समाज प्रबोधन मंच, वरुड आणि शिवशक्ती क्रीडा मंडळ, जामगाव खडका तसेच अखिल माकोडे मित्र परिवार यांच्या संयुक्त नियोजनात लाईफ लाईन ब्लड सेंटर, नागपूर यांच्या सहकार्याने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.या रक्तदान शिबिरात ४५ तरुणांनी रक्तदान करत आपली सामाजिक भूमिका पार पाडली.वरुड पोलीस स्टेशन चे एपीआय श्रीकांत विखे, पोलीस कॉस्टेबल किरण दहिवडे,पोलीस कॉस्टेबल सागर लेवरकर यांनी या शिबिराला सदिच्छा भेट दिली.



क्रीडा क्षेत्रात सक्रिय असलेल्या या मंडळाने समाजसेवेचा आदर्श ठेवत हा उपक्रम राबवून एक सकारात्मक संदेश दिला.मैदानी खेळांसोबतच सामाजिक व मानवीय दृष्टिकोन जपत या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान हे सर्वोत्तम दान मानले जाते, या भावनेतून अनेक युवक, ग्रामस्थ व क्रीडाप्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. शिबिरामध्ये रक्तदात्यांची तपासणी करून सुरक्षित पद्धतीने रक्त संकलन करण्यात आले.

या उपक्रमामुळे गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होण्यास मदत होणार असून समाजात रक्तदानाबाबत जागरूकता वाढविण्याचा हेतू साध्य झाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे पदाधिकारी, स्वयंसेवक व लाईफ लाईन ब्लड सेंटरच्या वैद्यकीय टीमने विशेष परिश्रम घेतले. यावेळ शिवशक्ती क्रीडा मंडळ सदस्य तुषार घोंगडे, पंकज वानखडे,राहुल शिवारे, चेतन गावंडे,महेश घोंगडे, चंद्रशेखर काळमेघ, रुपेश शेंबेकर, मयूर गावंडे, रोशन वानखडे, परिक्षित वानखडे, विवेक कडू, उदय घोंगडे, कौशल घोंगडे, आदेश घोंगडे, प्रणय घोंगडे, शुभम घोंगडे, अंकुश वानखडे, लोकेश नेहारे, मोहित कोठे, तेजस गावंडे, अनिकेत घोंगडे, हर्षु गावंडे तसेच अखिल माकोडे तथा मित्रपरिवारातील अनिल माकोडे, देवेंद्र ठाकरे, अक्षय मगर्दे इत्यादी अनेक सदस्यांनी उपस्थित राहून रक्तदान शिबिराचे यशस्वी नियोजन करून रक्तदान केले.

**नुकसान** आदिवासी कारागीर हवालदिल; कच्च्या मालाअभावी पारंपरिक उद्योग ठप्प

# जिल्ह्यात बांबूचा तुटवडा!

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.२५ :** जंगलसमृद्ध जिल्हा म्हणून ओळख असलेल्या गडचिरोलीतच सद्यस्थीतीत बांबूचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याने स्थानिक आदिवासींच्या पारंपरिक लघुउद्योगावर मोठा घाला बसला आहे. गत १५ दिवसांपासून कच्चा माल मिळत नसल्याने शेकडो कारागीर अक्षरश: हातावर हात धरून बसले आहेत. परिणामी त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

गडचिरोलीतील आदिवासी बांधव पिढ्यानपिढ्या बांबुपासून विविध कलात्मक वस्तू तयार करून आपला उदरनिर्वाह करतात. या वस्तूंना केवळ स्थानिकच नव्हे तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतही मोठी मागणी आहे. मात्र, आज बांबूच उपलब्ध नसल्याने हा संपूर्ण उद्योग ठप्प होण्याच्या मार्गावर आहे. काम आहे. मागणी आहे, पण कच्चा मालच



नाही, अशी हत्ताश प्रतिक्रिया कारागिरांकडून व्यक्त होत आहे. शासनाकडे वारंवार मागणी करूनही कुणाचेही याकडे लक्ष नाही. उलट बाहेरील जिल्ह्यांतील बांबू ठेकेदार गडचिरोलीत येऊन दादागिरी करत असल्याचे गंभीर आरोप कारागिरांनी केले.

स्थानिकांना बांबू मिळत नाही, पण बाहेरील ठेकेदार मात्र मोठ्या प्रमाणात साठा उचलत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. 'आमच्या पोटाचा प्रश्न आहे, पण प्रशासनाला काहीच पडलेले नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया एका कारागिराने व्यक्त केली. बांबू व्यवसायावर अवलंबून असलेल्या कुटुंबांमध्ये सध्या चिंतेचे वातावरण असून अनेकांना स्थलांतराचा पर्याय निवडण्याची वेळ येऊ लागली आहे.

### समस्येकडे लोकप्रतिनिधींचेही होतेय दुर्लक्ष

प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून स्थानिक आदिवासींना प्राधान्याने बांबू उपलब्ध करून देणे, ठेकेदारांच्या मनमानीवर नियंत्रण ठेवणे आणि या पारंपरिक उद्योगाचे संरक्षण करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा, गडचिरोलीची ओळख असलेला हा कलात्मक उद्योग संपुष्टात येण्याचा धोका निर्माण झाला आहे. लोकप्रतिनिधींनी तातडीने कृती करून बांबू उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी कारागिरातून केली जात आहे.

## वैद्यकीय अधिकारी डॉ. चैतन्य गजभिये यांनी जिंकला नागरिकांचा विश्वास

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**आष्टी, दि.२५ :** भातकुली तालुक्यातील आष्टी येथील प्रा. आ केंद्रामध्ये कार्यरत असलेले प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ. चैतन्य गजभिये साहेब येथे रुजू झाल्यापासून येणाऱ्या रुग्णाशी प्रेमाने त्यांना वेळेवर तपासणी करून चांगल्या तऱ्हेचा उपचार करणे व त्यांचे मने जिंकण्याचे कामे डॉ. गजभिये यांनी केली. व वर्षभरात जास्तीत जास्त कामे कशी होतील अशी कामगिरी डॉ.गजभिये यांनी बजावली येथील प्रा आ केंद्रामध्ये व उपकेंद्रा मध्ये कुठल्याही प्रकारची गैरसोय न व्हावी व औषध साठा सुरळीत चालावा याकडे पण स्वत: लक्ष घालून कमे केली. त्यांनी विविध प्रकारचे अभियान राबवून रोग निदान शिबिर बाल संगोपन स्वस्थ नारी सशक्त परिवार यासारखे खूप अभियान डॉ. गजभिये यांनी केली व येथील जनतेच्या घरोघरी जाऊनआपल्या कर्मचारी स्टाफ सोबत लोकांच्या समस्या जाणून घेऊन आपणाला शासनातर्फे काही तुम्हाला बिमारी



असेल त्यावर उपचार करून त्यांनी औषधी प्रा.आ. केंद्रा मार्फत उपलब्ध करून देण्याचे काम डॉक्टर यांनी करून दिले व आता त्यांची उच्च शिक्षणाकरिता निवड झाली असून त्यांची निवड सर्जन करिता झाली आहे त्यांची सर्जन पदा करिता निवड झाल्या बद्दल येथील कार्यरत असलेले वैद्यकीय अधिकारी डॉ.श्री. निखिल उपलवार,डॉ.शुभांगी राऊत डॉ. गीतांजली लखदिवे कनिष्ठ सहायक. मुकुंदा धसकट,सर्व कर्मचारी वृंद व गावातील नागरिक यांनी त्यांच्या कर्तव्यनिष्ठ कामगिरीबद्दल व त्यांची पदावर निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्याचे ठरवले आहे.

## शॉर्टक्यात



### नेरमध्ये मोफत मूत्ररोग निदान शिबिराला उस्फूर्त प्रतिसाद

**नेर :** येथील चिंतामणी क्लिनिकमध्ये २४ मार्च २०२६ रोजी नगरसेवक सचिन कराळे व मित्रपरिवाराच्या वतीने मोफत मूत्ररोग निदान शिबिर पार पडले. युरोलॉजिस्ट डॉ. वेदांत लाखे यांनी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत तालुक्यातील ४८ रुग्णांची मोफत तपासणी केली. मूत्ररोगाचे वेळीच निदान करून संभाव्य धोके टाळण्याच्या उद्देशाने या शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. निरामय हॉस्पिटल यवतमाळचे संचालक डॉ. वेदांत लाखे यांनी किडनी स्टोन, हर्निया आणि प्रोस्टेट ग्रंथीची वाढ यांसारख्या आजारांवर रुग्णांना मार्गदर्शन व औषधोपचार केले. गरीब रुग्णांच्या आवश्यक शस्त्रक्रिया महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून यवतमाळ येथे मोफत केल्या जाणार असल्याचे त्यांनी यावेळी जाहीर केले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील गोरगरीब रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे. मूत्रमार्गातील जळजळ आणि लघवीच्या समस्या असलेल्या नागरिकांनी या संधीचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. विजय मुंडे, डॉ. अंकिता मुंडे आणि नगरसेवक सचिन कराळे यांच्यासह त्यांच्या मित्रपरिवाराने विशेष परिश्रम घेतले. वेळेवर निदान झाल्यामुळे अनेक रुग्णांना भविष्यातील कठीण शस्त्रक्रिया टाळणे शक्य होणार आहे. सामाजिक बांधिलकीतून राबवलेल्या या आरोग्य उपक्रमाचे संपूर्ण तालुक्यात कौतुक होत आहे.



### तळणी येथे रमजान ईद उत्साहात

**आर्णी :** तालुक्यातील तळणी येथे सोमवार (दि. २३) रमजान ईद धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली. सकाळी ९ वाजता स्थानिक ईदगाहवर मौलाना मुश्ताक शेख यांच्या मार्गदर्शनाखाली मुस्लिम बांधवांनी नमाज अदा केली. पवित्र महिनाभर रोजे पूर्ण केल्यानंतर सर्व धर्मीयांनी एकत्र येत एकमेकांना शुभेच्छा देत सामाजिक सौहार्द आणि शांततेचा संदेश दिला. ईदनिमित्त सकाळी ८:३० वाजता सर्व मुस्लिम बांधव मस्जिदीसमोर एकत्र जमले आणि शिस्तबद्ध पद्धतीने ईदगाहकडे रवाना झाले. यावेळी मौलाना मुफ्ती शेख हबीब शेख जिलानी यांनी कुराण पठण करून ईदचे महत्व विशद केले. नमाज पूर्ण झाल्यानंतर सर्वांनी गळाभेट घेत शुभेच्छांचा वर्षाव केला. या सोहळ्याला राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सुनील पोटगंटवार यांनी उपस्थित राहून मुस्लिम समाजाला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला नजीर खान, इशाक शेख, शेख रशीद, युनूस खान, अजीमभाई, शेख मोईद्दीन, सय्यद अन्सार, केशव लोणकर, सय्यद कदीर, शाहिद खान आणि निशांत हलबी यांची प्रमुख उपस्थिती होती. हिंदू बांधवांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून मुस्लिम मित्रांना शुभेच्छा दिल्या, ज्यामुळे गावात धार्मिक एकोपा दिसून आला. ईदच्या पार्श्वभूमीवर घाटंजी पोलीस स्टेशनच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. शांततापूर्ण आणि उत्साही वातावरणात पार पडलेल्या या उत्सवाने सामाजिक ऐक्याची वीण अधिक घट्ट केली.

### वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार दांपत्य जखमी

**मुकुटबन:** भरधाव 'छोटा हत्ती' वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात पती-पत्नी जखमी झाले. १२ मार्च रोजी भारत पेट्रोल पंपाजवळ ही घटना घडली. फिर्यादी धनलाल राठोड (५२) आणि त्यांची पत्नी कल्पना (४०) हे दुचाकीने (MH २९ BH ६४०९) माहूरकडे जात होते. यावेळी अज्ञात 'छोटा हत्ती' मालवाहू वाहन चालकाने निष्काळजीपणे त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. यात धनलाल यांना किरकोळ तर त्यांच्या पत्नीला गंभीर दुखापत झाली. मुकुटबन पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# जागतिक युद्धाच्या झळीने पेटल्या चुली

## फुलसावंगीत व्यावसायिक गॅसचा तुटवडा, धुरामुळे आरोग्य धोक्यात, पुरवठा सुरळीत करण्याची मागणी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**फुलसावंगी, दि. २५ :** दोन देशांमधील युद्धाचे पडसाद केवळ आंतरराष्ट्रीय सीमेपुरते मर्यादित न राहता, आता फुलसावंगीसारख्या ग्रामीण भागातील सर्वसामान्यांच्या पोटापर्यंत पोहोचले आहेत. जागतिक स्तरावर विस्कळीत झालेल्या पुरवठा साखळीमुळे व्यावसायिक गॅस सिलिंडरचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला असून, येथील हॉटेल व्यावसायिकांना नाईलाजास्तव पुन्हा 'मातीची चूल' पेटवण्याची वेळ आली आहे. गेल्या काही दिवसांपासून महागाव आणि फुलसावंगी परिसरात गॅसचा पुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला असून, यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेले छोटे व्यावसायिक संकटात सापडले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, गॅस सिलिंडरसाठी आगाऊ नोंदणी करूनही अनेक दिवस पुरवठा होत नसल्याने हॉटेल चालकांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. एकेकाळी गॅस शेगडीवर चालणाऱ्या हॉटेल्समध्ये आता पुन्हा लाकूड-फाटा आणि सरपणाचा वापर सुरू झाला आहे. कडक उन्हाळ्यात धुराच्या लोटात काम करावे लागत असल्याने आचाऱ्यांचे आणि मजुरांचे आरोग्य धोक्यात आले असून, धुरामुळे हॉटेलच्या भिंती व भांडीही काळी पडत आहेत. स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाल्याने ग्राहकही पाठ फिरवण्याची भीती व्यक्त होत आहे. गॅसचा तुटवडा निर्माण झाल्याने लाकडाची मागणी वाढली असून सरपणाचे भावही गगनाला भिडले आहेत. चुलीवर अन्न शिजवण्यास गॅसच्या तुलनेत दुप्पट वेळ लागत असल्याने ग्राहकांना वेळेवर सेवा देणे कठीण होत आहे. वाढलेला खर्च आणि घटलेला नफा यामुळे हॉटेलचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे. अनेक ठिकाणी धुराच्या त्रासामुळे मजूर काम सोडून जात असल्याने व्यावसायिक हतबल झाले आहेत. प्रशासनाने या गंभीर समस्येकडे त्वरित लक्ष देऊन व्यावसायिक गॅसचा पुरवठा पूर्ववत करावा, अशी आर्त हाक फुलसावंगीतील हॉटेल व्यावसायिकांनी दिली आहे. अन्यथा, अनेक छोटी हॉटेल्स कायमची बंद पडण्याची भीती निर्माण झाली आहे.

> 'आम्ही अनेक वर्षांपासून गॅसवरच हॉटेल चालवत आहोत, मात्र गेल्या आठवड्यापासून सिलिंडर मिळत नसल्याने आमची मोठी कोंडी झाली आहे. ग्राहक आल्यावर त्यांना रिकाम्या हाती पाठवू शकत नाही, म्हणून नाईलाजास्तव लाकडे गोळा करून चूल पेटवली आहे. युद्ध जरी लांब सुरू असले तरी त्याची खरी झळ आम्हा गरिबांना सोसावी लागत आहे.'
>
> **- कुणाल राठोड,** स्थानिक हॉटेल व्यावसायिक, फुलसावंगी.

### आर्थिक गणितासह आरोग्यावरही परिणाम

**व्यावसायिक गॅस सिलिंडर मिळत नसल्याने हॉटेल चालकांना महागडे सरपण विकत घ्यावे लागत आहे. यामुळे उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली असून नफा कमावणे दुरापास्त झाले आहे. दुसरीकडे, भर उन्हाळ्यात चुलीच्या धुरामुळे श्वसनाचे विकार जडण्याची भीती निर्माण झाली आहे. मजूर टंचाई आणि स्वच्छतेचा अभाव यामुळे ग्रामीण भागातील या छोट्या उद्योगासमोर अस्तित्वाचे संकट उभे राहिले आहे.**

# टिपेश्वर अभयारण्य परिसरात बेकायदेशीर रिसॉर्ट्स

## जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**पांढरकवडा, दि.२५ :** पांढरकवडा तालुक्यातील टिपेश्वर वन्यजीव अभयारण्यालगत असलेल्या 'इको सेन्सिटिव्ह झोन'मध्ये बेकायदेशीर रिसॉर्ट्स, हॉटेल्स आणि कृषी पर्यटन प्रकल्पांचे पेव फुटले आहे. पर्यावरण आणि वन्यजीव संरक्षण कायद्यांना धाब्यावर बसवून सुरू असलेल्या या बांधकामांनी खळबळ उडवून दिली आहे. परिणामी, प्रशासनाच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह आहे.

वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ आणि 'इएसझेड' अधिसूचनांनुसार अभयारण्यालगत व्यावसायिक प्रकल्पांवर कडक निर्बंध असताना अनेक रिसॉर्ट्स विनापरवाना सुरू आहेत. याप्रकरणी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे आणि त्यानंतर मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांच्याकडे तक्रारी करण्यात आल्या होत्या. मात्र, चौकशी समिती नेमूनही अद्याप कोणताही अहवाल सार्वजनिक करण्यात आलेला नाही. विशेष म्हणजे, राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सुनील प्रभू यांनी लक्षवेधीद्वारे हा मुद्दा मांडला होता, ज्यावर वनमंत्री गणेश नाईक यांनी कारवाईचे आश्वासन दिले होते. मात्र, प्रत्यक्षात कोणतीही ठोस पावले उचलली गेली नाहीत. यावर संताप व्यक्त करताना अंकित नैताम यांनी आरोप केला की, 'हे केवळ प्रशासनाचे दुर्लक्ष नसून मोठे साटेलोटे आहे.' त्यांनी या सर्व प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करण्याची, विनापरवाना प्रकल्पांवर गुन्हे दाखल करण्याची आणि संबंधित दोषी अधिकाऱ्यांचे निलंबन करण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने तातडीने दखल न घेतल्यास उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

# सिमेंट मिक्सर घेऊन जाणारा टेम्पो उलटला

## सुदैवाने जीवितहानी टळली; देऊरवाडी कॉलनी परिसरातील घटना

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**दिग्रस, दि.२५ :** दिग्रस-आर्णी मार्गावरील देऊरवाडी पुनर्वसन ते कॉलनी परिसरात सोमवारी (दि. २३) सकाळी ९.३० वाजताच्या सुमारास सिमेंट मिक्सर मशीन घेऊन जाणारा टेम्पो पलटल्याची घटना घडली. या अपघातात वाहनासह बांधकाम साहित्याचे मोठे नुकसान झाले असून एका व्यक्तीच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे. मात्र, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, दिग्रस येथून आर्णी मार्गे चिरकुटा गावाकडे स्लॅब टाकण्यासाठी टेम्पो क्रमांक एम. एच. २९-६४८८ हा सिमेंट मिक्सर मशीन टोचन करून जात होता. दरम्यान, मिक्सर मशीनचे टोचन अचानक तुटल्याने चालकाचा वाहनावरील ताबा सुटला आणि टेम्पो रस्त्याच्या कडेला असलेल्या खोल नालीत जाऊन पलटी झाला. या अपघातात टेम्पो व मिक्सर मशीनसह बांधकामासाठी लागणाऱ्या साहित्याचे मोठे नुकसान झाले. वाहनातील एका व्यक्तीच्या पायाला गंभीर दुखापत झाली असून त्याला तातडीने दिग्रस ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. नालीत पडलेले वाहन बाहेर काढण्यासाठी जेसीबीच्या मदतीने प्रयत्न करण्यात आले. या प्रकरणी वृत्त लिहीपर्यंत दिग्रस पोलिस ठाण्यात कोणतीही तक्रार दाखल झालेली नव्हती.

# संपादकांशी गैरवर्तन करणाऱ्या 'त्या' पोलिस अधिकाऱ्यावर कारवाई करा!

## महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; 'एपीआय' पंकज दाभाडे यांच्या अरेरावीचा निषेध

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि.२५ :** स्थानिक दैनिक 'लोकसूत्र'चे कार्यकारी संपादक केशव सवळकर यांच्यासोबत अत्यंत अर्वाच्य भाषेत गैरवर्तन करणाऱ्या एपीआय पंकज दाभाडे यांच्याविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी आज (दि.२५) 'महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघटना, नागपूर, शाखा-यवतमाळच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे.

सोमवारी (दि.२३) दारव्हा-कारंजा मार्गावरील भांडेगाव टोल नाका बंद करण्यासाठी महाविकास आघाडीच्या वतीने आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाच्या वृत्त संकलनासाठी जिल्ह्यातील विविध माध्यमांचे प्रतिनिधी घटनास्थळी उपस्थित होते. पोलिसांनी सुरक्षेसाठी बॅरिकेट्स लावले होते, मात्र पत्रकारांनी आपली ओळख पटवून दिल्यानंतर त्यांना टोल नाक्यापर्यंत जाण्याची परवानगी देण्यात आली होती. आंदोलनस्थळी परिस्थिती शांत असतानाही कर्तव्यावर तैनात असलेल्या एपीआय पंकज दाभाडे यांनी अचानक आक्रमक पवित्रा घेतला. त्यांनी तेथील नागरिकांना आणि पत्रकारांना शिवीगाळ करत हाकलून देण्यास सुरुवात केली. यावेळी संपादक केशव सवळकर यांनी आपली ओळख देत ओळखपत्र दाखवून आपण पत्रकार असल्याचे सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र, दाभाडे यांनी त्यांचा हात जोरात पकडून त्यांना धक्काबुक्की केली आणि अत्यंत घाणेरड्या भाषेत शिवीगाळ करत 'शहाणपणा शिकवू नकोस' असे म्हणून अपमानित केले. निवेदनात म्हटले आहे की, घटनास्थळी इतरही वरिष्ठ पोलिस अधिकारी हजर होते, परंतु केवळ दाभाडे यांनीच आपला 'सिंघम' अवतार दाखवण्यासाठी एका प्रतिष्ठित पत्रकाराचा सार्वजनिक ठिकाणी अपमान केला. यामुळेसंविधानाने पत्रकारांना दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे हनन झाले आहे. 'पत्रकार हे कधीच गर्दीचा हिस्सा नसतात' असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले असतानाही पोलिस आणि माध्यमांमधील सुसंवादाला तडा गेला आहे. जरी एसडीपीओ डॉ. सिद्धेश्वर भोरे आणि ठाणेदार श्री. मुळे यांनी प्रकरण शांत करण्याचा प्रयत्न केला, तरी दाभाडे यांच्या चेहऱ्यावर आपल्या या कृत्याबद्दल कोणताही पश्चात्ताप नव्हता. पत्रकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत राऊत आणि सचिव अमोल ढोणे यांच्या नेतृत्वात हे निवेदन देण्यात आले. एपीआय दाभाडे यांच्यावर सेवाशिस्त भंग आणि मानहानीप्रकरणी तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती विशेष पोलिस महानिरीक्षक (अमरावती), लोकायुक्त आणि पोलिस अधीक्षकांनाही पाठविण्यात आल्या आहेत. तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही स्वतंत्र निवेदन पाठविण्यात आले असून दाभाडे यांच्यावर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

# मरसुळ येथे महाआरोग्य शिबिर; शेकडो रुग्णांना मोफत सेवा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**उमरखेड, दि. २५ :** तालुक्यातील मरसुळ येथे २२ मार्च २०२६ रोजी लोकनेते स्व. दशरथजी वानखेडे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ राहुल वानखेडे मित्रमंडळाच्या वतीने भव्य महाआरोग्य शिबिर पार पडले. ग्रामीण भागातील रहिवाशांना गावातच तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत आरोग्य सेवा मिळावी, या उद्देशाने आयोजित या शिबिरात शेकडो रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधोपचार करण्यात आले.

या महाआरोग्य शिबिरात नेत्ररोग, पोटविकार आणि इतर सामान्य आजारांवर तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांना मार्गदर्शन केले. डॉ. प्रीती जयस्वाल, डॉ. प्रफुल वानखेडे, डॉ. शुभम इंगळे, डॉ. पांडुरंग मुलगीर आणि डॉ. नागेश कदम यांनी रुग्णांची कसून तपासणी करून औषधे दिली. ग्रामीण भागातील गरजू रुग्णांना आरोग्याच्या आधुनिक सोयी उपलब्ध करून देण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला होता. शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. अनंतराव कदम, माजी सरपंच काशिनाथ पाटील, सखाराम पाटील, माणिकराव चव्हाण, रंजु भोयर, बंडू पाटील आणि प्रसाद धोंगडे यांच्यासह स्थानिक ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. मित्रमंडळाने सामाजिक बांधिलकी जपत राबवलेल्या या उपक्रमाचे परिसरात कौतुक होत असून, आरोग्याबाबत जागरूक राहण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. यामुळे आरोग्य सुविधांपासून वंचित असलेल्या अनेक रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# गॅससाठी रणरणत्या उन्हात ग्राहकांच्या रांगा

## ४० अंश तापमानात द्वारपोच योजना कोलमडली, पिण्याच्या पाण्याची व्यवस्थाच नाही

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**आर्णी, दि. २५ : आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या इंधन टंचाईमुळे आर्णी शहरात गॅस सिलिंडरसाठी नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. वाढत्या उष्णतेमुळे ४० अंश तापमानात गॅस कंपनीच्या गोडाऊनसमोर ग्रामीण भागातील ग्राहकांना ताटकळत उभे राहावे लागत असून, प्रशासकीय नियोजनाअभावी गॅसची द्वारपोच योजना पूर्णपणे कोलमडल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.**



आर्णी तालुक्यात सध्या स्वयंपाकाच्या गॅसचा तुटवडा निर्माण झाल्याने गृहिणी आणि सामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. शहरातील मुख्य गॅस कंपनीच्या कार्यालयासमोर आणि गोडाऊन परिसरात सकाळी पाच वाजल्यापासूनच नागरिकांनी गर्दी केली आहे. विशेष म्हणजे, शासनाची गॅस द्वारपोच योजना प्रभावीपणे राबविली जात नसल्याने ग्राहकांना स्वतः सिलिंडर नेण्यासाठी शहरात यावे लागत आहे. ४० अंश सेल्सिअस तापमानाचा पारा असतानाही, रस्त्याच्या कडेला उन्हात उभे राहून नागरिक गॅस मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. या ठिकाणी रांगेत उभ्या असलेल्या नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची कोणतीही व्यवस्था करण्यात आलेली नाही, तसेच उन्हापासून बचावासाठी शेडची सुविधाही उपलब्ध नाही. यामध्ये लहान मुले आणि महिलांचे मोठे हाल होत असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. आखाती युद्धाच्या चर्चांमुळे निर्माण झालेल्या संभ्रमावस्थेतून ही परिस्थिती ओढवल्याचे बोलले जात आहे. इंधनाच्या या संकटामुळे केवळ गॅसच नव्हे, तर तालुक्यातील पेट्रोल पंपांवरही डिझेल आणि पेट्रोलसाठी वाहनांच्या प्रचंड रांगा लागल्या आहेत. सोशल मीडियावरील विविध माहितीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून इंधन साठवणुकीसाठी चढाओढ सुरू झाली आहे. गॅस वितरकांनी नियोजनात बदल करून घरपोच सेवा पूर्ववत न केल्यास ही समस्या अधिक उग्र रूप धारण करण्याची शक्यता आहे. ग्रामीण भागातून येणाऱ्या मजुरांना आपला रोजगार सोडून दिवसभर उन्हात उभे राहावे लागत आहे. प्रशासनाने या परिस्थितीची दखल घेऊन गॅस आणि पेट्रोलचा पुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी आर्णीकरांकडून होत आहे. अन्यथा, येणाऱ्या काळात टंचाईमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# उमरखेडमध्ये तडीपार गुंडाला अटक

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**उमरखेड, दि. २५ :** शहरात धारदार शस्त्र घेऊन फिरणाऱ्या एका तरुणासह, तडीपारीच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला उमरखेड पोलिसांनी जेरबंद केले आहे. ही कारवाई पोलिस स्टेशनच्या डीबी पथकाने रविवारी, दि. २२ मार्च रोजी केली.

शहरातील रस्त्यावर एक इसम चाकू घेऊन फिरत असल्याची माहिती डीबी पथकाला मिळाली. पोलिसांनी सापळा रचून आरोपी शेख शाहरूख (वय २०, रा. डोंगरगाव, ह.मु. तकिया, उमरखेड) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून सोनेरी रंगाची मूठ असलेला ५०० रुपये किमतीचा फायटरसारखा दिसणारा चाकू जप्त करण्यात आला. याप्रकरणी त्याच्यावर आर्म्स ॲक्टसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसऱ्या कारवाईत यवतमाळ, नांदेड आणि वाशिम या तीन जिल्ह्यांतून तडीपार असलेला सराईत गुन्हेगार अमिशोद्दीन मोहम्मद तारखोद्दीन खतीब (वय २३, रा. तडसवाडी) हा उमरखेड शहरात फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. ढाणकी रोडवरील 'मदिना पान सेंटर' येथे तो तडीपारीच्या आदेशाचे उल्लंघन करून उभा असताना पोलिसांनी त्याला अटक केली. ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलिस अधिकारी हुनुमंत गायकवाड, पोलिस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनात डीबी पथकाचे पीएसआय सागर इंगळे, संजय (१६५२), किरण राठोड (१२७५) आणि दिगंबर गीते (२६७३) यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# पेट्रोल पंपांवर वाहनांच्या रांगा

## जिल्हाधिकारी म्हणतात हा कृत्रिम तुटवडा; समाजमाध्यमांवरील अफवांचा परिणाम

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**







यवतमाळ/उमरखेड, दि.२५ : जागतिक स्तरावर युद्धाचे ढग गडद होत असतानाच, 'इंधनाचा पुरवठा थांबणार' या वाऱ्यासारख्या पसरलेल्या अफवेने आज यवतमाळकरांची झोप उडवली. इंधन संपण्याच्या भीतीने आज सकाळपासूनच संपूर्ण यवतमाळसह उमरखेड शहरातील पेट्रोल पंपांवर वाहनधारकांच्या मोठमोठ्या रांगा पाहायला मिळाल्या. प्रशासनाने 'इंधनाचा पुरेसा साठा आहे' असे वारंवार स्पष्ट करूनही नागरिकांमधील भीती कमी झाली नाही, परिणामी अनेक पंपांवरील साठा संपल्याने दुपारीच 'नो स्टॉक'चे फलक लावून गेट बंद करण्याची वेळ आली. दरम्यान, जिल्हाधिकारी विकास मीना यांनी हा 'कृत्रिम तुटवडा'असल्याचे जाहीर करीत या अफवेला 'ब्रेक'लावला आहे.

गेल्या दोन दिवसांपासून शेजारील नागपूर, अमरावती, चंद्रपूर आणि वर्धा जिल्ह्यांत पेट्रोल-डिझेलचा मोठा तुटवडा निर्माण झाल्याच्या बातम्या सोशल मीडियावर व्हायरल झाल्या होत्या. त्यातच 'युद्ध सुरू होणार असल्याने कच्च्या तेलाचा पुरवठा थांबणार' अशा कपोलकल्पित संदेशांनी आगीत तेल ओतले. या अफवेचा सर्वाधिक फटका आज यवतमाळ जिल्ह्याला बसला. काल रात्रीपासूनच काही ठिकाणी सुरू झालेल्या गर्दीचे रुपांतर आज रांगेत बदलले. 'यवतमाळ जिल्ह्यात एलपीजी किंवा इंधनाचा कोणताही तुटवडा नाही,' असे अधिकृत स्पष्टीकरण जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्ष जमिनीवरील परिस्थिती वेगळीच होती. शासकीय यंत्रणेचे हे स्पष्टीकरण जनतेचा विश्वास संपादन करण्यात सपशेल अपयशी ठरल्याचे चित्र दिसले. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून पोलिस प्रशासनाने लाऊडस्पीकरद्वारे घोषणाबाजी सुरू केली. 'नागरिकांनी घाबरून जाऊ नये, अफवांवर विश्वास ठेवू नका,' असे आवाहन वारंवार केले गेले. मात्र, 'आज मिळाले तर मिळाले, उद्या काय होईल सांगता येत नाही' या मानसिकतेतून नागरिक तासनतास रांगेत उभे होते.

### ही तर कृत्रिम टंचाई : जिल्हाधिकारी विकास मीना

**जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलची टंचाई नाही. गॅसचाही तुटवडा नाही. समाजमाध्यमांवरील अफवेमुळे नागरिकांमध्ये भीती निर्माण झाली असून एकाच वेळी पेट्रोल आणि डिझेल भरले. त्यामुळे कृत्रिम तुटवडा निर्माण झाला आहे. नागरिकांनी याबाबत काळजी करू नये, अशी माहिती जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिली आहे.**

### वाहतूक कोंडी आणि 'नो स्टॉक'चे फलक

**दिवसभर चाललेल्या या अभूतपूर्व गर्दीमुळे दुपारी ३ वाजेपर्यंत अनेक पेट्रोल पंपांवरील साठा संपुष्टात आला. यवतमाळ शहरातील मुख्य चौकातील पेट्रोल पंपांवर वाहनांच्या इतक्या लांब रांगा होत्या की, शहरातील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. इंधन संपल्यानंतर पंप चालकांनी गेट बंद केले, तरीही काही नागरिक पुरवठा पुन्हा सुरू होईल या आशेने ताटकळत उभे होते.**

# येत्या रविवारी यवतमाळ 'ऑयडॉल'चे ऑडिशन

## विदर्भस्तरीय गीत गायन स्पर्धा; नोंदणी २८ मार्चपर्यंत सुरू राहणार

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.२५ :** क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त यवतमाळात 'समता पर्व-२०२६' अंतर्गत 'यवतमाळ आयडॉल'या विदर्भस्तरीय भव्य गीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे ऑडिशन येत्या रविवारी, दि. २९ मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत स्थानिक संविधान चौकातील 'लॉर्ड बुद्धा'कार्यालयात होणार आहे.

नवोदित कलावंतांना संगीताचा मोठा मंच मिळवून देण्यासाठी समता पर्व प्रतिष्ठानने हा पुढाकार घेतला आहे. स्पर्धेचे उद्घाटन माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सौ. माधुरी आडे आणि सामाजिक कार्यकर्ते अनिल आडे यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष नारायण थुल, डॉ. विलास कनाके, उमेश मेश्राम, प्रमोदनी रामटेके, डॉ. सुमेध देवतळे आणि माजी अध्यक्ष माधुरी वाळके यांची प्रमुख उपस्थिती राहील. या स्पर्धेतील नोंदणीचा कालावधी दि. १४ ते २८ मार्चपर्यंत आहे. तसेच वयोगट १५ ते ३५ वर्षे असून नोंदणी फी नाममात्र ३०० रुपये आहे. ऑडिशननंतर निवडक स्पर्धकांसाठी पहिली फेरी ९ एप्रिल, दुसरी फेरी ११ एप्रिल आणि अंतिम फेरी १३ एप्रिल २०२६ रोजी समता मैदान, यवतमाळ येथे पार पडेल. या उपक्रमासाठी मुख्य संयोजक धर्मपाल भितकर व काजल तायडे यांच्यासह सहसंयोजक विजय डोंगरे, बळीराम अडागळे व संयोजन समितीचे सर्व सदस्य परिश्रम घेत आहेत. नाव नोंदणीसाठी इच्छुकांनी ९८८१६१९३९३ किंवा ८६०५९०७६३५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन धर्मपाल भीतकर यांनी केले आहे. या स्पर्धेसाठी जया तेलंग, हर्षा बोडखे, माया हलवले, रीना वानखडे, शुभम वाळके, प्रा. विजय डोंगरे, रवी श्रीरामे, रवी बावनगडे, दीपाली बावनगडे, नंदकिशोर निमगडे, शिवदास कांबळे, प्रतिभा दातार आदींनी पुढाकार घेतला आहे.

### स्पर्धेची रूपरेषा आणि बक्षिसे

**या स्पर्धेत प्रथम विजेत्यास २२,०२२ रुपये, द्वितीय ११,०११ रुपये आणि तृतीय विजेत्यास ५,५०५ रुपये रोख व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येईल. ही बक्षिसे अनिल आडे यांनी स्मृतिशेष रामजी आडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुरस्कृत केली आहेत. याशिवाय विविध मान्यवरांकडून प्रोत्साहनपर बक्षिसेही दिली जाणार आहेत.**

# यवतमाळ जिल्हा पोलीस कर्मचारी पतसंस्थेची विशेष सभा तहकूब

## अध्यक्षांचा तडकाफडकी राजीनामा; पतसंस्थेवर आता प्रशासकाची नियुक्ती

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.२५ :** राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या आदेशानुसार रिक्त संचालकांची पदे भरण्यासाठी बोलावलेली यवतमाळ जिल्हा पोलिस कर्मचारी सहकारी पतसंस्थेची विशेष सभा गणपूर्तीअभावी तहकूब करण्यात आली. या नाट्यमय घडामोडीनंतर पतसंस्थेच्या अध्यक्ष पृथ्वीराज चव्हाण यांनी आपल्या पदाचा तडकाफडकी राजीनामा दिल्याने खळबळ उडाली असून, आता संस्थेचा कारभार प्रशासकाच्या हाती गेला आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम २०१४ मधील नियम ७४ नुसार, पाचपैकी चार रिक्त संचालक पदे नामनिर्देशनाद्वारे भरण्यासाठी या विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. अभ्यास अधिकारी श्रीमती विद्या एस. देऊळकर यांच्या अध्यक्षतेखाली ही प्रक्रिया पार पडणार होती. सभेसाठी एकूण सात संचालकांची उपस्थिती अनिवार्य असताना, काही संचालकांच्या अनुपस्थितीमुळे आवश्यक गणपूर्ती (कोरम) पूर्ण होऊ शकली नाही. यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सभा तहकूब केली. सभेतील या असहकार्यामुळे



नाराज होऊन पतसंस्थेच्या अध्यक्षांनी आपल्या अध्यक्षपदाचा आणि संचालक पदाचा राजीनामा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ यांच्याकडे सादर केला आहे. अध्यक्षांच्या राजीनाम्यानंतर संचालक मंडळ अल्पमतात आले असून, पतसंस्थेच्या दैनंदिन कामकाजासाठी प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. यापुढील सर्व आर्थिक व प्रशासकीय व्यवहार प्रशासकामार्फत चालवले जाणार असल्याची माहिती समोर आली आहे.

# यवतमाळ जिल्हा कृषी महोत्सव, प्रदर्शनाचे उद्यापासून आयोजन

## कृषी विज्ञान केंद्र वाघापूर येथे भरणार कृषी तंत्रज्ञानाचा मेळा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.२५ :** दरवर्षीप्रमाणे यंदाही आत्मा आणि कृषी विभागाच्या वतीने 'यवतमाळ जिल्हा कृषी महोत्सव व प्रदर्शन २०२६' चे योजन करण्यात आले आहे. हा महोत्सव २७ मार्च ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत कृषी विज्ञान केंद्र, वाघापूर (यवतमाळ) येथे पार पडणार आहे.

हे प्रदर्शन यवतमाळच्या वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाजवळील पिंपळगाव रोडवर आयोजित करण्यात आले आहे. कृषी विभागासोबतच पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग,



माविम, उमेद (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), जिल्हा माहिती अधिकारी, ग्रंथालय विभाग आणि नगर परिषद यवतमाळयांच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव साकारत आहे. यासाठी एकूण २०० स्टॉल्स उभारण्यात येत आहे. त्यापैकी ४० स्टॉल्स हे विविध योजनांची माहिती देण्यासाठी, ३० स्टॉल्स हे कृषी निविष्ठा, बी-बियाणे व खतांशी संबंधित, ३० स्टॉल्स हे कृषी तंत्रज्ञान व आधुनिक शेती व सिंचन साधनांसाठी, ४० स्टॉल्स हे गृहपयोगी वस्तू आणि घरगुती वापराच्या वस्तूंच्या विक्रीसाठी, २० स्टॉल्स हे धान्य महोत्सवांतर्गत थेट शेतकरी ते ग्राहक धान्य विक्री, २० स्टॉल्स हे खाद्यपदार्थांचे असून त्यात विविध खाद्यसंस्कृतीचा समावेश असणार आहे. यवतमाळ जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी आणि नागरिकांनी या कृषी महोत्सवाला भेट देऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# सावरगड कचरा डेपोत काळजाचा थरकाप उडविणारी घटना

## ट्रॅक्टर ट्रॉलीखाली दबून चालकाचा जागीच मृत्यू; उमसरा येथील किशोर शेंडे यांचा अंत

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि.२५ :** शहरातील कचरा व्यवस्थापनाचे काम सुरू असताना आज दुपारी सावरगड येथील कचरा डेपोमध्ये एक अत्यंत दुर्दैवी आणि अंगावर शहारे आणणारी घटना घडली. ट्रॅक्टरचे चाक बदलत असताना कचऱ्याने भरलेली अवजड ट्रॉली अंगावर कोसळल्याने चालकाचा जागीच मृत्यू झाला. किशोर उत्तमराव शेंडे (रा. उमसरा) असे या दुर्दैवी चालकाचे नाव असून, या घटनेमुळेसंपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आज दुपारी १ वाजेच्या सुमारास किशोर शेंडे हे कचऱ्याने भरलेला ट्रॅक्टर घेऊन सावरगड येथील कचरा डेपोमध्ये गेले होते. तिथे पोहोचल्यावर ट्रॅक्टरच्या ट्रॉलीचे चाक नादुरुस्त असल्याचे त्यांच्या लक्षात आले. चाक बदलण्यासाठी त्यांनी जॅक लावून भरलेली ट्रॉली वर उचलली आणि दुरुस्तीचे काम सुरू केले. दुरुस्तीचे काम सुरू असतानाच कचऱ्याचा प्रचंड भार असलेल्या त्या ट्रॉलीचा समतोल अचानक बिघडला. जॅकवरून ट्रॉली सटकली आणि किशोर यांना सावरण्याची संधी मिळण्यापूर्वीच ती अवजड ट्रॉली त्यांच्या अंगावर कोसळली. या भीषण अपघातात ट्रॉलीखाली दबले गेल्याने किशोर यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच अवधूतवाडी पोलिस ठाण्याचे पथक तातडीने सावरगड कचरा डेपोत दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवला आहे. प्राथमिक पाहणीत हा एक दुर्दैवी अपघात असल्याचे पोलिसांनी सांगितले असून, सध्या 'अकस्मात मृत्यू'ची नोंद करण्यात आली आहे. या घटनेने कचरा डेपोतील कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. अपघातग्रस्त ट्रॅक्टर यवतमाळ नगर परिषदेच्या मालकीचा होता की एखाद्या खासगी कंत्राटदाराचा, याबाबत अद्याप अधिकृत स्पष्टता मिळालेली नाही. 'पोलिस तपासानंतरच ट्रॅक्टरच्या मालकी हक्काबाबत माहिती समोर येईल,' असे प्रशासनाकडून सांगण्यात आले. उमसरा येथील रहिवासी असलेले किशोर शेंडे हे अत्यंत कष्टाळू होते. आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी ते काम करत होते, मात्र या भीषण अपघाताने एका कष्टकरी कुटुंबाचा आधार हिरावला गेल्याने सावरगड परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# ग्रंथालये ही समाज आणि संस्कृतीच्या प्रसाराची केंद्रे!

## पालकमंत्री ना. संजय राठोड; डिजिटल युगातही पुस्तकांचे महत्त्व अबाधित

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.२५ : 'आजच्या डिजिटल युगात माहितीचे अनेक स्रोत उपलब्ध असले तरी ग्रंथालयांचे महत्त्व आजही अबाधित आहे. ग्रंथालये ही केवळ पुस्तकांचे संग्रह नसून ती समाज, संस्कृती आणि ज्ञानाच्या प्रसाराची प्रमुख केंद्रे आहेत,' असे प्रतिपादन पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी केले.**




जिल्हा ग्रंथालय संघ यवतमाळच्या एक दिवसीय वार्षिक अधिवेशनाचे उद्घाटन आज वाघापूर येथे पार पडले. ज्ञानदीप सार्वजनिक वाचनालय व अशोक सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार, बाळासाहेब धांदे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कविता महाजन, प्रभाकर भोगे, जिल्हाध्यक्ष राजेश चव्हाण, सचिव प्रशांत पंचभाई, संजय कोल्हे, विनोद देशपांडे, मनोज रणखांब, अशोक फुटाणे यांसह ग्रंथप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकमंत्री ना. राठोड पुढे म्हणाले की, ग्रंथालयांच्या माध्यमातून समाज उभारणीचे मोलाचे काम होत आहे. ग्रंथालयातील पायाभूत सुविधा आणि कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या व समस्या सोडवण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा सुरू आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हा ग्रंथालय संघाचे सचिव प्रशांत पंचभाई यांनी प्रास्ताविकातून ग्रंथालयांच्या विविध समस्या व मागण्या पालकमंत्र्यांसमोर मांडल्या.

> **'ग्रंथालयांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन तेथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रे सुरू केल्यास भावी पिढीसाठी ती अधिक उपयुक्त ठरतील. ग्रंथालयांचे प्रश्न हे समाजाचे प्रश्न आहेत, ही भूमिका ठेवून ते मार्गी लावले जातील.'**
>
> **-ना.संजय राठोड, पालकमंत्री, यवतमाळ जिल्हा.**

# मंदिरातील दानपेटी फोडणारा चोरटा अटकेत

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**घाटंजी, दि. २५ :** येथील श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक केंद्रात काही दिवसांपूर्वी अज्ञात चोरट्याने मंदिराचे कुलूप तोडून दानपेटीतील १५ हजार रुपयांची रोकड लंपास केली होती. याप्रकरणी घाटंजी पोलिसांनी तपास चक्रे फिरवून तांत्रिक माहितीच्या आधारे राजुरवाडी येथील संशयित आरोपी तानबाजी मडावी (२८) याला अटक करून चोरीचा यशस्वी उलगडा केला.

मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराचे कुलूप लोखंडी सळईने तोडून चोरट्याने आत प्रवेश केला होता. दानपेटी फोडल्याच्या घटनेमुळे भाविकांमध्ये संतापाचे वातावरण होते. पोलिसांनी आजूबाजूच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे तानबाजी मडावी याला ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखवताच त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून चोरीला गेलेली १५ हजार रुपयांची रोकड जप्त केली आहे. तपासादरम्यान आरोपीने इतर ठिकाणीही चोऱ्या केल्याचे उघड झाले आहे. या कारवाईमुळे मंदिर प्रशासनाने सुटकेचा निश्वास टाकला असून नागरिकांनी पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक केले आहे. परिसरात अशा घटनांना आळा घालण्यासाठी सुरक्षा व्यवस्था वाढवण्याचे आवाहन पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास घाटंजी पोलिस अधिक गांभीर्याने करीत आहेत.

## महत्वाचे

### जागतिक क्षयरोग दिनानिमित्त रॅली

**यवतमाळ :** जागतिक क्षयरोग दिनानिमित्त अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे यांच्या उपस्थितीत भव्य रॅली व मार्गदर्शन कार्यक्रम पार पडला. जिल्हा महिला व बाल रुग्णालयातून सुरू झालेल्या या रॅलीद्वारे नागरिकांना क्षयरोगाची लक्षणे व उपचारांबाबत माहिती देण्यात आली. जिल्हा परिषद सभागृहात मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करून जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे यांनी क्षयरुग्णांना मानसिक आधार देण्याचे आवाहन केले. जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सागर जाधव यांनी विविध योजनांची माहिती दिली. यावेळी डॉ. क्रांतीकुमार नावंदीकर, डॉ. नितेश उपाध्याय, डॉ. मनोज तगडपल्लीवार, डॉ. नाझिया काझी आणि डॉ. हर्षलता गायनार उपस्थित होते.

### दिव्यांग लाभार्थ्यांच्या अनुदानात वाढ

**यवतमाळ :** यवतमाळ नगर परिषद व तहसील कार्यालय अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या संजय गांधी, इंदिरा गांधी आणि श्रावणबाळ योजनांमधील दिव्यांग लाभार्थ्यांच्या मासिक अनुदानात शासनाने एक हजार रुपयांची वाढ केली आहे. आता लाभार्थ्यांना दरमहा दोन हजार ५०० रुपये थेट बँक खात्यात वितरित केले जाणार आहेत. तहसीलदार डॉ. योगेश देशमुख व नायब तहसीलदार राजेश चिंचोरे यांनी लाभ सुरळीत राहण्यासाठी 'वैश्विक दिव्यांग ओळखपत्र' आधारशी जोडण्याचे आवाहन केले आहे. ऑफलाईन प्रमाणपत्र असलेल्या लाभार्थ्यांनी आठ दिवसांत युडीआयडी कार्ड काढून घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

### जनगणनेसाठी जिल्हास्तरीय प्रशिक्षण

**यवतमाळ :** येथे जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या अध्यक्षतेखाली २३ ते २५ मार्च २०२६ या कालावधीत जनगणना २०२७ साठी तीन दिवसीय जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला. आगामी डिजिटल जनगणना प्रक्रिया अचूक आणि नियोजित वेळेत राबवण्यासाठी या शिबिरात जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि मुख्याधिकाऱ्यांना प्रशासकीय समन्वयाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणात निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, तहसीलदार विद्या शिंदे आणि मुंबईचे सहसंचालक मयूर पवार यांनी मार्गदर्शन केले. व्ही. एस. दीक्षित व जतीन माहेश्वरी यांनी घरयादी, माहिती संकलन आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यावर सादरीकरण केले. जनगणनेच्या कामात पारदर्शकता आणि गोपनीयता राखण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले

## निधन

### इंदुमती डोंगरे



**यवतमाळ :** येथील आंजनेय सोसायटीतील ज्येष्ठ नागरिक इंदुमती मधुकर डोंगरे (वय ९३) यांचे बुधवारी (दि. २५) निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर येथील वडगाव मोक्षधामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात जयंत व अविनाश ही मुले, प्रतिभा मांडवगणे व शिरीष पांडे या मुली आणि बराच मोठा आप्त परिवार आहे.